**Regd. No.** RNP / NP City / 183 / 2009-20011

**ह्या एप्रिल-मे जोडअंक असल्याने मे चा स्वतंत्र अंक निघणार नाही.**

## ह्या अंकात


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्रद्धेची तपासणी | रा.चिं.ढेरे | 1 |
| 2. | संपादकीय | प्रमोद सहस्रबुद्धे | 3-5 |

**भाग एक : संकल्पनात्मक**

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | श्रद्धा प्रमाण आहे का? | दि.य.देशपांडे | 6 |
| 4. | श्रद्धा आणि अंधश्रद्धा | नरेन्द्र दाभोळकर | 11 |
| 5. | अंधश्रद्धा : काही संकल्पना | प्रमोद सहस्रबुद्धे | 19 |

**भाग दोन : विवरणात्मक**

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | मंत्र मांत्रिक व चमत्कार एक बातचीत : मच्छिंद्र मुंडेंची मुलाखत | | 22 |
| 7. | भविष्यकथन | सुहास शिंगारे | 27 |
| 8. | भूत | संजय सावरकर | 35 |
| 9. | आरोग्य आणि अंधश्रद्धा | निखिल जोशी | 39 |
| 10. | आधुनिक अंधश्रद्धा, दंतकथा, मिथके इ. | उत्तरा सहस्रबुद्धे | 52 |
| 11. | धार्मिक अंधश्रद्धा | प्रमोद सहस्रबुद्धे | 57 |

**भाग तीन : कार्यकर्ते : व्यक्ती व संघटना**

| | | | |
|---|---|---|---|
| 12. | अंधश्रद्धा-निर्मूलन चळवळीचा वेध | प्रमोद सहस्रबुद्धे | 63 |
| 13. | अंधश्रद्धा-निर्मूलन कायद्याची चळवळ | प्रभा पुरोहित | 65 |
| 14. | महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समिती | प्रभा पुरोहित | 74 |
| 15. | चिपळूणकर | प्रभा पुरोहित | 79 |
| 16. | आगरकर | प्रभा पुरोहित | 80 |
| 17. | र.धों. कर्वे | प्रभा पुरोहित | 81 |
| 18. | अब्राहम कोवूर | प्रभा पुरोहित | 87 |
| 19. | जोतीराव फुले यांचे अंधश्रद्धा-निमूलन कार्य | भा. ल. भोळे | 90 |
| 20. | गाडगे महाराजांचे अंधश्रद्धा-निर्मूलन कार्य | श्रीकांत तिडके | 95 |
| 21. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अंधश्रद्धा-निर्मूलन | रणजित परदेशी | 99 |

**भाग चार : एक सर्वेक्षण :**

| | | | |
|---|---|---|---|
| 22. | श्रद्धांचे सर्वेक्षण | प्रमोद सहस्रबुद्धे | 103 |
| 23. | लेखक परिचय | — | 119 |


हे मासिक भरत मोहनी यांनी श्याम ब्रदर्स, रामबाग रोड, गणेशपेठ, नागपूर येथे छापून मोहनीभवन, धरमपेठ, नागपूर 440 010 येथे प्रकाशित केले. दूरभाष : भरत मोहनी : 2558128

दिवाकर मोहनी : 2558128, **सर्व पत्रव्यवहार मोहनी-भवन, धरमपेठ, नागपूर - 440 010 या पत्त्यावर करावा.**

ह्या मासिकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



XXI-1-2

एप्रिल-मे 2010

वर्ष 21-अंक 1-2

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

# अंधश्रद्धा विशेषांक

## श्रद्धेची तपासणी

परंपरा आणि परिवर्तन यांची सहृदय चिकित्सा मी आयुष्यभर करत आलो आहे. मी सश्रद्ध माणूस आहे. पण रूढ कर्मकांडांपलिकडे जाण्याचा आणि ‘कर्माचे डोळे चोख हो आवे’ या ज्ञानदेवांच्या इशाऱ्याला सजगपणे स्वीकारत पुढे जाण्याचा प्रयत्न मी आयुष्यभर करत आलो आहे. श्रद्धेची तपासणी करण्याची वेळ आली तेव्हा ती करायला मी कधी कचरलो नाही आणि सांप्रदायिक श्रद्धांनी घातलेल्या मर्यादा ओलांडून, संशोधनाने समोर ठेवलेल्या सत्याकडे जाताना मी कधी पाऊल मागे घेतले नाही.

[ रा.चिं.ढेरे यांनी पुण्यभूषण पुरस्कार स्वीकारताना केलेल्या भाषणातून ]

## *नासदीय सूक्त*

कुणास खरे ठाऊक? कोण सांगू शकेल?
कधी ही सृष्टी आली?
हे जग आपले आपण तयार झाले का नाही?
देव तर त्यानंतर आले.
जो स्वर्गातून याकडे बघतो त्यालाच हे माहीत असेल,
कदाचित नसेलही.

(*नासदीय सूक्त ऋग्वेद* 10,129)

## *बुद्ध आणि त्याचा धम्म*

ईश्वर कसा अस्तित्वात आला याला उत्तर नाही.
जर कोणी महान सृष्टिकर्ता असेल
आणखी तो न्यायी व दयाळू असेल
तर मग जगात अन्याय का फैलावतो?

(*बुद्ध आणि त्याचा धम्म* : बाबासाहेब आंबेडकर)

**संस्थापक-संपादक** **दि. य. देशपांडे**

**अतिथि-संपादक** **प्रमोद सहस्रबुद्धे**

**संपादक मंडळ**
नंदा खरे (कार्यकारी), सुनीती देव, दिवाकर मोहनी

**सल्लागार-मंडळ :** प्रमोद सहस्रबुद्धे, उत्तरा सहस्रबुद्धे, प्रभाकर नानावटी, टी.बी. खिलारे, रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ, मिलिंद मुरुगकर, अश्विनी कुळकर्णी, लोकेश शेवडे, सुलक्षणा महाजन

विशेषांक रु. 75, किरकोळ अंक रु. 25.00 (टपालखर्च वेगळा)
वार्षिक वर्गणी : व्यक्तीला रु. 175.00, संस्थेला रु. 200.00
परदेशीय वर्गणीदारांकरिता वार्षिक वर्गणी : व्यक्तीला 25 डॉलर, संस्थेला 30 डॉलर (अधिक वटणावळ)
दहा वर्षांची आगाऊ वर्गणी देणाऱ्यांस बारा वर्षे अंक मिळेल.
वर्गणी कृपया डिमांड ड्राफ्टने, मनीऑर्डरने किंवा चेकनेच पाठवावी.
परगावाहून चेक पाठविल्यास वटणावळीकरिता रु. 50.00 जास्त पाठवावेत. व्ही.पी.ची पद्धत नाही.
मनीऑर्डर, चेक, ड्राफ्ट इ. आजचा सुधारकच्या नावे नागपूर पत्त्यावर पाठवावे.
वर्गणी भरण्याची ठिकाणे :
पोस्टाने आणि नागपूरमध्ये : मोहनीभवन, धरमपेठ, नागपूर-440 010.
पुण्यामध्ये रोखीने : मिळून साऱ्याजणी, 40 ब, भोंडे कॉलनी, देवनाळकरांचा बंगला,
अलुरकर म्यूझिक हाऊससमोर, कर्वे रोड, पुणे - 411 004



# संपादकीय

बरेचदा विवेकवादी माणसाला जागोजाग पसलेल्या अंधश्रद्धेचा प्रश्न बिनमहत्त्वाचा वाटतो. याचे कारण अंधश्रद्धेचे मूळ भोळसरवृत्ती हे आहे. जगातल्या अंधश्रद्धा एके दिवशी संपल्या तरी भोळेपणा चालूच असल्याकारणाने नव्या अंधश्रद्धा निर्माण होतील. शिवाय जुन्या व नव्या अंधश्रद्धांमध्ये समाजहितास घातक असण्याच्या बाबतीत डावे उजवे करता येणार नाही. मग अंधश्रद्धांचा प्रश्न गैरमहत्त्वाचा ठरतो. अंधश्रद्धांचे मूळ बरेचदा भोळेपणात असले तरी त्यांचा प्रचार हा त्यातला नाही. अंधश्रद्धेचे प्रचारक, मग ते पारंपरिक अंधश्रद्धेचे असोत वा आधुनिक अंधश्रद्धेचे असोत, काही हेतू ठेवून हे काम करतात. खूपदा हा हेतू आपली पोळी भाजण्याचा असतो. अशा प्रचाराविरुद्ध आघाडी उघडणे हे म्हणून महत्त्वाचे ठरते. या अंकातील मजकूर विवेकवाद्यांना अशी आघाडी उघडण्यास मदत करेल असे वाटते.

नुकतेच अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार येथे राज्यस्तरीय विज्ञानप्रदर्शन आयोजित केले गेले होते. या प्रदर्शनातील पहिले बक्षीस एस.टी.धावत असताना त्यावर पवनचक्की फिरवून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रयोगाला मिळाले. अशी फुकटची ऊर्जा मिळत नसते हे विज्ञानाचे तत्त्व येथे साफ अमान्य केले होते. याच प्रदर्शनात गोमूत्रापासून बनवलेले व कर्करोगाचा प्रतिकार करणारे औषध ठेवले होते. (लोकसत्ता 28 फेब्रुवारी) याच वृत्तात ‘ब्रह्मांडीय शक्तीपासून निर्माण केलेल्या जैवऊर्जेचा...’ असा एक अंधश्रद्धपूर्ण वाटणारा प्रयोग दिलेला आहे. काही वर्षांपूर्वी आय.आय.टी.त तंत्रउत्सवात (टेकफेस्ट) दीपक राव यांचे मनःशक्तीचे प्रयोग, परामानसशास्त्राविषयीची भाषणे झाली होती. याच उत्सवात दोन वर्षांपूर्वी एक निर्माणवादी माणसाचे भाषण झाले होते. केवळ सुशिक्षितच नाही तर विज्ञानाचे शिक्षक, तंत्रज्ञानाचे विद्यार्थी आणि वैज्ञानिक हेही अंधश्रद्धेचे शिकार होताना दिसतात. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे नावाजलेल्या ठिकाणांहून मिळालेली चुकीची माहिती. मिथ्याविज्ञान (pseudoscience) या प्रकारात अंधश्रद्धांना वैज्ञानिकतेचा आव आणला जातो. मिथ्यावैज्ञानिक विज्ञानाची भाषा बोलत अंधश्रद्धेचा प्रसार करीत राहतात. यामुळे विवेकी व्यक्तींची फसगत होताना बरेचदा दिसते. होमिओपॅथी, ॲक्युप्रेशर/पंक्चर, चुंबकचिकित्सा, संमोहन, निर्माणवादी (creationists जे उत्क्रांतीला खोटे ठरवू पाहत आहे.) असे कितीतरी प्रकार मिथ्याविज्ञानाची उदाहरणे म्हणून देता येतील.

पारंपरिक विज्ञान हा एक सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न. त्यात ती आयुर्वेद वा योगासारखी आपली परंपरा असेल तर अजून जिव्हाळ्याची. पारंपरिक विज्ञानांनी आधुनिक विज्ञानाची पायाभरणी केली असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. ‘किमया’ (अल्केमी) ही एक त्यातीलच बाब. किमयाकारांनी लोखंडाचे सोने करण्याचे अथक प्रयत्न केले.

**प्रमोद सहस्रबुद्धे**

त्यांतून आधुनिक रसायनशास्त्राला खूप माहिती मिळाली. ग्रहज्योतिषकारांनी भविष्य जाणून घेण्याच्या प्रयत्नात कित्येक शतके अवकाशातल्या अचूक नोंदी ठेवल्या. याचा फायदा कोपर्निकसला झाला एवढेच नाहीतर अजूनही होतो. आयुर्वेद, युनानी, चिनी अशा अनेक पारंपरिक विज्ञानांतून आधुनिक वैद्यकशास्त्राने अनेक औषधे मिळविली. पारंपरिक विज्ञाने ही निश्चित उपयोगी आहेत पण ती सर्वथा स्वीकारार्ह नाहीत. पारंपरिक विज्ञाने ही उपयोगी असल्याने त्यांचे जतन केले पाहिजे पण त्यांचा अंगीकार जपून व तपासून केला पाहिजे. सरकारी पातळीवर अशी तमा न बाळगता कारभार होताना दिसतो. त्यामुळे अनेक आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी वैद्य तयार होतात. हे तयार झालेले वैद्य बहुतांशी आपले परंपरागत विज्ञान न जपता आधुनिक वैद्यकशास्त्रात येतात. सरकार सूट देते म्हणून आयुर्वेदिक औषधांचा प्रचार प्रसार व्यावसायिक कंपन्या करतात. बरीचशी अशी औषधे मूळ आयुर्वेदात नसतात. हे सर्व पारंपरिक विज्ञाने जपण्याच्या उद्देशाखाली चालते. या अंकात जाहीर झालेल्या सर्वेक्षणातून असे लक्षात येते की आयुर्वेदाला संपूर्ण विज्ञान मानणारे जवळपास दोन तृतीयांश लोक आहेत. सुशिक्षित वर्गातदेखील हे प्रमाण जास्त आहे.

हा अंक जास्तीत जास्त माहितीपर व्हावा असे ठरवले होते. म्हणून अंधश्रद्धांची माहिती व त्याविरुद्ध लढलेल्यांची व लढणाऱ्यांची माहिती येथे जास्त सापडेल. अंधश्रद्धा नेमक्या कुठल्या, कुठल्या अंधश्रद्धांना अग्रक्रम द्यायचा असे वाद विवेकवाद्यांमध्ये नेहमीच दिसतात. या अंकातील काही लेखांमुळे हे वाद समोर आलेले दिसतील.

हा अंक तयार होण्यापूर्वी मनात जो आकृतिबंध होता तो या अंकामुळे पूर्ण साध्य झाला असे वाटत नाही. महाराष्ट्रातील काही महत्त्वाच्या व्यक्तींबद्दल यात माहिती यायला हवी होती. शाहू महाराज, शंकरराव किर्लोस्कर, धर्मानंद कोसंबी इत्यादींचा परिचय यायला हवा होता. त्याचबरोबर अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती व श्याम मानव यांचा व्यवस्थित कार्यपरिचय करून देणे गरजेचे होते. विज्ञानवादी चळवळीतील लोकविज्ञान, मराठी विज्ञानपरिषद यांचे संस्थात्मक काम बरेच आहे. आजचा सुधारकचे हे एकविसावे वर्ष. महाराष्ट्रातील पूर्णतः विवेकवादी चळवळीचाही (अंनिस) काळ याहून थोडासाच जास्त आहे. या मासिकाने केलेली तात्त्विक पायाभरणी मोलाची आहे. त्याबाबतचा आढावा घेतला गेला नाही. हे सर्व मुद्दाम केले गेले नाही. प्रयत्न करूनही यातील काही लेख मिळाले नाहीत. नीरज साळुंखे यांनी या विषयात विशेष संशोधन करून डॉक्टरेट मिळवली आहे. जोहानस क्वॅक या युरोपियन संशोधकाने भारतीय विवेकवादी चळवळींवर आपला प्रबंध लिहिला आहे. या दोघांचे लेख या अंकात यायला हवे होते. नीरज साळुंखे यांच्या प्रबंधावरचे पुस्तक सध्या प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्या वेळी ही कसर कदाचित भरून काढता येईल. अंधश्रद्धा हा एक विश्वकोशासारखा पसारा असलेला विषय आहे. त्यामुळे त्यातील सर्व बाबींना एकाच अंकात न्याय देणे शक्य नव्हते. या विभागातील विषयांची निवड म्हणून कोणाला अपुरी वाटेल, पण त्याला नाईलाज आहे. सामान्यांच्या अंधश्रद्धांवर कमी जागा ठेवली आहे. सर्वेक्षणाचा भाग मूळ आकृतिबंधात नव्हता. यातून तयार झालेली आकडेवारी ही बरीच उपयोगी ठरेल असे वाटते.



महाराष्ट्रात व काही प्रमाणात भारततही विवेकवादी विचारांची एक सशक्त परंपरा आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळींमुळे ही परंपरा जनसामान्यांपर्यंत पोचत आहे. या चळवळींना जसे कार्यकर्ते आणि साधनसामुग्रीचे पाठबळ लागते तसेच ते वैचारिक व माहितीपर पाठबळ लागते. भारतीय चळवळींत कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग जास्त प्रमाणात दिसतो. त्यामुळे जनसामान्यांपर्यंत ते जास्त पोचतात. याउलट प्रगत देशांत वैचारिक व माहितीपर पाठबळ खूप जास्त दिसते. विवेकवादी विचार अधिक बळकट बनवायचे असतील तर येथील चळवळीतल्या कार्यकर्त्यांना वैचारिक व माहितीपर पाठबळ देणे जरुरी आहे. मराठीत स्केप्टिक्स डिक्शनरीसारखा समृद्ध कोश तयार व्हावा, *अर्बन लिजेंड*सारखे आधुनिक अफवांचा वेध घेणारे संस्थळ असावे, क्वॅकवॉचसारखे वैद्यकाच्या आसपास फिरणाऱ्या भोंदूंना गाठणारे उपक्रम असावेत असे वाटते.

संपादनाचे काम करण्याची ही माझी पहिलीच वेळ. सर्वाधिक जाणवलेली गोष्ट म्हणजे हातीची सत्ता (कात्री चालवण्याची) उपभोगणे आनंददायी नाही. लेखकांनी याबाबत चांगले सहकार्य केले. त्यांनी फारसे वाईट वाटून घेतले नसावे अशी मी आशा करतो. संपादनाच्या सर्व कामात मोठ्या प्रमाणात प्रभा पुरोहित, सुहास शिंगारे, निखिल जोशी आणि उत्तरा सहस्रबुद्धे यांनी आपुलकीने सहभाग घेतला. याशिवाय सर्वेक्षणात दीपक राखुंडे, मिलिंद गायकवाड, प्रसाद ठाकुर, चेतन शिंदे, सलिल जोशी, मुकुंद देसाई आदींनी उत्साहाने सहभाग घेतला.

*— प्रमोद सहस्रबुद्धे*

## आरोग्य आणि अंधश्रद्धा

1. मानवी ज्ञान हे इंद्रियानुभवापुरतेच मर्यादित आहे, ज्ञानाचा आशय हा इंद्रियानुभवाने पुरवलेला असतो. त्यामुळे अनुभवाची व्याप्ती हीच ज्ञानाची व्याप्ती असते.
2. देवरूषा नादे वैद्यास त्यागून, औषधावाचून किती मेले.

   *— म. ज्योतिबा फुले.*
3. केवळ काही हस्तलिखित पोथ्यांचा आधार आहे, एवढ्याचसाठी कशावरही अंधपणे विश्वास ठेवू नका. स्वतः सारासार विचार करा.

   *— भगवान गौतम बुद्ध*
4. मला कुठल्याही संतापेक्षा अनास्थेशियाचा शोध लावून वैद्यकीय शस्त्रक्रिया वेदनाहीन करणारा संशोधक अधिक मोठा वाटतो.

   *— पु.ल.देशपांडे*

# श्रद्धा प्रमाण आहे काय?

दि.य.देशपांडे

ज्ञान म्हणजे वस्तुस्थितीविषयी यथार्थ माहिती. 'ज्ञान' या शब्दाचा हा एकमेव अर्थ नाही. कारण संज्ञा किंवा जाणीव या अर्थानेही या शब्दाचा उपयोग होतो. या अर्थी कोणतीही जाणीव ज्ञानच आहे. त्यामुळे ज्ञानाचे दोन प्रकार आहेत, यथार्थ आणि अयथार्थ, किंवा सत्य आणि मिथ्या ज्ञान असेही म्हणतात. पण या लेखात 'ज्ञान' हा शब्द सत्य ज्ञान या अर्थानेच वापरला आहे.

ज्ञानप्राप्तीची अनेक साधने आहेत. त्यांना प्रमाणे म्हणतात. उदा. ज्ञानेंद्रिये ही एक प्रकारची प्रमाणेच आहेत. कारण त्यांनी आपल्या शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या संवेद्य गुणांचे ज्ञान होते. ज्ञानेंद्रियांनी आपण कधी फसविले जात नाही असे नाही. प्रकाश अपुरा असला, किंवा वस्तू दूर किंवा सूक्ष्म असली तर तिचे ज्ञान स्वच्छ आणि स्पष्ट होत नाही. कानांनी अनेकदा एखादा शब्द जसाच्या तसा ऐकू येत नाही. वेगळाच शब्द कानांवर पडला असे वाटते. असेच इतर इंद्रियांचेही होते. पण अशी फसगत शक्य असली तरी तिच्यावर उपाय फिरून डोळा, कान इत्यादि इंद्रियांचा उपयोग अधिक काळजीने करू शकतो. कित्येकदा इंद्रियांनी मिळालेले ज्ञान दुरुस्त करून घ्यावे लागते. उदा. पाण्यात अर्धवट बुडालेली सरळ काठी पाण्याच्या पृष्ठभागाखाली वाकलेली दिसते, पण स्पर्शाला तसे जाणवत नाही. एका इंद्रियाला अन्य इंद्रियांचे साह्य घेऊन ऐंद्रिय ज्ञान परिष्कृत करून घ्यावे लागते. पण महत्त्वाची गोष्ट ही की इंद्रियांची जागा घेऊ शकेल असे दुसरे साधन नाही. आंधळ्याला रंगाच्या ज्ञानावाचून जन्मभर वंचित राहावे लागते.

दुसरे ज्ञानसाधन किंवा प्रमाण म्हणजे बुद्धि किंवा तर्क, व्याघात म्हणजे एकच गोष्ट खरी आहे आणि त्याच वेळी खोटीही आहे हे शक्य नाही हे आपल्याला बुद्धीने कळते. म्हणजे जर एक विधान खरे असेल तर त्याचे व्याघाती विधान खरे असू शकत नाही. तसेच एक विधान खरे असेल तर इतर अनेक विधानेही खरीच असू शकतात हेही आपल्याला बुद्धीने किंवा तर्काने कळते. उदा. 'सर्व माणसे मर्त्य आहेत' हे विधान जर खरे असेल तर एखादा मनुष्य, उदा. अश्वत्थामा, अमर असेल हे संभवत नाही, आणि जर कोणी मनुष्य असेल तर तो मर्त्य असला पाहिजे हे मान्य करण्यावाचून गत्यंतर नसते.

इंद्रियांनी मिळणाऱ्या ज्ञानाला प्रत्यक्ष ज्ञान (किंवा नुसतेच प्रत्यक्ष) म्हणतात. प्रत्यक्ष आणि तर्क किंवा अनुमान यांच्या साह्याने आपल्याला जगाचे पुष्कळ ज्ञान होते. विज्ञानाची विराट इमारत त्याच दोन प्रमाणांच्या साह्याने उभारली गेली आहे.

प्रत्यक्ष आणि अनुमान यांच्याखेरीज तिसरे एखादे प्रमाण आहे काय? असेल असे वाटत नाही. पण एक साधन आहे असे काही तत्त्वज्ञ मानतात. ते म्हणजे शब्दप्रमाण किंवा आप्तवचन. एकदोन दर्शने सोडून दिली तर अन्य सर्व भारतीय दर्शने आप्तवचन किंवा शब्दप्रमाण प्रमाण म्हणून मान्य करतात. ती म्हणतात की वेदांचा शब्द सत्य असतो. असत्य असू शकत नाही. पश्चिमेत सुद्धा बायबलचा शब्द चुकीचा किंवा असत्य असू शकत नाही असे बऱ्याच प्रमाणात अजूनही मानतात. या मताचे प्रतिपादन असे आहे की काही शब्द (म्हणजे वाक्ये) निःसंदेह सत्य असतात, असत्य असू शकत नाहीत. ही वाक्ये कोणती? तर आप्ताने उच्चारलेली, आप्त म्हणजे यथार्थवक्ता, अशी त्यांची व्याख्या केली जाते. पण मुळात, ज्ञान असेल तर त्याचा उच्चार तो करील, ते त्याला कोणत्या मार्गाने मिळते? ते जर प्रत्यक्ष आणि अनुमान या साधनांनी त्याला मिळाले असेल, आणि नंतर ते शब्दाने त्याला तो अन्य लोकांना पुरवीत असेल, तर शब्दप्रमाण प्रमाण राहिले नाही. पण प्रत्यक्ष आणि अनुमान यांच्याहून भिन्न मार्गाने ते होत असेल, तर तो मार्ग कोणता असा प्रश्न निर्माण होतो.

या ठिकाणी शब्दप्रमाणाने मिळणारे ज्ञान आणि प्रत्यक्ष व अनुमान या लौकिक प्रमाणांनी मिळणारे ज्ञान यांत एक महत्त्वाचा भेद केला जातो. शब्दप्रमाणाने जे ज्ञान मिळाले ते प्रत्यक्ष आणि अनुमान यांच्या क्षेत्राबाहेर असते. आणि जे ज्ञान प्रत्यक्ष व अनुमान याने होते ते शब्दप्रमाणाने होऊ शकत नाही. त्यांची क्षेत्र वेगळी आहेत. शब्दाचे किंवा आप्तवचनाचे क्षेत्र म्हणजे परलोक, मरणोत्तर अस्तित्व, पुनर्जन्म, ईश्वर, स्वर्ग, नरक, मोक्ष इत्यादि लौकिक प्रमाणांच्या आटोक्यात नसलेल्या विषयांचे, लौकिक विषयांवर जर आप्तवचन बोलू लागले त्याच्या वचनांची शहानिशा करता येईल, आणि प्रसंगी ते चुकीचे आहे असे सिद्ध होऊ शकेल ही भीति असणार. परलोकाविषयी बोलताना ते खोटे पडण्याची भीति नसते. कारण परलोकाविषयी लौकिक प्रमाणे काहीच सांगू शकत नाहीत.

तेव्हा आप्तवचन प्रत्यक्ष आणि अनुमान या प्रमाणांनी खोटे ठरू शकेल ही भीति नसल्यामुळे ते पूर्ण सुरक्षित असते हे त्याचे मोठे बळ आहे. पण ते त्याचे एक मोठे दौर्बल्यही आहे. ते खरे आहे की खोटे हे आपल्याला कदापि कळू शकत नाही. पण या परिस्थितीत असे म्हणणे स्वाभाविक आहे की जे आप्तवचन खरे आहे की खोटे हे आपल्याला कळू शकत नसेल त्यावर विश्वास ठेवणे कितपत शहाणपणाचे आहे.

याला उत्तर म्हणून शब्दप्रमाणाला साक्षात्काराची जोड दिली जाते. साक्षात्कार म्हणजे प्रत्यक्ष दर्शन. डोळ्यांनी आपल्याला रंग दिसतात किंवा कानांनी आवाज ऐकू येतात हेही साक्षात्कारच होय कारण रंग प्रत्यक्ष दिसतात आणि आवाज प्रत्यक्ष ऐकू येतात. हे साक्षात्कार अर्थात् लौकिक साक्षात्कार झाले. पण त्याच प्रकारचे अलौकिक साक्षात्कारही आहेत असे साक्षात्कारवाद्यांचे म्हणणे आहे. या अलौकिक साक्षात्काराने लौकिक जगाहून अगदी वेगळ्या अशा परम सताचा परिचय होतो, आणि शब्दप्रमाणाची शहानिशा करण्याचे एक साधन उपलब्ध होते असे म्हणतात. ते साधन म्हणजे साक्षात्काराची साधना. प्राणायाम, योगासने इत्यादींच्या साह्याने साधना करून ते ज्ञान

कोणालाही प्राप्त करून घेता येते असे साक्षात्कारवादी म्हणतात. साक्षात्काराची साधना दीर्घ असते. आणि तिच्या शेवटी आपल्याला परम सताचा अनुभव येतो. ते दिव्य दर्शन असते, आणि त्यात मानवाचे पूर्ण समाधान होते. त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळून त्यांचे सर्व संशय फिटतात अशी ती अवस्था असते. साक्षात्कारवाद्यांना जर आपण विचारले की तुमचे म्हणणे खरे कशावरून? तर ते उत्तर देतील, 'तुम्हीही साधना करून पाहा. तुम्ही जर ती पुरी केलीत तर तुम्हालाही साक्षात्कार होईल. मग शब्दाने मिळणारे जे ज्ञान आहे ते सर्व खरे आहे अशी तुमची खात्री पटेल.'

हे म्हणणे प्रथमदर्शनी सयुक्तिक दिसते. त्यानुसार आवश्यक ती साधना केल्यावर साक्षात्कार होतो, आणि त्यांना सर्व संशयांची उत्तरे मिळून त्यांना कसलाही प्रश्न शिल्लक राहात नाही असे जे म्हणतात ते खरे असू शकेल, पण ते खरे आहे असे म्हणता येण्याकरिता सर्व साक्षात्कार एकाच आशयाचे असावे लागतील. जर मला एक प्रकारचा साक्षात्कार झाला, आणि तुम्हाला वेगळाच साक्षात्कार झाला तर कोणाचे म्हणणे खरे मानायचे असा प्रश्न उद्भवेल, आणि त्याला उत्तर देणे अशक्य होईल.

परंतु साक्षात्कारात एकवाक्यता आढळत नाही ही वस्तुस्थिती आहे. अद्वैत वेदान्त तत्त्वज्ञावर विश्वास ठेवणाऱ्याला एक प्रकारचा साक्षात्कार होतो, तर विशिष्टाद्वैती मनुष्याला वेगळ्याच आशयाचा साक्षात्कार होतो. रामभक्त आणि कृष्णभक्त यांना रामाचा आणि कृष्णाचा साक्षात्कार होतो, तर ख्रिस्त्याला येशू आणि मेरी यांचा होतो. म्हणजे ज्या तत्वज्ञानाची पर्श्वभूमी साधकाला असते, त्यानुसार साक्षात्काराचा आशय तयार होतो. याला साक्षात्कारांची एकवाक्यता म्हणता येणार नाही. उलट त्याच्यावरून असे दिसून येते की काही तीव्र भावनांच्या व्यक्तींना आपला पूर्वेतिहास आणि परिस्थिती यांनी तयार झालेल्या अतींद्रिय गोष्टींचा साक्षात्कार होत.

यातून उद्भवणारा दुसरा मुद्दा असा की साक्षात्कार किंवा समाधि हा अनुभव-प्रकार घडून येतो हे नाकारता येत नाही. पण त्या अनुभवाचे विश्लेषण करून त्याचे स्वरूप काय आहे ते निश्चित केले पाहिजे. हा अनुभव ज्ञानदायी (cognitive) अनुभव आहे काय हे निश्चित करणे अवश्य आहे. सर्वच अनुभव ज्ञानदायी नसतात. इंद्रियांनी येणारे अनुभव ज्ञानदायी असतात असे आपण समजतो, पण पोटदुखी किंवा डोकेदुखीचा अनुभव वेगळा असतो. किंवा आपल्याला परीक्षेत पास झाल्याचा आनंद झाला, किंवा ती गमावल्याने आपण दुःखी झालो, तर हे अनुभव ज्ञानदायक नाहीत असे आपण म्हणतो, कारण त्यांनी आपल्याला वस्तुस्थितीचे ज्ञान होत नाही. म्हणजे अनुभव आणि त्याचा ज्ञानात्मक आशय असा भेद करावा लागतो. असा भेद केल्यावर असे लक्षात येते की ज्ञानात्मक अनुभव खरा किंवा कोटा असू शकतो. जागेपणी आपल्याला जो अनुभव येतो, तसाच झोपेत असताना स्वप्नातही येऊ शकतो. पण त्यांपैकी जागेपणीचा अनुभव खरा, आणि स्वप्नातील अनुभव भ्रामक असे आपण समजतो. म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानात्मक अनुभव खरा किंवा खोटा, यथार्थ किंवा अयथार्थ असतो. अनुभव आणि त्यापासून मिळणारे ज्ञान



हा भेद जर साक्षात्काराला लावला तर साक्षात्काराचा अनुभव आणि त्याचा विषय यांत भेद करता येईल. पण तो केल्यावर पुढील प्रश्न उद्भवेल : 'साक्षात्कारात किंवा समाधीत आपल्याला वास्तवाच्या सामान्यपणे अज्ञात असलेल्या अंगाचा अनुभव येतो, असे साक्षात्कारवादी म्हणतात. पण तो अनुभव जसा खरा असू शकेल तसाच तो भ्रामकही असू शकेल. तसे असेल तर साक्षात्कार भ्रामक आहेत असे म्हणावे लागेल', आणि भिन्न साक्षात्काराच्या विषयांत आढळणाऱ्या तफावतीमुळे तो ज्ञानात्मक नसावा, निदान तो खरा नसावा. अशी शंका येणे रास्त आहे.

हा अनुभव ज्ञानात्मक नसावा असे मानण्याचे आणखी एक कारण म्हणजे असे अनुभव धार्मिक साक्षात्कारातच येतात असे नसून, अन्य क्षेत्रांत सुद्धा जिथे ते येतात आणि तिथे ते ज्ञानदायी नसतात हे स्पष्ट असते. उदा. laughing gas मुळे अशा प्रकारची भावनात्मक स्थिती निर्माण होते असे विख्यात मानसशास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ विल्यम जेम्सने म्हटले आहे.

या सर्व कारणास्तव साक्षात्कार हा अनुभव ज्ञानात्मक अनुभव आहे ही कल्पना त्याज्य मानली पाहिजे.

**श्रद्धा हे प्रमाण आहे काय?**

माझ्या मित्राची एक मुलगी मला म्हणाली की संतोषी मातेवर तिची श्रद्धा आहे. या श्रद्धेचे समर्थन काय आहे या प्रश्नाला उत्तर देण्याची जरूर नाही असे तिचे मत होते. श्रद्धा आहे एवढे म्हणणे तिच्या समर्थनार्थ पुरे आहे अशी तिची समजूत होती आणि तिचेच नाही तर अनेक विद्वान लोकांचेही असेच म्हणणे असावे जसे दिसते. त्यांच्यापैकी तर काही स्पष्टच म्हणतात की श्रद्धा हे ज्ञानसाधन आहे, प्रमाण आहे. असे इंद्रियांनी रंग, आवाज इत्यादींचे ज्ञान होते, किंवा जसे एक विधान खरे असेल तर अनेक दुसरी विधाने खोटी असू शकत नाहीत हे ज्ञान तर्काने होते, तसेच श्रद्धेने इंद्रिये आणि अनुमान यांना आध्यात्मिक विषयांचे ज्ञान होते असे ते म्हणातात. म्हणूनच गुरूवर श्रद्धा ठेवा, वेदांवर श्रद्धा ठेवा असा आग्रह धर्मात केला जातो.

एखाद्या विधानावर विश्वास ठेवणे आणि ते खरे आहे असे मानणे एकच आहे. एखादे विधान खोटे आहे असे जर आपल्याला पटले असेल, तर त्याच्यावर विश्वास ठेवणे अशक्य असते. अमुक विधानावर माझा विश्वास आहे, पण ते खोटे आहे असे मला माहीत आहे असे म्हणणे वदतोव्याघाताचे उदाहरण आहे. परंतु एखादे विधान आपल्याला खरे वाटले किंवा आपला त्यावर विश्वास आहे, म्हणून ते खरे असेलच असे नाही. विश्वास कितीही पक्का असला तरी त्याने ज्या विधानावर विश्वास आहे ते विधान खरे होत नाही. विश्वास पक्का किंवा डळमळीत असणे हा मनाचा गुण आहे. परंतु विश्वास खरा आहे की खोटा ते वस्तुस्थितीने ठरते. उदा. सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असे आपल्याला प्रत्यक्ष दिसते, आणि हजारो वर्षे मनुष्याचा विश्वास होता की ते खरे आहे. तो खोटा मानल्याबद्दल गॅलिलिओला तुरुंगात जावे लागले, आणि तिथेच त्याचा अंत झाला. पण पुढे विज्ञानाची

**दि.य.देशपांडे**

प्रगती झाल्यानंतर तो विश्वास खोटा आहे हे सिद्ध झाले, आणि खुद्द चर्चलाही ते कबूल करावे लागते. तेव्हा विश्वास असणे किंवा तो पक्का असणे वेगळे, आणि तो खरा असणे वेगळे.

म्हणजे श्रद्धा (म्हणजे अर्थात् विश्वास) कितीही निःशंक असली तरी ती खरी आहे की नाही हा प्रश्न शिल्लकच राहतो, आणि त्याचे उत्तर ती भ्रामक आहे असे असू शकते हे लक्षात ठेवले पाहिजे. भ्रामक श्रद्धेची उदाहरणे आपल्या प्रत्येकाच्या अनुभवाची आहेत. आपण समजतो की अमुक महाराज ईश्वराचा अवतार आहेत आणि त्याचे बोल कधी खोटे ठरत नाहीत, परंतु केव्हा तरी महाराजांची लबाडी उघडी पडते. पण अशा वेळी देखील श्रद्धावान म्हणतो की हा मनुष्य लुच्चा होता. आमचे महाराज असे नाहीत. आणि अशा रीतीने हा व्यवहार चालू राहतो.

विश्वास किंवा श्रद्धा खरा नसेल तर ती ठेवणे चूक आहे हे उघड आहे, आणि ते चूक एवढेच नव्हे तर हानिकारकही असू शकेल. चुकीच्या विश्वासांचे विश्वासघात सर्वांचा परिचयाचे आहेत. पण एखादी श्रद्धा चुकीची आहे हे आपल्याला कसे कळू शकेल? या प्रश्नाचे उत्तर बरेच गुंतागुंतीचे आहे. पण इतके निश्चित की विश्वास चुकू शकतो. आणि म्हणून श्रद्धा ज्ञानसाधन आहे हे असत्य आहे हे उघड आहे. लौकिक जीवनात कोणी जर एखादे विधान खरे असल्याचा दावा केला तर आपण स्वाभाविकच विचारतो की 'कशावरून?' आणि त्याने जर उत्तर दिले की 'माझी तशी श्रद्धा आहे म्हणून', तर आपण ते वेडेपणाचे समजू आणि तीच गोष्ट परलोकविषयीच्या श्रद्धेचीही आहे. ती कधी चुकत नाही हे कदापि न पटणारे आहे.

म्हणून श्रद्धेलाही ती खरा आहे हे सिद्ध करावे लागेल. अशा स्थितीत श्रद्धा ज्ञानसाधन आहे, किंवा प्रमाण आहे, ते अमोघ ज्ञानसाधन आहे, हे म्हणणे वेडपणाचे आहे हे सांगणे नकोच.

[*आजचा सुधारक,* वर्ष 8 वे, फेब्रुवारी 1998 (अंक 8/11) मधून पुनर्मुद्रित]

□□

> ''देव, धर्म व अध्यात्म या संकल्पनाबाबत नास्तिक जेवढा जागरूक आहे, तेवढाच तर्कबुद्धी व विज्ञान याबाबत अंधश्रद्ध आहे.''
>
> – ***विजय बेडेकर***



# श्रद्धा आणि अंधश्रद्धा

*नरेन्द्र दाभोलकर*

अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या चळवळीमध्ये सगळी चळवळ या विषयाभोवती फिरत असते. आणि ज्या काही शिव्या आणि ओव्या आम्हांला चळवळीमध्ये मिळत असतात, त्याचा याच विषयाशी संबंध असतो. काही जणांना असे वाटते, आमचे काम अयोग्य आहे, अनिष्ट आहे, अरास्त आहे. काही जणांना असे वाटते की, हे काम झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने आपला देश 21 व्या शतकात पदार्पण करणार नाही. आणि काहीजणांना असे वाटते की, अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या नावाखाली आम्ही देव, धर्म, परंपरा बुडवत आहोत. ते म्हणतात, 'अंधश्रद्धा म्हणजे काय? अंधश्रद्धा म्हणजे श्रद्धेच्या निखाऱ्यावरची राख. राख उडवून लावली की आतला निखारा पुन्हा पूर्वीसारखा तेजस्वी होतो. त्याप्रमाणे अंधश्रद्धेची राख उडवून लावण्याची गरज आहे. पण त्याचवेळी राख उडवण्याच्या कृतीत तो निखाराच विझला जाणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे.'

## श्रद्धेची सापेक्षता

हे असे घडते याचे कारण —— एकाची श्रद्धा असते, ती दुसऱ्याची अंधश्रद्धा असते आणि तिसऱ्याची अंधश्रद्धा असते, ती चौथ्याची जीवन-मरणाची श्रद्धा असते, आणि म्हणूनच श्रद्धा आणि अंधश्रद्धा नीटपणे समजावून घ्याव्या लागतात. श्रद्धा आणि अंधश्रद्धा समजावून घेताना अडचण येते; कारण त्या कालसापेक्ष आणि व्यक्तिसापेक्ष असतात. आपल्याला माहीत आहे की, काही वर्षांपूर्वी राजस्थान येथे देवराला या गावात पतीच्या निधनानंतर एक स्त्री सती गेली आणि संपूर्ण देशभर एकच गदारोळ उडाला. अशा प्रकारे सती जाण्याला बंदी करणारा कायदा यापूर्वीच होता. परंतु देशभरातील प्रक्षुब्ध लोकांची मागणी लक्षात घेऊन तो कायदा कडक करावा लागला. आता केवळ सती जाणे आणि सती जाण्याला मदत करणे एवढाच दखलपात्र गुन्हा नाही, तर अशा प्रकरणाचे उदात्तीकरण करण्यासाठी त्या प्रसंगी हजर राहणे हीदेखील गंभीर घटना मानण्यात आलेली आहे. याचे कारण आज आपण सगळेजण मान्य कराल की, सती जाणे ही निखालस अंधश्रद्धा आहे. पण मागच्या शतकामधील गोष्ट काय होती? ज्या वेळेला लॉर्ड बेंटिंकने सती जात असलेल्या एका स्त्रीला मोठ्या धैर्याने वाचवले, त्या वेळेला त्या काळच्या बनारसमध्ये लोकांचा मोठा मोर्चा निघाला होता, असे लॉर्ड बेंटिंक आपल्या डायरीत लिहितो. आणि त्या लोकांची मागणी एकच होती की, 'सती जाण्यापासून या स्त्रीला रोखणारे तुम्ही कोण? स्वतःच्या पतीच्या निधनानंतर सदेह सती जाणं हा आमच्या पवित्र धर्मश्रद्धेचा अधिकार आहे'. लॉर्ड बेंटिंकने ज्यावेळी सतीच्या विरोधाचा कायदा केला, त्यावेळेला शहाणे-सुरते शास्त्री-पंडित अलाहाबादच्या हायकोर्टामध्ये गेले की, 'आमच्या पवित्र धर्मश्रद्धेमध्ये या पद्धतीने ढवळाढवळ करण्याचा अधिकार ईस्ट इंडिया कंपनीला

नाही.' ही झाली श्रद्धेची कालसापेक्षता. श्रद्धेची व्यक्तिसापेक्षता कशी असते यासाठी सत्यसाईबाबांचे उदाहरण घेऊ. सगळ्यांनी सत्यसाईबाबांचा फोटो बघितलेला आहे. सत्यसाईबाबा हे आजच्या जगातले महान बाबा, गुरु, महाराज, साधू असे त्यांच्या भक्तांकडून मानले जाते. सत्यसाईबाबांचे वैशिष्ट्य काय आहे? ते हवेतून हात फिरवतात आणि तुम्हाला विभूती देतात. हवेमधून हात फिरवतात आणि तुम्हाला सोन्याची किंवा चांदीची अंगठी देतात., आणि हवेमधून हात फिरवून त्यांनी सोन्याचे लॉकेट किंवा रत्नाचे हारदेखील आपल्या शिष्यांना दिल्याच्या गोष्टी त्यांच्या अधिकृत पुस्तकात मौजूद आहेत. साईबाबांचे हे महान चमत्कार त्यांना या देशातील राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून अनेकजणांचे श्रद्धास्थान बनवतात. याउलट हे चमत्कार इतर अनेकांना निव्वळ बनवाबनवी व अंधश्रद्धा वाढवणारे बुवाबाजीचे प्रकार वाटतात. ही झाली श्रद्धेची व्यक्तिसापेक्षता.

## चिकित्सेतील अडचणी

श्रद्धेची चिकित्सा होत नाही याची प्रमुख कारणे तीन. एक शब्दप्रामाण्य, दोन ग्रंथप्रामाण्य, तीन व्यक्ती. व्यक्ती स्वतः श्रद्धेची चिकित्सा करत नाही आणि इतरांनी श्रद्धेची चिकित्सा केलेली तिला चालत नाही. शब्दप्रामाण्य याचा अर्थ असा की, व्यक्तीचा शब्द प्रमाण मानावयाचा, त्याची चिकित्सा करावयाची नाही. व्यक्तीने सांगितलेला शब्द हे अंतिम सत्य आहे; त्याबाबत तपासण्याची, चिकित्सा करण्याची गरजच नाही. अशी भूमिका अनेकदा घेतली जाते. त्यामुळे श्रद्धेची चिकित्सा होणे दुरापास्त होऊन बसते. इतर क्षेत्रांत सोडाच, परंतु विज्ञानाच्या क्षेत्रातदेखील हे झालेले आहे. गॅलिलिओने दुर्बीण शोधून काढली. त्या आधारे त्याने आपल्या अन्य सहकाऱ्यांना अशी विनंती केली की, या दुर्बिणीमधून तुम्ही बघा. आत्तापर्यंत आपल्याला माहीत नसलेल्या गुरु या ग्रहाचे आणखी तीन उपग्रह तुम्हाला दिसतील. त्यावेळी विद्यापीठात ॲरिस्टॉटलने सांगितलेल्या ज्ञानाच्या आधारे शिक्षण दिले जात असे आणि ॲरिस्टॉटलचे म्हणणे हा अंतिम शब्द मानला जात असे. ॲरिस्टॉटलने जे सांगून ठेवले नाही ते असणे शक्यच नाही, अशी त्याच्या शिष्यांची श्रद्धा होती. कारण ॲरिस्टॉटल हा प्रकांड पंडित होता. त्याचे वर्णन असे केले जात असे की, 'He is a master of all who know'. ॲरिस्टॉटलवरील श्रद्धेच्यामुळे दुर्बिणीतून बघण्यास गॅलीलिओच्या सहकाऱ्यांनी त्याला नकार दिला. त्याला ते म्हणाले की, 'तुला दिसणारे गुरूचे तीन उपग्रह हे उपग्रह नाहीतच. ते तुझ्या दुर्बिणीच्या काचेवरील तीन डाग आहेत. गॅलीलिओ म्हणाला, 'मग काच पुसून घेऊ या'. ते म्हणाले की, 'ती काच पुसून घेतल्यानंतरही जर तुला ते उपग्रह दिसत असतील, तर तुझ्या डोळ्यांच्यामध्ये काही बिघाड झाला असेल'. गॅलीलिओ म्हणाला, 'मग तुम्ही तुमचे डोळे लावून बघा'. ते म्हणाले, 'आम्हाला आमचे डोळे लावण्याची गरजच वाटत नाही. आमची आमच्या ज्ञानावर आणि गुरूच्या शब्दांवर पक्की श्रद्धा आहे. तुझ्या डोळ्यांत बिघाड झाला नसेल, तर मग कदाचित तो तुझ्या मेंदूत झाला असेल. शेवटी त्या सहकाऱ्यांनी दुर्बिणीमधून



बघितलेच नाही. कारण त्यांनी ॲरिस्टॉटलचा शब्द प्रमाण मानला. हे झाले शब्दप्रामाण्य.

ग्रंथप्रामाण्य म्हणजे काय? मी अलिकडे एकदा जालना येथे गेलो होतो. त्या जिल्ह्यातील साखर कारखान्यातील एक अधिकारी मला भेटावयास आला. तो म्हणाला, 'मी तुमची पुस्तकं वाचलेली आहेत. मी तुमच्या मताचा आहे. परंतु माझे अन्य सहकारी मित्र मला असं विचारतात की, ज्ञानेश्वरांनी गाथेमध्ये असं लिहून ठेवलं आहे की, जो कोणी या गाथेचं पठण करील त्याचे अनेकविध फायदे होतीलच. परंतु त्याबरोबरच त्याची भूतबाधाही पळून जाईल. ज्या अर्थी ज्ञानेश्वरांनी भूतबाधा पळून जाण्याबद्दल लिहिलं त्याअर्थी भूतयोनी अस्तित्वात असेल, त्याची बाधा होत असणार हे सिद्धच होतं. ज्ञानेश्वर म्हणतात, भूत असतं. तू म्हणतोस, भूत नसतं. शहाणं कोण? ज्ञानेश्वर की तुमचे दाभोलकर? याचे उत्तर सरळच आहे की, ज्ञानेश्वरच. त्यामुळे भूत असते असा निष्कर्ष निघतो.' लक्षात घ्या ज्ञानेश्वर हे फार मोठे कवी आणि तत्त्वज्ञ होते. पण म्हणून त्यांनी त्यांच्या पुस्तकात जे लिहून ठेवले ते ग्रंथप्रामाण्य तसेच्या तसे मानावयाची गरज नाही. यामुळे ज्ञानेश्वरांना कमीपणा येत नाही. काय घडते पहा. जत्रेमध्ये किंवा यात्रेमध्ये लोक इकडून तिकडे फिरत असतात. कोठेतरी एका ठिकाणी गारुड्याचा खेळ चाललेला असतो. बाजूला लोकांचं कोंडाळं असतं. भरपूर गर्दी झालेली असते. स्वतःच्या तीन-चार वर्षांच्या पोराला घेऊन जत्रेत फिरणारा बाप त्या कोंडाळ्याच्याजवळ थबकतो. टाचा वर करून आत काय आहे, हे बघण्याचा प्रयत्न करतो. त्याला जवळपास काहीच दिसत नाही. एवढ्यात ते पोर म्हणते, 'बाबा, बाबा, तुम्ही मला उचलून खांद्यावर घ्या. बाप त्याला उचलतो, आपल्या खांद्यावर बसवतो. मग पोराला मधल्या वर्तुळातील सर्व काही दिसू लागते. तो बापाला सांगू लागतो. 'इथं एक गारुडी आहे. तो पुंगी वाजवत आहे. त्याच्यासमोर नाग आहे. तो नाग डोलत आहे. आजूबाजूला अशा अशा गोष्टी आहेत.' हे सारे ऐकल्यानंतर बाप पोराला असे म्हणत नाही की, 'लेका, तू फक्त चार वर्षांचा आणि मी चौतीस वर्षांचा! मला जे कळत नाही, मला जे दिसत नाही; ते तुला समजतं काय?' खरे उत्तर हे आहे की, बापाला जे दिसत नाही ते पोराला दिसत आहे; कारण पोरगा बापाच्या खांद्यावर बसलेला आहे. त्यामुळे तेवढ्या संदर्भात पोरगा बापापेक्षा श्रेष्ठ होतो. सातशे वर्षांच्या विज्ञानाची शिडी करून मी आणि आपण सर्व ज्ञानेश्वरांच्या खांद्यावर बसलो आहोत. ज्ञानेश्वरांच्या काळी मग मनाचे आरोग्य, मनाचे आजार, भूतबाधा या कल्पना स्पष्ट नसणे स्वाभाविक होते. परंतु आता आपणाला माहीत आहे की, जगात भूत कुठेच नसते. ते तुमच्या आमच्या मनात असते. त्यामुळे या बाबतीत आपल्याला ज्ञानेश्वरांच्या गाथेचे प्रामाण्य मानण्याची गरज नाही.

## काही अंधश्रद्धा जातात, त्याची कारणे

परंतु तरीदेखील अनेक अंधश्रद्धा गळून पडलेल्या आपण बघतो. हे कशामुळे घडते? हे घडते याची काही कारणे आहेत. काही विशिष्ट स्वरूपाच्या अंधश्रद्धा दूर

करण्यासाठी काही विशिष्ट स्वरूपाची परिस्थिती उपकारक ठरते. जसे — ज्या अंधश्रद्धा निखालसपणे आज्ञानावर आधारित आहेत, अश्या अंधश्रद्धा ज्ञानाच्या प्रकाशात वितळून जातात. एकवेळ अशी होती की हे माहीत नव्हते की एखाद्या व्यक्तीला ताप का येतो? व्यक्तीला ताप येई. तापाबरोबर तोंडावर फोड येत. काही दिवसांनी ताप जाई. तोंडावरचे फोडही जात. त्याच्या खपल्याही पडत. परंतु व्रण कायम राहात आणि तोंड हे ठोक्याच्या तपेल्यासारखे दिसे. म्हणून हा देवीचा कोप आहे, असे मानले जाऊन याला देवीचा रोग समजला जाऊ लागला. मग एक वेळ अशी आली की ज्यावेळेला देवीच्या लसीचा शोध लागला. लक्षात असे आले की, देवीचा जंतू हा फक्त माणसांच्याकडून माणसांच्याकडेच जाऊ शकतो. जगामध्ये जर एकही माणूस देवीच्या रोगाचा रोगी उरला नाही; तर जगातून देवी रोगाचे उच्चाटन होणे शक्य आहे. आज तसे झालेले आहे. 'देवीचा रोगी कळवा आणि हजार रुपये, नव्हे, एक लाख रुपये मिळवा.' असे जरी तुम्ही सांगितलेत, तरी आता तो रोगी मिळणार नाही, आणि देवीची लस टोचून घेण्याची गरजच राहिली नाही. म्हणजे ज्ञान आले, अज्ञान गेले. अज्ञानाच्या बरोबरची अंधश्रद्धा गेली.

अंधश्रद्धेचा दुसरा प्रकार असतो अमानुष अंधश्रद्धांचा. ज्या अंधश्रद्धा मानुष नसतात, अमानुष असतात; त्या अस्तित्वात असतात, परंतु त्यांच्याबद्दल समाजमानसामध्ये एक घृणास्पदता, संताप आणि चीड असते. आपल्याला देवदासीच्या प्रथेबद्दल माहिती आहे. देवदासीच्या प्रथेमध्ये डोक्यात आलेली केसाची जट किंवा आईवडिलांनी केलेला नवस यासाठी तरण्या-ताठ्या मुलीचे लग्न देवाशी अथवा देवीशी लावले जाते. यामुळे काय होते? देवाशी लग्न ही कल्पना अनैसर्गिक असल्यामुळे प्रत्यक्षात ती मुलगी एक तर मुंबईच्या वेश्याबाजारात विकली जाते किंवा गावच्या टग्यांचं धन बनते. तिच्या सुखी संसाराच्या स्वप्नांची राखरांगोळी होते. या गोष्टी आजही चालू आहेत. परंतु याबद्दल जनमानसामध्ये एक संताप चळवळींमुळे जागृत झाला आहे. अश्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी जनमानसाचा पाठिंबा मिळवणे आवश्यक असते. याच प्रकारच्या आणखी काही अंधश्रद्धा म्हणजे अघोरी अंधश्रद्धा. काही ठिकाणी नवस फेडण्यासाठी अघोरी पद्धतींचा वापर केला जातो. काहीजण स्वतःला कपाळावर ब्लेडनं चिरा मारून घेतात. तर काहीजण पळत येऊन देवळाच्या दगडी भिंतीवर आपले डोके फाडकन आपटून घेतात. यामुळे स्वाभाविकपणेच त्रास होण्याची, जिवाला धोका होण्याची शक्यता असते. कुठल्याच धर्माने, संतांनी, देवांनी अशा स्वरूपाची उपासना सांगितलेली नाही. हा अघोरी प्रकार धर्माचरणाचा भाग नाही, हे लोकांना पटवणे तुलनेने सोपे जाते असा अनुभव आहे.

आणखी एका प्रकारच्या अंधश्रद्धा बाळगल्या जातात. गतिमान जीवन समाजामध्ये त्यांचे पालन करणे शक्य नसते. समाजामध्ये स्पृश्य आणि अस्पृश्य असे भेद पूर्वी होते आणि आजही आहेत. त्यामध्ये स्पर्शबंदी होती, रोटीबंदी होती, बेटीबंदी तर होतीच होती. आजही परिस्थिती काय आहे? आज स्पर्श आणि रोटीबंदी जवळपास गळून पडल्या आहेत. समाजसुधारकांचे प्रयत्न याला कारणीभूत आहेत. परंतु त्याबरोबरच गतिमान समाजव्यवस्थेने यासाठी हातभार लावला आहे. तुम्ही एकदा बसच्या किंवा रेल्वेच्या गर्दीत घुसलात की, तुम्हाला कुणाचा स्पर्श होतो आणि ती व्यक्ती कोण आहे हे कळण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळे स्पर्शबंदी अर्थहीन आहे. तुम्ही एकदा हॉटेलात गेला की, तुम्हाला ज्या कपातून चहा दिला त्या कपामध्ये आधी कोण चहा प्याला आहे याची तुम्हाला माहिती कळणे शक्य नाही यामुळे रोटीबंदी पाळणे शक्य होत नाही. माणसे रोटीबंदी आणि स्पर्शबंदी पाळत नाहीत, कारण त्यांनी मनातून जात ही एक अत्यंत जहरी अंधश्रद्धा सोडून दिली आहे, असे मात्र नाही. स्वतःच्या, मुलांच्या लग्नामध्ये मात्र जात आवर्जून पाहिली जाते. कारण त्या ठिकाणी ती स्पष्ट असते, ती पाळणे शक्य असते. मासिक पाळीमध्ये स्त्री आजही स्वतःला अपवित्र मानते. परंतु पूर्वीच्या काळी मासिक पाळीत स्त्री पाच दिवस घरामध्ये एका बाजूला कोपऱ्यात बसत असे. आज कोणत्याही नोकरीच्या ठिकाणी मासिक पाळीची म्हणून महिन्याला पाच दिवसांची रजा दिली जात नाही. त्यामुळे मासिक पाळीत स्त्री अस्पर्श आहे ही कल्पना दूर होण्यास मदत होते.

समाजसुधारक ज्यासाठी प्रयत्न करतात, त्या अंधश्रद्धा दूर होण्यास मदत होते. याचे कारण आपल्याला हा एक चांगला वारसा मिळालेला असतो. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पुणे शहरामध्ये अनेक स्त्रिया तांबडी अलवणी नेसलेल्या आणि डोक्याचे केशवपन केलेल्या दिसत. त्या अभागी विधवा होत्या, ज्यांनी केशवपन करणं हा त्या काळचा धर्मसंस्काराचा, धर्मश्रद्धेचा भाग होता. अलिकडे अशी घटना महाराष्ट्रातील एका जिल्ह्यात घडली की, एका स्त्रीने पतीच्या निधनानंतर स्वतःचे केशवपन करण्याची इच्छा प्रगट केली. आता तसा विचार केला, तर स्वतःचे केस हा व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा भाग आहे. कोणीही पुरुष स्वतःचे केस का काढतो! काही वेळेला तिरुपतीला जाऊन आला आणि देवाला केस दिले म्हणून काढतो? काही वेळेला सिनेमातल्या हिरोचे अनुकरण करण्यासाठी तुळतुळीत चमनगोटा करतो आणि काही वेळेला घरामध्ये घडलेल्या अप्रिय घटनेमुळे धार्मिक कृत्याचा भाग म्हणून तो स्वतःचे केस काढतो. केस स्वतःचे असतात. त्यामुळे ते केव्हा काढायचे हा अधिकार त्या व्यक्तीचा असतो. याच पद्धतीने ती सुशिक्षित विधवा स्त्री म्हणाली, 'माझ्या पतीच्या निधनानंतर मी माझा विपुल केशसंभार सांभाळू इच्छित नाही. मी केशवपन करणार!' एका बाजूने विचार केला, तर तिचे केस हा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा भाग होता. तरीही तिला सर्वांनी हेच समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, 'बाई ग, तू केशवपन करू नकोस. पतीच्या निधनानंतर स्त्रीच्या जीवनाला अर्थ नाही, तिच्या सौंदर्याला अर्थ नाही, तिने विद्रूप दिसणे अधिक चांगले, या सर्व कल्पना पतीच्या निधनानंतर स्त्रीचे केशवपन करण्याच्या मागे होत्या. या सर्व केवळ अंधश्रद्धाच नव्हत्या, तर स्त्रीवर लादलेली गुलामगिरी होती. पतीच्या निधनानंतर केशवपन करण्याचे स्त्रीने बंद केले याचा अर्थ या अंधश्रद्धेच्या गुलामगिरीतून तिने स्वतःची सुटका करण्याचे एक पाऊल पुढे टाकले. परंतु जर व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाने पुन्हा हे सुरू झाले, तर याचा अर्थ महाराष्ट्रातल्या सामाजिक सुधारणेचा प्रश्न 50 वर्षे मागे नेल्यासारखा



**नरेन्द्र दाभोळकर**

होईल. तेव्हा तू केशवपन करू नकोस.' ही विनंती तिला करण्यात आली आणि तिने ती मान्य केली. तेव्हा अज्ञानावर आधारित असलेल्या अंधश्रद्धा, अमानुष आणि अघोरी अंधश्रद्धा, गतिमान समाजजीवनाशी विसंगत असणाऱ्या अंधश्रद्धा, समाजसुधारकांनी प्रयत्न केलेल्या आणि त्यामुळे गळून गेलेल्या अंधश्रद्धा या अंधश्रद्धा आज जात आहेत, जाण्यास अनुकूलता निर्माण होत आहे. परंतु तरीही अंधश्रद्धेचे एक मोठे क्षेत्र आज शिल्लक आहे. ते शिल्लक असण्याचे कारण आपणास बघावयाचे आहे आणि त्याबरोबरच श्रद्धेचे स्वरूप अधिक खोलात समजावून घ्यायचे आहे.

### अंधश्रद्धा – आधार घेणे, आहारी जाणे

आता श्रद्धा आणि अंधश्रद्धा या संदर्भातील आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याचा आपण विचार करू. हा मुद्दा असा आहे की, अंधश्रद्धांचे निर्मूलन हे पूर्णतः आणि सर्वांच्या बाबतीत शक्य आहे का? या बाबतीमध्ये विचार करताना एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की माणसे अंधश्रद्ध का होतात? या संदर्भात आमच्या संस्थेच्या कार्यक्रमात बोलताना सुप्रसिद्ध साहित्यिक विजय तेंडुलकर म्हणाले होते की, 'तुम्हाला असे वाटत नाही का की, माणसं अंधश्रद्ध असतात; कारण अंधश्रद्ध असणं ही त्यांची गरज असते?' याचा अर्थ आपण नीट समजावून घेतला पाहिजे. माणसाना जेव्हा अनपेक्षितरीत्या मोठा आघात सोसावा लागतो, त्यावेळेला त्या आघातांनी आपले स्वतःचे व्यक्तिमत्त्व उद्ध्वस्त होऊ नये म्हणून माणसे अंधश्रद्धेचा आधार घेतात. हा आघात कधी जमत आलेले मुलीचे लग्न मोडण्याचा असतो, हाता-तोंडाशी आलेली मुलाची नोकरी जाण्याचा असतो, घरामधल्या एखाद्या पुरुषाला मोठा अपघात होण्याचा असतो किंवा याच स्वरूपाचे इतर काही असू शकतात. आपण एक उदाहरण घेतले, तर हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. माणसाचे व्यक्तिमत्त्व चांगले असते आणि एखादी बजाजची स्कूटर चांगली असते. माणसाचे व्यक्तिमत्त्व चांगले असते, याचा अर्थ त्याला आईवडिलांकडून मिळालेली आनुवंशिकता आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाची आजूबाजूच्या वातावरणात झालेली घडण ही योग्य असते. बजाजची स्कूटर चांगली असते, याचा अर्थ बजाजच्या स्कूटरचे भाग आणि त्यांची जुळणी योग्य असते. पण बजाजची स्कूटर चांगली असली, तरी तिला शॉक ॲबसॉर्बर बसवलेला असतो. कारण स्कूटर चांगली असली तरी रस्ता चांगला नसतो, रस्त्यावर खाचखळगे असतात आणि रस्त्यावरच्या त्या खाचखळग्यांमुळे स्कूटरला कमी धक्का बसावा आणि स्कूटरला बसला तरी चालेल, सीटवर बसलेल्या आपल्याला कमी धक्का बसावा, यासाठी वाहनाला शॉक ॲब्सॉर्बर असतात. जीवनाच्या ज्या रस्त्यावरून आपण जातो, त्याच्यावरही अपेक्षाभंगाचे असे अनेक लहान-मोठे खड्डे असतात. आपल्या व्यक्तिमत्त्वाचे वाहन या अपेक्षाभंगाच्या खड्ड्यांच्या मध्ये मोडून पडू नये, धक्का सहन करण्याची क्षमता त्याच्यामध्ये यावी म्हणून अंधश्रद्धांचे शॉक ॲब्सॉर्बर आपण आपल्या व्यक्तिमत्त्वाला बसवतो. ही गोष्ट योग्य नाही, पण क्षम्य आहे. माणसे समजून घेण्याचा हा प्रश्न आहे.



### श्रद्धेचे चार निकष

श्रद्धेच्या बाबतीमध्ये चार निकष लावावयाचे, ते कोणते? पहिला निकष हा सत्याचा म्हणजे तपासण्याचा. ज्या श्रद्धेला सत्याच्या आधारे प्रश्न विचारलेला चालत नाही, ती श्रद्धाही अंधश्रद्धाच असते. म्हणजे? बाबासाहेब आंबेडकरांनी एके ठिकाणी फार छान म्हटलेले आहे —

''तुम्हाला जर एक पिवळा चकचकीत तुकडा मिळाला तर तुम्ही आनंदाने अशा उड्या मारू लागता का की, मला सोनं मिळालं? तुम्ही असं म्हणता की, हा पिवळा तुकडा आगीमध्ये टाकून जर ते सोनं असेल, तर ते उजळून निघेल; पितळ असेल तर वितळून जाईल. तुम्ही जो निर्णय एखाद्या पितळेच्या धातूच्या तुकड्याबद्दल घेता, तो निर्णय स्वतःच्या जीवनामध्ये तुम्ही ज्याच्या आधारे जीवनाची उभारणी करणार त्या मूल्यांबद्दल का घेत नाही? त्या मूल्यांबद्द्ल तो निर्णय तुम्ही घेतला पाहिजे. याचा अर्थ असा की, सत्याच्या आधारे तुमच्या श्रद्धेची अग्निपरीक्षाही तुम्ही केली पाहिजे. दुसरा निकष म्हणजे आपल्यापेक्षा वेगळ्या श्रद्धा असणारे लोक समाजात असणार. त्याच्यामुळे जोपर्यंत लोक सर्व प्रकारचे औचित्याचे बंध पाळून वेगळ्या श्रद्धांचा प्रसार करतात तोपर्यंत त्यांना परवानगी दिली पाहिजे. आपल्यापेक्षा वेगळ्या श्रद्धांचा प्रसार करण्याची, प्रचार करण्याची, संघटित करण्याची आणि त्याद्वारे लोकांना आपल्या बाजूचे बनवण्याची परवानगी देणे हे दुसऱ्याच्या श्रद्धेच्या आदराशी संबंधित आहे, सहिष्णुतेशी संबंधित आहे आणि जीवनातल्या अहिंसेच्या मूलभूत नियमांशी संबंधित आहे. म्हणजे 'माझी श्रद्धा हीच सत्य आहे. आणि माझ्यापेक्षा वेगळ्या श्रद्धा बाळगणाऱ्याला येथे अजिबात स्थान नाही', असं म्हणणं ही मोठीच अंधश्रद्धा आहे. म्हणून श्रद्धेची पहिली कसोटी ही सत्याची आहे, तर श्रद्धेची दुसरी कसोटी ही अहिंसेची आहे. श्रद्धेची तिसरी कसोटी काय आहे? श्रद्धेची तिसरी कसोटी म्हणजे श्रद्धा ही कृतिशील असते. कृतिशील असते याचा निकष असा – भीती आणि मोह या माणसाला दुर्बल करणाऱ्या दोन प्रबळ प्रेरणा असतात, माणसे स्वतःच्या निर्णयामध्ये भीती आणि मोह यांच्यामुळे खूप मोठे बदल घडवतात. तुमची तुमच्या धर्मावर श्रद्धा आहे; पण तुम्हाला असं विचारलं की, 'काय रे, लेका वीस लाख रुपये देतो कॅश. धर्म बदलतोस का?' तर ही शक्यता आहे की आजूबाजूला कोणी ऐकत नाही हे बघून तुम्ही विचाराल, 'नक्की वीस लाख रुपये देणार ना? मग धर्माचं काय करायचं ते तुमच्या इच्छेप्रमाणं करू'. किंवा जर कोणी उद्या तुमच्या किंवा तुमच्या मुलाबाळांच्या मानेवर तलवार ठेवली आणि सांगितले, 'धर्म बदललात, तर ठीक; नाही तर तुमचं मुंडकं उडवतो'. तरी तुम्ही असा विचार कराल की, 'पहिल्यांदा जीव जगला; तर पुढचं सगळं.' 'शिर सलामत तो पगडी पचास'. आणि आणि मग स्वाभाविकपणे तुम्ही म्हणाल की, 'जान बची लाखो पाये, तू म्हणतोस तसं करू'. आणि मग मनातल्या म्हणाल, सवडीसवडीनं पुन्हा जमेल, त्यावेळी पुन्हा धर्म बदलू.' याला तुम्ही शहाणपणाचा विचार म्हणू शकाल; परंतु श्रद्धावान विचार म्हणू शकणार नाही. आणि चौथी कसोटी

म्हणजे श्रद्धा माणसाचा मूल्यविवेक उन्नत करते. अंधश्रद्धा माणसाचा मूल्यविवेक अवनत करते. मी ज्यावेळेला एखादी गोष्ट श्रद्धापूर्वक स्वीकारतो, त्यावेळेला त्याबरोबर येणारा मूल्यात्मक आशय मला मान्य करावा लागतो. मी जर असं मानत असेन की, प्रभुरामचंद्र हे माझे श्रद्धास्थान आहे; तर प्रभुरामचंद्रांचा मूल्यात्मक आशय – ते सत्यवचनी होते आणि एकपत्नीव्रती होते, हा आहे. एका बाजूला प्रभुरामचंद्रांच्याबद्दल जे बोलतात ती माणसं स्वतःच्या व्यवहारामध्ये या गोष्टींबाबत खबरदारी घेतात की नाही आणि आग्रह धरतात की नाही, हे बघण्यासारखं आहे. यांपैकी सत्यवचनीपणाबद्दल या देशामध्ये न बोललेलं बरं अशी स्थिती आहे. म्हणजे 'सत्यमेव जयते' हे आपलं वाक्य आहे अशोक स्तंभावर लिहिलेलं. आणि 'असत्यमेव जयते' हा आपला अनुभव आहे. आणि 'असत्यमेव जयते' यासाठी आपल्याला कुठंच रामाची अडचण येत नाही.''

त्याहीपेक्षा सोपे उदाहरण आपण घेऊ. राम हा त्या काळामध्ये एकपत्नीव्रती होता. आज तर एकपत्नीव्रताचा कायदा आहे. परंतु ज्यावेळेला रामजन्मभूमीचा लढा उभा राहिला त्याच वेळेला एक विदारक वास्तव महाराष्ट्रासमोर आले की, महाराष्ट्रामध्ये सहा लाख परित्यक्ता स्त्रिया आहेत की ज्यांना नवऱ्यांनी कारण नसताना टाकून दिलेले आहे आणि ज्यांचे संसार वाऱ्यावर आलेले आहेत. या सहा लाख परित्यक्ता स्त्रियांचे जिणे, त्याचे जगणे, त्यांचे समाजात असणे हे प्रभुरामचंद्रांच्या मूल्यांच्या श्रद्धेच्या आदर्शाशी सुसंगत आहे की विसंगत आहे? हे जर विसंगत असेल; तर जे रामचंद्रांच्या श्रद्धेची बात करतात, त्यांनी या विषयावर पोटतिडकीने बोलायला पाहिजे. परंतु मंडळी या विषयाबाबत मूग गिळून बसतात. त्यावेळेला राम हा मताचा विषय होतो. मूल्याचा होत नाही. त्याच्यामुळे आपण ज्याला 'श्रद्धा' हा शब्द वापरतो, काहीजण त्याला 'निष्ठा' हा शब्द वापरतात. काहीजण त्याला 'डोळस' हा शब्द वापरतात; शब्द कुठला वापरता याला महत्त्व नाही – परंतु 'तुमच्या श्रद्धेची चिकित्सा तुम्ही करता की नाही? तुमच्या श्रद्धेच्यापेक्षा वेगळ्या श्रद्धेच्या बाबतीत सहिष्णु आणि अहिंसक तुम्ही वागता की नाही? तुमची श्रद्धा तुम्हाला कृतिशील करते की अवनत करते?' याच्यावर तुम्ही ज्याला स्वतची श्रद्धा म्हणता, ती तपासून घेता येते. हा तपासण्याचा आग्रह एकूणच मानवी जीवन पुढे नेतो. म्हणून आम्ही श्रद्धा आणि अंधश्रद्धा हा अंधश्रद्धा-निर्मूलन चळवळीचा वैचारिक चर्चेचा विषय बनवतो.

[ *श्रद्धा अंधश्रद्धा* या पुस्तकातून ]

□□

> '''वैज्ञानिक ज्ञान हेच एकमेव प्रमाण ज्ञान आहे' हे ज्ञान वैज्ञानिक नाही''.
>
> – ***मे.पुं.रेगे***



# अंधश्रद्धा : काही संकल्पना

*प्रमोद सहस्रबुद्धे*

आपण अंधश्रद्ध आहोत हे जवळपास कोणीच पटकन म्हणणार नाही. जरा खोलवर विचार केल्यावर कदाचित एक दोन बाबी मान्य केल्या जातील पण त्या तेवढ्याच. सर्वसाधारण अंधश्रद्धा म्हणजे दुसऱ्या कुणाची विचित्र समजूत असे म्हटले तर फारसे वावगे ठरू नये. या सापेक्ष व्याख्येचा एक फायदा म्हणजे अंधश्रद्धेविरुद्ध सर्वांचे एकमत होऊ शकते! कारण दुसऱ्यांची अंधश्रद्धा दूर करणे हे प्रत्येकाचे स्वाभाविक कर्तव्य असते.

अंधश्रद्धा शब्द उच्चारला की साहजिकपणे मंत्र-तंत्र, शकुन-अपशकुन, फलज्योतिष्य, नवससायास, व्रतवैकल्ये अशा गोष्टी डोळ्यांसमोर येतात. या सर्वांना अंधश्रद्धा न म्हणता चिपळूणकरांनी 'लोकभ्रम' असा शब्दप्रयोग केला. अंधश्रद्धा असली तर डोळस श्रद्धा कुठली? असा प्रश्न या नावात पडत नाही. त्यामुळे हा शब्दप्रयोग जास्त चपखल वाटतो. अंधश्रद्धा शब्दाची व्याप्ती या लोकभ्रमापेक्षा जास्त आहे. ही व्याप्ती सांगणारा दुसरा शब्द नसल्याने श्रद्धा शब्दाशी घोटाळा करणारा अंधश्रद्धा हा शब्दच येथे वापरला आहे. पण त्याच्या अर्थाच्या छटा अंध+श्रद्धा यापेक्षा वेगळ्या आहेत.

देव, पुनर्जन्म, आत्मा, स्वर्ग/नरक अश्या म्हणजे लौकिकार्थाने श्रद्धा मानल्या जाणाऱ्या संकल्पना अंधश्रद्धाच मानल्या जाव्यात असा काहींचा आग्रह असतो. विवेकवादाची ही भूमिका बहुतेक तत्त्ववेत्त्यांनी ज्यात रसेल, दि.य.देशपांडे व हल्लीचे रिचर्ड डॉकिन्स आहेत त्यांनी आग्रहपूर्वक मांडलेली दिसते. दुसऱ्या बाजूला आत्मा, पुनर्जन्म, योगसाधना इत्यादी बाबींकडे सहानुभूतिपूर्वक पाहणारे वसंत पळशीकर 'विज्ञान या गोष्टींबरोबर त्यांची (विवेकवाद्यांची) श्रद्धा - हो ती श्रद्धाच आहे – ही आंधळी आहे.' असे म्हणतात. तर परामानसशास्त्राकडे सहानुभूतिपूर्वक पाहणारे डॉ. विजय बेडेकर यांच्या मते ज्या गोष्टींविरुद्ध निर्णायक पुरावा मिळाला नाही त्या सर्वांना अंधश्रद्धा मानू नये. या वेगवेगळ्या संकल्पनात अंधश्रद्धांची व्याप्ती कमी वा जास्ती होताना दिसते.

अंधश्रद्धा म्हणजे पुरावा नसताना धरलेला विश्वास अशी ढोबळ व्याख्या केली जाते. पण ही व्याख्या पुरेशी नाही. पुरावा नसताना आपण सर्वजण गफलतीने काहीतरी मानत असतो. चूक समजल्यावर आपण मग सुधारून घेतो. अशाला आपण गैरसमजूत होती असे म्हणतो पण अंधश्रद्धा होती असे म्हणत नाही. गैरसमजूत व अंधश्रद्धा यात भेदभाव करायचा ठरवला तर गैरसमजूत ही विरुद्ध पुरावा मिळाल्यावर संपते तर अंधश्रद्धेचे तसे होत नाही. विरुद्ध पुरावा मिळाला तरी त्याकडे कानाडोळा करणे वा त्यास खोटा ठरवणे हे एक अंधश्रद्धेचे लक्षण आहे.

अंधश्रद्धेचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे भीती. आपल्या एखाद्या समजुतीला पुरावा नसेल आणि शिवाय त्यासंबंधी भीती असेल तर त्यास अंधश्रद्धा म्हणता येईल.

शकुन-अपशकुन, कोप, नवस, भूतप्रेत, भविष्यकथन वगैरे गोष्टी या व्याख्येत चपखलपणे बसतात. विज्ञान बदलते असते. यातील संकल्पना आज एक आणि उद्या एक अश्या होऊ शकतात. पण सहसा या बदलत्या संकल्पना भीतिकारक नसतात. एकेकाळी अशी समजूत होती की रॉकेट हे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणापार (escape velocity पेक्षा जास्त वेगाने) कधीच जाऊ शकणार नाही. वेळेनुसार ही संकल्पना बदलली पण त्यात भीतीचा सहभाग नव्हता.

*आजच्या सुधारक*मध्ये सुरुवातीच्या अंकात दिवाकर मोहनींनी श्रद्धांची चिलखते हा शब्दप्रयोग केला होता. माझी अमुक गोष्टीवर श्रद्धा आहे असे म्हणणे म्हणजे मी आता काही ऐकून घेणार नाही असा होतो. उदा. 'रामाचा जन्म अयोध्येत रामजन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणी झाला होता अशी माझी श्रद्धा आहे.' अशी श्रद्धेची चिलखते वाद टाळण्यासाठी वा पुरावा ऐकून न घेण्यासाठी उपयोगी ठरतो.

काही श्रद्धांची निर्मिती अंधश्रद्धेची भीती काढण्यासाठी होते. म्हणजे भूत लागू नये म्हणून कुठलेसे स्तोत्र वा मंत्र म्हणायचा, किंवा ब्रह्मगाठ, वा क्रुस दाखवायचा असे सर्व प्रकार. आता या स्तोत्र मंत्रादी प्रकारात भीती नसते तर आश्वस्तपणा असतो. अंधश्रद्धांची भीती घालवणारे ते एक कवच असते. श्रद्धेच्या चिलखताचा हा एक वेगळा अर्थ. या सर्वांना काही जण श्रद्धा असे म्हणतात. थोडक्यात भीतियुक्त समजूत (गैर) म्हणजे अंधश्रद्धा तर निर्भय समजूत (ही ही गैरच) ती श्रद्धा असे म्हणता येईल.

भीती हा अंधश्रद्धेचा महत्त्वाचा गुण असल्याने भीतीचे निराकरण करणे जरुरी असते. त्याचे दोन लौकिक उपाय आहेत. एकात विवेकवादी विचार अंगीकारावे लागतात. तर दुसऱ्यात भीती घालवायला श्रद्धेचा अंगीकार करायला लागतो. या दुसऱ्या मार्गाची लोकप्रियता जास्त आहे. यामुळे कित्येकांना श्रद्धा ही आधारासारखी वाटते. आणि ती संपली तर पुढे काय असे वाटत राहते. श्रद्धाप्रचारक, यांत बहुसंख्येने धर्ममतप्रचारक सामील आहेत, आपल्या मतांचा प्रचार करण्यासाठी या भीती निराकरण तत्त्वज्ञानाचा आधार सगळ्यात जास्त घेताना दिसतात. आणि वरकरणी ही अंधश्रद्धेवर मात असली तरी या प्रचारात अंधश्रद्धेला खोटे ठरवून चालत नाही. कारण तसे झाले तर त्यांच्या उपायाला किंमत राहणार नाही. म्हणून अंधश्रद्धेची वाढीव भीती दाखवत श्रद्धेचा वाढीव उपचार करायचा असे यांचे स्वरूप असते. अंधश्रद्धेचे विवेकवादी निराकरण म्हणून अशा लोकांना पसंत नसते. त्यांच्या मते काळी जादू, नजर लागणे (या जवळपास कुठल्याच धर्ममतात समाविष्ट नाहीत) वगैरे गोष्टी अंधश्रद्धा असतात पण त्यांचे निराकरण विवेकवादी रूपाने न होता कुठल्या मंत्राने होणे चांगले. कारण या श्रद्धांच्या चिलखतांचा बाजार बराच मोठा असतो. या मानाने स्वर्ग/मोक्ष इत्यादि पारलौकिक बाबी श्रद्धेच्या प्रचारासाठी फार मोठ्या कामात येत नाहीत असे दिसते. पारलौकिक बाबतीत (देव, स्वर्ग/नरक, आत्मा इत्यादि) कुठलाच पुरावा मिळण्याची शक्यता नसते. तेव्हा पारलौकिक बाबींसाठी श्रद्धा शब्द वापरता येतो ही व्याख्यादेखील बरीच चपखल आहे. तर परामानसशास्त्र, नवस, फलज्योतिष , भूत लागणे या सर्व ऐहिक बाबतीत पुरावा मिळू शकतो. पण शोधूनही तो सापडत नाही म्हणून त्यांना अंधश्रद्धा म्हणता येईल. ही व्याख्या चिपळूणकरांच्या लोकभ्रम संकल्पनेला जवळची आहे.

अंधश्रद्धा-निर्मूलन करणारे कार्यकर्ते याबाबतीत प्रॅक्टिकल भूमिका घेताना दिसतात. साहजिकपणे ज्या बाबी विघातक आहेत, पिळवणूक करणाऱ्या आहेत, फसवणूक करणाऱ्या आहेत, जास्त पसरल्या आहेत किंवा ज्यांचे निराकरण जास्त सहज आहे अशा बाबींना ते प्राधान्य देतात. याचा अर्थ इतर बाबींना ते कमी लेखतात असे नाही. प्रस्थापित धर्मविरोधी (जसे सध्याचे शिवधर्मप्रणेते वा मार्क्सवादी) चळवळीतील कार्यकर्त्यांवर पुरेसे धर्मविरोधी नसल्याचा आरोप करतात. अशांचा रोख व साध्य हे विवेकवादी चळवळीच्या बाहेरचे असल्याने देखील साहजिकच आहे. चळवळीतील कार्यकर्ते असंघटित धर्माच्या (वैदू-भगत) विरुद्ध जितक्या परखडतेने बोलतात तितक्या परखडपणे संघटित धर्मप्रकाराविरुद्ध बोलत नाहीत. संघटित आरोग्यविषयक बाबतीतही हीच भूमिका ते बाळगतात. सहसा ते आयुर्वेद, होमिओपॅथी या प्रणालींविरुद्ध प्रचार करत नाहीत.

जगातील इतर चळवळींची भूमिका यापेक्षा थोडी वेगळी दिसते. त्यांच्या मते संघटित व असंघटित धर्मप्रकार एकासारखे एक आहेत. सरकारी पातळीवर (यात सरकार अनुदानित शिक्षण धरले जाते) कुठल्याही धर्माच्या आधारे वा त्याच्या प्रचारार्थ निर्णय घेतला जाणार नाही याकडे त्यांचे लक्ष असते. आयुर्वेद, होमिओपॅथीसारख्या प्रकारांना सरकारी आश्रय वा मान्यता मिळू नये यासाठी ते प्रयत्नशील असतात. अंधश्रद्धेविरुद्ध वैचारिक प्रचार, अभ्यास, संग्रह याबाबतीत ते येथील चळवळींपेक्षा खूप पुढे दिसतात. तर भारतातील चळवळी ह्या जनमानसाकडे जाणाऱ्या आढळतात.

अर्थात या चळवळींची भूमिका व अंधश्रद्धेच्या संकल्पना यात फारशी गल्लत करू नये. चळवळी या साहजिकरीत्या परिस्थितीनुरूप वा कामानुरूप अंधश्रद्धेच्या व्याप्तीचा संकोच वा प्रसरण करत असतात.

## निरीश्वर धर्म वगैरे

1. ह्या विश्वाची सुरुवात कशी झाली हे विज्ञानाच्या नियमांनी शोधता येणे शक्य आहे, त्यासाठी देवाला साकडे घालणे आवश्यक नाही. त्यामुळे 'देव नाही' असे सिद्ध होत नाही, पण देवाची गरज पण नाही.

   *— स्टीफन हॉकिंग*

2. देव ते कल्पित, शास्त्र ते शाब्दिक, पुराने सकळिक, बाष्कळीक।

   *— संत ज्ञानेश्वर*

3. देव झाले उदंड, देवाचे मांडियले भंड, भूत देवांचे थोतांड, एकाची जाहले।

   *— संत रामदास*

**प्रमोद सहस्रबुद्धे**

# मंत्र, मांत्रिक व चमत्कार : बातचीत मच्छिंद्र मुंड्यांशी

[प्रा. मच्छिन्द्र मुंडे (जन्म 1958) अंधश्रद्धा-निर्मूलनाचे काम करणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. दोन हजाराच्या आसपास व्याख्याने, प्रात्यक्षिके, सहा पुस्तकांचे लेखन, भोंदूबाबांची हातचलाखी ओळखण्यात हातखंडा व त्यामुळे पर्दाफाश करणे, भरपूर संघटनात्मक कार्य अशी त्यांची थोडक्यात ओळख आहे.]

**तुम्ही विवेकी कसे बनलात?**

माझे लहानपण खेड्यात व घरच्या वारकरी वातावरणात गेले. डोंबिवलीजवळचे आगासन हे माझे गाव. माझ्या गावात सातवीपर्यंत शाळा होती. हायस्कूल डोंबिवलीत आणि नंतरचे शिक्षण मुंबईत झाले. मी सातवीत असताना (1972 साली) आमच्या गावच्या शाळेत संपतराव कदम गुरुजी हे विवेकी विचाराचे शिक्षक तेथे बदलून आले. आम्हाला शिकवताना ते एकदा म्हणाले की देव नसतो तसे भूतही नसते. आमच्या वर्गातील एका मुलाने हे घरी सांगितले. मग त्याचे आजोबा रागवायला/भांडायला शाळेत आले. गुरुजींनी त्यांच्याशी चर्चा केली आणि यात एक आव्हान घेतले. गावचा वेताळ (गावाबाहेर एका दगडाला शेंदूर लावला होता.) कोपिष्ट म्हणून प्रसिद्ध होता.त्या वेताळाला अमावस्येच्या रात्री 12 वाजता भेट द्यायची असे ते आह्वान होते. त्यावेळी आमची पी.एस.सी.ची परीक्षा असल्यामुळे आम्ही काही मुले शाळेत राहून अभ्यास करीत असू. आमच्यासमोरच गुरुजी काठी व कंदील घेऊन निघाले व परतले. तिथे जाऊन खूण म्हणून लघवी करून आले. गुरुजींवर आता हे बेतणार अशी हवा त्यावेळी गावात होती, पण काहीच झाले नाही. इथून माझा विवेकाचा प्रवास सुरू झाला.

**तुम्ही चळवळे कधी झालात?**

गुरुजींचा सहायक म्हणून मी एका बळी जाणाऱ्या डुकराचे दावे गुपचुप कापले. वेळेवर डुक्कर नाहीसा झाल्याने बळी जाणे टळले. ही माझी चळवळीची सुरुवात म्हणता येईल. त्यानंतरही कोप होण्याच्या भीतीखाली गाव होते, पण काहीच झाले नाही. मी पुढे डोंबिवलीत शाळेत गेलो. तिथले काही शिक्षक याच विचाराचे होते. माझे काही मित्र कम्युनिस्ट विचारसरणीचे होते. मी त्यावेळी डोंबिवलीत स्वतंत्र खोलीत राहायचो, त्यामुळे त्यांच्यासाठी आयतेच ते बैठकस्थान झाले. बी. प्रेमानंदांचा महाराष्ट्र दौरा माझ्या कानावर/वाचनात आला. आपणही चमत्कार करून दाखवू असे वाटू लागले. अकरावीत असताना मी अशी प्रात्यक्षिके करू लागलो. राजकारण करण्यापेक्षा लोकशिक्षण करून समाजात जास्त काळ टिकतील असे परिणाम करावे असे माझ्या मनात आले. याचा एक परिणाम म्हणजे मी बारावीत असताना एक पुस्तक लिहिले व प्रसिद्ध केले. बंडखोर बेकाम तरुण (बंबेत) अशी संघटना मी स्थापन केली होती. गावच्या आमच्या आळीतली विहीर मी हरिजनांसाठी खुली करून दिली (1978 साली). यावेळी गावात मला विरोध झाला. पण काही युक्त्यांनी मी त्यावर मात केली. याच सुमारास 'प्रागतिक' नावाचे सायक्लोस्टाईल साप्ताहिक मी काढत असे. मी लिहिलेले पुस्तक डोंबिवलीच्या अंधश्रद्धा-निर्मूलन समितीचे कार्यकर्ते राजू देशपांडे यांच्या हाती पडले. ते बघून ते मला शोधत आले. त्यानंतर मी अंनिस चळवळीत सहभागी झालो.



**मांत्रिकांचे हृदय परिवर्तन होते का?**

दत्ता सातखेडे (नाव थोडेसे बदलले) नावाचा तरुण मांत्रिक उल्हासनगरला राहतो असे कळले. 'आडू माडू..' असा मंत्र म्हणत त्याचे चालायचे. त्याला भेटलो. शाळेत जाण्याचा प्रश्न टाळण्यासाठी त्याने हे सुरू केले आणि चिकटले असे तो म्हणाला. त्याच्याशी बोलल्यावर तो मांत्रिकगिरी बंद करायला तयार झाला. मात्र त्यास त्याबदली कामाची गरज होती. जोस्तोवर ते मिळाले नाही तोस्तोवर त्याचे हे चालूच राहिले. माझ्या माहितीच्या माणसाकरवी त्याला काम मिळाले आणि त्याचा मंत्रोद्योग संपला. फराख शेख (नाव थोडेसे बदलले) नावाच्या मांत्रिकाने माझ्या मित्राला 200 रुपयाने फसवले. त्याचा शोध घेत मी त्याला भेटलो. त्यालाही नोकरी मिळवून दिली व त्याचे काम थांबले. काही मांत्रिक पिढीजात असतात. पैसे मिळवणे हे आता त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे नसते. माझ्या माहितीत असे दोन मांत्रिक होते. एक जण साप उतरवायचा मंत्र वापरायचा. माझ्या आतेभावाला साप चावला तेव्हा त्याला त्याच्याकडे नेले होते. माझ्या लहानपणची गोष्ट ही. त्याच्यावर पाणी उडवून त्याने सापाचे विष उतरवायचे मंत्र म्हटले होते आणि पैसे घेतले नव्हते. बऱ्याच वर्षांनंतर तो मला भेटला. त्याने मान्य केले की साप उतरवण्याची कुठलीही विद्या त्यास नव्हती. पण लोकांना आधार वाटतो या कारणाने त्याने ते चालू ठेवले होते. खरोखर विषबाधा झाली असे त्याला वाटले तर तो खुबीने दुसरीकडे म्हणजे हॉस्पिटलला वगैरे पाठवत असे. या मांत्रिकाचे सापाचे ज्ञान कच्चे होते. चावण्याच्या खुणा बघून विषारी बिनविषारी असे त्यास कळत नव्हते. दुसरे एक मांत्रिक काविळीचे औषध द्यायचे. त्यांचा मुलगा डॉक्टर होता व माझ्या परिचयाचा होता. त्यांची पद्धत म्हणजे रोग्याला ते कशात तरी लपेटून ढेकूण खायला द्यायचे. मग पथ्य पाणी वगैरे सांगायचे. मुख्य उद्देश पथ्यपाण्याचा होता असे ते म्हणायचे. यांचाही पैसे कमावणे हा प्रकार नव्हता. या दोन्ही मांत्रिकांचे उद्योग मी मुद्दाम जाऊन बंद पाडले नाहीत.

**मांत्रिकांना शिक्षा होते का?**

जवळपास नाही. यास मुख्य कारण म्हणजे न्यायव्यवस्था. 1991 च्या आसपास, नंदूरबार जिल्ह्यातील असलोदमंदाणे गावातील अस्लम शेख नावाचा मांत्रिक प्रसिद्ध होता. त्याला आम्ही रीतसर पकडून दिले. सुरुवातीला आम्ही त्याचा पाठपुरावा केला. पण तारखा इतक्या पडायच्या की आम्हाला जाणे-येणे कठीण होऊ लागले. पोलिसही आपली केस पूर्ण करायची जबाबदारी नीटसे पाळत नाहीत असे दिसले.

### मंत्र म्हणजे काय? तुमच्या माहितीतील मंत्र कुठचे?

मंत्र अर्थपूर्ण व अर्थशून्य अशा दोन पद्धतीचे असतात. कधी कधी दोन्ही असतात. 'आडू माडू काडू, उंबराखाली गाडू, तेरा दुखता तो मै क्या करू' हा मंत्र दत्ता सातखेडेनेच केला होता. 'बिसमिल्लाहिर हम्मानिरहिम, कुत्सिन मात्सिन मियांसिन शाखिसिन अब्बुसिन, बिसमिल्लाहिर हम्मानिरहिम' हा एक निरर्थक मंत्र. 'बांधरे बांध आल्यागेल्याची पीडा बांध, बांधरे बांध याच्यावरची नजर बांध' असा एक मंत्र. 'काली काली महाकाली, बसला राजा शिवा खेळी' असाही एक मंत्र. हे सर्व मंत्र प्रत्यक्षात वापरले गेलेले मंत्र. यांचा परिणाम भक्तांवर किंवा अडल्यानडल्यांवर भरपूर होतो.

विविध मानवी समूहांमध्ये मंत्राची एक सरळ व सुलभ परंपरा चालत आलेली आहे. त्यांचा बोलबाला नसलेला मानवी समूह विरळाच. मानवी समाजातील हे मंत्र येतात आणि जातात. पण आपल्याकडील शिक्षित, उच्चशिक्षित माणसं या मंत्रांची स्तुती व मंत्र पठणाची महती सांगत आली आहेत. आज प्रगत विज्ञानाची फोडणी देऊन त्याला फसव्या (pseudo) विज्ञानाची झालर चढवून नवा सोंगाड्या नवीन ज्ञान म्हणून घराघरात पसरवीत आहे. त्यांच्या मते मंत्र म्हणजे 'मननात् त्रायते'. याचा अर्थ ज्याचे मनन केल्यास आपले स्वतःचे व समूहाचे तारण होते तो. ज्यावेळी केंद्रित ध्वनिकंपने व मनःशक्ती बाहेर पडते किंवा शरीरात एकवटते तिला मंत्रशक्ती असे ते संबोधतात. त्यांच्यामते सर्वश्रेष्ठ मंत्र म्हणजे गायत्री मंत्र. जो दोन्ही अर्थप्रधान आणि ध्वनिप्रधान आहे. याउलट शाबरी मंत्र हा बोधरहित असल्याने त्याला ध्वनिप्रधान मंत्र म्हटले आहे. गायत्रीमंत्राचा अर्थ बघितला की असे वाटते की यात काहीच खास नाही. यामागचे छद्मविज्ञान मात्र अल्फा, बीटा कंपने सारखे शब्द वापरून तयार केलेले दिसते.

### ही अल्फा बीटा कंपने काय असतात?

EEG इलेक्ट्रो एंसेलोग्राफीच्या शोधानंतर या अवस्था उघडकीस आल्या. मेंदूच्या ॲक्टिविटीमुळे काही विद्युत्तरंगीय कंपने होत असतात. यांची जाणीव पहिल्यांदा 1875 साली झाली; नंतर मोजमाप 1924 साली व्हायला लागले. या कंपनांची फ्रिक्वेंसी असते व त्याचा संबंध मेंदूच्या चार अवस्थांशी लावण्यात आला. बीटा, अल्फा, थिटा व डेल्टा व हल्ली गॅमा अशा पाच अवस्था लक्षात आल्या. यातील अल्फा अवस्थेत मेंदूत आठ ते तेरा हर्ट्झ फ्रिक्वेंसीच्या विद्युल्लहरी असतात. सर्वसाधारणपणे डोळे बंद असताना पण झोपले नसताना ही अवस्था येते. थिटा व डेल्टा मध्ये माणूस झोपी जायला लागतो.तर बीटा ही सर्वसाधारणपणे जागृतावस्था मानली जाते. असे दर्शवले जाते की मंत्राच्या सहाय्याने ध्यानधारणा केली तर मनुष्य अल्फा अवस्थेत जातो व त्याचा मेंदू अल्फा तरंग पाठवू लागतो. मात्र यात काही दम नाही. कारण कुठल्याही माणसाने डोळे बंद केले तर तो अल्फास्टेटमध्ये जाण्याची शक्यता असते. याशिवाय कित्येक प्राण्यांमध्ये हे अल्फा विद्युत तरंग आढळले आहेत.



### या छद्मविज्ञानाचा उपयोग कसा केला जातो?

मी पहिल्यांदा सांगितलेले मंत्र हे कुणा मांत्रिकाने म्हणावयाचे मंत्र होते. गायत्री मंत्रासारखे मंत्र हे ज्याने त्याने म्हणावयाचे आहेत. गायत्री मंत्र हा एके काळी फक्त ब्राह्मणांनी म्हणावयाचा मंत्र होता. तो स्त्री वा शूद्रांसमोर म्हटलाही जात नसे. हळूहळू लोक शिकू लागले आणि मंत्रोपचार कमी व्हायला लागले. आता अशा प्रकारच्या छद्मविज्ञानाच्या साहाय्याने उच्चशिक्षित लोकांना असे सांगितले जाते की हा मंत्र बुद्धिवर्धक वगैरे आहे. आणि ईईजीसारख्या तंत्राने ते सिद्ध झाले आहे.

### मंत्र व चमत्कार यांचा काय संबंध?

मंत्र हे चमत्काराची वातावरणनिर्मिती करण्यासाठी वापरले जातात. मांत्रिक सहसा मंत्रोपचारासोबत काही क्रिया करत असतो. त्या क्रियांतून तो काहीतरी चमत्कार झाला असे दर्शवतो. माझ्या लहानपणापासून मी अनेक मांत्रिकांचे चमत्कार स्वतः पाहिले. असे चमत्कार करणारे जसे अशिक्षितांमध्ये दिसतात तसेच ते उच्चशिक्षितांमध्येही दिसतात. अशिक्षित जनातील चमत्कार हे छोट्या हातचलाखीने होतात तर सुशिक्षित समाजातील काही मांत्रिक हे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारे असतात. याशिवाय त्यांना छद्मविज्ञानाची साथ बोलताना असते.

### तुमच्या अनुभवातील उच्चशिक्षित वर्गात झालेला चमत्कार सांगा.

आय.आय.टीत झालेला दीपक राव यांचा प्रयोग माझ्या डोळ्यांसमोर आहे. भारताचे युरी गेलर म्हणून हा गृहस्थ ओळख करून द्यायचा. हा पूर्वी युरी गेलरसारखा व्यवसायाने जादुगार होता. पण ते फारसे चालले नसल्याने त्याने मनःशक्तीचे प्रयोग दाखवायला सुरुवात केली. आम्ही त्याविरुद्ध तेथे जाऊन पत्रके वाटली व अंनिसचे 21 लाखाचे आह्वानही दिले. वेळेवर हा प्रकार ध्यानात येऊन दीपक रावने प्रश्नोत्तरे टाळली. मात्र त्याचे प्रयोग मी जवळून पाहिले. मनाने पेन पेंसिल उचलणे (अदृश्य धाग्याच्या सहाय्याने), मनातले ओळखण्याचा प्रयोग, असे अनेक छोटेमोठे प्रयोग त्याने केले. त्यानंतर आम्ही विद्यार्थ्यांना सांगितले की हे सर्व प्रयोग आम्ही तुम्हाला करून त्यांची फोड करून सांगू.

### तुम्ही तसे केलेत?

तसा प्रसंग आला नाही. एकतर मुलांनी आम्हाला बोलावले नाही. आणि दुसरे म्हणजे संयोजकांना तरी आमचे बोलणे पटले होते व दीपक रावला बोलावण्यात चूक झाली असे वाटले होते. त्याच्या प्रयोगांची फोड मला एकेक करून सुचली. आता मी त्याचे सर्व चमत्कार करून दाखवतो.

### दीपक रावचे पुढे काय झाले?

मी यासंबंधाने नाव घेऊन लेख लिहिला. अंनिस वार्तापत्रात मुखपृष्ठावर त्याचे छायाचित्र असा तो लेख होता. याची दखल महाराष्ट्र टाईम्स सोडून इतर वृत्तपत्रांनी घेतली

नाही. महाराष्ट्र टाईम्समधील उतारा वाचून दीपक राव यांनी याबद्दल अशी मखलाशी केली की मी चमत्कार करतो हा दावा कधीच केला नव्हता. पण हा खुलासा बरोबर नसल्याचे संदर्भासकट पत्र पाठवल्यावर त्याने त्यात लक्ष घालणे सोडून दिले. आय.आय.टी.तल्या प्रात्यक्षिकाचा दीपक रावने चांगलाच फायदा करून घेतला असे कळले. हल्ली उच्चभ्रू समजलेल्या सहनिवासात खूप जास्त फी घेऊन त्याची चमत्कारदर्शनाची प्रात्यक्षिके होतात असे कळले.

**तुम्ही इतके चमत्कार पाहिले व त्यांची फोड केलीत. यातील सर्वांत कठीण चमत्कार सांगा.**

सफाळा गावातील एक मिशनरी हा चमत्कार करीत असे. तो एक मेणबत्ती पेटवून त्यावर लिंबू धरायचा. मेणबत्ती विझल्यावर ते लिंबू मेणबत्तीला चिकटायचे. ते जर चिकटले तर बाधा झाली, अन्यथा नाही. हा प्रयोग पाहिल्यावर मी घरी येऊन तसे करून पाहिले. माझे लिंबू काही मेणबत्तीला चिकटेना. सुरवातीला वाटले की मेण वितळण्यामुळे हे घडते.पण ते बरोबर नव्हते. मग मी परत एकदा हा प्रयोग बघायला गेलो. जाताना तशीच दिसणारी एक मेणबत्ती मी स्वतःजवळ घेऊन गेलो होतो. मी तिकडे गेल्यावर त्याला मुद्दाम बोलण्यात गुंतवून मी गुपचूप मेणबत्ती बदलली. त्याची मेणबत्ती घरी घेऊन आल्यावर मला त्यातील गोम समजली.त्याने त्या मेणबत्तीत वातीजवळ एक सुई रोवून ठेवली होती. नंतर लक्षात आले की तो लिंबू न वापरता एक तत्सम चेंडू वापरत होता. तो चेंडू तो त्या सुईवर दाबायचा. सुई दिसू नये म्हणून तो मेणबत्ती जास्त वेळ पेटवायचा नाही. मेणबत्ती मोठी व कागदवाली असायची ज्यामुळे मेण वितळून खाली पडत नसे. चमत्कार करताना असे छोटे मोठे डिटेल्स महत्त्वाचे असतात. चमत्काराची फोड करताना व ते दर्शवताना झालेल्या चुकांमधून मी हे शिकत गेलो. लहानपणी मी नुसते वाचले होते की आगीवरून असे चालतात. त्यावेळी मी कुठेही हे न बघता चालायला लागलो. आता तत्पूर्वी पाय धुणे, आगीवर मीठ टाकणे ज्यामुळे तडतड वाढते पण उष्णता वाढत नाही, बाहेर आल्यावर लगेच पाणी टाकणे असे करायला लागलो.

**प्रत्यक्ष कृतीसोबत आणखी काय काय लागते?**

मी असे करताना भरपूर वाचतो. आता हा मंत्र व मांत्रिक हा विषय घेताना त्याची पूर्वतयारी म्हणून मी दुसऱ्या बाजूची अनेक पुस्तके विकत आणली. त्यांना काय म्हणायचे ते समजून घेतले. मानसशास्त्रीय चमत्काराची प्रात्यक्षिके देताना त्याचा मी अभ्यास केला होता.

**प्रत्यक्ष कृती न करणाऱ्या पण विवेकवादी असणाऱ्या वाचकवर्गाला तुम्ही काही सांगू इच्छिता का?**

प्रत्येक विवेकी माणसाला आमच्यासारखे चळवळीत राहून वा प्रत्यक्ष काम करणे जमेलच असे नाही. कुणी कृतीतून तर कुणी चर्चेतून तर कुणी लिहून आपला सहभाग दाखवतात. प्रश्न चोहोकडून जेव्हा प्रचंड विरोधाला कार्यकर्ते सामोरे जात असतात. हल्लाबोल केल्यासारखा प्रचार चालू असतो. त्यावेळी हा लढा बोथट होऊ शकतो. म्हणून प्रत्यक्ष कृती न करणाऱ्या विवेकी वाचकवर्गाला एक आवाहन आहे. जेव्हा आम्हाला होणारा विरोध प्रत्यक्ष कृतीतून सुरू होतो तेव्हा तुम्हीही प्रसारमाध्यमाद्वारे, कधी मुलाखतीद्वारे, कधी चर्चेद्वारे तर कधी लेख लिहून यास विरोध नोंदवावा. त्यामुळे आमच्यासारख्यांचे बळ वाढेल.

□□

# भविष्यकथन

*सुहास शिंगारे*

भविष्याची चिंता मानवाला प्राचीन काळापासून सतावत आली आहे. त्यावर मात करण्यासाठी काळाच्या ओघात भविष्यकथनाच्या विविध पद्धतींनी आकार घेतला. या सर्वांचा उगम पुराणकाळात झाल्याचे दिसून येते. सर्वस्वी निसर्गावर अवलंबून असणारा आदिमानव जसजसा निसर्गबदलांशी परिचित होऊ लागला तसतसा निसर्गाच्या अफाट सामर्थ्यात स्वतःला जुळवून घेण्यास शिकला. हे शिकत असताना निसर्गाच्या वर्तमान स्थितीतून अथवा बदलातून भविष्यातील सृष्टी आकार घेत असते हे त्याला समजू लागले. झाड फुलांनी बहरलं की काही दिवसांत झाडाला गोड फळे लागतात. मुंगीसारखे कीटक पृष्ठभागावर दिसू लागले की थोड्याच दिवसांत पाऊस येतो. विशिष्ट प्राणी दिसेनासे झाले की उन्हाळा सुरू होतो. भिन्न भौगोलिक वातावरणात भिन्न वनस्पती आणि प्राणी आढळतात. यावरून भौगोलिक परिस्थितीचा परिणाम जीवसृष्टीवर होत असतो हे त्याच्या ध्यानात आले. त्याच्या आधारे त्याने प्राणी, वनस्पतींच्या निरीक्षणातून स्वतःला राहण्यालायक योग्य भौगोलिक पर्यावास शोधला. पुढे जाऊन भटकंती करणाऱ्या मानवी समूहाने तर मुक्कामाची जागा निवडताना बळी जाणाऱ्या प्राण्यांचे यकृत पाहून सभोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीचा अंदाज बांधण्यास सुरुवात केल्याचे आढळून येते. हीच पद्धत पुढे रोमन साम्राज्यात प्रचलित झाली. आणि नंतर या प्रथेचे रूपांतर रोमन सम्राट कॉमॉडसच्या काळात प्रतिष्ठित लोकांच्या मुलांची आतडी पाहून भविष्य सांगण्यात झाले. या सर्वातून एक महत्त्वाची गोष्ट तत्कालीन मानवाच्या ध्यानात आल्याची दिसते, ती म्हणजे कोणतीही घटना अथवा बदल आपोआप घडत नाही तर त्याला कारण असते. विविध घटनांचा त्याने जोडलेला कार्यकारण संबंध जरी त्याला नीटसा समजला नसला तरी त्याचा मार्ग चुकीचा होता असे म्हणता येणार नाही. कारण तो निरीक्षण आणि तर्कावर आधारित होता. त्याचा उद्देश केवळ मानवी समूहाची भविष्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीतून सुटका करणे एवढाच होता. या भविष्यकथनामागे, निसर्गाला भविष्यातील घटना ज्ञात

असतात आणि त्या तो सांकेतिक भाषेत प्राणी अथवा वनस्पतींमार्फत आपल्यापर्यंत पोहोचवतो, अशी मानवाची समजूत होती. या समजुतीतून मांजर आडवे जाणे, घुबड ओरडणे, कुत्रे रडणे, टिटवी घरावरून ओरडत जाणे, अंगावर पाल पडणे इत्यादी अपशकुनी तर कावळ्याचे ओरडणे, मुंगुस आडवे जाणे इत्यादी शुभशकुनी मानण्याच्या प्रथा निर्माण झाल्या असाव्यात.

निसर्गाची सांकेतिक भाषा समजणारी नव्हती. ज्यांना समजली त्यांना तत्कालीन मानवाने दैवी शक्तीचा आविष्कार मानला आणि त्यामुळे कार्यकारण-संबंधाला पूर्णतः तिलांजली मिळाली. पण केवळ एवढ्यानेच भविष्यकथनाच्या विविध पद्धती निर्माण झाल्या नाहीत. भिन्न प्रदेशात राहणाऱ्या मानवी समूहांना भिन्न नैसर्गिक परिस्थितीशी तोंड द्यावे लागले. ज्या पर्यावरणात राहात असे तेथील उपलब्ध साधनांचा वापर तो दैनंदिन जीवनात करू लागला. त्यातून त्याने वेगवेगळ्या जीवनपद्धती जश्या विकसित केल्या तश्याच भविष्यकथनाच्या विविध पद्धती निर्माण झाल्या. या भविष्यकथनात तो सभोवताली सापडणाऱ्या साधनांचा वापर करत असे. सर्व बाजूंनी समुद्राने वेढलेल्या जपानी बेटावर कासवाच्या पाठीवरच्या आकृत्या पाहून भविष्य सांगितले जाई. कारण त्याची समजूत होती की ईश्वराची इच्छा मानवाला कळावी म्हणून स्वतः ईश्वराने कासवाच्या पाठीवर आपली इच्छा आकृतिरूपात मांडली. चीनमध्ये सहा रेषांनी बनलेल्या चौसष्ट वेगवेगळ्या भौमितिक आकृत्यांचे साधर्म्य नैसर्गिक आकाराशी जोडून भविष्य सांगितले जाई. या पद्धती काळानुसार बदलत गेल्याचे दिसून येते. कासव जसे दुर्मिळ झाले तसे त्याची जागा कॉफी बियांनी घेतली. म्हणजेच सहजासहजी उपलब्ध होणाऱ्या साधनांचा वापर भविष्यकथनात होऊ लागला. अशा प्रकारच्या भविष्यकथनात कार्यकारणभावांऐवजी दैवीशक्तीला महत्त्व दिल्याने भविष्य सांगणाऱ्याला अमर्याद महत्त्व प्राप्त झाले. राजे, महाराजे आपल्या राजदरबारात ज्योतिष्याची नेमणूक करू लागले. वापरली जाणारी साधने केवळ निमित्तमात्रच राहिली. त्यामुळे भविष्यकथनाच्या विविध नावीन्यपूर्ण पद्धती तयार झाल्या. उदा. पोपटाद्वारे भविष्यकथन, वश केलेल्या पिशाच्चाने कानात भविष्य सांगणे (कर्णपुतळी), स्फटिकात नजर रोखून, काजळाच्या डबीत पाहून, रुद्राक्ष पाहून, फासे टाकून (रमलविद्या), अंकावरून (अंक सामुद्रिक), चेहरा, शरीराची ठेवण, तीळ व खुणा पाहून (अंगलक्षण होराशास्त्र), तळहातावरच्या रेषा पाहून (हस्तसामुद्रिक) भविष्य सांगणे इत्यादी. या प्रकारात आणखी एक महत्त्वाची गोष्ट दिसून येते ती म्हणजे व्यक्तिकेंद्रित भविष्यकथन. व्यक्तीच्या भविष्यात काय घडणार याची भविष्यवाणी.

आजच्या वैज्ञानिक युगात वर उल्लेखलेल्या भविष्यप्रकारांचा फोलपणा सर्वज्ञात आहे. पण हस्तसामुद्रिकाविषयीचे चित्र किंचित वेगळे आहे. कारण जसे प्रत्येकाचे आयुष्य वेगळे तसे तळहाताचे ठसेही वेगळे. या युक्तिवादामुळे बहुदा अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात 1950 साली घेतलेल्या जनमत-चाचणीत 20% लोक यावर विश्वास ठेवत असल्याचे दिसून आले. पण थोडा जरी तार्किक विचार केला तरी त्याचा फोलपणा आपल्या ध्यानात येतो. उदा. दीडशे वर्षांपूर्वी जेव्हा भारतातील स्त्रियांना व दलितांना शिक्षणाचा हक्क नव्हता, तेव्हा खरोखरच त्यांच्या हातावर शिक्षणरेषा नव्हती का? आणि समाजसुधारकांच्या प्रयत्नांनी जेव्हा शिक्षणाचा हक्क मिळाला तेव्हा सर्वांच्या तळहातावर पटापट शिक्षणरेषा उमटू लागली का?

मानवी उत्क्रांतीच्या प्रक्रियेत आणखी एक भविष्यप्रकार उदयाला आला तो म्हणजे 'फलज्योतिष्य'. जन्मवेळी आकाशस्थ ग्रहगोलांची स्थिती पाहून, कुंडली मांडून भविष्य सांगणे. आकाशातील चांदण्यांचे कुतूहल मानवाला आदिम अवस्थेपासूनच होते. आकाश-निरीक्षणातूनच त्याला चांदण्यांच्या शिस्तबद्ध हालचालींची जाणीव झाली. सूर्य-चंद्राच्या हालचाली आणि समुद्राची भरती-ओहोटी यातील लयबद्धता, विशिष्ट तारा अथवा तारकासमूह विशिष्ट ठिकाणी आला की बदलणारे हवामान इत्यादींमुळे त्याला आकाशातील हालचालींचा संबंध निसर्गातील कालबद्ध बदलांशी असल्याचे जाणवू लागले. (याच समजुतीच्या आधारे बहुसंख्य शिक्षित समाज फलज्योतिषाला विज्ञान मानून त्यावर विश्वास ठेवत असावा.) आणि त्यातून फलज्योतिषाचा उदय झाला. सुरुवातीला सभोवतालच्या निसर्गावर होणाऱ्या परिणामांचे भाकित केले जात असावे. नंतर काळाच्या ओघात आकाशातील ग्रहस्थिती पाहून व्यक्तीचे भविष्य सांगण्याची प्रथा रूढ झाली असावी. आज ही पद्धत समाजाच्या सर्व थरांत संपूर्ण जगभर वापरली जाते. या पद्धतीत भविष्यकथनाची सुरुवात कुंडलीपासून होते. कुंडली म्हणजे जन्मस्थळापासून जन्मवेळी आकाशाचा तयार केलेला नकाशा. तो तयार करण्यासाठी सूर्य पृथ्वीभोवती ज्या मार्गाने फिरतो त्या क्रांतिवृत्ताचे बारा भाग करून प्रत्येक भागात विशिष्ट आकृती (सिंह, मेष, कर्क इ.) दर्शविणाऱ्या तारकासमूहांना नावे देऊन बारा राशी तयार केल्या. त्याच क्रांतिवृत्ताचे सत्तावीस भाग करून प्रत्येक भागातील तारकासमूहाला नाव देऊन सत्तावीस नक्षत्रे तयार केली. यात पृथ्वी मध्यभागी समजण्यात आली आहे. कुंडली तीन प्रकारे दर्शवली जाते. आपल्याकडे आयताकृती, पाश्चिमात्त्य जगात वर्तुळाकार तर दक्षिण भारतात चौकोनी. चौकोनी कुंडलीत राशींची स्थाने ठरलेली असतात. आणि लग्न (जन्मवेळी पूर्वेची रास) ज्या राशीत तिथे 'लग्न' असे लिहिण्याची पद्धत आहे. कुंडली तयार करण्याच्या प्रामुख्याने तीन पद्धती आहेत. जन्मवेळेस जन्मस्थळाच्या पूर्वेस जी रास, ती कुंडलीच्या प्रथम स्थानात (लग्न स्थानात) लिहून कुंडली तयार करणे. ती झाली लग्न कुंडली. दुसरी राशी कुंडली : त्यामध्ये जन्मवेळेस चंद्र ज्या राशीत ती रास प्रथमस्थानात लिहून कुंडली तयार करणे. तर तिसरी भावचलित कुंडली. ही कुंडली जन्मवेळेची सांपतिक वेळ, स्पष्ट भावसाधन आणि स्पष्ट ग्रहसाधन या आधारे बनवली जाते. त्यातही दोन प्रकार : एक सायन भावचलित आणि दुसरी निरयन भावचलित. निरयन पद्धतीनुसार मेष रास ही अश्विनी नक्षत्रापासून, खरं तर रेवती नक्षत्राच्या झिटापेशियम या शेवटच्या ताऱ्यापासून सुरू होते. यास अश्विन्यारंभबिंदू म्हणतात. तर सायन पद्धतीत मेष रास वसंत संपात बिंदूपासून म्हणजेच अश्विन्यारंभबिंदूच्या मागे साडेतेवीस अंशांवर सुरू होते कारण पृथ्वीला परांचन गती



सुहास शिंगारे

असल्याने दर बहात्तर वर्षांनी वसंत संपात बिंदू एक अंशाने अश्विन्यारंभबिंदूपासून दूर जातो. परिणामी सायन-पद्धतीनुसार जर श्रावण महिन्यात सूर्य सिंह राशीत असेल म्हणजेच स्वगृही तर निरयन पद्धतीनुसार सूर्य कर्कराशीत. त्यामुळे सूर्याच्या परिणामात कमालीची तफावत आणि भविष्यकथनात भिन्नता अपरिहार्य. प्रश्नकुंडली हा आणखी एक प्रकार आहे. यात व्यक्तीला प्रश्न पडतो ती वेळ जन्मवेळ मानून कुंडली तयार करून भविष्य सांगणे. या सर्व प्रकारात एकाच व्यक्तीच्या वेगवेगळ्या कुंडल्या तयार होणार आणि त्याद्वारे सांगितलेले भविष्यही वेगवेगळे येणार.

केवळ कुंडली तयार करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या नाहीत तर भविष्य ठरविण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या आहेत. दशाविचार, गोचरफलादेश, ताजिक, दिनवर्ष पद्धती, डिरेक्शन ह्या त्यांतील महत्त्वाच्या पद्धती आहेत. त्यामुळे एकाच व्यक्तीची एकच कुंडली वेगवेगळ्या ज्योतिष्यांना दिली तर त्यातून नेमके एकच भविष्य येणे कदापि शक्य नाही.

विज्ञान 'ग्रहगोलांचे परिणाम मानवावर होत नाहीत' असे म्हणत नाही. मात्र 'ते परिणाम सर्वांवर सारखेच आणि ताबडतोब होत असून ते अतिशय सूक्ष्म असतात.' असे मानते. तर फलज्योतिषानुसार ते जन्मवेळेनुसार व्यक्तिगणिक वेगवेगळे असल्याचे मानते. म्हणजेच जन्मवेळेच्या ग्रहस्थितीनुसार आयुष्यभर ग्रह, राशी, नक्षत्रे परिणाम करत असतात. हे परिणाम कोणत्या प्रकारचे असू शकतील? गुरुत्वाकर्षणाचा विचार करायचा तर फलज्योतिषातील नऊ ग्रहांपैकी राहू आणि केतू यांना भौतिक अस्तित्वच नाही. ते काल्पनिक छेदनबिंदू आहेत. त्यामुळे त्यांच्या गुरुत्वाकर्षणाचा प्रश्नच उद्भवत नाही. चुंबकीय लहरींचा विचार केला तर चंद्र, शुक्र, मंगळ यांना चुंबकीय क्षेत्रच नाही. राशींचा विचार करायचा तर प्रत्येक रास तीस अंशाची मानली असली तरी प्रत्यक्षात त्या समान आकारमानाच्या नाहीत. त्यांच्यातील अंतरे पण सारखी नाहीत. प्रत्येक राशीत असणाऱ्या ताऱ्यांची संख्याही सारखी नाही. आणि प्रत्येकातील सर्व तारेही पृथ्वीपासून सारख्याच अंतरावर नाहीत. हीच गोष्ट नक्षत्रांबाबत. फलज्योतिषात मात्र सर्व राशी व नक्षत्रे एकाच त्रिज्येच्या गोलाकार पृष्ठभागावर आहेत आणि पृथ्वी मध्यावर आहे असे मानून गणिती आकडेमोड केली आहे. त्यामुळे केवळ प्राचीन आहे आणि ऋषिमुनींनी सांगितले म्हणून त्याला विज्ञान म्हणता येणार नाही. विज्ञान वस्तुनिष्ठ असते. व्यक्तिनिष्ठ नसते. ऋषिमुनींना खरोखर दैवी शक्ती वा दिव्य दृष्टी असती तर राहू, केतू ऐवजी फलज्योतिषात युरेनस, नेपच्यून दिसले असते.

फलज्योतिषाला मिथ्या विज्ञान का म्हणायचे? याचे एक प्रमुख कारण म्हणजे त्याने ग्रह राशी आणि नक्षत्रांना चिकटवलेले गुणधर्म. उदा. चंद्र, गुरू, शुक्र, शुभ ग्रह तर रवि, शनि, मंगळ पाप ग्रह. यामागचे कारण काय? उत्तरच नाही. तार्किक विचार केला तरी उत्तर मिळत नाही. रविमुळे पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण झाली आणि आजपर्यंत टिकली. त्यामुळे खरे तर रवि शुभ असायला हवा. दुसऱ्या बाजूला तो सर्व ग्रहांत श्रेष्ठ. गुरु-शुक्र दोन्ही शुभ ग्रह पण ते म्हणे एकमेकांचे शत्रू. मंगळाचे उच्चस्थान मकर तेच गुरूचे नीच स्थान तरी मंगळ, गुरु एकमेकांचे मित्र. शुक्र स्त्रीलिंगी, रवि पुल्लिंगी तर शनि नपुंसक. मघा, पूर्वा, उत्तरा या तीन स्त्रीलिंगी नक्षत्रापासून तयार होते पुल्लिंगी सिंह रास. शनीचा मूळ पिंड दुःख-नैराश्यवादी आहे. तो पूर्वजन्मी केलेल्या कर्माप्रमाणे फल देणारा आहे. शुक्र हा भिन्न लिंगामधील आकर्षण निर्माण करणारा ग्रह आहे. तो प्रेमभावना दाखवतो. व्यक्तीचे कामसुख, व्यक्तीचे स्त्रीसंबंध शुक्रावरून पाहतात. शुभ ग्रह वक्री झाले की ते निर्बल होतात. वस्तुतः कोणताही ग्रह उलट दिशेने चालत नाही. पृथ्वीसापेक्ष तो वक्री असल्याचे भासते. अशा कितीतरी मनोरंजक कल्पना फलज्योतिषात वाचायला मिळतात. त्यामागचा कार्यकारण-भाव मात्र कुठेच आढळत नाही. मनुष्याच्या आयुष्यात कोणत्या काळी काय घडणार हे सांगण्यासाठी विशोत्तरी महादशेची निर्मिती पराशर आचार्यांनी केली. त्यामध्ये माणसाचे सरासरी आयुष्य 120 वर्षे धरून त्याचे कमी अधिक कालावधीचे नऊ कालखंड पाडून प्रत्येक कालखंडाची मालकी एकेका ग्रहाकडे दिली. मुलाचा जन्म होतो तेव्हा चंद्र ज्या नक्षत्रात असतो त्या नक्षत्राचा स्वामी जो ग्रह असेल त्या ग्रहाची महादशा सुरू होते. उदा. गुरूची महादशा सुरू झाली. ती संपल्यावर क्रमाने शनि, बुध, केतू इत्यादींच्या महादशा येत राहतील. आणि त्या त्या ग्रहांची विशिष्ट फळे मिळत राहतील. यामध्ये ग्रहाचा क्रम ठरलेला असतो. ही कल्पना अचाट आहे पण कार्यकारणभावाचा पत्ता नाही.

फलज्योतिषाचे समर्थक भविष्य खरे ठरल्याचे दाखले देतात. पण खरोखरच भविष्य खरे ठरते का? कधीच नाही. अलिकडेच ऑक्टोबरमध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल काय लागतील याबाबत भविष्यवाणी करण्याचे 21 लाख रुपयांचे आह्वान महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समितीने ज्योतिष्यांना दिले होते. पण कोणीही पुढे आले नाही. पृथ्वीवर सर्व ग्रह सूर्याच्या एका बाजूला येणार आणि या अष्टग्रहीमुळे, पृथ्वीवर हाहाकार उडेल, भूकंप, वादळ, पाऊस अशी अरिष्टे येतील असा दावा जगभरातील ज्योतिष्यांनी 1962 साली केला होता. प्रत्यक्षात काहीही घडले नाही. मात्र लोकांना घाबरवून जपजाप्य, होमहवन, नवस, ग्रहशांती, खडे आदि कर्मकांडे करायला लावून ज्योतिष्यांनी भरपूर माया गोळा केली. वाईच्या डॉ. शरद अभ्यंकर यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये जन्मतःच मृत पावलेल्या काही बालकांच्या पत्रिका बनवून त्यावरून ज्योतिष्यांना भाकित वर्तवण्यास सांगितले. सर्व ज्योतिष्यांनी या बालकांचे उत्तम व उज्ज्वल भविष्य वर्तविले. परंतु ती बालके जन्मतःच मृत असल्याचे एकाही ज्योतिष्याला सांगता आले नाही. एप्रिल 1991 मध्ये पुण्याच्या साप्ताहिक सकाळमध्ये महाराष्ट्रातील सात नामवंत ज्योतिष्यांनी मे 1991 मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे भविष्य वर्तविले होते. सातपैकी सहाजणांनी पंतप्रधानपदी राजीव गांधी विराजमान होतील तर एकाने भाजपाला सत्ता मिळेल असे सांगितले होते. परंतु कुंडलीवरून मृत्ययोग सांगण्याचा दावा करणाऱ्या ज्योतिष्यांपैकी एकालाही राजीव गांधींच्या हत्येचे भाकीत करता आले नाही. मूळ नक्षत्रात जन्मलेले मूल आई-वडिलांचा नाश करते असे फलज्योतिषात म्हटले आहे. याच मूळ नक्षत्रात जन्मलेल्या संत एकनाथांनी म्हटले आहे,



सुहास शिंगारे

*''मूळीच्या मूळी एक जन्मला, मायबापें घोर धाक घेतला,*
*कैसें नक्षत्र आलें कपाळा, स्वयें लागलों दोहोंच्या निर्मूला.''*

तार्किक विचार आणि वैज्ञानिक चिकित्सेने फलज्योतिषाचा फोलपणा सिद्ध होत असून लोक फलज्योतिषाकडे का जातात? याला अनेक कारणे आहेत, 1) भविष्याची चिंता आणि त्यातून आगतिक झालेली मानसिकता, 2) मनात खोलवर रुजलेला दैववाद आणि त्यातून ज्योतिषावर बसलेला प्रगाढ विश्वास, 3) शक्याशक्यतेचा नियम : बहुतेक प्रश्न द्विपर्यायी असतात. उदा. नोकरी मिळेल का? मूल होईल का? इत्यादी. यांपैकी कोणतेही उत्तर दिले तरी ते बरोबर येण्याची शक्यता 50%. बरे ज्योतिषी एवढे सांगून थांबत नाही. 'शंकरावर लघुरुद्र कर', 'संकष्ट्या धर', 'नवचंडी कर', अशुभ ग्रहाचा मंत्रजप कर' इत्यादी. त्यामुळे भविष्य चुकलेच तर उपासना करण्यात कमी पडला. एवढेच नाही तर ज्योतिषी एकच गोष्ट जातकाला सांगत नाही. आयुष्यात घडणाऱ्या शेकडो घटना सांगितल्यावर त्यातील काही गोष्टी खऱ्या ठरतात. त्यामुळे जातकाला आपले भविष्य खरे ठरल्यासारखे वाटते. आणि खोट्या ठरलेल्या गोष्टींबाबत 'नसीब' नावाची कल्पना कामी येते. खरे ठरलेल्या भविष्याचा जातक स्वतःच गाजावाजा करतो आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी चटकदार बातमीची वाट पाहणाऱ्या प्रसारमाध्यमांना आयता मुद्दा मिळतो. परिणामी फक्त खरी ठरलेली भाकिते तुमच्या-आमच्यापर्यंत पोहोचतात आणि तीही पराचा कावळा बनून.

4) दुटप्पी भाषा : ज्योतिषी नेहमी गुळमुळीत आणि संदिग्ध भाषेत भविष्यकथन करतात. त्यामुळे सोईनुसार हवा तो अर्थ काढता येतो. उदा. ''प्रकृतीची काळजी घ्या, कारण शनि नीचीचा आहे. पण घाबरण्याचे कारण नाही. गुरु स्वग्रही परततोय.'' आता जातक आजारी पडला तर शनीचा फटका आणि ठणठणीत राहिला तर गुरूची कृपा. काहीही घडले तरी भविष्य खरेच. काही वाक्ये सर्वांना लागू पडतात. उदा. ''बाहेरून जरी तुम्ही शिस्तबद्ध आणि स्वतःवर नियंत्रण ठेवू शकत असला तरी आतून तुम्हाला कधी कधी चिंता भेडसावतात आणि असुरक्षितता जाणवते.'' तर काही वाक्ये जरी प्रत्येकाला लागू होत नसली तरी मनाला समाधान देणारी असतात. उदा. ''तुम्हाला अभिमान आहे की तुम्ही स्वतंत्रपणे विचार करता आणि दुसऱ्यांची विधाने परीक्षणाशिवाय मानत नाही. स्वतःचा उत्कर्ष घडवून आणण्याची क्षमता असलेले पण पूर्ण वाव न मिळालेले गुण तुमच्यात आहेत.'' अशी वाक्ये घेऊन एक व्यक्तिचित्र तयार केले जाते. ते प्रत्येकाला आपलेच वाटते. याला सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ व गणितज्ञ जयंत नारळीकर यांनी त्यांच्या 'आकाशाशी जडले नाते' या पुस्तकात बार्नम इफेक्ट संबोधून सविस्तर वर्णन केले आहे. कुंडली पाहून जर असे भविष्य कथन केले तर कोणालाही ते पटण्याजोगे आणि लागू पडणारे असेल. पणजीत फलज्योतिषाचा व्यवसाय करणारे संस्कृतिकोशकार पं. महादेवशास्त्री जोशी शास्त्रानुसार भविष्य सांगायचे पण त्यांनी सांगितलेले भविष्य खरे ठरायचे नाही. त्याचा परिणाम व्यवसायावर झाला. त्यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी गोव्यातील नामवंत भास्कराचार्यांना सल्ला विचारला. त्यावर ते म्हणाले, ''तुम्ही ग्रंथाधारे भविष्य सांगायला गेलात की मेलात. इथे शब्दजंजाळच कामी येते. समोरच्या माणसाचं सूक्ष्म निरीक्षण करायचं. भविष्य सांगायचं ते बरंच सांगायचं अन् त्याला आशेच्या घोड्यावर बसवून पाठवून द्यायचं. अहो, हा धंदा आहे. यात तुमचं वाक्चातुर्य जितकं प्रभावी तितकं भविष्य बरोबर.'' महादेवशास्त्री जोशींसारख्या प्रामाणिक माणसाला हे न पटल्याने पुढे वर्षभरातच त्यांनी आपला ज्योतिष्याचा व्यवसाय बंद केला.

फलज्योतिष्यांनी केलेले दावे खरे ठरतात का? हे तपासण्यासाठी जगभरातील वैज्ञानिकांनी अनेक चाचण्या घेतल्या. मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीतील बर्नी सिव्हरमन या शास्त्रज्ञाने साडेतीन हजार लग्ने व घटस्फोट यांचा अभ्यास केला. फलज्योतिष्यांनी पत्रिकेवरून कोणत्या जोड्या योग्य म्हणजे पत्रिका जुळणाऱ्या व कुठल्या न जुळणाऱ्या हे सांगितले. वस्तुस्थितीची तुलना करता त्यांना पत्रिकेच्या निष्कर्षाचा वस्तुस्थितीशी संबंध नसल्याचे आढळले.

थोड्याफार फरकाने अशा स्वरूपाच्या चाचण्या भारतातील सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. वि.म.दांडेकर, कॅलिफोर्निया विद्यापीठातील शॉन कार्लसन, सारबॉन विद्यापीठातील डॉ. मिशेल गॉकेला यांनी घेतल्या. सर्वांचे निष्कर्ष फलज्योतिष्याच्या विरोधात गेले. वैशिष्ट्य म्हणजे ज्यांना फलज्योतिषाचा खरे-खोटेपणा तपासायचा होता ते सर्व वैज्ञानिक होते. त्यांना फलज्योतिषाविषयी आवड व कुतूहल होते. मात्र एकाही ज्योतिषाने अशा प्रकारची चाचणी घेतली नाही. आणि आजही कोणी ज्योतिषी त्याबाबत तयारी दाखवत नाही. दहा वर्षांपूर्वी भारतातली सर्व विद्यापीठांवर अंकुश ठेवणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाने (यू.जी.सी.ने) फलज्योतिष हा विषय विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात अंतर्भूत केला. पण तो विज्ञानशाखेत न ठेवता संस्कृत भाषेत समाविष्ट केला. यातून फलज्योतिष वैज्ञानिकांपासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

फलज्योतिषात अंतर्विरोध आहे. ग्रह-राशीचे चांगले-वाईट परिणाम माणसाला भोगावे लागतात असे सांगून त्यातून सुटका करून घेण्यासाठी (परिणाम थांबवण्यासाठी) विशिष्ट विधी करायला सांगितले जातात. उदा. कालसर्प योग असेल तर नारायण नागबळी : नाशिकला त्रिंबकेश्वराच्या मंदिरात जाऊन सोन्याचा नाग देऊन संपूर्ण कुटुंबाने विधी करायचा. शनीची साडेसाडी असेल तर एकवीस शनिवार उपवास करा. शनीला तेल व रुईची माळ घाला. अशुभ ग्रहस्थितीत मूल जन्माला आले, ग्रहशांती करा. इत्यादी इत्यादी. जणू काय ग्रह आपले गुलाम आहेत.

वरील बाबी विचारात घेतल्या तर फलज्योतिष हे फसवे विज्ञान ठरते. म्हणूनच 1974 साली 192 शास्त्रज्ञांच्या सहीसकट (ज्यात अनेक नोबेल पारितोषिक विजेते होते) एक पत्रक प्रसिद्ध केले ज्यात फलज्योतिषावर वैज्ञानिक दृष्टिकोनातून टीका होती. अशा अवैज्ञानिक फलज्योतिषाला विरोध करायची अनेक कारणे आहेत.

1) व्यावहारिक दृष्टीने अनुरूप असलेल्या किंवा परस्परांबद्दल प्रेम असलेल्या जोडप्यांची



सुहास शिंगारे

लग्ने केवळ पत्रिका न जुळल्याने मोडतात.

2) काही आवश्यक आणि लवकर करायच्या गोष्टी केवळ शुभमुहूर्तासाठी लांबणीवर टाकल्या जातात.
3) ग्रहणकाळात सर्व कामधंदा सोडून जपजाप करत बसल्याने आर्थिक विकासाला अडथळा येतो. जरी हा खेळ सावल्यांचा असला तरी समाजात भीतीचे वातावरण निर्माण होते.
4) प्रयत्नवादास खीळ बसते आणि दैववादाला खतपाणी मिळते. फलज्योतिषामुळे माणूस आकाशातील ग्रहगोलांचा गुलाम बनतो. यावर स्वामी विवेकानंद म्हणतात, ''हे दूरवरचे ग्रहतारे जर माझे आयुष्य बदलू शकत असतील, तर मी ते जगण्यास लायक नाही, तेव्हा निर्भय बना व अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त व्हा.'' एवढे सर्व माहीत असूनही देशातील बहुसंख्य प्रसारमाध्यमे, राज्यघटनेतील वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रचाराचे मूलभूत कर्तव्य बाजूला ठेवून फलज्योतिषाचा प्रसार आणि प्रचार करताना दिसताहेत. त्यांनी ''ज्या देशात भविष्यवादी ज्योतिष्यांचा धंदा भरपूर चालतो, तो देश हवा त्या आक्रमकांनी मन मानेल तेव्हा पायदळी तुडवून गुलाम करावा'' हा एका पाश्चात्त्य तत्त्वज्ञाचा इशारा आता तरी ध्यानात घ्यावा कारण तो भारताच्या इतिहासाला तंतोतंत लागू पडतो.

संदर्भ : 1) *फलज्योतिषाचा बोजवारा* : संपादन, लेखक - जगदीश काबरे
2) *फलज्योतिषाचा फोलपणा* : प्रकाशक - महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समिती
3) *आकाशाशी जडले नाते* : लेखक - जयंत नारळीकर
4) *फलज्योतिष शास्त्र म्हणजे केवळ स्वैर ठोकताळ्यांचे भाकड* : लेखक - माधव रिसबूड
5) *कुंडली तंत्र आणि मंत्र* : भाग - 1 व 2 : लेखक व. दा. भट
6) *Superstition* : Author : Felix E. Planer

□ □

> ''फलज्योतिष हे विज्ञान का नव्हे? असा प्रश्न फलज्योतिषी आणि त्या विषयात रस घेणारी सुशिक्षित माणसे विचारतात. फलज्योतिषाकडे वैज्ञानिक जाणून बुजून दुर्लक्ष करतात असा दावा त्या विषयांचे समर्थक करतात. तर असाही आरोप करतात की ह्या विषयाची योग्य अभ्यास न करताच त्याला अवैज्ञानिक असा शेरा मारून वैज्ञानिक मोकळे होतात. वस्तुस्थिती तशी नाही.''
>
> **— *जयंत नारळीकर***



# भूत

*संजय सावरकर*

*आजचा सुधारक*चा वाचक भुतां-खेतांवर विश्वास ठेवत असेल असे कुणी म्हणणार नाही. भूत का नाही? त्याच्या संदर्भातील गोष्टी किंवा घटना कश्या बनावट आहेत? याची चर्चा करण्याचा प्रश्नही येथे उद्भवत नाही. परंतु 'भूत' हा विषय जितक्या गांभीर्याने घ्यायला पाहिजे तितका तो गांभीर्याने घेतला जात नाही हेही तितकेच खरे. त्यामुळे 'भूत' म्हणजे पडक्या वाड्यात राहते, स्मशानात राहते अशा प्रकारची अंधश्रद्धा इतपतच माहिती सुशिक्षित समाज बाळगतो. फार फार तर लहान मुलांना घाबरवण्यासाठी 'भूत' ही कल्पना वापरली जाते. त्यामुळे भुताबद्दल बोलले की बऱ्याच वेळा असा प्रश्न विचारला जातो की तुम्ही 'आहट' वगैरे मालिकांविरुद्ध मोहीम सुरू करा. त्यामुळेच अंधश्रद्धा वाढतात. जणू काही 'आहट'सारख्या मालिकांमधून भुतांच्या कथा दाखवतात म्हणून लोकांचा भुतांवर विश्वास आहे अशी प्रश्नकर्त्याची समजूत असते. परंतु जेव्हा एखादी कल्पना किंवा भीती सार्वत्रिक असते, तेव्हा त्याची कारणे अशी वरवरची नसावीत. भुताच्या कल्पनेत फरक पडत असला तरी मरणोत्तर जीवनाचे अस्तित्व आणि त्याचा जिवंत माणसाला असलेला धोका या दोन मूळ कल्पना धर्म, देश यांच्या सीमा ओळखत नाही.

तसे पाहायला गेले तर धर्माच्या काटेकोर चौकटीत 'भुतां'चा समावेश अशक्य म्हणायला हवा. कारण हिंदू धर्माच्या रिवाजानुसार किंवा मान्यतेनुसार प्रत्येक व्यक्तींचे पाप-पुण्य याचा फैसला पुनर्जन्म होऊन दुसऱ्या जन्मात होणे भाग आहे. त्यामुळे मरणानंतर आत्म्याने ताबडतोबीने किंवा बारा दिवसानंतर दुसरे शरीर धारण करायला हवे. ख्रिस्ती माणसाचे सर्व पापकर्म येशूने आधीच शिक्षा भोगल्यामुळे त्यानेही पृथ्वीतलावर रेंगाळणे चूक ठरते आणि मुस्लिम धर्मीयांचे आत्मे कयामत का दिन येईपर्यंत कबरीमध्ये विश्रांती घेणे अपेक्षित आहे. असे असतानाही सर्व धर्मांमध्ये मरणोत्तर भूत बनण्याची प्रक्रिया आहे. अगदी अब्राहम लिंकन सारख्या व्यक्तीलादेखील भूत बनून भटकावे लागते. धर्माचा पगडा जबरदस्त असतानाही भुताची कल्पना प्रचलित असण्यामागे काहीतरी थेट अनुभवाचा प्रत्यय आणि तोही बहुतेक सर्वांना असायला हवा. भुताचा भास फक्त त्याला घाबरणाऱ्या किंवा भुतावर विश्वास ठेवणाऱ्यालाच होतो असे माझे मत होते परंतु गेल्या वर्षी मी स्वतःच याचा अनुभव घेतला. (अर्थात त्यामुळे 'भूत' खरोखरच अस्तित्वात असते असे काही मी सांगणार नाही) परंतु त्यामुळे या कल्पनेकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला याची कबुली द्यायला हरकत नाही.

त्या मागची हकीकत अशी की आमच्या सोबत काम करत असणारा कर्मचारी अचानक मृत्यू पावला. एका विशिष्ट ठिकाणी बसून येणाऱ्या-जाणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांवर गंमतीशीर शेरे करण्याची त्याची सवय आमच्या अंगवळणी पडली होती. याच कारणामुळे

का होईना पण दोन-तीन वेळा तेथून जाताना तो तिथेच आहे आणि आपल्याला हाक मारतो असा भास मलादेखील झाला. असा भास भीतीपेक्षा सवयीचा परिणाम आहे हेही त्यातून लक्षात आले. ज्यांच्या मनात आधीच भुताची कल्पना ठाम मांडून आहे त्यांच्यासाठी हा भास म्हणजे त्याचा न मागता मिळालेला पुरावाच आहे. असे पुरावे आपण ठरवून केलेल्या प्रयोगापेक्षा जास्त ठसतात हेही तितकेच खरे. परंतु भुताची सांगड भीतीशीच का घातली जाते? आपला मित्र भूत झाल्यावर त्रास देण्याची शक्यता जास्त आहे असे का वाटावे याचे उत्तर काही उत्क्रांतिवाद्यांकडे आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार भीतीची भावना जीवन टिकून राहण्यामागे जास्त फायदेशीर ठरते. उदाहरणच द्यायचे झाले तर प्रत्यक्षात साप असताना तो नाही असे वाटणे या भ्रमात असलेली व्यक्ती सर्पदंशाला आमंत्रण देऊ शकेल परंतु याच्या उलट म्हणजे साप नसताना साप असल्याची भीती त्या मानाने तोट्याची ठरत नाही. त्यामुळे विषाची परीक्षा घेण्याच्या भानगडीत कुणी पडत नाही. परंतु एवढेच कारण भुताच्या सार्वत्रिक भीतीमागे आहे असे मानणे म्हणजे सोप्या-सोप्या उत्तरांची अपेक्षा करण्यासारखे आहे. इंग्रजी चित्रपटांतून (आणि त्यांची नक्कल करणाऱ्या आपल्या हिंदी चित्रपटांमधूनदेखील) नेहमीचे दिसणारे ड्रॅक्यूला किंवा व्हॅम्पायर नावाचे भूत! भुताच्या कल्पनेमागील कहाणी एका स्पेनच्या डॉक्टरने उलगडून दाखवली.

ड्रॅक्यूलावर आधारित चित्रपट पाहताना स्पेनचे मेंदूविकारतज्ज्ञ जुआन गोमेझ अलोन्सो यांच्या रेबीजच्या रुग्णामध्ये आणि ड्रॅक्यूलाच्या चित्रणांमध्ये असणारे साम्य लक्षात आले.

कुत्रा किंवा कोल्ह्यासारख्या प्राण्याच्या चाव्यानंतर रेबीज रोगाची शक्यता असते. या रुग्णामध्ये निद्रानाश, स्नायूंचे अचानक आकुंचन (मस्कूलर स्पाझ्म) त्यामुळे रक्तमिश्रित थुंकी येणे यांच्याबरोबरच उजेड, पाणी आणि आरशासारख्या वस्तूंना असणारी अतिसंवेदनशीलता यांचा ताळमेळ ड्रॅक्यूला किंवा व्हॅम्पायरच्या चित्रणांशी जवळजवळ तंतोतंत बसतो. त्यात लसणाच्या वासाला भिणारे ड्रॅक्यूला आणि दुसऱ्या सामान्य व्यक्तीचा चावा घेतल्यानंतर त्या व्यक्तीचे ड्रॅक्यूलामध्ये रूपांतर होणे या साम्यामुळे ड्रॅक्यूला दुसरेतिसरे कोणी नसून रेबीजचे रुग्ण असावेत असे मानायला वाव आहे. व्हॅम्पायर आणि ड्रॅक्यूलाच्या कहाण्या प्रसिद्ध होण्याचा काळ आणि रेबीजच्या युरोपमधील संसर्गाच्या उपद्रवाचा काळ हाही जुळतो. विशेषतः हंगेरीमधील 1721 ते 28 या काळात हा उपद्रव मोठ्या प्रमाणात होता. डॉ.जुआन यानी या संदर्भातील एक लेख *मेडिकल जर्नल ऑफ न्युरॉलॉजी* मध्ये 1998 मध्ये प्रसिद्ध केला आहे. त्याअगोदर 1985 मध्ये डेव्हिड डॉल्फिन नावाच्या जीवरसायनतज्ज्ञाने रक्ताच्या आजाराशी व्हॅम्पायरशी तुलना करण्याचा प्रयत्न केला होता.

रेबीज या आजाराशी रात्री प्राण्यामध्ये रूपांतर होणाऱ्या मनुष्याच्या किंवा भुताच्या कथांशीदेखील सांगड घालता येईल. त्याशिवाय प्रेतात्मे फिरण्याच्या घटनेचा छडादेखील अशाच पद्धतीने लावला गेला. विल्फ्रेड नावाच्या एका कुमारवयीन मुलाला त्याच्या मृत्यूनंतर पुरण्यात आले. तो एका वर्षानंतर पुन्हा गावात आला परंतु कोस्टास या भौतिकीतज्ज्ञाच्या मते हे भूत नव्हते. ज्या हैती भागात विल्फ्रेड राहत होता त्याच परिसरात मिळणाऱ्या माशांचे यकृत विषारी असते. हे विष मनुष्याला पूर्णपणे मारू शकत नसले तरी मनुष्य मेल्यासारखा निपचित पडतो. विल्फ्रेडच्या कथेमध्ये विषप्रयोगानंतर विल्फेडला पुरण्यात आले. त्यामुळे ऑक्सिजनच्या कमतरतेचा परिणाम त्याच्या मेंदूवर झाला असण्याची शक्यता होती. हैती परिसरात कबरी फार खोल खणल्या जात नाहीत. त्यामुळे विल्फ्रेड त्यातून बाहेर येऊ शकला. अर्थात काही किंमत चुकवूनच. त्यानंतर डॉ. रॉजर मॅलोरी यांनी विल्फ्रेडच्या मेंदूचे एम.आर.आय. स्कॅन केल्यानंतर त्यात मेंदूला ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे इजा झाल्याचे निष्पन्न झाले. यातून विल्फ्रेड हा प्रेतात्मा नसून विषप्रयोगाचा बळी होता हेच सिद्ध झाले. अर्थात भुताखेताच्या नावाखाली कुणी कुणाचे खून केले असतील हे सांगणे कठीणच.

हिंदी चित्रपटावरून कुणी इथल्या भुतांबद्दल अनुमान काढण्याचा प्रयत्न करेल तर निष्कर्ष हमखास चुकतील. अर्थात त्याचे कारण हिंदी चित्रपटातील भुते ही इंग्रजी चित्रपटावर बेतलेली असतात. युरोपीय किंवा ख्रिस्ती/मुस्लिम संस्कृतीमधील भुते कबरीमधून उठून बाहेर येतात. त्यांच्याशी सर्वसामान्य व्यक्ती अयशस्वी का होईना मारामारी करू शकते. त्याचे कारण अर्थातच त्यांच्यातील दफनपद्धती आहे. हिंदू परंपरेतील भूत अशरीरी असते. त्यामुळे ते मनोकामना पूर्ण करण्यास शरीराचा ताबा घेते. नाहीतर भासमान असते. कोकणातल्या माझ्या गावी असताना असाच एक अनुभव ऐकायला मिळाला. विंचवाचा डंख झाल्याने मृत्युमुखी पडलेल्या मुलीला भुतानेच नेले असा समज त्यांच्या पालकांचा होता. त्याचे कारण मुलीचा मृत्यू विंचवाच्या डंखाने लगेच झाला नव्हता. दोन दिवस त्या मुलीला बेशुद्धावस्थेत काही माणसे दिसत होती. ती माणसेच आपल्या मुलीला बोलवायला आली हा पालकांचा समज दूर करणे कठीणच होते. विंचू चावल्यानंतर रक्तदाबात कमालीची घट येते. या परिस्थितीत मेंदूला कमी रक्तपुरवठा झाल्याने असे भास होणे शक्य होते. घराबाहेर झोपल्यावर कुणीतरी छातीवर दाब देतो आहे. असे अनुभवही बऱ्याच जणांना येतात. या सर्वांचा संबंध अर्थातच भुताशी जोडला जातो.

भुताबद्दलच्या या कल्पना आणि अनुभव हा आणखी एका मोठ्या अंधश्रद्धेचा पाया आहे. या अनुभवातून भूत असतेच ही एक भूमिका तयार झाली की मग त्यावर आधारित पिशाच्चबाधा आणि झाड लागणे वगैरे अंधश्रद्धा आपोआपच खऱ्या ठरतात. याला आणखी एक जोड आहे स्त्री-पुरुष विषमतेची! देवी अंगात येणे हादेखील एकप्रकारे पिशाच्चबाधेचाच परंतु मान मिळवून देणारा प्रकार म्हणायला हरकत नाही. स्त्रियांच्याच अंगात का येते? याचे कारण उघड आहे, ते म्हणजे स्त्रियांच्या आविष्कार-स्वातंत्र्याला घातलेला लगाम! सौम्य स्वरूपाचा मानसिक आजार असणाऱ्या व्यक्तींमध्ये स्त्रियांचे प्रमाण मोठे असते कारण ते परिस्थितीवर अवलंबून आहे. पुरुषामध्ये ताण-तणाव असले तरी त्यांना दारू पिणे, रात्र-रात्र मित्रांबरोबर बाहेर राहणे, लैंगिक ताण हलका करण्यासाठी वेश्येकडे जाणे इत्यादी मार्ग उपलब्ध असतात. याउलट प्रत्येक बाबीसाठी अगदी नोकरी



संजय सावरकर

करत असतानादेखील नवऱ्यावर अवलंबून असणाऱ्या स्त्रीवर कुटुंबाची जबाबदारी आपसूक येते. त्यात पुन्हा मनात जे येते ते बोलण्याचे स्वातंत्र्य नाही. घरातल्या बाईला कसले आलेय टेन्शन! अशीही समजूत बऱ्याच जणांची असते. या ताणाचे रूपांतर सौम्य मानसिक आजारात होणे ही नैसर्गिक बाब आहे. स्वभावाने चिडचिडी असणारी व्यक्ती तेथल्या तेथे हा राग व्यक्त तरी करते परंतु जिच्यावर सोशिकतेचे संस्कार झाले असतील किंवा मुळातच असुरक्षिततेमुळे गप्प राहणे भाग असते अशा व्यक्तीच्या मनाचा कोंडमारा असह्य होऊन त्याची परिणती अर्थातच पिशाच्चबाधा किंवा अंगात येण्यामध्ये होते. देवी अंगात येण्यामध्ये आणि भूत लागण्यामध्ये जरी वरवर फरक दिसत असला तरी ते एकाच मानसिक रोगाचे लक्षण आहे हे समजून घेतले तरी पुरे.

इतर रोगांची आणि मानसिक रोगांची सांगड भुताशी किंवा पिशाच्चबाधेशी घालण्यात मुख्य फरक आहे तो उपचाराचा! देवीच्या रोगाचा संबंध मरीमाईच्या कोपाशी लावला जायचा परंतु व्यक्तीच्या समजुतीचा आणि उपचाराच्या परिणामांचा थेट संबंध या ठिकाणी नाही. व्यक्ती कितीही अंधश्रद्ध असो देवीची लस टोचली की देवीचा रोग होण्याची शक्यता नष्ट होते. परंतु मानसिक आजारांवरच्या उपचारामध्ये मात्र रुग्णांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाची बाब ठरते. आणि बहुधा हे सहकार्य पारंपरिक मताच्या प्रभावामुळे मांत्रिकालाच मिळत असते. मांत्रिकाकडे मोठ्या प्रमाणात रुग्ण येत असल्याने त्याला अपयश आले तरी सूट मिळते. मनोरुग्णाची सांगड भूतबाधेशी घातल्याने आधुनिक उपचारांचा मार्ग जवळजवळ बंद होतो. एखाद्याला भूतबाधा झाली तर ''तुम्ही त्याला मनोविकार-तज्ज्ञाकडे घेऊन जा'', असे सांगणे सोपे असते. परंतु त्याचा प्रत्यक्ष फायदा फार कमी होतो. त्यात पुन्हा मनाचा आजार झाला म्हणजे 'स्क्रू ढिला झाला'. अशा प्रकारचे टोमणे ऐकायचे. पैसा खर्च करायचा, आजूबाजूच्या लोकांचे सल्ले नाकारायचे. इतके सगळे सोसत असताना अर्थातच त्याचा परिणाम आधुनिक उपचारपद्धतींकडून वाढलेल्या अपेक्षांवर होतो. त्यामुळे डॉक्टरांनी काहीतरी जादूची कांडी फिरवून जर रुग्णाला बरे केले नाही तर मग ''आपल्याला खरोखरच भुताने पकडले आहे'' याची खात्री पटते. अशा सगळ्या दुष्टचक्राचे आह्वान अंधश्रद्धा-निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांसमोर आहे.

त्यात पुन्हा जादुई उपचाराची आवश्यकता लोकांना का वाटते हा प्रश्न महत्त्वाचा आहे. असुरक्षित वातावरणात कोणतीही हिताची घटना सरळ मार्गाने होताना दिसतच नाही. या अपेक्षाभंगातून फक्त कोणीतरी महात्मा किंवा जादुई ताकत आपल्याला बाहेर काढू शकेल अशी समजूत इथे रुजलेली आहे. आपण नेहमी म्हणतो की विज्ञानाची सृष्टी पोचली परंतु दृष्टी पोचली नाही परंतु खरेच तसे आहे का? विज्ञानाचे फायदे कुणाला मिळाले का? या प्रश्नांचे उत्तर बहुतांशी लोकांच्या बाबतीत नाही असेच द्यावे लागेल. भुताबद्दलच्या कल्पना त्याची भीती हे या इथल्या अजूनही मागास राहिलेल्या समाजाचे लक्षण आहे. साध्या विंचूच्या डंखाने व्यक्ती मरते याचे कारण विंचवाचे विष जहाल असते एवढे एकच कारण नाही तर दळणवळणाची अपुरी साधने, प्राथमिक आरोग्यसुविधेचा बोजवारा यामुळे गावठी उपचार, मंत्र-तंत्र यावर अवलंबून राहणे भाग पडते. यात व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याला भूतबाधेचे कारण तार्किक वाटते. या सर्व परिस्थितीचा विचार केला तर भूत म्हणजे केवळ 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' एवढे म्हणून खिल्ली उडवण्याची बाब नाही तर त्याला गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

□ □

# आरोग्य आणि अंधश्रद्धा

*निखिल जोशी*

आपण प्रत्येक घटनेचे कारण शोधतो. नको असलेल्या घटना टाळून हव्या असलेल्या घटना वारंवार घडविण्यासाठी ती पहिली पायरी आहे. घटनेच्या कारणशृंखलेतील आपल्या कुवतीचे दुवे शोधून त्यांवर नियंत्रण करण्याची आपली इच्छा असते. हे वर्णन विज्ञानाचे असले तरी उत्क्रांतीमुळे ते आपल्या स्वभावातच मुरले आहे.

अर्थात, उत्क्रांतीने मिळालेल्या इतर गुणांप्रमाणेच, कारण शोधण्याची कलासुद्धा अगदी प्राथमिक आहे. कुत्र्यांना अन्न देण्याच्या वेळेआधी इवान पावलॉव यांनी एक घंटानाद करण्याची सवय केली. रोज असा घंटानाद ऐकल्यानंतर निव्वळ घंटानाद ऐकूनच कुत्र्यांना लाळ सुटे. याचा अर्थ असा की सत्य सापडले नसले तरी वारंवार घडणाऱ्या काकतालीय न्यायावर (post hoc, ergo propter hoc) ठाम विश्वास ठेवण्याची सजीवांना सवय आहे. घटनेचे कारण इंद्रियगम्य नसले की उपजत सवयीने इतर कोणत्याही घटनेला कारण समजले जाते. त्यातून अंधश्रद्धेचा उगम होतो.

कबुतरांना धान्याचा एकएक दाणा नियमितपणे देणारे एक यंत्र बी. एफ. स्किनर यांनी बनविले. दाणा मिळण्याच्या वेळेस कबूतर जी काही कृती करीत असे, तीच कृती कबूतर वारंवार करी. त्या कृतीच्या अपयशाच्या अनुभवांकडे कबूतर बरेचदा दुर्लक्ष करी. यास counting the hits and ignoring the misses ही सवय कारणीभूत आहे. नवस बोलूनही फायदा न झालेले लोक नशिबाला दोष देतात, पण फायदा झालेले लोक जाहिरात करतात, तसाच हा प्रकार आहे.

अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुती यांमध्ये थोडा फरक आहे. समजूत चूक असल्याची शक्यता नाकारणे, चर्चेस उत्सुक नसणे आणि तिला चूक ठरविणारा पुरावा सापडल्यानंतरसुद्धा समजूत न बदलणे, म्हणजे अंधश्रद्धा होय. परंतु, माहितीच्या महापुरात सर्वच पुरावा स्वत: तपासणे शक्य नाही. म्हणूनच, 'प्रस्थापित' विज्ञानाशी विपरीत अशा सर्व समजुतींना अंधश्रद्धा म्हटले पाहिजे. बंडखोर मत शास्त्रीय असल्याचे सिद्ध करण्याची संधी प्रत्येकाला देण्यात येते. परंतु, तसे मत योग्य विकल्प नसताना आपोआप (by-default) चूक ठरवून, सिद्ध करण्याचे ओझे (burden of proof) त्याच्या कैवाऱ्यांवर



**निखिल जोशी**

टाकले पाहिजे. पुरावा तपासून निष्कर्ष काढण्याची लोकांची क्षमता वेगवेगळी असू शकते. म्हणूनच, या लेखात अंधश्रद्धा आणि चुकीची समजूत या भेदाकडे दुर्लक्ष केलेले आहे.

अन्नग्रहण आणि पुनरुत्पादन यांच्याही आधी, स्वसंरक्षण हे सजीवांचे तातडीचे ध्येय असते. कदाचित म्हणूनच, अनेक अंधश्रद्धा या इजा, मृत्यू यांविषयी असतात. मोठ्या शत्रूंपासून असलेला धोका (उदा. आग, दरी, शिकारी प्राणी, इ.) आपल्या उपजत वृत्तीला समजतो. घटनांची कारणे सूक्ष्म पातळीवरील असल्यास (उदा. रोगजंतू) मात्र ती हल्लीच इंद्रियगम्य झाली आहेत. म्हणूनही आरोग्यविषयक अंधश्रद्धांची व्याप्ती मोठी आहे (याच धर्तीवर एका सर्वेक्षणानुसार, मेकॅनिकल इंजिनिअरपेक्षा इलेक्ट्रिकल इंजिनिअर अधिक धार्मिक असतात [1,2,3]. बल, गति, तरफ, गुरुत्वाकर्षण, इ. नियम आपल्याला उपजतच समजतात. उलट, विद्युत्चुंबकीय शास्त्राचे, सापेक्षतेचे, पुंज यामिकीचे नियम intuitional वाटत नाहीत. कदाचित त्यामुळेच त्यांना श्रद्धा ठेवण्याची सवय अधिक लागते का?).शिवाय, जीवशास्त्रात व्यामिश्रता असते. मर्यादित निरीक्षणांतून सुटसुटीत नियम बनविणे तेथे शक्य नसते. मर्यादित विचारक्षमता आणि स्मरणशक्ति वापरणाऱ्यांना सत्याऐवजी बटबटीत अंधश्रद्धाच हाती लागतील. रसायनशास्त्राचे नियम कमी व्यामिश्र असल्यामुळे लोकांनी स्वीकारले आहेत, रासायनिक किमयांचे (अल्केमी) मध्ययुगीन प्रयत्न आज कोणी गंभीरपणे घेत नाही. परंतु वैद्यकशास्त्राविषयी आजही अज्ञानजन्य भीती आहे. 'पारंपरिक', 'नैसर्गिक', 'होलिस्टिक', अशा जुनाट (किंवा आधुनिकोत्तर) संकल्पनांचे आकर्षण लोकांना आहे. अशा प्रकारे स्वभावाची घडण अंधश्रद्धांना पोषक आहे.

मानवी मेंदूवर संस्कृतीचासुद्धा पगडा बसू शकतो. रिचर्ड डॉकिन्स यांनी म्हटले आहे की इतरांवर, विशेषत: वडीलधाऱ्यांवर नि:शंक विश्वास ठेवणे हीसुद्धा एक उपजत प्रेरणा आहे. 'नदीत मगरी आहेत', 'एवढ्या उंचीवरून उडी मारल्यास पाय मोडेल', अशा विधानांची खुल्या मनाने तपासणी करणे लहान बाळाला परवडणार नाही. सर्वच मानवसदृश प्राण्यांना सरिसृपांचा तिरस्कार वाटत असला तरी नागांची आर्थिक उपयुक्तता निर्माण झाल्यावर (खांडववन जाळण्याच्या 'शौर्य'गाथेकडे दुर्लक्ष करून) शेतकरी समाजांनी नागाची पूजा (प्रति अंधश्रद्धा) सुरू केली! मताविषयी शंका विचारण्यास बंदी करण्यासाठी परंपरा आणि धर्म या शब्दांचा फायदा होतो. म्हणूनच, गायत्री मंत्राच्या ध्वनिलहरींचे आरोग्यासाठी फायदे, तुळशीतून मिळणारा प्राणवायू, गोवऱ्यांचा धूर, शिवांबू, गोमूत्र, श्रावणीच्या दिवशीचे शेण खाणे, अशा दाव्यांवर लोक लगेच विश्वास टाकतात. डॉ. अंजली सोमण यांनी म्हटले आहे की ''अंधश्रद्धांची जंत्री समाजापुढे टाकून चालणार नाही. समाज बुद्धिप्रामाण्यवादी झाला नाही तर जुन्या अंधश्रद्धा जातील आणि नव्या अंधश्रद्धा निर्माण होतील.'' अतिदक्षता विभागात मोबाईल फोन वापरणे आधुनिक उपकरणांना अडचणीचे नसते याची माहिती अनेक डॉक्टरांनासुद्धा नसते. अल्पवयीन कुमारिकेशी संबंध ठेवल्यामुळे एचआयव्ही बरा होते ही नवी आफ्रिकन समजूत निर्माण होण्याचे कारण तर अनाकलनीय आहे.

'खुल्या मनाने शंका घेणे' या मनोवृत्तीस प्रतिष्ठा देणारी परिस्थिती निर्माण झाल्यावरही समाज चुकीच्या दिशेला जाऊ शकतो. आधुनिकोत्तरवादी स्टीव्ह फुलर यांच्या मते डॉक्टरांवर श्रद्धा ठेवण्यापेक्षा वैयक्तिक मते बाळगावी. त्यांच्या मते पुरावाधिष्ठित वैद्यक ही संकल्पना फसवी आहे कारण वैज्ञानिकांना सापडलेला पुरावा तपासूनही वैज्ञानिकांपेक्षा भिन्न निष्कर्ष काढण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. येथे 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' या वृत्तीचा ऱ्हास होतो आहे असे मला वाटते. 'प्रस्थापित मतांवर अविश्वास दाखविणे' या भूमिकेतून कॉन्स्पिरसी सिद्धांत आणि छद्मविज्ञान इतके वाढले आहेत की 'मेंदू बाहेर पडेल इतके खुले मन नसावे' असे वैज्ञानिकांना म्हणावे लागत आहे. [4]. गेल्या शतकात खऱ्या रेडियमने रंगविलेली रात्री चमकणारी घड्याळे लोकांनी वापरली. वापरकर्त्यांना याचा फारसा त्रास झाला नाही परंतु घड्याळाचे काटे आणि आकडे हाताने रंगविणाऱ्या कारागिरांना विषबाधा झाली कारण रंगाचे ब्रश ते (बहुधा स्त्रिया) जिभेने ओले करीत. आज दुसऱ्या टोकाला लोक मोबाईल फोनच्या 'किरणोत्सर्गाला'आणि जनुकीय अभियांत्रिकीने बनविलेल्या वनस्पतींना घाबरतात तसेच फ्लू, मॅड काऊ, इ. रोगांच्या साथी आल्या की करोडो खाद्य-प्राण्यांना मारून टाकून देतात.

काही पुरोगामी लोकांच्या मते अंधश्रद्धा उपयुक्त असू शकतात. उदा. 'तिळगुळामधून पुष्कळ ऊर्जा मिळते (उष्ण पदार्थ हे याच्याशी निगडित एक उपखूळ आहे) म्हणून मकर संक्रांतीला तिळगूळ खाण्याची प्रथा पाळावी.' ते स्वत: वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगतात परंतु समाजाचे भले करणाऱ्या अंधश्रद्धांना त्यांची अनुमती असते. परंपरांच्या मर्यादा आणि नवीन ज्ञानानुसार बदलत राहण्याची गरज तिळगुळाच्या तथाकथित वैज्ञानिक प्रथेतून जाणवते. ज्यांनी संक्रांत साजरी करण्याची प्रथा पाडली ते पृथ्वीच्या परांचन गतीविषयी अनभिज्ञ होते. साधारण दर 72 वर्षांनी मकर संक्रांत एक दिवस (ऋतुसापेक्ष आणि म्हणूनच ग्रेगोरिअन कॅलेंडरसापेक्ष) पुढे सरकते. पानिपतच्या तिसऱ्या युद्धात संक्रांत 10 जानेवारीस होती. पाच हजार वर्षांपेक्षा कमी काळात सनातनी लोकांना उन्हाळ्यात तिळगूळ खावा लागेल. त्याच धर्तीवर, आदिवासींची सर्वोच्च देवी दंतेश्वरी हिच्या नावे पत्रके काढून डॉ. बंग आरोग्यविषयक संदेश देतात. परंतु श्रद्धा हे फारच बेभरवशाचे हत्यार आहे. दंतेश्वरीच्या आदेशामुळे लसीकरणाला तयार होणाऱ्या आदिवासींना उद्या दंतेश्वरी देवी किंवा बिरसा मुंडा (स्वातंत्र्यसैनिक आणि 'प्रेषित') यांच्याकडून लोहमार्गातील फिशप्लेट काढणे, विजेच्या पायलॉन पाडणे, भूसुरुंग पेरणे, इ. आदेशसुद्धा मिळू शकतात.

### बाल आरोग्य

अपत्यांच्या आरोग्याविषयी पालक विशेष चिंतित असणे स्वाभाविक आहे. म्हणूनच बाल आरोग्याविषयक अंधश्रद्धा खूप आहेत. काविळीसाठी चटके देणे, गाठींची माळ गळ्यात घालणे किंवा लोणावळ्याला जाऊन नाकात दोन थेंब औषध टाकणे [5],

मनोरुग्णांना भूतबाधा काढण्यासाठी नेणे, श्वान किंवा सर्पदंश यांवर मंत्र टाकणे, दम्यासाठी जिवंत मासा गिळणे, पोलिओच्या रुग्ण मुलाला कमरेपर्यंत उकिरड्यात पुरणे, इ. अंधश्रद्धा बऱ्याच प्रचलित आहेत. आरोग्यविषयक अंधश्रद्धा सुशिक्षितांमध्ये सुद्धा असतात. मानवी शरीररचना मांसाहारास अनुकूल असल्याचे नाकारणे, काविळीच्या रुग्णाला स्निग्ध पदार्थ न देणे किंवा विषमज्वराच्या रुग्णाची उपासमार करणे असे प्रकार सुशिक्षितांमध्येसुद्धा होतात. 'लहान मुलांना प्रथिनांची गरज असते' एवढीच माहिती असलेले सुशिक्षित लोक सकस आहाराऐवजी महागड्या डब्यांतील चमचाभर प्रथिने दुधात घालतात. सूर्यग्रहणाला लोक घाबरतात, विशेषत: त्याच्या गर्भावरील परिणामांबाबत अत्यंत भीती आहे. गोवर, गालगुंड, रुबेला यांच्याविरुद्ध दिल्या जाणाऱ्या एका लसीमुळे ऑटिझम होत असल्याचा चुकीचा निष्कर्ष 1998 साली एका सर्वेक्षणाने बारा मुलांच्या अभ्यासातून काढला. त्यास प्रसिद्धिमाध्यमांनी प्रचंड महत्त्व दिले. परिणामत: पाश्चात्त्य देशांमध्ये लाखो लोकांनी ही लस नाकारली. फॅमिली डॉक्टरांनी खात्री देऊनसुद्धा लोकांनी त्यांच्या अंतर्मनाच्या शंकांना दुजोरा देणाऱ्या प्रसिद्धिमाध्यमांवर विश्वास ठेवला. 2008 साली डांग्या खोकल्याविरुद्धच्या लसीविषयी अशाच अफवा पसरल्या होत्या [6]. मरीआई किंवा 'देवी'ला घाबरणाऱ्यांपेक्षा हे लोक श्रेष्ठ कसे? लाख रुपयांच्या चुंबकीय गादीच्या साखळी पद्धत विक्रीतंत्रातील गैरव्यवहाराच्या बातम्या येतच असतात. नीलगिरी आणि तुळस स्वाईन फ्लूवर उपयोगी असल्याच्या अफवा ई-मेल आणि एसएमएसद्वारे राष्ट्रीय विषाणू संशोधन केंद्राच्या नावे पसरल्या होत्या [7]. अशा अफवा पसरवणे अंधश्रद्धेचे लक्षण असले तरी त्या तयार करणे हा पद्धतशीर खोडसाळपणा आहे आणि त्यामागे धार्मिक बांधिलकी दिसते.

पुस्तके अति वाचनाने आणि विशेषत: पुस्तके डोळ्याजवळ धरल्यामुळे चष्मा 'लागतो' अशी समजूत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की ज्या मुलांची दृष्टी अधू असते ती मुले खेळ टाळून पुस्तके वाचण्यास सुरू करतात. डोळ्याजवळ पुस्तके धरून वाचल्यामुळे 'चाळिशी' प्रकारचा चष्मा लागण्याची शक्यता वाढते हे मात्र खरे आहे.

**वैद्यकक्षेत्र**

'आज कमी रुग्ण येत आहेत' अशा अर्थाचे वाक्य उच्चारल्यास गुंतागुंतीच्या समस्या असलेले अनेक रुग्ण येतात असे पाश्चात्त्य देशांत रात्रपाळी करणाऱ्या अनेकांना वाटते. 'काम कमी येईल' अशा अपेक्षेने पुस्तके किंवा गाणी ऐकण्याची तयारी केल्यास खूप काम येते, स्टेथोस्कोप, रुग्णांच्या गाद्या, इ. शुभाशुभ असू शकतात असेही त्यांना वाटते. रात्रपाळीत झोपेसाठी कमी वेळ मिळतो म्हणून काहीजण स्वत:ला कमनशिबी समजतात. असे डॉक्टर कमी कार्यक्षम किंवा कमी निष्काळजी असल्यामुळे नेहमीचीच गर्दी तपासण्यासाठी त्यांना अधिक वेळ लागतो [8, 9].

चंद्राच्या कलांचा सजीवांवर परिणाम होतो हे निर्विवाद आहे. परंतु, 'मासिक' पाळी 29 दिवसांची असते याचे मूळ चंद्राशी संबंधित होते की नाही याची अजून खात्री



नाही [10], आणि मानसिक रोगांचा चंद्राच्या कलांशी संबंध नसल्याचे सिद्ध झालेले आहे. शहरांमधील अपघातांचा पौर्णिमेशी संबंध नसल्याचे सिद्ध होऊनसुद्धा तशी समजूत अनेक परिचारिकांना असते [9].

रक्तदानाविषयी लोकांना भीती वाटते हे जरी सत्य असले तरी रक्तदानाचा प्रचार करणाऱ्या पत्रकांमध्ये "it proves to be a healthy habit that helps blood re-newal" असा दावा करून सरकार लोकांची फसवणूकच करते [11].

पोटातील कृमींविषयी जगभर अंधश्रद्धा आहेत. गोड पदार्थांनी जंत होतात असे जगभरात अनेक लोकांना वाटते [12,13], तर सातवा मुलगा रेबीजपासून जंतांपर्यंत सर्व रोग बरे करू शकत असल्याचे आयरिश परंपरेमध्ये मानतात. जंतांमुळे अपस्माराचे झटके येण्याची शक्यता अगदीच कमी असली तरी भारतात अनेक सुशिक्षित पालक आणि डॉक्टरसुद्धा अपस्मारासाठी जंत ही शक्यता मानून त्यावर उपचारात वेळ घालवतात [14,15].

काचेच्या वातानुकूलित इमारतीमध्ये चकचकीत फरश्या घातलेल्या आधुनिक खोल्यांमध्ये बसणारे सुटाबुटातील डॉक्टर इतरांपेक्षा अधिक चांगले असतात, हीसुद्धा अंधश्रद्धाच आहे. डॉक्टरांची आणि रुग्णांची वागणूक शक्य तेथे सामाजिक मनोवृत्तीनुसार बदलते आणि औषधे, शस्त्रक्रिया, शुश्रूषा, अशा सर्वच क्षेत्रांत खर्च वाढतो पण अतिरिक्त उपचारांच्या दुष्परिणामामुळे आरोग्य खालावते. रुग्णालयाच्या नफ्यामध्ये डॉक्टरांचे आर्थिक हितसंबंध असले की अशी शक्यता वाढते [16].पंचवीस लाख रुपयांची पदवी, एक कोटी रुपयांचे पदव्युत्तर शिक्षण आणि काही कोटी रुपयांचे पॉलिक्लिनिक अशी गुंतवणूक करणारा 'रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट' बघणारच!

**वैकल्पिक उपचार**

वैकल्पिक उपचार या नावाखाली अनेक अंधश्रद्धा संघटित झालेल्या आहेत. वैकल्पिक उपचारपद्धतींच्या लोकप्रियतेचे एक कारण म्हणजे प्लॅसिबो परिणाम आहे. एखाद्या रुग्णावर विश्वासातील व्यक्तीने किंवा पांढऱ्या कपड्यांतील रुबाबदार व्यक्तीने औषधोपचार करण्याचा किंवा आधुनिक दिसणाऱ्या एखाद्या उपकरणाने 'शस्त्रक्रिया' करण्याचा देखावा केला तरीसुद्धा रुग्णाला 'बरे वाटते'.अशिक्षित लोकांना सुई टोचली तरी आनंद होतो. अर्थात, कोणाचा तुटलेला अवयव उगवत नाही [17], परंतु वेदना, दमा, आम्ल'पित्त', उच्चरक्तदाब, इ. समस्यांचे थोडेफार शमन होते. प्लॅसिबो परिणाम होण्याचा एक मार्ग म्हणजे विश्वासामुळे मेंदूमध्ये निर्माण होणारी अफूसारखी रसायने होय.

वैकल्पिक पद्धतींविरुद्ध जेव्हा प्लॅसिबो परिणामाचा वापर करण्याचा दावा करण्यात येतो तेव्हा प्रतिवाद केला जातो की 'जर रुग्णाला बरे वाटत असेल, तर या उपचारांचा वापर करण्यात अडचण काय आहे?' परंतु, प्लॅसिबो फायदा होतो असे बहुतेक सर्व रोग क्षुल्लक आहेत. दुसरी अडचण म्हणजे प्लॅसिबो परिणामासाठी रुग्णाला अज्ञ ठेवणे आवश्यक

निखिल जोशी

असते. न्यायवैद्यकीय नियमांनुसार, रुग्णावरील उपचारांची सर्व माहिती रुग्णाला देणे आवश्यक आहे, परंतु प्लॅसिबो औषध वापरल्याची जाणीव रुग्णाला झाल्यास प्लॅसिबो परिणाम बंद पडतो. उदा. प्लॅसिबो उपचार स्वत:वर करता येत नाहीत. तिसरा धोका असा की प्लॅसिबो परिणाम उलट दिशेलासुद्धा होऊ शकतो. ख्रिश्चनधर्मी टेम्पलटन प्रतिष्ठानाला असे आढळले की ज्या ख्रिश्चन हृद्रोग्यांना बरे वाटावे अशा आशयाची प्रार्थना देवाकडे करण्यात आली त्यांच्या शस्त्रक्रियेत गुंतागुंत होण्याची शक्यता इतर रुग्णांपेक्षा अधिक होती. यावर भाष्य करताना मायकेल शर्मर यांनी अशी शक्यता वर्तविली की 'माझ्यासाठी देवाकडे प्रार्थना करण्याची वेळ आली याचा अर्थ माझे आरोग्य खूपच खराब असेल' अशा विचाराने रोग्यांवर नोसिबो परिणाम झाला. चौथा मुद्दा असा की शास्त्रीय औषधपद्धतीमध्ये कोणत्याही औषधाचा परिणाम मोजताना रुग्णांवरील प्लॅसिबो परिणाम वजा करण्याची योजना असते. ज्या औषधाचा परिणाम मोजावयाचा असेल ते औषध काही रुग्णांना देण्यात येते तर काही रुग्णांना रिकामी औषधे देण्यात येतात. कोणत्या रुग्णाला खरी औषधे दिली ते रुग्णांची प्रगती मोजणाऱ्या डॉक्टरांनासुद्धा माहिती नसते. अशा रीतीने प्लॅसिबो परिणामाला शून्य मानून (offset) शास्त्रीय औषधांचा परिणाम मोजला जातो. प्लॅसिबो आणि वास्तव औषध यांच्या किमतीतील फरक जर त्यांच्या परिणामरूपी फायद्यांतील फरकापेक्षा कमी असेल तरच औषधांनाच मान्यता मिळते. प्रेमळ डॉक्टरमुळे जो शुद्ध प्लॅसिबो परिणामरूपी फायदा होत असेल त्यापेक्षा कितीतरी अधिक फायदा प्रेमळ डॉक्टरने दिलेल्या वास्तव औषधाचा होईल. डॉक्टरने प्रेमाने वागावे ही मागणी रास्त असली तरी प्लॅसिबो परिणामासाठी त्याचा पुरस्कार करणे चूक आहे.

वैकल्पिक वैद्यकाला पारंपरिक वैद्यक असेसुद्धा संबोधिले जाते. गंमत म्हणजे परंपरा हा शब्दच अपरिवर्तनीयता आणि पर्यायाने अशास्त्रीयता दर्शवितो. 'पारंपरिक ते चांगले' ही अंधश्रद्धा आहे. वैकल्पिक उपचारपद्धतींचे दुष्परिणाम नसतात असा दावा करण्यात येतो. परंतु आयुर्वेद किंवा युनानी वैद्यकामध्ये सांगितलेल्या एरंड (castor), धोतरा आणि जमालगोटा (croton) सारख्या जालीम विषांमुळे अनेकांचा जीव गेलेला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार जगातील ८० टक्के लोक रोगप्रतिबंधासाठी वैकल्पिक उपचारपद्धती वापरतात. प्रत्येक समाजामध्ये पारंपरिक उपचारपद्धति असते. त्यांपैकी प्रमुख प्रकारांची ओळख करून घेऊ.

## आयुर्वेद, योग, प्राणायाम, निसर्गोपचार, इ.

आयुर्वेद या विषयावर मी सप्टेंबर 2006 च्या सुधारकच्या आरोग्य विशेषांकामध्ये सविस्तर लिहिले आहे. त्या विशेषांकाच्या अतिथी संपादकांनी माझ्या विचारांवर टीका करण्यासाठी जे लेख आमंत्रित केले होते ते माझा लेख नीट न वाचताच लिहिलेले होते. म्हणून माझा लेख आणि त्यावरील टीकेचा प्रतिवाद यांचा काही भाग येथे देत आहे.

औषधशास्त्र हे वैद्यकशास्त्रावर अवलंबून असते. आयुर्वेदामध्ये नमूद काही उपचारांचे आयुर्वेदामध्ये नमूद उपयोग सिद्ध झाले तरी त्या आयुर्वेदिक पद्धती शास्त्रीय ठरत नाहीत. (मुडदूस झालेल्या बाळाला देवळाबाहेर ठेवल्यामुळे त्याचा मुडदूस बरा झाला तर श्रेय सूर्यप्रकाशाला मिळावे, मांत्रिकाला नव्हे). शरीरप्रक्रियाप्रणाली (physiology), रोगोद्भवाची कारणे आणि मार्ग, औषधांचा परिणाम होण्याची पद्धत, इ. अनेक आयुर्वेदिक गृहीतके चूक आहेत. दोष, धातु, रस इ. काल्पनिक संकल्पनांचे अस्तित्वसुद्धा सिद्ध झालेले नाही. त्यामुळे औषधे आयुर्वेदिक सिद्धांतांना अनुसरून परिणाम करीत असल्याचा पुरावा मिळणे शक्य नाही. औषधांच्या शोधाचे श्रेय देण्यास ऐतिहासिक, भावनिक, आर्थिक महत्त्व असले तरी वैज्ञानिक महत्त्व नाही. क्रोसिनला ग्लॅक्सोस्मिथक्लाइनिक किंवा सिप्रोला सिप्लिक म्हणत नाहीत (ग्लॅक्सोस्मिथक्लाइन व सिप्ला ह्या कंपन्यांना श्रेय दिले जात नाही). आयुर्वेदामध्ये नमूद पदार्थांचे आयुर्वेदामध्ये नमूद नसलेले उपयोग सिद्ध झाले तर त्याचे श्रेयसुद्धा आयुर्वेदाला नसावे. 'आयुर्वेदाचा मुघल आणि ब्रिटिशांमुळे ह्रास झाला' असे रडगाणे गाणारे विसरतात की आयुर्वेदाला राजाश्रय होता तेव्हासुद्धा लोकांचे (आणि राज्यकर्त्यांचे) सरासरी आयुष्यमान 35 वर्षे होते. सत्ताधीशांच्या विरोधाला झुगारून विज्ञानाने प्रगती केली. उपयुक्तता असती तर आयुर्वेदाचासुद्धा प्रसार झाला असता.

केईएम रुग्णालयामध्ये वैज्ञानिक पद्धतींनी आयुर्वेदिक औषधांचा अभ्यास करतात. त्यांना 27 टक्के औषधांमध्ये मानवनिर्मित स्टीरॉईड सापडली. विषारी धातूंचा तपास करताना त्यांना असे आढळले की ८० टक्के औषधांमध्ये शिसे, 74 टक्के औषधांमध्ये पारा आणि 76 टक्के औषधांमध्ये आर्सेनिक होते [18]. डॉ. शरदिनी डहाणूकर आणि डॉ. रवि बापट या आयुर्वेदप्रेमी वैज्ञानिकांनी स्थापलेल्या संस्थेचे हे आकडे आहेत.

आयुर्वेदानुसार, पाप्म या प्रकारचे रोग पूर्वजन्मातील पापांची शिक्षा म्हणून होतात. त्यांचा उपचार करणे हे देवाच्या इच्छेला आव्हान ठरेल. कदाचित म्हणूनच त्या रोगांवर आयुर्वेदात इलाज सांगितलेला नाही. तुकारामाने म्हटले आहे की 'पूर्वजन्मती पापें ती येती रोग रूपें न जाती वैद्याचेनी बापें'[19]. कर्मविपाक सिद्धांत समाजाला निराशावादी बनवितो.

आयुर्वेदातील पुंसवन विधीने म्हणे गर्भाचा लिंगबदल होतो. गर्भसंस्कारासारख्या निराधार विधीच्या सी.डी. डॉ. स्नेहलता देशमुख बनवितात. दुसऱ्या टोकाला, काही स्त्रीवादी लिखाणात असा दावा केला जातो की मुलगी होण्यात पतीचा दोष असतो कारण 'य' गुणसूत्र पुरविण्याची जबाबदारी त्याची असते. परंतु पहिला मुद्दा असा की या युक्तिवादाने 'मुलगी जन्मणे' ही वाईट घटना असल्याच्या पुरुषकेंद्री दाव्याला मान्यता मिळते. दुसरे म्हणजे वास्तविकरीत्या पुरुष दोन्ही प्रकारचे शुक्राणू पुरवितो. अंडाणूपर्यंत सर्वप्रथम कोणत्या प्रकारचा शुक्राणू पोहोचेल ते यदृच्छेने ठरत असले तरी ते स्त्रीच्या शरीरात घडते. 'य' गुणसूत्रधारी शुक्राणू अधिक वेगवान असतो. शुक्राणूंना 'धावायला' अधिक अंतर पुरविल्यावर 'य' गुणसूत्रधारी प्रकारच्या शुक्राणूद्वारे फलन घडण्याची शक्यता वाढल्यास आश्चर्य नसावे. शुक्राणूंवर गर्भाशयातील स्राव, आम्लता, इ. स्त्रीशरीरातील घटकांचा

परिणाम घडतो. स्त्रीवाद्यांना विरोध करणे हा येथे हेतु नसून मुद्दा असा आहे की कोणताही इतर वाद आला की बुद्धिप्रामाण्यवादाकडे दुर्लक्ष होते.

प्रत्येक नवे वैज्ञानिक औषध शोधण्यासाठी अब्जावधि रुपये खर्च येतो. औषधकंपन्यांच्या स्वार्थामुळे वैज्ञानिक वैद्यक महाग आहे हे अर्धसत्य आहे. झंडू, डाबर, रामदेव, हिमानी, विप्रो, हिमालया, अशा सर्वांचे ध्येयसुद्धा भरमसाठ नफाच आहे. तेसुद्धा शाहरुख, बच्चन यांना घेऊन जाहिरातींचा झगमगाट करतात. आयुर्वेदात नमूद नसलेल्या औषधांवर 'आयुर्वेदिक' असा शिक्का मारून करांतून सवलत मिळविली जाते.

योग या शब्दाचा संबंध आत्मा आणि ब्रह्म यांच्या एकरूपतेशी आहे. आज योगाचे दोन प्रकार प्रचलित आहेत. पतंजलीच्या अष्टांग योगामध्ये आसन आणि प्राणायामाचा उल्लेख असला तरी सर्व भर संयम, यम, नियम, ध्यान, धारणा आणि समाधी यांद्वारे मानसिक समाधान मिळविण्यावर आहे. विचार न करण्याची ती स्थिती अनेकांना आवडते. आत्मा ही संकल्पनाच निराधार असल्यामुळे योगाचे सर्वच सिद्धांत आणि दावे गैरलागू आहेत. श्वसनाच्या व्यायामांमुळे श्वसनाचे स्नायू बळकट होतात तसेच सर्वच स्नायूंना कमी ऑक्सिजनमध्ये काम करण्याची क्षमता मिळते. परंतु ध्यानामुळे मिळणारे मानसिक समाधान हा बहुतांशी प्लॅसिबो परिणाम आहे. शांत बसून थोडीफार विश्रांतीसुद्धा मिळते. आजची लोकप्रिय आसने आणि प्राणायाम पंधराव्या शतकामध्ये नाथ संप्रदायाने लिहिलेल्या हठ योगामध्ये सापडतात. ध्यानासाठी (किंवा हल्ली केवळ आरोग्यासाठी) शरीर 'शुद्ध'करणे हे त्याचे ध्येय आहे. त्यासाठी षट्कर्मे, आसने, चक्रे , नाडी, कुंडलिनी, शक्ति, अशा अनेक निराधार संकल्पनांची माहिती दिली आहे. आसने करून शरीरास लवचिकता मिळते परंतु त्यासाठी लागणारी ऊर्जा कमी असल्यामुळे फारसा व्यायाम होत नाही. काही आसने निरुपयोगी आहेत तर काहींमुळे शरीरास इजा सुद्धा पोहोचू शकते.

श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग कार्यक्रमात सुदर्शन क्रिया नावाचा प्राणायामाचा प्रकार शिकविला जातो. बहुतेकांना पहिल्या प्रयत्नातच तीव्र भावना, हातापायांना मुंग्या येणे, भान हरपणे, शरीराचे स्नायू आखडणे, इ. विस्मयकारक अनुभव येतात. वेगाने श्वासोच्छ्वास करण्याचा अंतर्भाव असलेल्या या क्रियेमुळे शरीरातील कर्बद्विप्राणिल वायूचे प्रमाण कमी होते. त्यामुळे मेंदूचा रक्तपुरवठा कमी होतो तसेच रक्तातील कॅल्शियम निष्क्रिय बनून मज्जासंस्था उद्दीपित होते. या अनुभवाचे काहीजणांना व्यसन लागते. परंतु सुदर्शन क्रियेचा काहीही उपयोग सिद्ध झालेला नाही. उलट आजारपणाच्या काठावर असलेल्यांना ती घातक ठरू शकते. नवरात्रीत घागरी फुंकतात त्यामागचे स्पष्टीकरणही असेच आहे.

निसर्गोपचार या नावाने उपचार करणाऱ्या अनेक पॅथी आहेत. पाश्चात्त्य नॅचरोपॅथीमध्ये मानवनिर्मित औषधांचा वापर टाळण्यावर भर असतो. परंतु शरीराच्या नैसर्गिक क्षमतेने बरे होण्यासाठी डॉक्टरला पैसे कोण देईल? म्हणून निसर्गोपचाराच्या तत्त्वांसोबत होमिओपॅथी, रोमाथेरपी, ॲक्युपंक्चर, ओझोन थेरपी (अतिनील किरणांना अडविण्यासाठी उंच आकाशात



ओझोन आवश्यक असला तरी फुप्फुसांसाठी तो एक प्रदूषक वायू आहे), इ. वाटेल ते उपचार केले जातात. भारतीय सरकारपुरस्कृत निसर्गोपचार पद्धतीच्या मते कोणत्याही रोगाचे मूळ कारण जीवाणू नसून ते जमणे हे रोगी शरीराचे एक लक्षण आहे [20]! या पद्धतीमध्ये पाणी, आहार, हवा, उष्णता, माती, लोहचुंबक, रंगीत प्रकाश, यांचा वापर केला जातो.

पारंपरिक ते चांगले अशी अनेकांची ठाम समजूत असते. आशिया खंडातील ९० टक्के लोकांना दुग्धशर्करा पचत नाही हे आर्यसंस्कृतीचा अभिनिवेश असणाऱ्यांना माहिती नाही. दूध आणि मासे, दूध आणि केळे अशा अनेक जोड्यांचे सेवन न करण्याची समाजात पद्धत आहे. आहाराचे सात्त्विक, तामसिक असे प्रकार असतात. पाश्चात्त्य लोक आयुष्यभर ब्रेड खातात. मैद्याची रोटी मैद्याच्या ब्रेडपेक्षा चांगली कशी? सिगरेटवर धोक्याचा इशारा छापण्याची मागणी करणारे चीज आणि लोण्यामुळे होणाऱ्या हृद्रोगजन्य मृत्यूंकडे दुर्लक्ष करतात. शिवाय भारतीय संस्कृतीमध्ये तेलापेक्षा अधिक प्रतिष्ठा संपृक्त अशा तुपाला आहे. उपवास या शब्दाचा मूळ अर्थ आहे 'देवाच्या जवळ जाणे'. परंतु 'पचनसंस्थेला विश्रांतीची गरज असते' हे मत साशंकतेला विश्रांती दिल्यामुळे स्वीकारले जाते. उपासाच्या नावाखाली साबुदाणा, भुईमूग आणि बटाटा अशा परदेशी पदार्थांचे सेवन केले जाते, तर एरवी औषधी समजले जाणारे लसूण आणि हळद वर्ज्य असतात.

शीतपेयांमध्ये कीटकनाशके सापडल्याच्या बातम्यांना प्रचंड प्रसिद्धी मिळाली. शीतपेय-निर्मात्या कंपन्या जाणूनबुजून बाटलीमध्ये कीटकनाशके घालीत असण्याचा संशय घेण्याचे काही कारण नाही. शीतपेयांसाठी उचललेल्या पाण्यात कीटकनाशके नसल्याची काळजी न घेणे हा त्यांचा निष्काळजीपणा जरूर आहे. परंतु तसलेच दोन तीन लिटर पाणी दररोज पिण्यामुळे शीतपेय कारखान्यांच्या आसपासच्या रहिवाशांना जो त्रास होत असेल त्यापेक्षा शीतपेये सुरक्षितच राहतील. शीतपेयांची भीती इतकी पराकोटीला गेली होती की फाऊंटन शीतपेये (ज्यांचे पाणी शहरातीलच असते) पिणेसुद्धा लोक टाळत असत. त्याऐवजी फळांचे रस विकणारी दुकाने उघडली गेली. परंतु फळांच्या रसात आरोग्यदायक काय आहे? कीटकनाशकांची शक्यता फळबागेतसुद्धा आहे. किंबहुना, जैविक संपृक्तीकरण (bio-accumulation) या प्रक्रियेमुळे अन्नसाखळीमध्ये कीटकनाशकांचे प्रमाण वाढत जाते. पाण्यापेक्षा वनस्पतींमध्ये (आणि वनस्पतींपेक्षा प्राण्यांच्या दुधात) कीटकनाशके वाढतात म्हणून डीडीटी सारख्या 'सर्वांत सुरक्षित' रसायनावर निर्बंध आले. फळांच्या रसांत शीतपेयांच्या एक ते दीडपट साखर असते. फळांतून आतड्यांना सारक तंतू मिळतात, तसे फळांच्या रसांतून मिळत नाहीत. फळांच्या रसांतून ब आणि क जीवनसत्त्वे तसेच क्षार आणि ॲन्टिऑक्सिडंट मिळतात परंतु निरोगी लोकांना सामान्य आहारातून ती पुरेशी मिळतात. (दोन वेळा नोबेल पुरस्कार विजेते लायनस पॉलिंग यांनी उतारवयात, सर्दीपासून कर्करोगपर्यंत अनेक रोगांसाठी क जीवनसत्त्वाच्या 'मेगा' डोस देण्याच्या खुळाचा पुरस्कार केला.) गर्भवती आणि इतर काही अवस्थांमध्ये या पदार्थांची गरज वाढत असली तरी

त्यासाठी फळांचे रस पिण्यापेक्षा गोळ्या गिळणे स्वस्त पडते ॲन्टिऑक्सिडंट्स मिळावी म्हणून कोणी लाल वाईन पीत नाही. शीतपेयांचा सामू (pH) 2.5 ते 3.5 असल्याला कुप्रसिद्धी मिळते परंतु फळांच्या रसांचा सामूसुद्धा 3 ते 4 असाच असतो. शीतपेयांतील कर्बद्विप्राणिल वायू उडून गेल्यावर त्यांची आम्लतासुद्धा फळांच्या रसासारखीच होईल. संत्र्याच्या रसात फॉस्फेटचे प्रमाण कोलाएवढेच असते. रस्त्याच्या कडेला मिळणारे फळांचे रसही शीतपेयांपेक्षा अधिक महाग असतात. स्वच्छतेची काळजी घेणारे लोक त्याहीपेक्षा महाग खोक्यातील रस पितात. त्यामध्ये अतिरिक्त पोषणमूल्ये घालण्याच्या नादात फॉस्फेटचे प्रमाण पाचपट होते.

## होमिओपॅथी

होमिओपॅथीविषयी झालेल्या संशोधनात आजवर तरी होमिओपॅथी खोटी पडल्याची समग्र माहिती सुधारकच्या जुलै 1992 अंकात आहे. 1) रोगाच्या लक्षणांसारखी लक्षणे निरोगी व्यक्तींमध्ये निर्माण करणाऱ्या पदार्थांच्या सेवनाने रोग बरा होतो आणि 2)औषध विरल केले की त्याची शक्ति वाढते, अशी गृहीतके असणारी होमिओपॅथी अतार्किक आहे. होमिओपॅथीच्या औषधांमध्ये वांछित पदार्थांचे एवढे विरलीकरण केले जाते की वांछित पदार्थाचा एक रेणू सेवन करण्यासाठी पृथ्वीवरील सर्व पाण्याएवढे औषध पिणेसुद्धा कमी पडेल. औषधांमध्ये वांछित पदार्थाचा एकही रेणु नसतो हे होमिओपॅथीच्या पुरस्कर्त्यांनासुद्धा मान्य असते. वांछित पदार्थाचे गुणधर्म विरलीकरणाच्या खास पद्धतींमुळे द्रावकाच्या स्मृतीमध्ये जातात असा त्यांचा दावा असतो. एक निराधार गृहीतक झाकण्यासाठी दुसरे निराधार विधान करण्याचा सर्वच अंधश्रद्धांचा प्रयत्न असतो. कितीही ठिगळे लावली तरी होमिओपॅथीची गृहीतके आज ज्ञात विज्ञानामध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत. होमिओपॅथी सत्य असण्याची सैद्धांतिक शक्यता नाकारणे अवैज्ञानिक आहे, परंतु होमिओपॅथी सत्य असल्याचा दावा करणाऱ्यांना संपूर्ण रसायनशास्त्र नव्याने लिहावे लागेल.

होमिओपॅथीच्या समर्थनार्थ लसीकरणाचे (vaccination) उदाहरण दिले जाते. लसीकरणाच्या काही प्रकारांमध्ये, खच्चीकरण केलेले जिवंत जंतू किंवा त्यांची विषे निर्बल करून (toxoid) शरीरात सोडण्यात येतात. रोगाचा सौम्य हल्ला झाल्यामुळे शरीराच्या प्रतिकारयंत्रणेला त्या रोगाविरुद्ध रसायने शोधण्यासाठी वेळ मिळतो. खऱ्या रोगाचा प्रादुर्भाव होताच प्रतिकारयंत्रणेच्या पेशींच्या स्मरणशक्तीमुळे त्या रोगाविरुद्ध कार्य तातडीने सुरू होते. वरवर पहाता सौम्य रोग निर्माण करून खरा रोग टाळणे असाच हा प्रकार दिसतो. परंतु पांढऱ्या रक्तपेशींची स्मरणशक्ती वैज्ञानिक संशोधनामध्ये सिद्ध झालेली आहे. निर्जीव द्रावकाच्या स्मरणशक्तीविषयी असा पुरावा नाही.

पुणे येथील सोसायटी फॉर एन्हॅन्समेंट ॲण्ड रिसर्च इन क्लासिकल होमिओपॅथी (सर्च) या संस्थेने प्रस्तुत अंधश्रद्धाविशेषांकाच्या संपादकांचा होमिओपॅथीविरोधी मते मांडण्याचा हक्क 'शैक्षणिक पात्रता नसल्यामुळे' नाकारला होता. या संस्थेने वैज्ञानिक चाचण्या केल्याचा दावासुद्धा केला होता. परंतु 'माहितीची, रुग्णांची व निष्कर्षांची देवाणघेवाण' केवळ 'होमिओपॅथीमधील योग्य प्रशिक्षित आणि पात्रता असलेल्या व्यक्तीशीच' करण्यास ही संस्था तयार आहे. म्हणजेच होमिओपॅथीच्या धंद्याला शरण न गेलेल्यांशी चर्चा करण्यास त्यांची तयारी नाही. होमिओपॅथीचे सिद्धांत खोटे ठरण्याजोगे (फॉल्सिफाएबल) असूनही त्यांची वैज्ञानिक तपासणी करण्यास होमिओपॅथीचे पुरस्कर्ते तयार नसतात.

## सिद्ध

सिद्ध या तामिळ उपचारपद्धतीविषयी सरकारी संकेतस्थळावर असे लिहिले आहे की देवाने मानववंशाची सुरुवात भारतात केली [21]! अल्केमिस्टांचे एक ध्येय असलेला परीस सुद्धा त्यांना माहिती होता: In Siddha system chemistry had been found well developed into a science auxillary to medicine and alchemy. It was found useful in the preparation of medicine as well as in transmutation of basic metals into gold"(sic). परंतु तातडीचे उपचार करणे जमत नसल्याची कबुलीसुद्धा तेथे आहे.

## युनानी तिब्ब

पौर्वात्य आणि पाश्चात्त्य प्राचीन ज्ञानाचे (आणि खुळ्या समजुतींचे) मध्ययुगात अरबांनी जतन केले. इब्न झकारिया राझी, इब्न सिना, इब्न अल नफीस, अबु अल कासिम इत्यादींनी ग्रीक चतुर्दोष सिद्धांतावर आधारित वैद्यकात स्वत:ची भर घातली. प्राचीन भारतीय वैद्यकाचीसुद्धा त्यांना माहिती होती. त्याला युनानी तिब्ब वैद्यक म्हणतात. आयुर्वेदाच्या दैवी ज्ञानाच्या दाव्याच्या तुलनेत इस्लामी राजवटीतील वैद्यक कालसापेक्ष वैज्ञानिक म्हणावे लागते. परंतु हिप्पोक्रॅटिस आणि गॅलेन यांचे बहुतेक सिद्धांत आज वैज्ञानिक वैद्यकाने त्यागले आहेत. गंमत अशी की सर्पगंधा या वनस्पतीमध्ये वैज्ञानिकांना रिसर्पिन हे औषध सापडल्यानंतर त्याचे श्रेय घेण्यासाठी आयुर्वेदिक आणि युनानी या दोन्ही पद्धती पुढे आल्या. या दोन्ही पद्धतींच्या उद्गात्यांनी प्रयोग करणे व चुका त्यागणे (ट्रायल ॲण्ड एरर) पद्धतीने औषधी गुण असलेल्या अनेक पदार्थांची नोंद करून ठेवली असली तरी त्या पदार्थांचा परिणाम वैज्ञानिक पद्धतीने होत असल्यामुळे या उपचारपद्धती कोणत्याही प्रकारे वैज्ञानिक वैद्यकापेक्षा उच्च नाहीत. त्यांचे सिद्धांत निराधार असल्यामुळे सैद्धांतिक संशोधनसुद्धा त्यांच्यामध्ये शक्य नाही. त्यांच्या औषधांच्या वैज्ञानिक चाचण्या होतच असतात. या उपचारपद्धतींचे जे दावे चाचण्यांमध्ये सिद्ध होतात ते वैज्ञानिक वैद्यकाचा भाग बनतातच.

## ॲक्युपंक्चर आणि चिनी वैद्यक

गर्भामध्ये तयार झालेले काही अवयव आपली जागा बदलतात, उदा, पीयूषिका



**निखिल जोशी**

ग्रंथीचा अर्धा भाग घशामध्ये तयार होऊन नंतर मेंदूत जातो, मूत्रपिंडे वर सरकतात, तर हृदय आणि वृषणे खाली सरकतात. सामान्यत:, एखाद्या अवयवाच्या नसा आणि त्या अवयवावरील त्वचेच्या नसा सामायिक असतात. म्हणूनच, जागा बदललेल्या अवयवांच्या वेदना मूळ जागीच्या त्वचेवर होतात. त्वचेला स्पर्श केल्यास अंतर्गत अवयवांच्या वेदना कमी होतात हेसुद्धा एक सत्य आहे. परंतु ॲक्युपंक्चर शास्त्राच्या समर्थनार्थ स्थान बदललेल्या वेदनांचा (रिफर्ड वेदनांचा) संदर्भ देणे म्हणजे सुतावरून स्वर्ग गाठणे आहे. ॲक्युपंक्चरशास्त्रामध्ये नमूद वेदनाबिंदू आणि अवयवांच्या जोड्या गर्भविकासशास्त्राला धरून नाहीत.

ॲक्युपंक्चरशास्त्रानुसार, शरीरात सुया टोचून *ची* (qi) ऊर्जेचे नियमन करून सर्व प्रकारचे रोग बरे करता येतात. उपचारामागचा सिद्धांत चूक असला तरी उपचाराच्या परिणामाचे शास्त्रीय कारण सापडल्यास तो उपचार वापरावा, या विचाराने ॲक्युपंक्चरला थोडा वैज्ञानिक पाठिंबा आहे. परंतु रुग्णाच्या नकळत हे उपचार करणे शक्य नसल्यामुळे त्यांचा शास्त्रीय अभ्यास करून उपयुक्तता ठरविणेच कठीण आहे. चिनी पारंपरिक वैद्यकाचा महत्त्वाचा भाग म्हणविणाऱ्या ॲक्युपंक्चरशास्त्राचा मुख्य भर रिफर्ड बिंदूंवर आहे. अशा बिंदूंचा सिद्धांत चीन आधी ग्रीक आणि अरबांनीसुद्धा मांडला होता. हे शास्त्र फारसे पारंपरिकसुद्धा नाही. ख्रिस्तपूर्व काळात त्याचा उल्लेख आढळत नाही. बिंदूची जागा आणि *ची* उर्जेच्या प्रवाहाचे रेखांश यांविषयी विविध प्राचीन लिखाणांमध्ये एकमत नाही. आज ॲक्युपंक्चरसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रकारच्या सुया बनविणे 400 वर्षांपूर्वी शक्य नव्हते. चिनी पारंपरिक वैद्यकाचा मोठा भाग गेल्या शतकात चिनी अस्मितेसाठी बनविला गेला [22, 23].

भारतीय कायद्यानुसार, ॲक्युपंक्चरशास्त्राची प्रमाणपत्रे मिळवून उपचार करण्याची अनुमति केवळ वैद्यकीय व्यावसायिकांनाच आहे. तरीही इंदिरा गांधी विद्यापीठाने सामान्य जनतेसाठी ॲक्युपंक्चरचा पदविका अभ्यासक्रम सुरू केलेला आहे [24].

## रेकी

रेकी या जपानी उपचारपद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे भारतात या उपचारपद्धतीला मान्यता नाही. 1922 साली सुरू झालेल्या रेकीला परंपरासुद्धा नाही. ॲक्युपंक्चरप्रमाणेच, परंपरा असल्याचा निराधार दावा मात्र आहे). भारतात इतक्या उपचारपद्धती असताना अजून एक पद्धत स्वीकारण्याची लोकांना गरज नव्हती. तरीही शहरांमध्ये रेकी उपचारांच्या जाहिराती दिसतात. शरीरातील उर्जेचे संतुलन करून स्पर्शाद्वारे सर्व रोग बरा करण्याचा रेकी पद्धतीचा दावा असतो. प्राण्यांना रेकी देण्यासाठी वेगळे तज्ज्ञसुद्धा असतात. करमणूक क्षेत्रातील अनेक तारे या खुळाचेसुद्धा बळी असल्यामुळे वर्तमानपत्रांतील गुळगुळीत पुरवण्यांमध्ये रेकीतज्ज्ञांच्या मुलाखतवजा जाहिरातीसुद्धा प्रसिद्ध होतात.

वैकल्पिक उपचारपद्धतींच्या पाठीराख्यांच्या निरीक्षणातून असे दिसते की या उपचारपद्धतींचे पाठीराखे एकमेकांवर टीका करीत नाहीत. वास्तविक पाहता आयुर्वेद आणि होमिओपॅथीमध्ये समान तत्त्व नाही. तरीही वैकल्पिक उपचारपद्धती एकमेकांच्या कुरणांचा आदर राखताना दिसतात. रुग्णांमध्येसुद्धा एकाच उपचारपद्धतीवर निष्ठा असल्याचे क्वचितच दिसते. बिल माहर या विनोदकाराच्या शब्दात सांगायचे झाले तर "You can't crap all over Darwin, and stem cell research and global warming, and then come crawling back to science when you want Tamiflu; that's for us sinners." विज्ञानामध्ये उत्क्रांत होण्याची सोय असल्यामुळे वैज्ञानिक विचारसरणीची 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर', 'आमच्याशी फारकत घेणे चूक'ही भूमिका योग्य आहे. कदाचित आजच्या अनिश्चित जीवनशैलीत असा विश्वास ठेवण्याची लोकांना सवय नाही. दीडशे वर्षांपूर्वी असाध्य असलेले अनेक रोग वैज्ञानिक वैद्यकामुळे बरे होतात, अनेक गंभीर रोगांची तीव्रता सुसह्य झाली आहे, लोकांचे आयुष्यमान दुप्पट झाले आहे, शिवाय जगण्याची धडपड भौतिक प्रगतीमुळे सोपी होऊन छंद आणि खुळे जोपासण्यासाठी फावला वेळ, पैसा मिळतो आहे. म्हणूनच अविवेकी वागणूक करणे लोकांना परवडते आहे. विज्ञानाचे फायदे लाभले असले तरी समाजाने वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारलेला नाही. अशा परिस्थितीत अंधश्रद्धा-निर्मूलन सतत आवश्यक आहे.

**संदर्भ:**


1. http://socrel.oxfordjournals.org/cgi/content/abstract/70/2/101
2. http://www.anatheist.net/2009/07/religion-us-professors
3. http://en.wikipedia.org/wiki/Salem_hypothesis
4. http://www.faktoider.nu/openmind_eng.html
5. http://www.indianexpress.com/oldStory/64945/
6. http://lefarkins.blogspot.com/2008/12/medical-superstition-has-consequences.html
7. http://nirmukta.com/2009/08/13/swine-flu-nilgiri-oil-and-the-faux-sms
8. http://www.docgurley.com/2007/09/13/superstitious-doctors-part-i
9. http://findarticles.com/p/articles/mi_m0FSL/is_5_81/ai_n13793208
10. http://www.straightdope.com/columns/read/1348/whats-the-link-between-the-moon-and-menstruation
11. http://www.mahasbtc.com/index.php?option=com_content&task=view&id=34&Itemid=244
12. http://www.scielo.br/scielo.php?pid=S0074-02762001000300004&script=sci_arttext and http://memorias.ioc.fiocruz.br/963/4151dis.html
13. http://www.island.lk/2009/07/02/features2.html
14. http://archpedi.highwire.org/cgi/content/summary/88/3/294
15. http://www.springerlink.com/content/p85q1w054612w776
16. http://www.newyorker.com/reporting/2009/06/01/090601fa_fact_gawande
17. http://www.whywontgodhealamputees.com
18. http://kem.edu/dept/ayurvedic/services_offered.htm
19. Patrika Nov 2002, Auth: V B Athawale, Pub: Marathi Vidnyan Parishad
20. http://indianmedicine.nic.in/naturopathy.asp
21. http://indianmedicine.nic.in/siddha.asp
22. http://www.drspinello.com/altmed/acuvet/acuvet_files/frame.htm
23. http://www.skeptic.com/eskeptic/08-10-08#feature
24. http://timesofindia.indiatimes.com/city/ludhiana/IGNOU-offering-course-in-unrecognized-field/articleshow/5453722.cms 16-01-2010


□ □

**निखिल जोशी**

# आधुनिक अंधश्रद्धा, दंतकथा, मिथके, इत्यादि

*उत्तरा सहस्रबुद्धे*

नवस, चमत्कार, मांत्रिक-तांत्रिक, ज्योतिषविद्या, वेगवेगळ्या प्रकारचे स्वामी-महाराज, या अंधश्रद्धांच्या परिचित प्रकारांपलिकडे इतरही अनेक प्रकार आहेत. या प्रकारातल्या 'अंधश्रद्धा' समाजातील प्रचलित चालीरीती, रूढीपरंपरा, धार्मिक कर्मकांडे, यांच्याशी संबंधित नसतात. त्यांचा उगम तुलनेने अलिकडच्या काळात झालेला असतो. त्यातील अनेक समजुतींना 'अंधश्रद्धा' मानायला शिक्षित समाजही पटकन तयार होत नाही. या 'आधुनिक' अंधश्रद्धा कधी नवीन दंतकथांच्या स्वरूपात समोर येतात. तर कधी त्या मिथ्याविज्ञानाच्या बुरख्याआड दडलेल्या असतात. कधी त्या विशिष्ट उत्पादक-विक्रेत्यांनी पसरवलेल्या असतात, तर कधी, टीव्ही, इंटरनेट अशा आधुनिक प्रसारमाध्यमांद्वारे त्या पसरतात. विचारप्रणाली (ideology) म्हणजे एक 'दृष्टिकोण' असतो, 'सत्य' नव्हे, याचे भान सुटल्यामुळेही अनेक अंधश्रद्धा तयार होतात.

प्रसारमाध्यमांतील लेख, बातम्या, फीचर्स यातून पसरलेल्या अनेक समजुती समाज फारशी शहानिशा न करता ग्राह्य धरत असतो. मोबाइल फोनची संख्या वाढल्यामुळे मुंबई शहरातील चिमण्यांची संख्या कमी झाली आहे, इथपासून ते पेट्रोलपंपावर मोबाइल फोन वापरला तर स्फोट होऊ शकतो, इथपर्यंत अशा समजुतींची अनेक उदाहरणे देता येतील. यांपैकी अनेक समजुती भ्रामक असतात. तर अनेकांमागील कारणमीमांसा, तार्किकता निर्विवादपणे सिद्ध झालेली नसते. तरीही या समजुतींना सत्य मानून चालणाऱ्यांची संख्या फार मोठी असते. आणि त्यांच्यामध्ये सुविद्य, स्वतःला आधुनिक म्हणवणाऱ्यांची संख्याही बरीच असते.

उत्पादक-विक्रेत्यांच्या व्यापारी हितसंबंधांतून काही वर्षांपूर्वी 'जपान लाईफ' नावाचे एक मायाजाल पसरवले गेले होते. यात फसल्यामुळे जबर आर्थिक नुकसान सोसाव्या लागलेल्या व्यक्ती आपल्या आजूबाजूलाही सापडतील. या जपान लाईफचे प्रमुख उत्पादन म्हणजे चुंबकीय गादी. या गादीची किंमत रु.85,000 ते रु.1,00,000 इतकी सांगितली जात असे. या गादीचे चुंबकीय गुण, ॲक्युप्रेशरची वैशिष्ट्ये, यामुळे तिला वैद्यकीय उत्पादन म्हणून बाजारात आणले गेले होते. पण खरी मेख त्या कंपनीच्या मार्केटिंग स्ट्रॅटेजीमध्ये होती. अत्याधुनिक कार्यालये, त्यात समूहाने आणि व्यक्तिगत प्रेझेंटेशन करणे, दृक्श्राव्य माध्यमातून गादीचे गुण सांगणे, या सगळ्यांतून मिळणाऱ्या गिऱ्हाइकाला आणखी आमिष दाखवले जात असे. अशीच गादी आणखी काही जणांना विकली तर नफ्यातील टक्केवारी, त्याहून जास्त विक्री केली तर कंपनीत पार्टनरशिप अशी ती आमिषे. त्यांना



भुलून कितीच व्यक्तींनी अगदी आपली बचत पणाला लावून ही गादी विकत घेतल्याची उदाहरणे आहेत. त्यानंतर स्वतः विक्रेते बनलेल्या या 'गिऱ्हाईकां'पैकी काही जणांना कोरियात नेऊन मार्केटिंगचे प्रशिक्षणही दिले गेले होते. पुढे मात्र ही मंडळी नफ्यातील टक्केवारी मिळत नाही, गाद्या मिळाल्या नाही म्हणून नवी गिऱ्हाइके तगादा लावतात, अशा दुष्टचक्रात अडकली. त्यांच्यापैकी अनेक जण अक्षरशः बुडाले. कंपनीने मात्र भरपूर कमाई केली. 2002 च्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात जयपाल रेड्डी यांनी त्यांच्या स्वतःच्या नलगोंडा मतदारसंघात जपान लाईफ कंपनीने एक कोटी रुपयांचा गल्ला जमा केल्याची, तर संपूर्ण आंध्रप्रदेश राज्यातून 100 कोटींवर कमावल्याची माहिती दिली होती. हे उत्पादन विकणाऱ्या फ्रंटियर ट्रेडिंग या कंपनीने ही गादी 'औषधे' या सदराखाली आयात करून कोट्यवधी रुपयांची कस्टम ड्यूटी चुकविल्याची माहितीही पुढे सीएनबीसी टीव्ही 18 ने केलेल्या एका फीचरमध्ये बाहेर आली. सहज, सुलभ उपायाने एरव्ही दुर्धर मानलेले रोगही बरे होऊ शकतात असे सांगितले, तर रोगाने त्रस्त व्यक्ती किंवा त्याचे जवळचे इष्टमित्र असे 'प्रयोग' करून पाहायला सहज तयार होतात. या मनोवृत्तीचा जपान लाईफसारख्या वस्तूंचे उत्पादक-विक्रेते पुरेपूर फायदा करून घेतात. पौर्णिमेच्या रात्री एका माशातून दिलेले औषध घेऊन दमा बरा होतो अशा जाहिराती करून दर पौर्णिमेला शेकडो लोकांना मासे गिळायला लावणारे वैदू म्हणजे जपान लाईफच्या लहान आवृत्त्या.

दंतकथा या पिढ्यान्‌पिढ्या चालत असतात. त्यांचे मनोरंजनमूल्य हे त्यांचे वैशिष्ट्यच. गेल्या साठ-सत्तर वर्षांत पसरलेल्या काही दंतकथांमध्येही असे मनोरंजनमूल्य आहे. त्याशिवाय कित्येक जण या कथांना सत्य मानत असतात. असा सर्वपरिचित दंतकथांपैकी एक म्हणजे बर्म्युडा त्रिकोण. ही दंतकथा साधारण विसाव्या शतकाच्या मध्यापासून चालत आलेली आहे. 1945 मध्ये अमेरिकन नौदलाचा एक प्रशिक्षक आणि पाच शिकाऊ पायलट या भागात विमानांसकट गायब झाले. तेव्हापासून ही दंतकथा हळूहळू पसरत गेली. त्या सहापैकी फक्त प्रशिक्षकाच्याच विमानात दिशादर्शक यंत्रणा होती, इतर पाच विमानांमध्ये नव्हती. तर्कसंगत स्पष्टीकरण द्यायचे, तर प्रशिक्षकाच्या विमानातील दिशादर्शक यंत्रणा नादुरुस्त झाली असावी, त्यामुळे सर्वच विमाने भरकटली असावीत आणि एकाक्षणी इंधन संपल्यामुळे कुठेतरी कोसळून बुडून गेली असावीत, असे म्हणता येते. पण या घटनेभोवती गूढतेचे वलय निर्माण झाले. त्यानंतरच्या कालात अटलांटिक महासागरातील मायामी, बर्म्युडा आणि प्योर्टो रिको दरम्यानच्या या तथाकथित त्रिकोणाच्या भोवती गूढरम्य कथा पसरत गेल्या. या भागातून जहाजे आणि विमाने अचानक गायब होतात, अशा स्वरूपाच्या त्या कथा आहेत. या भागात घडलेल्या घटनांची मोजदाद करण्याचा उद्योगही काही जणांनी केला आहे. कोणता काळ आणि प्रदेशाची किती व्याप्ती यावरून वेगवेगळे आकडे दिले गेले आहेत. पाचशे वर्षांचा काळ धरला तर 200 ते 1000 घटना घडल्याचे दावे करण्यात आले आहेत. या त्रिकोणाचे क्षेत्रफळ, तिथल्या हवामानाची परिस्थिती हे लक्षात घेतले तर पाचशे वर्षांत हजार घटना हे काही

अनैसर्गिकरीत्या मोठे प्रमाण नाही, हे सहज लक्षात येईल. या परिसरात वारंवार येणारी विविध प्रकारची वादळे, सुनामी, भूकंप, उंच उसळणाऱ्या लाटा, यांपैकी कोणत्याही कारणामुळे जहाजे आणि विमाने अपघातग्रस्त होऊ शकतात. या दंतकथांमधील काही जहाजे चाचेगिरीचीही बळी ठरलेली असू शकतात. तर कधी दिशादर्शक यंत्रणा अथवा ती वापरणाऱ्यांच्या मानवी चुकांमुळेही अपघात घडलेले असू शकतात. मात्र ही सगळी तर्कसंगत कारणे दूर राहून बर्म्युडा त्रिकोणाच्या दंतकथांमध्ये परग्रहावरील सजीवांच्या कारवाया, गुरुत्वाकर्षणविरोधी यंत्रे, तत्सम 'विक्षिप्त' तंत्रज्ञान आणि ते वापरणारे 'गूढ कुणीतरी', अशा कथा प्रसृत झाल्या. बर्म्युडा त्रिकोणावर पुस्तके लिहून जगातील विविध भाषांतील अनेक लेखकांनी एकेकाळी बक्कळ पैसा कमावला. लॅरी कुशे यांनी या साहित्याचा अभ्यास केला तेव्हा त्यांना असे आढळले, की बहुतेक लेखकांनी या विषयावर स्वतंत्रपणे संशोधन, अभ्यास केला नव्हताच. आधीच्या लेखकांच्या अशाच, बव्हंशी निराधार, लेखनाचा आधार घेऊन पुढचे लिखाण केले गेले होते.

नवीन दंतकथांचे आणखी एक उदाहरण म्हणजे 'परग्रहावरून' आलेल्या उडत्या तबकड्या किंवा याने किंवा सजीव यांच्याविषयीच्या विविध कहाण्या. अशा तबकड्या किंवा सजीव बघितल्याचे दावे अजूनही अधूनमधून केले जात असतात. वारंवारतेच्या सिद्धान्तानुसार अवकाशात सूर्यासारख्या हजारो ग्रहमाला आणि त्यात पृथ्वीसारखे ग्रह असण्याची शक्यता निश्चितपणे आहे. अशा ग्रहांवर सजीवांची निर्मिती झाली असण्याची सांख्यिकी शक्यताही भरपूर आहे. मात्र हे सजीव किंवा त्यांच्या कोणत्या वस्तू आपल्यापर्यंत पोचण्याची शक्यता मात्र अगदीच नगण्य आहे. पृथ्वीचे सूर्यापासूनचे अंतर 500 प्रकाशसेकंद इतके आहे. सूर्यानंतरचा सर्वांत जवळचा तारा प्रॉग्झिमा सेंटॉरी पृथ्वीपासून 4 प्रकाशवर्षे दूर आहे. म्हणजे 27 ट्रिलियन (27,000,000,000,000) मैल. ताशी 1 मिलियन (1,000,000) मैल वेगाने गेले तरी हे अंतर कापायला 2700 वर्षे लागतील. सध्याचे सर्वांत वेगवान अवकाशयान व्हॉयेजर हे ताशी 40,000 मैल वेगाने जाऊ शकते. त्यातून अल्फा सेंटॉरीवर जायला 70,000 वर्षे लागतील. या आकडेवारीवरून अवकाशाच्या एका भागातील सजीव दुसऱ्या भागातील सजीवांपर्यंत पोचण्याची गणिती शक्यता जवळपास नाहीच, असे म्हणता येते. तरीही उडत्या तबकड्यांच्या किंवा परग्रहावरील सजीवांच्या बातम्या अजूनही येतच असतात.

उडत्या तबकड्या, परग्रहावरचे सजीव, बर्म्युडा त्रिकोण, अशा दंतकथांच्या बाबतीत तार्किक स्पष्टीकरण देऊन विचारी व्यक्तींना त्याविषयी किमान दुसऱ्या बाजूने विचार करण्यास उद्युक्त करता येते. परंतु ज्यांच्या 'वैज्ञानिकतेबद्दल' आणि म्हणून 'सत्यतेबद्दल' शंका घेणे भल्याभल्यांनाही जड जाते असा आधुनिक अंधश्रद्धेचा आणखी एक प्रकार म्हणजे मिथ्याविज्ञान (pseudoscience). वैज्ञानिकतेच्या आभासात्मक वेष्टनात गुंडाळून मांडलेले तथाकथित ज्ञान म्हणजे मिथ्याविज्ञान असे म्हणता येईल. ज्योतिषविद्या, परामानसशास्त्र, ही मिथ्याविज्ञानाची सर्वपरिचित उदाहरणे. विज्ञान आणि



मिथ्याविज्ञान यांमधील सीमारेषा तशी धूसर आहे. मिथ्याविज्ञानात वैज्ञानिक भाषेचा, संख्याशास्त्राचा वापर केलेला असतो. त्यामुळे ते विज्ञान आहे असा समज होतो. परंतु काही लक्षणांवरून विज्ञान आणि मिथ्याविज्ञान यांतील फरक स्पष्ट करता येऊ शकतो. वैज्ञानिक पद्धतीमध्ये जी व्यक्ती एखादा सिद्धान्त मांडते, तिच्यावरच तो सिद्ध करायची, त्यासाठी पुरावे देण्याची जबाबदारी असते. मिथ्याविज्ञानात मात्र सिद्धान्ताला आह्वान देणाऱ्या व्यक्तीवर आपले आह्वान सिद्ध करण्याची जबाबदारी टाकली जाते. वैज्ञानिक परिभाषेत याला Reversal of burden of proof असे म्हणतात. विज्ञानामध्ये जे सिद्धान्त मांडले जातात, त्याची कोणाही इतर व्यक्तीला पडताळणी करता येते. मिथ्याविज्ञानात मात्र अनुभूती, प्रत्यय, अशा गोष्टींवर भर असतो, आणि तिसऱ्या व्यक्तीला त्याची पडताळणी करून पाहणे शक्य नसते. याशिवाय पडताळणीसाठी प्लॅसेबो, डबल ब्लाइंड अशा तंत्रांचा वापरही मिथ्याविज्ञानात करता येत नाही. मिथ्याविज्ञानामध्ये नेमके आणि स्पष्ट सिद्धान्त किंवा तत्त्वे मांडली जात नाहीत. तर अतिशय ढोबळ अशी विधाने केली जातात. गृहीतके कमीत कमी ठेवून सिद्धान्त सिद्ध करता आला पाहिजे, याचेही पालन मिथ्याविज्ञानात होत नाही. इतके सारे असूनही मिथ्याविज्ञानावरील विश्वास मोठ्या प्रमाणात समाजात अस्तित्वात आहे. मारिओ बुंगे (Bunge) या sceptic वैज्ञानिकाने एका सर्वेचा हवाला देऊन सांगितले आहे की 1988 मध्ये उत्क्रान्तिवादावर विश्वास नसणाऱ्या अमेरिकनांची संख्या 50% होती, तर 88% अमेरिकनांना ज्योतिष हे विज्ञान आहे असे वाटत होते. (अमेरिकेतील नॅशनल सायन्स फौंडेशनच्या एका सर्वेनुसार 1990 मध्ये मिथ्याविज्ञानांवर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्या बरीच मोठी होती. 2001 मध्ये ती सर्वोच्च होती.) अलिकडे वास्तुशास्त्र या नावाचे असेच एक मिथ्याविज्ञान बोकाळलेले आहे. 'आग्नेय दिशा अग्नीची, म्हणून स्वयंपाकघर आग्नेयेकडे असले पाहिजे' अशांसारख्या वैज्ञानिकतेचा आव आणणाऱ्या अवैज्ञानिक दाव्यांवर ते आधारलेले आहे. आकडेशास्त्र (numerology), फंगशुई, ही आणखी काही उदाहरणे.

आधुनिक अंधश्रद्धांचा आणखी एक प्रकार म्हणजे विचारप्रणाली (ideology) वरील 'श्रद्धा'. एखाद्या 'इझम' (ism) वरील श्रद्धा आणि एखाद्या धर्मावरील श्रद्धा यात फारसा फरक नसतो. अशी श्रद्धा बाळगल्यामुळे विज्ञानातील तथ्ये नाकारण्याची चूक अनेकांच्या हातून होते. ''सायन्स : गुड, बॅड, ॲण्ड अग्ली'' या पुस्तकात संकलित केलेल्या लेखांमध्ये मार्टिन गार्डनर या प्रख्यात लेखकाने याविषयी काही मनोरंजक माहिती दिली आहे. त्यातली एक कहाणी स्टालिनच्या सोविएत युनियनमधली आहे. मार्क्सवादाला 'शास्त्रीय समाजवाद' (scientific socialism) असे म्हणतात. या शास्त्रीय समाजवादाचा determinism वर विश्वास आहे. भौतिकशास्त्रामध्ये अणुविषयी नवनवे संशोधन होत गेले, तशी इलेक्ट्रॉनविषयी अधिकाधिक माहिती मिळत गेली. ही माहिती विज्ञानाच्या तत्कालीन प्रचलित तत्त्वांमध्ये बसणारी नव्हती. इलेक्ट्रॉन व संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकांपैकी हाइझेनबर्ग या वैज्ञानिकाने इलेक्ट्रॉनच्या randomness चे स्पष्टीकरण देणारा

principle of uncertainty हा सिद्धान्त मांडला. तर इलेक्ट्रॉन हा particle आहे की wave आहे हे कोडे, 'तो दोन्ही आहे' असे सांगून सोडवणारा Principle of complementarity हा सिद्धान्त नील्स बोर या वैज्ञानिकाने मांडला. रशियातील जुन्या पिढीतील वैज्ञानिकांना हाइझेनबर्ग आणि बोरचे सिद्धान्त मान्य करण्यात काहीच अडचण नव्हती. पण क्रान्तीच्या, मार्क्सवादाच्या आणि determinismच्या श्रद्धेवर पोसल्या गेलेल्या नव्या पिढीतील सोविएत वैज्ञानिकांना मात्र ते सिद्धान्त मान्य झाले नाहीत. इलेक्ट्रॉनचे 'गूढ' रूप वस्तुस्थिती म्हणून मान्य होण्यात त्यांची विचारप्रणालीवरची श्रद्धा आड आली. सोविएत वैज्ञानिक संस्थांमध्ये अशाच वैज्ञानिकांचे महत्त्व वाढत गेले. भौतिकीप्रमाणेच जनुकशास्त्रातील नवे संशोधनही या 'मार्क्सवादी वैज्ञानिकांनी' नाकारले. लायसेन्को या सोविएत वैज्ञानिकाने उत्क्रान्तिवादातील natural lawचे तत्त्व अमान्य केले. सोविएत जनुकशास्त्रीय संशोधनावर लायसेन्कोचा प्रभाव पुष्कळ काळ राहिला. गमतीचा भाग म्हणजे, स्टालिनच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी सोविएत वैज्ञानिकांनी आपली चूक सुधारली. आणि त्यानंतर हाइझेनबर्ग आणि बोरच्या सिद्धान्तांना सोविएत भौतिकीमध्ये प्रतिष्ठा प्राप्त झाली. कॅथलिक ख्रिस्ती धर्मावर श्रद्धा असणाऱ्यांनी डार्विनचा उत्क्रान्तिवाद नाकारणे, अशा मंडळींनी creationism चा पुरस्कार करणे; यापेक्षा स्टालिनच्या सोविएत युनियनमधील श्रद्धाळू मार्क्सवादी वैज्ञानिकांच्या वरील गोष्टी फारशा वेगळ्या नाहीत.

मिथ्याविज्ञान आणि विचारप्रणाली या दोन्ही वर्गात बसू शकेल अशी एक जबरदस्त आधुनिक अंधश्रद्धा म्हणजे 'पर्यावरणवाद'. पृथ्वी हा ग्रह अस्तित्वात आल्यापासून इथल्या पर्यावरणात, हवामानात सातत्याने बदल होतच आहेत. हवामानविषयक नोंदी ठेवण्याची पद्धत गेल्या दीडशे वर्षातली आहे. पर्यावरणाविषयीचा प्रमुख प्रश्न असा आहे, की गेल्या दीडशे वर्षांत हवामानात जे झाले, ते पूर्वीपेक्षा अधिक वेगाने, अधिक तीव्रतेने झाले का; आणि या बदलात नैसर्गिक प्रक्रियेचा भाग किती आणि मानवी हस्तक्षेपाचा भाग किती. उपलब्ध आकडेवारीवरून आणि इतरही अनेक प्रकारच्या पुराव्यांवरून गेल्या काही वर्षांत मानवी हस्तक्षेपामुळे हवामानबदलाचा वेग आणि तीव्रता वाढली आहे, असे ठामपणे मुळीच म्हणता येत नाही. तरीही तसे दावे केले जातात, त्यासाठी भरमसाठ आकडेवारी दिली जाते. हा मिथ्याविज्ञानाचाच एक प्रकार आहे. या दाव्यांनाच तथ्य मानून त्या अनुषंगाने देशोदेशींच्या सरकारांची धोरणे ठरावीत, अगदी मानवी जीवनशैलीतही बदल करावेत, ही पर्यावरणवादाची विचारसरणी आहे. पर्यावरणवादाचे जागतिक पातळीवरील राजकारणही आहे. क्योटो प्रोटोकॉल, 2007 मध्ये बालीमध्ये झालेली तसेच 2009 मध्ये कोपनहेगमध्ये भरलेली आंतरराष्ट्रीय परिषद, हे सर्व पर्यावरणवादाचे राजकारण आहे. सुनामीपासून वादळांपर्यंत, भूकंपापासून अतिवृष्टीपर्यंत, अतिउन्हाळ्यापासून अतिहिवाळा, दुष्काळापर्यंत सर्व घटनांचे खापर हवामानबदलावर फोडणे ही पर्यावरणीय अंधश्रद्धा आहे. (सामान्यांच्या पर्यावरणीय अंधश्रद्धांचा गैरफायदा घेत पर्यावरणाचे जागतिक राजकारण चालू आहे.) अपुऱ्या, पडताळणी न केलेल्या, ठोस पुराव्यांचा भक्कम आधार



नसलेल्या माहितीच्या आधारे जागतिक धोरणे ठरवण्याचे दुष्परिणाम नुकतेच आयपीसीसीच्या (Intergovernmental Panel on Climate Change) अहवालातील गंभीर त्रुटी आणि चुका जगासमोर आल्याने स्वच्छ दिसू लागले आहेतच.

वर उल्लेखिलेल्या आणि त्याप्रकारच्या इतरही दंतकथा, मिथ्याविज्ञान, विचारप्रणाली, वगैरेंना रूढ अर्थाने 'अंधश्रद्धा' म्हणायचे की नाही हा वादाचा मुद्दा होऊ शकेल. या सर्व गोष्टी तर्कविसंगत आणि अवैज्ञानिक आहेत, हे मात्र खरे. विवेकवादाचे काम हेच आहे, की वरवर तार्किक वाटणाऱ्या दाव्यांमधील अतार्किकता आणि विसंगती शोधून काढणे. *आसु*च्या प्रस्तुत विशेषांकामध्ये अशा 'अंधश्रद्धांचा' समावेश करण्याचा हेतू हाच आहे.

□ □

# धार्मिक अंधश्रद्धा

*प्रमोद सहस्रबुद्धे*

**धर्म :**

अंधश्रद्धांचा एक मोठा स्रोत म्हणून धर्माकडे पाहता येते. बहुतांश अंधश्रद्धांचा धर्माशी संबंध दिसतो. धर्माचे वा धार्मिक अंधश्रद्धांचे तीन भाग करता येतात. परंपरागत, वैयक्तिक व संघटनात्मक असे ते तीन भाग करता येतील. प्रत्येक धर्माला मूलतत्त्व असते (जे विविध पंथांमध्ये समान असते पण दोन धर्मांत असमान असते). एक ज्ञानी वा पुरोहितवर्ग असतो आणि एक सामाजिक अस्तित्व असते. यातील मूलतत्त्व हे वैयक्तिक, सामाजिक हे परंपरात्मक तर पुरोहितवर्ग हे संघटनात्मक अशी वर्गवारी करता येईल. सर्वसाधारणपणे सुधारणा (अंधश्रद्धानिर्मूलन) या प्रथम सामाजिक वा परंपरागत नंतर पुरोहितवर्गविरोधी व शेवटी मूलतत्त्वविरोधी असतात. पहिले दोन टप्पे हे चळवळीतून साधले जातात. तिसरा टप्पा वैयक्तिक असल्याने प्रत्येकाला तो आपापला गाठावा लागतो.

सर्व धर्मांत एक समान धागा असतो असे म्हणता येईल. तो धागा म्हणजे मृत्यूनंतरचे जीवन असणे असे मानणे आणि ते जीवन सुखकर करण्यास ऐहिक जीवनात काहीतरी करता येते असे मानणे. सध्याच्या जीवनावर चांगला परिणाम करणारे काहीतरी धार्मिक कृत्य असते असे मानणे हाही अजून एक समान धागा आहे असे मानता येईल. धार्मिक तत्त्ववेत्ते मात्र याला गौण समजतात. धर्माची लोकप्रियता वाढण्यास याचाच मुख्य उपयोग असतो. अंधश्रद्धा व श्रद्धा यात तात्त्विक भेद करायचा झाल्यास ऐहिक जीवनात बदल घडवू पाहणाऱ्या असंबद्ध कृति/समजुती या अंधश्रद्धा प्रकारात मोडता येतील तर तथाकथित पारलौकिक जीवनातील बदल घडवू पाहणाऱ्या कृती/समजुती या श्रद्धा प्रकारात मोडता येतील. अर्थात हा श्रद्धा-अंधश्रद्धांचा वाच्यार्थ म्हणता येणार नाही.

धर्मांचे विभाग करता आले तर दोन होतील. एकात ईश्वराला व्यक्तिमत्त्व दिलेले आहे व तो एकच आहे. दुसऱ्यात असे काही नाही. ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम व काही हिंदू पंथ हे पहिल्या प्रकारात मोडू शकतात. अनेकेश्वरवादी हिंदू, अद्वैती, बौद्ध व जैन हे दुसऱ्या प्रकारात मोडतात. यातील ज्यू-ख्रिश्चन व इस्लाम हे धर्म काही धार्मिक पुस्तके (जुना करार), विशिष्ट जगन्निर्मितीची व अंताची कल्पना मानतात म्हणून त्यांचा एक गट तयार होऊ शकतो. या तिन्ही धर्मांमध्ये संघटनात्मक बाबीदेखील इतर काही धर्मांपेक्षा जास्त स्पष्ट आहेत. अकाली (शीख) व जैन हेदेखील संघटनात्मक बाबीत जास्त पुढे आहेत. हिंदू धर्माची निश्चित अशी संघटना दिसत नाही. अर्थात ऐतिहासिकरीत्या या बाबी नेहमीच सारख्या राहिलेल्या नाहीत. या संघटनांमुळे विवेकवादी चळवळी समोर कधी आह्वान उभे राहते तर कधी याच संघटना धार्मिक चळवळींचा कमजोर भाग बनतात.

प्रत्येक धार्मिक चळवळ ही कोणा लोकोत्तर माणसापासून तयार झाली असते. ही माणसे समाजाला नेतृत्व देणारी आणि लोकप्रिय असतात. यांच्या नावावरचे चमत्कार विचारात घेतले नाहीत तरी त्यांच्या बुद्धीची, न्यायप्रियतेची, दयाळूपणाची, ज्ञानाची चुणूक आपल्याला त्यांच्या चरित्रातून दिसते. बरेचदा त्यांचा लढा प्रस्थापितांविरुद्ध दिसतो. याद्दष्टीने पाहिल्यास मार्क्सिस्ट दृष्टिकोणातून त्यांना क्रांतिकारी म्हणता येते. मात्र ह्याच्या विरोधात अशा महापुरुषांचे ज्ञानी अनुयायी ज्यांना हळूहळू पुरोहितवर्गात गणता येते असे असतात. म्हणजे हा वर्ग व्यवस्थेच्या बाजूने असतो, राज्यकर्त्यांसोबत असतो. राज्यकर्त्यांना धार्मिक अधिष्ठान देतो. तळागाळातल्यांना उपेक्षितो. हे सर्व नेहमीच असे होत नसले तरी ते बहुतांशाने खरे आहे. याचबरोबर काही चांगल्या गोष्टीही घडतात. म्हणजे हा वर्ग धार्मिक ज्ञानाचा एक साठा तयार करतो. हा वर्ग शिक्षित असल्याने इतर ज्ञानही त्यात जोडले जाते. धार्मिक चळवळीच्या प्रणेत्यांच्या वचनावर आधारित अशी एक नियमव्यवस्था बनवितो. बरेचदा त्या शिकवणीला तत्त्वज्ञानाची जोड देऊन एकसंधपणा आणतो.

धार्मिक चळवळ ही समाजातील चालीरीती, सण इ. शी फारशी फारकत घेत नाही. कित्येक धार्मिक सण हे त्या धर्मकालापूर्वीचे होते. याची उदाहरणे म्हणजे ख्रिस्ताच्या आधी ख्रिसमस व इस्टर, महमदापूर्वीपासूनची चालू असलेली मक्कावारी, अनेक हिंदू दैवते याच पद्धतीने धर्मात शिरलेली दिसतात. यात अलिकडचे उदाहरण म्हणजे साईबाबा. दिवाळी, पोंगल यांसारखे सण, बारसे, बाप्तिस्मा, मुंज, कम्युनियन यांसारख्या चालीरीती (अधिक माहितीसाठी रा. चिं. ढेरे यांचे लोकदैवतांचे विश्व, लज्जागौरी, इतर साहित्य वाचावे.) हिंदू धर्मात अशाच रीतीने आल्या असे जाणवते. यातील कित्येकांची सामाजिक गरज असते. पुरोहितवर्ग या सर्वांना एक धार्मिक अधिष्ठान देत असतो. या सर्वांमुळे धर्माच्या कक्षेत सर्वप्रकारचे ज्ञान, सामाजिक नियमव्यवस्था, सणउत्सवादी कृत्ये, सामाजिक चालीरीती आणि शेवटी पारलौकिक फायदा असे सर्व येऊन बसते म्हणून कित्येक धर्मपुरस्कर्ते धर्माला एक जीवनव्यवस्था म्हणवतात. अर्थात त्या सर्वांत काहीसे काळानुरूप चांगले असते. म्हणून सुधारणावादी चळवळींना विरोध होतो. या सुधारणा जीवनव्यवस्था बदलवणाऱ्या



असतात असे वाटते. काही जण चांगल्या गोष्टींकडे पाहून वाईट गोष्टींमध्ये काहीतरी न समजलेला चांगला उद्देश आहे असे मानतात. यातून सर्व त्याज्य विरुद्ध सर्व ग्राह्य असा नाहक वाद घडतो. अर्थात काळ बदलत असल्याने त्याज्य परंपरा समाजातून दूर होत असण्याची प्रक्रिया पण चालूच असते.

**परंपरागत अंधश्रद्धा :**

शकुन-अपशकुन, भविष्यकथन, नवसादी कर्मे, आयुर्वेदादी परंपरागत औषध-उपचारपद्धती, योगादी तंदुरुस्त राहण्याची शास्त्रे, भूतखेत उतरवणाऱ्या व्यक्ती, मंत्रे व ठिकाणे, सर्पदंशासारख्या संकटांवर लागू पडणारे मंत्र, वास्तुशास्त्र अशा बाबी यात मोडतात. यातील बहुतेकांवर याच अंकात वेगळे लेख असल्याने यावर येथे सविस्तर लिहिण्याची गरज नाही. या सर्व गोष्टी धार्मिकतेच्या उंबरठ्यावरच्या आहेत. अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या चळवळी व संघटित धार्मिक नेतृत्व या दोघांमध्ये बरेचदा परंपरागत अंधश्रद्धांवर वाद होत नाही. अनेकदा त्यांचे एकमत होते. विज्ञानाच्या कसोटीवर उतरणाऱ्या पारंपरिक समजुतींना वैज्ञानिक सत्य म्हणून मान्यता मिळणे हे साहजिक असते (जसे आयुर्वेदातील काही औषधे). त्याचबरोबर पारंपरिक अभिमानाला त्यातून पुष्टी मिळते. मात्र ज्याविरुद्ध अजून निर्णायक पुरावा मिळाला नाही अशा गोष्टींना मानण्याचा कल परंपराभिमान्यांकडून पहायला मिळतो. यातच ज्यांच्या विरोधात निर्णायक पुरावा आहे अशा गोष्टींना मानणे असे घडते.

परंपरा या आजच्या एकत्रित समूहाच्या असल्या तरी त्यांचा उगम विभिन्न समूहात घडलेला असू शकतो. याशिवाय त्याबद्दल कोणी एकत्रित विचार न केल्यामुळे त्यामध्ये खूप विरोधाभास सापडतो. असे विरोधाभास अंधश्रद्धा-निर्मूलनाचे कळीचे मुद्दे होऊ शकतात. म्हणून या अंधश्रद्धांचा अभ्यास जरुरी असतो. विभिन्न समाजातून आलेल्या असल्याने त्यांच्याबद्दल आत्मीयता ही समूहानुरूप वेगवेगळी असते. समाजातील तळागाळातल्यांच्या समजुती (उदा. वैदू, करणी, भगत, मांत्रिक, भानामती) या समाजातील अभिजनवर्गाच्या समजुतींपेक्षा फारशा भिन्न नसतात. (उदा. आयुर्वेद, यंत्र, मंत्र, स्तोत्र, शांत, श्राद्ध). यातील एकास अंधश्रद्‌ा म्हणण्यास फारसा विरोध नसतो. पण दुसऱ्यांच्या मागे संघटनात्मक पाठबळ उभे राहिलेले दिसते. पहिल्या वर्गात (गरीब दुबळ्यांच्या) परंपरागत अंधश्रद्धांचा व्यापक प्रसार झालेला दिसतो. तसेच गरिबांच्या असलेल्या अंधश्रद्धा कायम राखण्यात श्रीमंतांचे भले असते. दीनदुबळ्यांच्या अंधश्रद्धा या त्यांचे खूप नुकसान करणाऱ्या असतात. त्यांना प्रगतिशील आयुष्य जगू न देणाऱ्या असतात. म्हणून अंधश्रद्धांच्या चळवळी त्यांना एक नंबरचा शत्रू मानून काम करतात. यात फारसे वावगे नाही. मात्र त्याबरोबर संघटनात्मक वा पुरोहितवर्गमूलक अंधश्रद्धांना कमी लेखून चालणार नाही. या सर्व सधन व शिक्षित समाजातील असल्याने त्यांच्या समर्थनार्थ मोठे पाठबळ उभे राहिलेले दिसते. हे पाठबळ आधुनिक ज्ञानाचा, कायद्याचा, पैशाचा, लोकशक्तीचा आणि कधी कधी हिंसात्मक साधनांचा वापर करत असते.

**प्रमोद सहस्रबुद्धे**

**संघटनात्मक अंधश्रद्धा :**

धर्माच्या संघटनात्मक बाबीत धार्मिक विधी (जसे विवाह, अंत्यविधी, नमाज, बाप्तिस्मा, मुंज, यज्ञ), धार्मिक ठिकाणे व काही संकल्पना (कर्मसिद्धान्त), विश्वनिर्मितीचा सिद्धान्त) यांचा समावेश होतो. मूलतत्त्वापासून या बाबी थोड्याश्या वेगळ्या आहेत. धार्मिक मूलतत्त्वात ईश्वर अवतार, प्रेषित, मूळ धर्मग्रंथ आणि मरणोत्तर जीवनाच्या मूळ धार्मिक कल्पना अशा गोष्टींचा समावेश होतो. संघटनात्मक बाबतीत मुख्य खटकणारी गोष्ट म्हणजे पुरोहितवर्गाची मक्तेदारी. ही मक्तेदारी, हिंदूंमध्ये जातीशी निगडित असल्याने अधिक जास्त खटकणारी असते. पण तरीही इतर पुरोहितवर्ग यामध्ये मागे नसतो. एकेकाळी (काही प्रमाणात आताही) ख्रिश्चन, मुस्लिम, शीख धर्मगुरु हे राजकारणात नुसतेच सक्रिय नव्हते तर राज्यव्यवस्था चालवणारे होते. हा पुरोहितवर्ग समाजातील सधन वर्गातून येत असे.

धार्मिक मूलतत्त्व राखून पुरोहितवर्गाचे वर्चस्व अमान्य करणे ही प्रत्येक धर्मातील नवीन पंथाची सुरुवात असते. संघटनात्मक बाबीत पंथ हे एकमेकांपेक्षा भिन्न असतात. म्हणून काही जण त्यांना विभिन्न धर्म म्हणतात. सहसा अशा विभिन्न पंथांमध्ये आपसात लग्ने होत नाहीत म्हणून तसे म्हणणे फारसे चुकीचे ठरणार नाहीत. काही धार्मिक चळवळी (उदा. वारकरी, नाथपंथीय) अशी संघटनात्मक पायरी गाठत नाहीत मग त्यांना काय संबोधायचे असा प्रश्न राहतो.

पहिल्या वर्गातील अंधश्रद्धांमुळे त्या बाळगणाऱ्या व्यक्तीचे वैयक्तिक नुकसान होऊ शकते. तर या वर्गातल्या अंधश्रद्धांचा वापर पुरोहित वा ज्ञानी वर्ग स्वतःच्या फायद्यासाठी करीत असतो. यामुळे यांच्या प्रचारासाठी वैज्ञानिकतेचा, तंत्रज्ञानाचा, जाहिरातींचा वापर केलेला दिसतो. यातील एक उदाहरण म्हणजे सध्याचा क्रिएशनिझम. क्रिएशनिझम हे डार्विनच्या उत्क्रांतिवादाला आह्वान देण्यासाठी उभे केलेले एक बुजगावणे आहे. या बाजूने काम करणारे डार्विनच्या सिद्धान्तातील तपशिलावर आक्षेप घेतात. असे आक्षेप काढण्यात काही गैर नाही. विज्ञानाच्या प्रगतीत त्यांची मदतच होते. पण या आक्षेपांना दिलेल्या प्रत्युत्तरांचा वाद हा वैज्ञानिक माध्यमातून न घडता लोकप्रिय माध्यमातून घडताना दिसतो. या वादाच्या समर्थनार्थ केलेली विधाने वरकरणी वैज्ञानिक संकल्पनातून व्यक्त केलेली असतात, पण अशा वैज्ञानिक परिभाषेतील बाजू वैज्ञानिक तथ्यांवर आधारित नसतात.

आपल्याकडचे आधुनिक उदाहरण म्हणजे वैदिक गणित. या गणिताचा वेदांशी काहीही संबंध नाही. मूळ पुस्तकाच्या प्रस्तावनेतच तसे म्हटले आहे. या आधुनिक गणिताला वेदांचा मुलामा देऊन त्याची जाहिरातबाजी केली जाते. शिक्षणाच्या दृष्टीने यातील रीती नेहमीची गणिते सोडवण्यास फारश्या उपयोगी नाहीत. चीनी मणीपट्टी वा इतर मौखिक रीती यांच्यापुढे वैदिक गणित जात नाही. गोमूत्रापासून शीतपेय करायची योजना आहे असे ऐकिवात आहे. शंकराची पिंड आधुनिक अणुभट्ट्यांची प्रतिकृती आहे असे म्हणणे, ओम वा गायत्रीमंत्रातील नादाने शरीरात बदल घडून येतात असे म्हणणे, यज्ञाच्या धुराने पाऊस पडतो असे म्हणणे हे सर्व यातील प्रकार मानता येतील.



**मूलतत्त्वजन्य अंधश्रद्धा :**

यांमध्ये ईश्वर, आत्मा आणि मरणोत्तर जीवन या तीन संकल्पनांचा प्रामुख्याने समावेश होतो. याबद्दल याच अंकात सविस्तर मांडणी केली असल्याने येथे लिहिण्यासारखे फारसे राहात नाही.

बहुतेक धार्मिक समजुतींना साक्षात्कार हा मुख्य आधार असतो. साक्षात्कार हा वैयक्तिक असल्याने त्याची वैज्ञानिक सार्वत्रिकता मिळणे दुरापास्त आहे. त्यामुळे विज्ञान धर्मापर्यंत पोहोचू शकत नाही असा रास्त आरोप केला जातो. साक्षात्कार/समाधी/मरणोत्तर सुखी जीवनापर्यंत नेणारा मार्ग म्हणजे धर्म असे सांगता येईल. या सगळ्यांत वैयक्तिक अनुभवास जास्त किंमत आहे. सार्वत्रिक अनुभवाच्या म्हणजे विज्ञानाच्या क्षेत्रात ते येतच नाही. मात्र याला निरुपाय नाही असे नाही. याला बरेच उपाय आहेत.

प्रेषित मोहमदाना काही साक्षात्कार झाले. पण ते भूतयोनीमुळे झाले की देवदूतांमुळे झाले यात वाद संभवत होता. यातील काही ज्यांना सैतानाची वचने म्हणतात हे देवदूतांमुळे झाले नाहीत असे एकेकाळी मानले जाई. भगवान बुद्धाचे असे काही वाद आहेत की ज्यात ते दुसऱ्यांच्या साक्षात्कारासंबंधी अशीच शंका घेताना दिसतात.

माझे पोट दुखते आहे या माझ्या अनुभूतीला कोठलाच वैज्ञानिक पुरावा देता येत नाही पण ते सत्य असू शकते. माझ्या वैद्यकीय तपासणीत याबाबतीत कारण वा संभावना सांगता येतील. पण समजा तीही काही मिळाली नाही तरीही ते सत्य असू शकते. आता मी असे सांगण्याने माझा काही वैयक्तिक स्वार्थ साधला जात असेल तरी ते सत्य असू शकते. कित्येक रोग हे मानसिकतेने आलेले असतात. तेव्हा तशीही तपासणी होऊ शकते. अर्थातच प्रत्येक तपासणीनंतर अशा विधानाच्या सत्यासत्यतेबाबत शक्यता वर्तवली जाऊ शकते.

साक्षात्कार आणि चमत्कारांचे तसेच आहे. म्हणजे साक्षात्कारी पुरुषाला त्यासोबत जे ज्ञान प्राप्त होते ते ज्ञान कधी कधी वैज्ञानिक पद्धतीने तपासता येते. काही वर्षांपूर्वी पुण्यातील एका डॉक्टरांनी असे जाहीर केले की त्यांनी साक्षात्काररूपाने चंद्रसफर केली. त्याचे वर्णनही त्यांनी केले. त्या वर्णनाची कक्षा विज्ञानात बसत असल्याने त्यांच्या साक्षात्काराबद्दल खरे खोटे सांगता येणे शक्य होते. त्या वर्णनात तफावत आढळू शकते मग या तफावतीच्या आधारे शक्यता वर्तवली जाऊ शकते. पूर्वजांनी केलेले साक्षात्काराचे वर्णन हे अशाच माहितीच्या आधारे तपासता येते. बायबलमधील विश्वनिर्मितीही वैज्ञानिकतेच्या आधारावर तपासता येते. पण कुठे केलेले स्वर्गाचे वा नरकाचे वर्णन हे विज्ञानाच्या कसोटीवर तपासता येत नाही. दोन व्यक्तींच्या साक्षात्कारांमधून वेगवेगळी माहिती बाहेर येते मग यातील एकावर निश्चित शंका व्यक्त केली जाऊ शकते.

शंका येणे व त्यांचे निरसन करण्याचा प्रयत्न करणे हा एक वैज्ञानिक प्रगतीचा मार्ग आहे. मूलगामी स्वरूपाच्या संकल्पनांबाबत हा मार्ग घेण्यास कोणाची हरकत नसावी असे वाटते.

□□

**प्रमोद सहस्रबुद्धे**

ब्रह्मा लिहितो कपाळीं । आणी वाचून जाते सटी
ऐसा प्रकारच्या गोष्टी । या नांवें भ्रम ॥

**— समर्थ रामदास**

दुश्चिह्नें अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेनें भंगे मन ।
वचके पदार्थ देखोन । या नांवें भ्रम ॥

**— समर्थ रामदास**

वैद्य वांचविती जीवां । तरी कोण ध्याते देवा ॥
काय जाणो कैसे करी । प्रारब्ध ते ठेवे उरी ॥
अंगीं दैवत संचारे । मग तेथें काय उरे ॥
नवसें कन्या पुत्र होती । तरी कां करणें लागे पती ॥
जाणे हा विचार स्वामी हा तुकयाचा दातार ॥

**— संत तुकाराम**

''प्रत्यक्ष, अनुमान वा शब्द यांपैकी कोणत्याही प्रमाणाने पारलौकिक वस्तुस्थितीचे आज उपलब्ध असलेले वर्णन हे सिद्ध होत नसल्यामुळे त्यास सनातन धर्म त्रिकालाबाधित नि अपरिवर्तनीय सत्य, असे म्हणता येत नाही.''

**— स्वातंत्र्यवीर सावरकर**

''शास्त्राचे तुम्ही (सातवळेकर) एक अर्थ करता, समन्वयवादी मीमांसक दुसरा, रूढीवादी आचार्य तिसरा! म्हणूनच आम्ही म्हणतो की, हे शास्त्राधाराचे गुऱ्हाळ कायमचे बंद करून टाकल्यावाचून गत्यंतर नाही.''

**— स्वातंत्र्यवीर सावरकर**





# अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या चळवळींचा वेध

*प्रमोद सहस्रबुद्धे*

1967 ते 1980 दरम्यान आर्थिक, राजकीय घडामोडींना वेग आला होता. तरुणांची आंदोलने होत होती. नक्षलवादी चळवळीचा उगम, बिहार व गुजरातमधील आंदोलने याच काळातली. महाराष्ट्रात अशा अस्वस्थतेबरोबर, तरुण दलितांची चळवळ दलित पँथर, सामाजिक बदलाची चळवळ युक्रांद यांचे वारे वाहत होते. 1974 मध्ये वरळीत दलित-सवर्ण दंगा झाला, यापुढे काहीच महिन्यांत दलित युवकांनी मराठवाड्यात सरकारी यंत्रणेविरुद्ध मोठ्या प्रमाणात निदर्शने केली. विविध पुरोगामी चळवळी यावेळी कार्यरत होत्या. ज्यांतील काही नावे पुढीलप्रमाणे : रॉयिस्ट, राष्ट्र सेवा दल, सर्वोदयी, सत्यशोधक समाज, आंबेडकरांचे अनुयायी, भूमिसेना, ग्रामस्वराज्य समिती, मागोवा, शहादा तळोदा गट, छात्र युवा संघर्ष वाहिनी, यूथ ऑर्गनायझेशन, क्रांतिकारी महिला संघटना. समाजवादी पक्षातील बाबा आढाव (हमाल पंचायतचे संस्थापक) यांनी सत्यशोधक चळवळीला नवीन चालना दिली. त्यांनी महात्मा फुले समता प्रतिष्ठान सुरू केले ज्यातून पुढे विषमता निर्मूलन समिती स्थापन झाली. त्यांनीच Pro-Science and Equality Action Committee नावाची संघटना स्थापली. नरेंद्र दाभोलकरांची समाजवादी युवक दल म्हणून संघटना होती. कुमार सप्तर्षी, कुमार शिराळकर, सुधीर बेडेकर, सुभाष जोशी, अमर हबीब इत्यादींचे कार्य यात महत्त्वाचे होते. यातूनच समता आंदोलन नावाची चळवळ सुरू झाली.

अशा संघटनांनी अघोरी चालीरीतींविरुद्ध लढा पुकारला होता. त्यांनी मध्ययुगीन समाजघडण, मूल्ये, चालीरीती टाकून देण्यासंबंधी विविध कार्यक्रम केले. सरंजामशाही, पुरोहितशाही, वैदिक कर्मकांडे, सत्यनारायण यांविरुद्ध आवाज उठविला. सामाजिक क्षेत्रातील देवदासी पद्धत, पोतराज, निर्वस्त्र राहून देवीची पूजा करणे, वाघ्या मुरळी, जटा, महानुभाव पंथातील कृष्णाशी विवाह करण्याची पद्धत अशा गोष्टींविरुद्ध आंदोलने केली. चौगुले व डॉ. आनंद वसकर यात सहभागी होते. याचबरोबर भोंदूबाबांविरुद्धदेखील यातील काही चळवळी लढा पुकारत असत. हुंडा, लग्नविधी आणि त्यातली जात बंधने, सती, अस्पृश्यता यांवर या संघटना क्रियाशील होत्या. 'एक गाव एक पाणवठा'सारखी चळवळ ही यातलीच. यातील कम्युनिस्ट सोडले तर इतरांना वर्गसंघर्षाची चळवळ अपुरी वाटत असे. वर्गसंघर्षाचे तत्त्व मान्य असले तरी मुख्यतः गांधी व जयप्रकाश नारायण यांच्या प्रभावामुळे या चळवळी अहिंसेला मूल्य मानत असत. अशा वैचारिक मतभेदामुळे पुढे अंधश्रद्धा निर्मूलनाची एक नेमके उद्दिष्ट असलेली चळवळ उभी राहिली (ज्यात अशा मतभेदांना स्थान नव्हते).

विज्ञानातून सामाजिक परिवर्तनाकडे जाणाऱ्या चळवळी याचदरम्यान प्रसार पावत

होत्या. केरळ शास्त्र परिषद, मराठी विज्ञान परिषद, प्रयोग परिवार, महाराष्ट्र रॅशनॅलिस्ट असोसिएशन, बुद्धिप्रामाण्यवादी मंच याच दरम्यान कार्यरत होता. लोकविज्ञान संघटना ही यातील एक महत्त्वाची संघटना. अंधश्रद्धेविरुद्ध ही संघटना लोकजागृती करत असे. 1982 मध्ये महाराष्ट्र विज्ञान जत्रा मोठ्या जोरात काढण्यात आली. बी. प्रेमानंदांच्या दौऱ्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळींना विशेष जोर चढला. विज्ञान यात्रा विदर्भ व मराठवाड्याचा काही भाग सोडल्यास सर्वत्र पोचली होती. अनेक मान्यवरांनी ज्यात लक्ष्मणशास्त्री जोशी होते, यास पाठिंबा दिला. एकंदर 45 ठिकाणी या यात्रेचे विशेष स्वागत केले गेले. यानंतर प्रेमानंदांनी विदर्भ दौरा केला. कोल्हापूरमध्ये विज्ञानप्रबोधिनी, साताऱ्यातील डॉ. दाभोळकरांची स्वागत समिती, नागपुरातील नागेश चौधरी, सुधाकर जोशी, डॉ. पांडे यांचा या यात्रेत सहभाग होता. श्याम मानव यावेळी प्रेमानंदांसोबत गुजरात दौऱ्यावर गेले. या सुमारास ते तरुण शांतिसेनेचे कार्यकर्ते होते व साप्ताहिक मनोहरमध्ये काम करीत. या सर्वांची परिणती म्हणजे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना ज्याचे अध्यक्ष मुकुंदराव किर्लोस्कर होते.

श्याम मानव हे यवतमाळ जिल्ह्यातील एका खेड्यातून आले. लहानपणी घरात व परिसरात असलेल्या मांत्रिकी वातावरणाने ते प्रभावित झाले होते. पुढे जयप्रकाश नारायण, दादा धर्माधिकारी, चंद्रशेखर पांडे आदींच्या विचारप्रभावामुळे व स्वतःच्या अभ्यासामुळे विवेकवादी बनले. कोवुरांच्या पुस्तकांच्या प्रभावामुळे अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन करण्याचे ठरवले. कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर, प्रात्यक्षिकांसह व्याख्यान, भोंदूबाबा, तांत्रिक मांत्रिकांचा भांडाफोड करणे, समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे रहस्यमय गोष्टींचा अभ्यास करून सत्य बाहेर आणणे अशा प्रकारच्या कामातून समितीचे कामकाज चालते. चमत्कार करून दाखविणाऱ्या बाबाला 2 लाखाचे आव्हान देते. खटोली बाबा, लष्करीबाबा, गिरिपुंजे महाराज, नकली शेख फरीद बाबा आदी अनेक बाबांचा त्यांनी भंडाफोड केला आहे. 'केवळ अंधश्रद्धांच्या बाबतीत नव्हे तर जीवनाच्या विविध क्षेत्रांकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजवणे, हे समितीचे लक्ष्य आहे. त्यासाठी प्रबोधनात्मक व संघर्षात्मक कार्यक्रम हाती घेतले जातात.'

**भारतातील इतर संघटना**

फेडरेशन ऑफ इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशन ही भारतातील विवेकवादी चळवळींची शिखर संघटना आहे. मंगलोरचे नरेन्द्र नायक यांचे यात मोठे योगदान आहे. भारतातील प्रत्येक प्रांतात विवेकवादी चळवळी कार्यरत आहेत. बिहार, पंजाब, बंगाल, गुजरात, महाराष्ट्र, केरळ, गोवा, कर्नाटक इत्यादी प्रांतात त्या विशेषतः काम करतात.

4 ऑक्टोबर 2009 ला प्रेमानंदांचे निधन झाले. 1975 पासून ते विवेकवादी चळवळीत कार्यरत होते. त्यांचे चमत्कार प्रात्यक्षिकांचे दौरे, इंडियन स्केप्टिक हे नियतकालिक, त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके याला जवळपास तोड नाही. त्यांच्या



व्यवसायातून येणारा पैसा ते आपल्या समाजकार्यासाठी आणि लोकशिक्षणासाठी खर्च करत. त्यामुळे ते स्वतः एका संस्थेसारखे होते असे म्हणायला हरकत नाही. गुरु बस्टर्स माहितीपटात त्यांच्या सहज प्रात्यक्षिकांची एक झलक पहायला मिळते. त्यांची राहणी अतिशय साधी आणि प्रभावित करणारी होती. त्यांच्या दौऱ्यातून देशभरातल्या कित्येक विवेकवादी जनचळवळींना प्रेरणा मिळाली. याशिवाय त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर संपर्क ठेवला होता.

तर्कशील सोसायटी ही मुख्यत्वेकरून पंजाब व हरियाणात कार्यरत आहे. सुमारे 100 शाखा, 30 पुस्तके, पंजाबी व हिंदीतून *तर्कशील* नियतकालिक असा तिचा पसारा आहे. 1984 साली अब्राहम कोवूर यांच्या बिगॉन गॉडमेन नावाच्या पुस्तकाचा पंजाबी अनुवाद प्रकाशित झाला व या संघटनेची स्थापना झाली. या संघटनेचा प्रसार इंग्लंड व कॅनडात झाला आहे. चमत्कार प्रात्यक्षिके आणि जोडीला व्याख्यान अशा रीतीने ते कार्यक्रम करतात. दरवर्षी तर्कशील मेळा भरवतात. तर्कशील सोसायटी पंजाब यांचे हिंदी नियतकालिक हे वाचनीय असतात. भगतसिंगाचे मी नास्तिक का आहे हे पुस्तक, कोवूरांची पुस्तके अशा अनेक तऱ्हांनी त्यांचा प्रचार चालू असतो. (Tarksheel.org) (बलविंदर बर्नाला यांच्या संपर्कातून मिळालेली माहिती.)

**जागतिक संघटना**

बहुतांश प्रगतशील देशांमध्ये स्केप्टिक, ब्राईट, CSICOP आदी नावांनी या संघटना काम करतात. वेबसाईटस (आंतरजालावरील संस्थळे), नियतकालिके, लोकप्रबोधन, आव्हान प्रक्रियेतून लोकसंवाद आदी मार्गांनी ती कार्यरत असतात. स्केप्टिक्स डिक्शनरी, जेम्स रँडी यांचे आव्हान, नियकालिकात स्केप्टिकल इंक्वायरर, स्केप्टिक ही यातील विशेष प्रसिद्ध आहेत.

http://www.csicop.org/resources/international_organizations या संस्थळावर याबाबतची माहिती मिळते.

□□

# अंधश्रद्धा-निर्मूलन कायद्याची चळवळ

*प्रभा पुरोहित*

विवेकवादाच्या चळवळीत शासन आणि न्यायव्यवस्था ह्यांचा काय सहभाग असतो, समाजसुधारक आणि सामाजिक संस्था ह्यांना काय तडजोडी करायला लागतात आणि विरोधकांची त्यामध्ये काय भूमिका असते असा सर्व अंगाने अंनिसच्या कायदाविषयक चळवळीचा अभ्यास केला तर ते उद्बोधक ठरेल.

अंनिस 1990 पासून अंधश्रद्धा-निर्मूलन कायदा व्हावा म्हणून प्रयत्नशील आहे.

**प्रमोद सहस्रबुद्धे**

ह्यात शासनाची चालढकल अशी राहिली. एका राजवटीत 1995 मध्ये कायद्याचे अशासकीय विधेयक विधानपरिषदेत प्रचंड बहुमताने मंजूर झाले परंतु कायद्याची प्रक्रिया पूर्ण केली गेली नाही. नंतर दुसरी राजवट आली. त्यांनी 15 ऑगस्ट 2003 ला 'जादूटोणाविरोधी कायदा करणारे भारतातील पहिले राज्य' अशी जाहिरात करून स्वतःचीच पाठ थोपटून घेतली. 2005 मध्ये विधानसभेत सत्तारूढ पक्षातीलच काहींनी त्याला विरोध केला. परिणामतः त्यातील काही कलमे गाळण्यात येऊन तो सौम्य करण्यात आला. त्यातील स्वयंसेवासंस्थांच्या सहभागाची तरतूद काढून टाकण्यात आली आणि सुधारित कायदा 2005 मध्ये विधानसभेत मंजूर करण्यात आला. विधानपरिषदेत त्याला मंजुरी देणे हा केवळ औपचारिकतेचा भाग होता. कायद्याचा मसूदा नामवंत विधिज्ञ, वरिष्ठ पोलिस अधिकारी, शासनाचा सामाजिक न्याय विभाग, महिला आणि बालकल्याण विभाग व इतरांनी मान्यता दिलेला होता. तरीही विधानपरिषदेतील अध्यक्षांनी तो संयुक्त चिकित्सा समितीकडे धाडला आणि समितीने दोन वर्षात एकही बैठक भरविली नाही. विधानसभा, विधानपरिषदेतून शासकीय कौल मिळूनही कायद्याची प्रक्रिया पूर्ण करण्याची राजकीय इच्छाशक्ती कुठल्याही पक्षाने दाखविली नाही. कुठल्याही चांगल्या, वाईट बदलाला विरोध हा असणारच परंतु त्याला न जुमानता आपल्या ध्येयधोरणांवर दृढविश्वास दाखविणे मतांच्या मिंध्या शासनाला जमत नाही. जेव्हा राज्यकर्ते केवळ सत्तेच्या मागे असतात तेव्हा सर्व निर्णय राजकीय सोय बघून घेतले जातात असे सगळीकडे आढळून येते. 'बाईला जिवंतपणी जाळीत असतील तर ते थांबविणे राज्यकर्त्यांचे काम आहे' अशी धीट भूमिका घेऊन सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता 175 वर्षांपूर्वी सतीचा कायदा करणारा व्हाईसरॉय लॉर्ड बेंटिंक हा अपवादात्मक होय.

कायद्याच्या या लढ्यात अं.नि.समितीने आपली बौद्धिक, आर्थिक आणि शारीरिक शक्ती खर्च केली. त्यातून समाजप्रबोधन झाले. संघटना बळकट झाली, विस्तारली. उपोषण करणे, स्वतःच्या थोबाडीत मारून घेणे, रक्ताने पत्रे लिहिणे, काळ्या बाहुलीची सरशी झाली हे बघवत नाही म्हणून डोळ्याला काळी पट्टी लावणे असे आगळे-वेगळे विविध निषेध कार्यक्रम जिल्ह्या-जिल्ह्यातून आयोजित केले गेले. त्यातून जनमताचा रेटा निर्माण झाला. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, जनसामान्यांचे जीवन मुश्कील करणे हे निषेध दर्शविण्याचे धोपटमार्ग समिती अनुसरत नाही हे तरुण कार्यकर्त्यांच्या मनावर ठसले. गोपाळ कृष्ण गोखले सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा व्हावा म्हणून प्रयत्न करीत होते. तो अजूनही प्रत्यक्षात आला नाही. कायद्यासाठीचा लढा नेहमीच असा दीर्घकाळ चालणारा, वेळखाऊ असतो हे लक्षात आले आणि कार्यकर्त्यांची जबाबदारी वाढली.

हिंदुत्वाचा झेंडा मिरविणाऱ्या संघटनांनी 'या कायद्याने हिंदूंच्या धर्माचरणात बाधा येते' असा अत्यंत खोटा, खोडसाळ प्रचार केला. फॅसिस्ट वृत्तीच्या ह्या लोकांनी गोबेल्स तंत्राचा अवलंब केला. खेड्यापाड्यापासून शहरापर्यंतच्या आपल्या प्रत्येक कार्यक्रमांतून, आपल्या दैनिकांतून, लाखोनी पत्रके वाटून आपली प्रचारयंत्रणा कायद्याच्या विरोधात



पुरेपूर राबविली. कायदा झाला तर तुम्हाला सत्यनारायणाची पूजा करता येणार नाही, ज्ञानेश्वरी वाचता वा छापता येणार नाही, वारीला जाता येणार नाही इत्यादी हास्यास्पद गोष्टी ह्या प्रचारात पुनः पुनः सांगितल्या गेल्या. अशा तऱ्हेचा विरोध हिंदू धर्माच्या प्रगत बुद्धिवादी परंपरेला अशोभनीय होता.

वेड्या माणसाला भूतबाधा झाली म्हणून साखळीने बांधणे; चमत्काराचा दावा करून लोकांना फसविणे; दैवी कृपा मिळविण्यासाठी जीवघेण्या जखमा करणे; गुप्तधनासाठी नरबळी देणे; अतींद्रिय शक्तीचा दावा करून भीती दाखविणे; एखाद्या व्यक्तीला सैतान ठरविणे; एखादी व्यक्ती करणी, चेटूक करते असे सांगून त्या व्यक्तीची नग्न धिंड काढणे; एखाद्याला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून अघोरी उपाय करायला लावणे; विषबाधेवर गंडा, दोरा, मंत्र-तंत्र करणे; बोटाने शस्त्रक्रिया करण्याचा दावा करणे; पूर्वजन्मीचा दाखला देऊन लैंगिक संबंध ठेवणे; इत्यादी उघड उघड अंधश्रद्धेचे एकूण 12 प्रकार आता कायद्यात उरले आहेत. ह्यातला कुठला प्रकार हिंदू धर्मांतर्गत मोडतो असे ह्या हिंदुत्ववाद्यांना कुणीही खडसावून विचारले नाही. ह्या हिंदुत्ववाद्यांनी आता सामाजिक समता आणि बंधुभावाबाबत संतांची परंपरा सांगणाऱ्या वारकरी पंथातही शिरकाव करून घेतला आहे. 'वाजे पाऊल आपुलें, म्हणे मागें कोण आलें?' 'नवसासायासें पुत्र होती, तरी कां करणें लागे पती' अशी परखड वचने सांगणाऱ्या संतांच्या पालख्या मानाने मिरविणारे वारकरी जेव्हा ह्या कायद्याच्या विरोधात घोषणा देऊ लागले, 'रास्ता रोको' करू लागले तेव्हा विवेकवादी चळवळ चार पाउले मागे गेली.

सर्वसामान्य जनता विद्वेषी हिंदुत्वाच्या पारड्यात मत टाकणारी नाही हे सरकारला अजून उमजले नाही. तिघा जणांना फाशीची शिक्षा झालेले सिंधुदुर्गातील नांदोस येथील 'पैश्याचा पाऊस पाडण्याचे' प्रकरण, अमरावतीला दलित भगिनीला चेटकीण ठरवून तिची काढलेली नग्न धिंड, मुरबाडला गुप्तधनाच्या शोधात दिलेला लहान मुलीचा नरबळी ह्या अलिकडच्या घटनांबाबत आमजनतेशी संवाद साधला तर लक्षात येते की जनता ह्या अंधश्रद्धांच्या विरोधात ठाम आहे आणि संबंधित पीडित व्यक्तींची कीव करते. परंतु राजकीय पक्ष असंघटित जनसामान्यांच्या ह्या मानसिकतेबाबत अनभिज्ञ आहे. त्यांनी वारकऱ्यांच्या निषेधाचा धसका घेतला आहे.

सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी न्यायव्यवस्था व शासन फार काही करू शकत नाही. आणि आपले समाजजीवन न्यायव्यवस्थेवर किती सोपवावे ह्याबाबतही वेगवेगळे मतप्रवाह आहेत. बालविवाह, भ्रूणहत्या, हुंडापद्धती ह्याबाबत कायदे असूनही हे प्रकार थांबले नाहीत. ते कमी होण्यामागे कायद्यापेक्षाही सामाजिक दबावाचा भाग अधिक आहे. कायद्यामुळे सामाजिक दबाव वाढतो हे मात्र मान्य करायला हवे.

## विवेकवादी चळवळीचा इतिहास

सत्य हे बुद्धिवादाखेरीज प्राप्त होत नाही. अशा बुद्धिवादाचा आणि विवेकी विचाराचा

प्रभा पुरोहित

आजतागायतचा आढावा घेताना भारतातील ऋग्वेदकालीन वैदिक संस्कृतीपासून ते विसाव्या शतकातील समाजसुधारकांपर्यंतचा काल विचारात घेता येईल. त्याची स्थूलमानाने कालानुसार मांडणी खालीलप्रमाणे करता येईल. इ.स.पू.1500 चा वैदिक काल, इ.स.पू.1000 चा लोकायतवाद, इ.स.पू.700 चे बुद्ध धर्माचे तत्त्वज्ञान, त्यानंतर जैन धर्म, कर्मकांडयुक्त ब्राह्मणी धर्माचे पुनरुत्थापन, उत्तरेतील सूफी तत्त्वज्ञान, दक्षिणेत 12 व्या शतकातील संत बसवेश्वर, इ.स.1500 मध्ये संत कबीर, इ.स.1300 ते इ.स.1700 दरम्यान ज्ञानेश्वर, तुकाराम आदि संत आणि त्यानंतर 19 व्या व 20 व्या शतकातील समाजसुधारक, लेखनाद्वारे केलेला विवेकी विचारांचा प्रसार व आजच्या अंधश्रद्धानिर्मूलनाच्या चळवळी असा कालक्रम घेता येईल.

### 'विवेकवादी चळवळ' कशाला म्हणायचे

अंधश्रद्धांचे मूळ हे अज्ञानात असते. हितसंबंधीय ह्या अंधश्रद्धा टिकून राहाव्या म्हणून प्रयत्न करतात. युक्त्या काढतात. आणि सश्रद्ध (की भोळ्या?) लोकांचे शोषण करतात. न्याय, नीतीची चाड अनुस्यूत असलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोणाचा प्रसार करून अधिकाधिक लोक आपल्या जीवनात विवेकवाद कसा स्वीकारतील ह्यासाठी तऱ्हेतऱ्हेने प्रयत्न करणे म्हणजेच विवेकवादाची चळवळ होय. ही चळवळ तीन प्रकारची असू शकते. एक वैचारिक स्तरावर मौखिक चळवळ, दुसरी लिखाणातून प्रसार करणारी व तिसरी वैयक्तिक अथवा संघटनात्मक कृती करणारी चळवळ. विवेकवादाच्या ह्या चळवळी विवेकवादाकडे जाणाऱ्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असतात. शंभर टक्के विवेकवादाचा दावा करणे हीच एक अंधश्रद्धा ठरेल. विवेकवादात अंतर्भूत अशा नीतिमूल्यांची अनेक अंगे असतात त्यामुळे त्यात लवचीकता येते. सत्य हे 'अंतिम सत्य' नसते त्यात कालानुसार व अनुभवाने बदल संभवतो. विवेकवादी चळवळीचा अभ्यास करताना ह्याचे भान ठेवणे गरजेचे आहे.

### विवेकवादाची सुरुवात

प्रश्न विचारून आपले जीवन व सभोवतालचे जग ह्याचे स्वानुभवाने आकलन करून घेणे हे वैज्ञानिक दृष्टिकोणाचे एक लक्षण मानले तर अशा तऱ्हेचा मानवी संस्कृतीच्या ज्ञात इतिहासातील पहिला प्रयत्न भारतात सुमारे साडेतीन हजार वर्षांपूर्वी झाला. 'हे विश्व केव्हा, कुणी व कसे निर्माण केले की हे आपोआप निपजले? देव विश्वनिर्मितीनंतर आले का?' अशा मूलगामी प्रश्नांचा ऊहापोह जगातील प्राचीनतम ग्रंथ जो ऋग्वेद त्यात आढळून येतो. संशयवादाची ही सुरुवात होती असे म्हणता येईल. ऋग्वेदाच्या 10 व्या मंडळात वैदिक ऋषी एकीकडे श्रद्धादेवीची प्रार्थना करतात. परंतु संशयाची आणि आक्षेपांची माला चालूच राहते. 'सुरुवातीला सृष्टीत देव नव्हता. ईश्वर, आत्मा इत्यादी सनातन, नित्य असे काही असत नाही' असे पण ते प्रतिपादन करतात. याचवेळी चार्वाकवादाचा जन्म



झाला आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाचे बीज पेरले गेले.

### लोकायतवाद चळवळ

चार्वाकाच्या तत्त्वज्ञानाचे सर्वांत प्राचीन नाव 'लोकायतवाद' असे आहे. चार्वाकमताचा पहिला तत्त्वचिंतक बृहस्पति त्याचे हे नाव असावे असे इतिहासकार मानतात. तर्कशुद्ध विचारपद्धतीने मांडलेले इहवादाचे हे तत्त्वज्ञान इ.स.पू.600 वर्षांपर्यंत एक सुस्थापित चार्वाकवादी तत्त्वज्ञान म्हणून नावारूपास आले. आणि इ.स.1300 नंतरही चांगलेच प्रचलित होते. उपनिषदातील आस्तिक दर्शनांचा उगम बरेचदा चार्वाकवादी नास्तिकांचा प्रतिवाद करताना झाला आहे. चार्वाकांचे तत्त्वज्ञान सांगते,'प्रत्यक्ष हेच प्रमाण आहे. देह आणि आत्मा एकच आहे. स्वर्ग, नरक व पुनर्जन्म नाही. मरण हाच मोक्ष. वर्णभेद, जातिभेद अशास्त्रीय आहेत. पातिव्रत्य वगैरे मूल्य स्त्रीस्वातंत्र्यघातक आहेत. वरचे तूस काढून जसा आपण भात खातो त्याप्रमाणे दुःख दूर करून सुख उपभोगावे.' स्वर्गातील पितरांना जर येथून पिंड देता येतो तर प्रवासाला निघताना शिदोरी घेण्याची काय गरज? मृत्युपश्चात् जर देह परलोकात जातो; तर तेथून परत आलेला, कुणीच कसा भेटत नाही. अशासारखा बिनतोड युक्तिवाद चार्वाकवादी करतात. 'बहुजनांच्या हितासाठी चार्वाकमताचा आश्रय घेणेच श्रेयस्कर' हा त्यांचा दावा रास्त वाटतो. व्याकरणकार पाणिनी व 'अर्थशास्त्र'कार कौटिल्याच्या ग्रंथातून 'लोकायत'शास्त्राला योग, सांख्य आदि दर्शनांच्या बरोबरीचा मान होता. महाभारतातही वेदोपनिषदातील पंडितांच्या बरोबरीने लोकतत्त्वज्ञानाचाही गौरवपूर्वक उल्लेख असे. बृहदारण्यक उपनिषदांत याज्ञवल्क्य प्रश्न टाकतात. 'वृक्ष मुळापासून तोडला तर त्याला फूट येत नाही. मनुष्य मृत्यूने तोडला असता, कोणत्या मुळापासून उत्पन्न होणार? त्याला पुन्हा जन्म कोण देणार?' तत्त्ववेत्ते निरुत्तर होतात. 'विज्ञान हेच आनंदरूपब्रह्म होय'. असे ते ठासून सांगतात. 'माणूस मेल्यावर प्राण दुसरीकडे जात नाहीत. तिथल्या तिथे नष्ट होतात. असे म्हणता तर मग मृत्यूपश्चात उरते ते काय?' ह्या प्रतिप्रश्नाला, त्याचे नाव तेवढे शिल्लक राहते. नाव राहणे हेच अमरत्व असे सांगून याज्ञवल्क्य सभा जिंकतात आणि त्यांना चार सहस्र गोधन आणि आठ सहस्र सुवर्णांचे बक्षीस मिळते. भौतिकवादाच्या अध्यात्मवादावरील विजयावर शिक्कामोर्तब होते.

रामायणात जाबाली नावाचा चार्वाक पंडित प्रत्यक्ष रामाला, रामायणाच्या महानायकाला उपदेश करतो. आपल्या पित्याला दिलेल्या वचनाचे पालन करायचे म्हणून राम वनवासात निघाला असतो. जाबाली म्हणतो, 'तुझ्या अनुभवांवरच तू अवलंबून रहा. मानवी आकलनाच्या जे बाहेरचे आहे त्याची खंत तू करू नकोस. अयोध्या नगरीला तुझी गरज आहे तेव्हा सारासार विचार करून तू वनवासाचा विचार सोडून दे.' 'देवपूजा, यज्ञ, आहुति, दक्षिणा आणि जपतप हे धर्मातील आदेश म्हणजे धूर्त ब्राह्मणांनी जनतेवर सत्ता गाजविण्यासाठी केलेल्या क्लृप्त्या आहेत. श्राद्धादी प्रकार ही अन्नाची नासाडी होय.' अशी परखड टीकाही तो करतो. रामायणावर बंदी किंवा त्याची होळी, वाल्मिकी ऋषींवर

बहिष्कार असे प्रकार तेव्हा आढळत नाहीत. वैचारिक सहिष्णुता हे विवेकवादाचे महत्त्वाचे अंग आहे. तात्पर्य हे की पाणिनी, कौटिल्य, महाभारतरचना ह्यांच्या काळात नास्तिक लोकायत शास्त्र ही महत्त्वाची विद्या म्हणून वैदिक आर्यांच्यामध्ये प्रतिष्ठा पावली होती.

**चार्वाकवादाचा संघटित प्रचार झाला नाही.**

आज विज्ञानात प्रचलित असलेली चिकित्सक, विश्लेषणात्मक विचारपद्धती चार्वाकवाद्यांनी प्रथम मांडली. ह्यूमपासून रसेलपर्यंतचे आधुनिक पाश्चिमात्त्य विचार चार्वाकांच्या पुढे गेलेले नाहीत. आजचे प्रगत तर्कशास्त्रही चार्वाक विचारपद्धतीशी सुसंगत आहे. चार्वाकवादाला एक तत्त्वज्ञान म्हणून मान्यता मिळाली तरी राजाश्रय अथवा लोकाश्रय मिळाला नाही. त्यांचे सर्व ग्रंथ नष्ट झाले (की केले?). तत्त्वज्ञानाचे विकृतीकरण केले गेले आणि जास्तकरून हेटाळणीच वाट्यास आली. आपल्या विचारांचा पद्धतशीर, संघटित प्रचार करण्याची तसदी चार्वाकवाद्यांनी घेतली नाही. त्यांच्या तत्त्वज्ञानातील 'सुखाने जगा' हा मंत्र तेवढा उच्चवर्गाने घेतला. परंतु एकंदरीत समाज कर्मकांड, आत्मा, मोक्ष, कर्मविपाक ह्या भोंगळ कल्पनांत रमला. नीतिमत्तेची कठोर बंधने पाळण्याऐवजी दिवसभर हवे ते करावे व नंतर घटकाभराच्या पूजेने त्याचे परिमार्जन करावे हा सोपा मार्ग स्वीकारला गेला. आपले इहवादी विचार समाजजीवनात उतरविण्याचे कष्ट चार्वाकवाद्यांनी घेतले नाहीत. ते अधिकतर वाचिवीर राहिले. ह्याला एक अपवाद इ.स.पू.550 मधल्या अजित केशकाम्बली यांचा! ह्या भटक्या पंडिताने पायपीट करून प्रचारासाठी संघटित पंथ निर्माण केला. ब्राह्मणशाहीविरोधात जोरदार बंड केले. त्याच्यामागे कांबळ पांघरलेल्या शिष्यांचा घोळका असे. त्यावरून त्याचे केशकाम्बली नाव पडले.

**विवेकवाद आणि भौतिक प्रगती**

लोकायतवादाचा प्रभाव दीर्घकाल टिकून होता. सातव्या शतकात भारतात आलेल्या ह्युएन त्संग ह्या चिनी प्रवाशाने ह्याबाबत लिहिले आहे. बनारसमध्ये बरेच निरीश्वरवादी व्यापारी त्याला आढळून आले. दुतर्फा झाडे लावलेले व जागोजागी खुणांच्या पाट्या असलेले राज्यमहामार्ग तेव्हा होते. वाटेवर खानावळी आणि आरोग्यकेन्द्रांची सोय असे. त्यामुळे प्रवास सुलभ होत असे. विभिन्न सामाजिक घटकांमध्ये अभिसरण होते. युद्ध करण्याचे पण सुबुद्ध नियम होते. नागरी जीवन व संपत्तीला हानी पोचणार नाही तसेच युद्धात शेतीचे नुकसान होणार नाही ह्याची काळजी घेतली जात असे. युद्धात भाग न घेणाऱ्यांना तसेच स्त्रिया, वृद्ध व मुले ह्यांना युद्ध क्षेत्रातून सुरक्षितपणे बाहेर पडण्याची संधी दिली जाई. त्याकाळच्या वैज्ञानिक प्रगतीचा प्रभाव शिल्पकला, साहित्य, चित्रकला इत्यादी क्षेत्रांतही दिसून येतो. 11 व्या शतकात इराणी खगोलअभ्यासक अल् बेरुनीने संस्कृतमधील शास्त्रविषयक ग्रंथांचे अरेबिकमध्ये भाषांतर केले. अरबी आणि इराणी संशोधकांनी प्राचीन भारताच्या गणित आणि खगोलशास्त्रातील योगदानाची महती मान्य केली. जेव्हा



विवेकवादाला समाजात मान्यता होती, विरोधाची धार बोथट होती तेव्हा भौतिकशास्त्रे विकसित पावली. शवविच्छेदन, आहारशास्त्र, रुग्णसेवा अंतर्भूत असलेले आयुर्वेदशास्त्र प्रगत झाले. प्राचीन भारताने गणित व इतर वैज्ञानिक क्षेत्रात जी प्रगती केली त्याचे मूळ त्या काळच्या 'संशयवादी' परंपरेत आहे. रूढ विचारांना धक्का देणाऱ्या, सतत प्रश्न विचारणाऱ्या पूर्वग्रहमुक्त बुद्धीलाच नव्या शोधांचे वेध लागतात. तर सनातनी विचारसरणी त्याला विरोध करते असे दिसते. एकीकडे खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट, जग सूर्यकेन्द्रित आहे हे सांगणारा वराहमिहिर, पृथ्वीचा व्यास मोजणारा ब्रह्मगुप्त आणि वनस्पतींचे वर्गीकरण करणारा अमरसिंह उदयास आले तर दुसरीकडे चर्चचे आधिपत्य असलेल्या रोमन राज्यात ब्रुनो, कोपर्निकस आणि गॅलिलिओ ह्यांचा सनातन्यांनी छळ केला.

विवेकवादाचा पडसाद प्राचीन तांत्रिक पंथांतूनही दिसून येतो. देव, देवता, पुनर्जन्म ह्यांवर विश्वास न ठेवणाऱ्या तांत्रिकांचा एक 'देहसत्य' पंथ बंगाल, बिहार, आसाम या प्रदेशांमधील बहुजनसमाजात प्रचलित होता. मानवी प्रजोत्पादनावरून धडा घेऊन त्यांनी शेतीपद्धती व शेतीअवजारांत सुधारणा केली. एका अर्थी ते तंत्रज्ञ होते. योग, आयुर्वेद मानणारा हा पंथ बंगाली फकीर, लालन फकीर ह्यांच्या लोकसंगीताच्या मौखिक परंपरेने आजतागायत जागृत आहे.

**बौद्ध आणि जैन धर्म**

देव, धर्म नाकारूनही सदाचरण, नैतिकता शक्य आहे हे इ.स.पू. 7 व्या शतकात निर्माण झालेल्या बौद्ध धर्माने सांगितले. बौद्ध आणि जैन धर्माने यज्ञसंस्थेला विरोध केला. जन्मजात विषमता मानणारी समाजरचना नाकारली. ब्राह्मणांच्या वर्चस्वाला हादरा बसला. परंतु निर्वाण, पुनर्जन्म, स्वर्गनरक ह्यातून लोकांना बाहेर काढले नाही. वेदप्रामाण्य नाकारले पण शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य इतक्या वाईट रीतीने आणले की फक्त तीर्थंकरांची वचने तेवढी खरी; बाकी रामायण, महाभारत, गणित, व्याकरण सर्व मिथ्या ठरविले. सामान्य माणसाला ऐहिक जीवनाबद्दल खजील केले. त्यामुळे ब्राह्मण गेले पण त्या जागी मुनी आणि भिक्षु आले. संन्यासधर्म लोकांना पेलवला नाही. भिक्षुकसंघात अनाचार वाढला, ढोंगीपणा वाढला. ऐहिक जीवनात सुखाने राहण्याची शिकवण देणाऱ्या लोकायतवादाला तुच्छ लेखले गेले. 'कावळा पांढरा असतो' अशासारखे विधानही हे लोकायतवादी उद्या सिद्ध करून दाखवतील अशी टीका केली. बौद्धभिक्षूंना लोकायतशास्त्र शिकण्याची बंदी होती कालांतराने मूर्तिपूजा, जातिभेद इत्यादी ब्राह्मणधर्माचे सर्व दोष जैनधर्मात आले. बौद्धधर्म भारतात नावालाच उरला.

**चार्वाक विचारांचे विकृतीकरण**

प्राचीन भारताची अध्यात्मिक परंपरा बरीच नावाजली गेली आहे. परंतु अत्यंत प्रगतावस्थेतील पाखंडी विचारांची चार्वाकीय परंपरा इ.स. पूर्वीच्या भारतात होती ह्याची

**प्रभा पुरोहित**

योग्य दखल घेतली जात नाही. विवेकवादाच्या ह्या स्फूर्तिदायक पर्वाचा विवेकवादी चळवळीने सखोल अभ्यास केला पाहिजे. कालपरत्वे चार्वाक विचारांचे विकृतीकरण झाले. आचार आणि विचारांत दरी निर्माण झाली. एकीकडे परमेश्वर निर्गुण निराकार आहे असे म्हणायचे आणि दुसरीकडे षोडषोपचारे मूर्तिपूजा करायची, मृत्युपश्चात् देह पंचतत्त्वात विलीन होतो असे म्हणायचे आणि श्राद्ध, पिंडदान चालूच ठेवायचे. सर्व व्यवहार सृष्टीच्या नियमानुसार होतात हे मान्य करायचे आणि संकट आले असता देव पाण्यात बुडवायचे आणि ज्योतिष्याचे पाय धरायचे असा ढोंगीपणा आला. विविध धर्मांच्या रूपाने पारंपरिक आध्यात्मिक विचारसरणीने विवेकवादावर मात केली. धर्मांचाच पगडा कायम राहिला. निरीश्वरवादी आणि ईश्वरवादी ह्यांच्यातील वाद-संवाद संपुष्टात आले. देव-देवतांच्या मांदियाळीने एक प्रकारची बेहोषी आली. विचार करण्याची प्रवृत्ती मागे पडली. बेटीबंदी, रोटीबंदी, समुद्रबंदीसारख्या खुळचट कल्पना बोकाळल्या आणि कर्मकांडांचे अंधारयुग आले. पोर्तुगीजांच्या गोव्यात वापरले जाणारे छपाईयंत्र मुंबईत येण्यास दोनशे वर्षे लागली.

अकराव्या शतकात ज्ञानमार्गी, भक्तिमार्गी धर्म मागे पडून विचारमंथनाची, तत्त्वचिंतनाची परंपरा जाऊन (यज्ञयाग, होमहवन, मंत्रतंत्र वगैरे) कर्मकांडांचे प्राबल्य वाढले होते. जातिभेद, अस्पृश्यता ह्यांसारख्या समाजविघातक रूढींना धर्माचे शिक्कामोर्तब मिळू लागले. वरिष्ठ जातींनी कनिष्ठ जातींना शास्त्राध्ययन आणि मोक्षाचा हक्क नाकारला. त्यांना देवालयात प्रवेश नाकारला. बहुजन समाजात वाटेल त्या दगड धोंड्याला शेंदूर फासून, झाडा-झुडपांना देव मानून त्याची पूजा करण्याची प्रथा पडली. भूतपिशाच्च, जादूटोणा, मंत्रतंत्र धर्माच्या नावावर रूढ झाले. अशावेळी 1132 ते 1162 दरम्यान विजापूर जिल्ह्यात वीरशैव धर्मात एक महान संत होऊन गेले. ते म्हणजे संत बसवेश्वर. उच्चनीचतेच्या व विषमतेच्या पायावर उभे असलेले चातुर्वर्ण्य नाकारून, धर्माचरणातील वेडगळ व अनिष्ट रूढी आणि कर्मकांडांना फाटा देऊन समता, विश्वबंधुत्व, अहिंसा, सत्य आणि प्रेम अशा उदात्त तत्त्वांवर आधारित धर्माची पुनर्रचना त्यांनी केली. सर्वांच्या अंतर्यामी एकच परमेश्वर वसत असल्याने उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरुष असा भेदभाव करणे पाप आहे असे त्यांनी सांगितले. स्त्रियांना आणि कनिष्ठ वर्गाच्या लोकांना शास्त्राध्ययनाचा आणि पारलौकिक कल्याणाचा मार्ग मोकळा केला. त्यांची शिकवण सांगे, 'वाट्याला येईल ते काम आनंदाने पण अंग मोडून करा. पण त्यापूर्वी आपल्या व्यवसायाची योग्य निवड आपल्या आवडीप्रमाणे करा. परिश्रमपूर्वक अर्थार्जन करा. गरजेपुरते मिळवा. अधिकाची हाव धरू नका. निढळाच्या घामाशिवाय केलेले अर्थार्जन ही चोरी आहे. सदाचरण हाच स्वर्ग होय. दुराचरण म्हणजे नरक. एखाद्या व्यवसायाला श्रेष्ठ मानणे आणि एखाद्या जातीला अधिक महत्त्व देणे, हा वेडेपणा आहे. 'सर्व माणसे सारखी, सर्व व्यवसाय समान योग्यतेचे, सगळ्या जाती समान' हेच जीवनाचे नियामक सूत्र राहू द्या. विश्वाच्या उभारणीमागे एकच परतत्व आहे. तेच आपल्या अंतर्यामीदेखील आहे' त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले. बालविवाहांना विरोध केला. विधवा पुनर्विवाहाचा मार्ग खुला केला. आंतरजातीय



रोटी-बेटी व्यवहार धर्मसंमत केला.

धार्मिक, सामाजिक क्षेत्रांप्रमाणेच आर्थिक क्षेत्रामध्येसुद्धा त्यांनी धर्म, नीती, उद्योगशीलता व श्रमगौरव ह्या तत्त्वांवर आधारित कार्यक्रम अंमलात आणले. संन्यास धर्म आणि दैववाद यांच्यामुळे समाजात आळस, निरुद्योगीपणा बोकाळून समाज भिकेस लागतो. उदरनिर्वाहाकरिता वडिलोपार्जित संपत्तीवर अवलंबून न राहता समाजपोषक धंदा करून स्वकष्टार्जित धनाने आपला प्रपंच चालवावा व कुणीही भिक्षा मागू नये असा नियम त्यांनी आपल्या अनुयायांसाठी केला होता. समाजधारणेला सर्व तऱ्हेच्या समाजपोषक उद्योगधंद्यांची आवश्यकता असल्याने कोणताही धंदा हीन समजू नये असे ते सांगत. 'कायकवे कैलास' हा त्यांचा महामंत्र प्रसिद्ध आहे. आपआपला मनपसंत धंदा सचोटीने, प्रामाणिकपणे शिवार्पणबुद्धीने करावा; त्यात गैरवाजवी फायदा न घेता निर्वाहापुरते धन संपादावे हाच खऱ्या मोक्षाचा मार्ग होय असा ह्या मंत्राचा अर्थ आहे. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी'चा संदेश देणारा मंत्र 'कायकवे कैलास' आजही समयोचित वाटतो. आपल्याकडील संपत्तीचा विश्वस्त ह्या नात्याने विनियोग करावा असे सांगणाऱ्या महात्मा गांधींनी पण '12 व्या शतकात बसवेश्वरांनी केलेले कार्यच आपण आज करीत आहोत' असे उद्गार काढले होते.

थोड्याच काळात बिदर जिल्ह्यातील कल्याण शहरी सुरू झालेल्या ह्या नवधर्माची कीर्ती भारतात सर्वदूर पोचली. तेथे होणाऱ्या धर्मचर्चेत भाग घेण्यासाठी बनवासीहून प्रभुदेव, उडुतडीहून अक्का-महादेवी, सोलापूरहून शिवयोगी सिद्धराम, काश्मीरहून आलेले राजे महादेव भूपाल (पोटगी पारध्या), राणी महादेवी, राणी बोंतादेवी, दक्षिण राज्यातून आलेले राजे सकलेश मादरस वगैरे होते. संत बसवेश्वर केवळ अध्यात्मवादी धर्मप्रचारक नव्हते तर व्यवहारकुशल संघटक होते. त्यांच्या अनुयायांमध्ये ब्राह्मणांपासून अंत्यजापर्यंत आणि राजांपासून रंकापर्यंत सर्व जातीचे व दर्जाचे लोक होते. त्यांच्यातील जातिभेद, अस्पृश्यता ह्या रूढी नाहीश्या झाल्या व सर्रास रोटीबेटी व्यवहार चालू झाला.

बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या ह्या संस्कारपीठाला 'शिवानुभव मंडप' अथवा 'अनुभव मंडप' नाव होते. ह्यात सर्व जातीच्या स्त्री-पुरुषांना प्रवेश होता. ज्या काळात स्त्रीशिक्षण कल्पनेच्या बाहेर होते त्या काळात तीनेकशे पुरुषांच्या बरोबरीने तीस-चाळीस स्त्रियाही 'अनुभव मंडपात' प्रबोधनाचे काम करीत. हे तत्कालीन समाजाचे एक विद्यापीठच होते. अवघ्या भारतभरातून काही हजारांच्या घरात ह्या विद्यापीठाचे सभासद होते. श्री प्रभुदेव, श्री बसवेश्वर ह्यांच्या बरोबरीने चर्चा करणाऱ्यांमध्ये ढोर जातीचे कक्कया, ब्राह्मण मधुवय्या, चांभार हरळय्या, जैनगुरु मनुमुनी तसेच सोनार, गुराखी, शेतकरी, नावाडी, पारधी, दारूगुत्तेदार असे हीन समजल्या जाणाऱ्या पेशांचे पण लोक होते. बसवेश्वरांचे संस्कृत भाषेवर प्रभुत्व असूनही विद्यापीठात मायभाषेचा, कन्नड भाषेचा, वापर असे.

रवींद्रनाथ टागोरांचे शांतिनिकेतन, स्वामी विवेकानंदांचे रामकृष्ण मिशन, विश्वभारती ह्या नावाजलेल्या संस्था येण्यापूर्वी 12 व्या शतकात बसवेश्वरांनी 'अनुभव मंडप' स्थापन

**प्रभा पुरोहित**

केला. त्यांची कीर्ती भारतभर पसरली. त्यांची वाढती सदस्यसंख्या पाहून कर्मठांचा अहंकार दुखावला होता. त्यातून 'अनुभव मंडपा'तील ब्राह्मण मधुवय्या याने आपल्या मुलीचे चांभार हरळय्या याच्या मुलाशी लग्न लावले आणि समाजसुधारणेचा कडेलोट झाला. जी गोष्ट आजच्या समाजातही धारिष्ट्याची वाटते ती त्या काळच्या सनातनी वातावरणात घडवून आणल्याने सनातनी वर्णाश्रमधर्मी लोकांच्यात हलकल्लोळ माजला. 'तू रूढींचे संरक्षण करण्यास असमर्थ आहेस' असे म्हणून त्यांनी तेथील कल्याणच्या राजा बिज्जळला दोषी ठरविले. त्यांनी राजाकरवी त्या आंतरजातीय जोडप्यांचे हाल हाल केले. मधुवय्या आणि हरळय्याचा वध करविला. त्यांचा आश्रम जाळला. बसवेश्वर व अन्य आश्रमार्थी पांगले आणि ही नवसमाजरचनेची विवेकी चळवळ बंद पडली.

□□

# महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समिती

*प्रभा पुरोहित*

राष्ट्रसेवादल, बाबा आढाव ह्यांची 'एक गाव एक पाणवठा' चळवळ आणि अन्य परिवर्तनवादी चळवळीतील सहभागाची पार्श्वभूमी असलेल्या डॉ. नरेन्द्र दाभोळकर यांना बी. प्रेमानंदांबरोबर 'विज्ञान जथा'मध्ये काम करताना आपल्या जीवनकार्याची दिशा सापडली. त्यांनी 'अंधश्रद्धा-निर्मूलना'च्या कामात एक पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून स्वतःला झोकून दिले. श्याम मानव ह्यांच्याबरोबर 1986 मध्ये 'अखिल भारतीय अंधश्रद्धा-निर्मूलन समिती'ची एक ट्रस्ट म्हणून स्थापना झाली. दोन, तीन वर्षे एकत्र काम करताना आचार आणि विचारातील तीव्र मतभेद पुढे आल्याने दोघांनी स्वतंत्रपणे काम करण्याचा निर्णय घेतला. श्याम मानव यांनी आपल्या मोजक्या साथीदारांबरोबर 'शांतिवन' नेरे येथे अखिल भारतीय अंधश्रद्धा-निर्मूलन समिती पुनर्गठित केली. मुंबई शहर, धुळे, नागपूर व एकंदर विदर्भ हे समितीचे प्रमुख कार्यक्षेत्र होते. बाबा-बुवांना थेट भिडून, आह्वान देत त्यांची भांडाफोड करण्यात श्याम मानव अग्रेसर असत. पुस्तक-प्रकाशन, व्याख्याने, चमत्कार सादरीकरण इत्यादी उपक्रम जोरात चालत. त्यांच्या भाषणाच्या चित्रफिती चांगल्याच लोकप्रिय आहेत. वर्षातून दोनदा शांतिवन, नेरे येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे नियमित भरत. आपल्या मोजक्या कार्यकर्त्यांसमवेत त्यांचे काम चालू आहे.

वेगळे झाल्यावर डॉ. दाभोळकरांनी आपल्या काही सहकाऱ्यांबरोबर 1989 मध्ये 'महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समिती'ची स्थापना केली. तेव्हापासून सुरू झालेला हा अंधश्रद्धा-निर्मूलन चळवळीचा झंझावात आजही 20 वर्षांनी सर्व पातळीवर जोमात चालू आहे. दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. परिवर्तनाच्या चळवळीत जनतेच्या सहभागाला



अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थिदशेपासून सामाजिक चळवळीत असलेल्या डॉ. दाभोळकरांनी ह्याची योग्य दखल घेतली आहे. आज समितीच्या गोवा, बेळगावसह संपूर्ण महाराष्ट्रात 150 च्या वर शाखा आहेत. समितीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण चळवळ कुठलीही विदेशी अथवा सरकारी आर्थिक मदत न घेता केवळ जनाधारावर चालते. ह्याबाबत लोकमान्य टिळकांच्या वेळच्या 'पैसा फंड' उपक्रमाची आठवण होते. औद्योगिक क्षेत्रात नगण्य असलेल्या आपल्या देशात जनतेकडून एक एक पैसा गोळा करून तळेगाव येथे काचेच्या कारखान्याचा औद्योगिक उपक्रम केला होता. जेवणाच्या पंगतीत मांडलेली 1 पैसा दक्षिणा पण 'पैसा फंड', 'पैसा फंड' पुकार करीत गोळा केली जात असे. आज 'अंनिस'चे काम महाराष्ट्रात सर्वदूर पोचले आहे. कुठेही भूत, भानामती, बुवाबाजीच्या घटना झाल्या तर त्वरित 'अंनिस'च्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधला जातो. अंधश्रद्धांबाबत 'अंनिस' ही एक अघोषित Help-line बनली आहे.

### जनप्रबोधनाच्या मोहिमा

आपल्या प्रभावी भाषणातून आणि लिखाणातून चळवळीशी जोडून घेण्याचे आवाहन करून डॉ. दाभोलकरांनी महाराष्ट्र अंनिसकडे कार्यकर्त्यांचा ओघ कायम ठेवला आहे. प्रबोधनाच्या सातत्याने चालणाऱ्या मोहिमांमुळे आलेले कार्यकर्ते टिकून राहतात आणि त्यांची जडणघडण पण होते हे समितीने जाणले आहे. ह्या उपक्रमांतील वैविध्यही लक्षणीय आहे.

भूत ह्या गोष्टीबद्दल संपूर्ण कोकणात भरपूर गैरसमज आणि अज्ञान आहे. त्यासाठी 'शोध भुताचा बोध मनाचा' ही मोहीम रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतून राबविली. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रदीप पाटकर ह्यांनी मोहिमेचे कल्पक नियोजन केले. त्या निमित्त डॉ. पाटकरांची मानसिक आजारासंबंधी एक पुस्तिका काढण्यात आली. पुस्तिकेची विक्रमी विक्री झाली. डॉ. पाटकरांनी अंधश्रद्धा-निर्मूलन वार्तापत्राच्या विशेष अंकाचे संपादन केले. मोहिमेचे उद्घाटन मानसोपचारतज्ज्ञ डॉ. मोहन आगाशे व प्रसिद्ध साहित्यिक विजय तेंडूलकर ह्यांनी केले. 'भूत नाही' हे दाखविण्यासाठी गावागावातून आह्वाने स्वीकारण्यात आली. 1 डिसें. ते 12 डिसें. दरम्यान आयोजित ही मोहीम नियोजित 150 गावांऐवजी एकूण 163 गावात जाऊन धडकली. बाबरी मशीद विध्वंसापश्चात् देशभर उसळलेल्या आगडोंबाला न जुमानता ही मोहीम कमालीची यशस्वी झाली.

1995 मध्ये 'चमत्कार सत्यशोधन यात्रा' काढण्यात आली. यात्रेदरम्यान ठिकठिकाणी चमत्काराचे आह्वान स्वीकारण्यात आले. त्यायोगे गावागावातून अंधश्रद्धा-निर्मूलन समितीचे काम पोचले. कार्यकर्ते उत्साहित झाले. 'अंधरूढीच्या बेड्या तोडा' हा नारा देऊन सभांमधून अंधश्रद्धा नाकारण्याचा संकल्प करण्यात आला.

मराठवाड्यातील परभणी, बीड, लातूर आणि नांदेड ह्या जिल्ह्यांत भानामतीचा मोठा उपद्रव आहे. 1996 मध्ये प्रसिद्ध अभिनेते निळू फुले व कुलगुरु जनार्दन वाघमारे

ह्यांनी 'भानामती निर्मूलन धडक मोहिमेचे' उद्घाटन केले. मोहीम 275 गावांमध्ये नेण्यात आली. भानामतीच्या अनेक प्रकरणांचा यशस्वी उलगडा करण्यात आला. 'मी अनुभवलेली भानामती' ह्या विषयावर निबंधस्पर्धा घेण्यात आली. 50 हजार पत्रके वाटण्यात आली.

तरुणवर्गात वैज्ञानिक दृष्टिकोण रुजावा ह्या हेतूने 'युवा एल्गार', 'सत्यशोध प्रजा संकल्प', 'वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प' असे अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. ह्या विषयीची एक शिक्षक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत ह्यांची 'विवेकजागर' परिषद लातूर येथे घेण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'विवेक वाहिनी' गट स्थापण्यात येतात. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर घेण्यात येते. त्यानंतर प्रशिक्षित शिक्षकवर्ग अंनिस कार्यकर्त्यांसमवेत 'सत्यशोध प्रज्ञाप्रकल्प' राबवितात. प्रकल्पांतर्गत वैज्ञानिक दृष्टिकोण, मनाचे आजार, व्यसनमुक्ती व एड्स, लैंगिक शिक्षण इत्यादी विषयांवर आधारित शालेय विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेतल्या जातात. त्यांना सुरुवातीला पं. लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या सहीचे व अलिकडे प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. वसंत गोवारीकरांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र दिले जात असे. 'स्वयं-अध्ययन' उपक्रमामध्ये शालेय विद्यार्थी वरील विषयांवर आधारित प्रश्नपत्रिका आपले पालक, शिक्षक वा स्नेही ह्याच्या मदतीने सोडवून आणतात. ह्यामुळे व्यापक जनसंपर्क साधता येतो. ह्या विद्यार्थ्यांनाही मान्यवरांच्या सहीचे प्रमाणपत्र दिले जाते.

आतापर्यंत समितीने अनेक बुवाबाबांचा पर्दाफाश केला आहे. महिलांशी गैरवर्तन करणारा कोल्हापूरचा तोडकर महाराज, येशू अंगात संचारला असे नाटक करून औषध म्हणून तेल-पाणी देणारा उमरगा येथील तेलपाणी बाबा, नाशिक येथील फरशीवाले बाबा, साक्षात्कार झाल्याचा दावा करणारा साताऱ्याचा गणू महाराज हे त्यातील काही. 2003 मध्ये 'बुवाबाजी संघर्ष यात्रे'ची सुरुवात मुंबईहून झाली. चमत्कार करणारे बुवा तसेच अध्यात्मिक बुवा करीत असलेल्या फसवणुकीबद्दल, लैंगिक आणि आर्थिक शोषणाबद्दल जागोजागी आवाज उठवीत ही यात्रा महाराष्ट्रभर फिरली. इचलकरंजी येथे प्रा. पुष्पाताई भावे, मृणाल गोरे व सामाजिक चळवळीतील इतर मान्यवरांच्या उपस्थितीत 'बुवाबाजी संघर्ष परिषद' झाली. उत्कृष्ट स्थानिक नियोजनाखाली सांस्कृतिक कार्यक्रम, वैचारिक परिसंवाद, प्रभातफेरी ह्यांनी परिपूर्ण अशी ही परिषद गाजली.

समितीतर्फे वेळोवेळी फलज्योतिषांना आह्वान दिले जाते. अशा आह्वानांना क्वचितच प्रतिसाद मिळतो. 'दैववादाची होळी' हा कार्यक्रम सातारा येथे झाला. कार्यकर्त्यांनी आपल्या जन्मकुंडल्या व पंचागातील शुभ-अशुभ मुहूर्तांच्या पानांची जाहीर होळी केली. उत्तर महाराष्ट्रात 'फलज्योतिष सत्यशोधन परिषद' भरविण्यात आली. पुणे येथील IUCCA ह्या आंतर्विद्यापीठ खगोलशास्त्र संस्थेच्या सहकार्याने मतिमंद मुले व बुद्धिमान मुले ह्यांच्या जन्मकुंडल्या ओळखण्याची संख्याशास्त्रीय चाचणी घेण्यात आली. ह्यात प्रख्यात शास्त्रज्ञ जयंत नारळीकर ह्यांचा सहभाग होता.

नंदूरबारसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यात एखाद्या असहाय्य स्त्रीला डाकीण ठरवून तिचे जिणे मुश्कील करायचे अशी प्रथा आजही आहे. अशा ठिकाणी 'डाकीण प्रथाविरोधी प्रबोधन मोहीम' घेण्यात आली. आदिवासी भागात सहा संकल्पमेळावे घेतले. तीन हजार महिला सहभागी झाल्या. पाड्या-पाड्यांवरील संदेशवाहक, अंगणवाडीसेविका, पोलीसपाटील व प्राथमिक शिक्षक ह्यांची प्रबोधन शिबिरे घेऊन तालुका पातळीवर डाकीण प्रथाविरोधी एकत्रित कृतिदलाची स्थापना केली. प्रसारमाध्यमांकडून तसेच प्रशासकीय पातळीवर अनुकूल प्रतिसाद मिळाला. डाकीणबाधित महिलांना आपली व्यथा समाजासमोर मांडण्याची संधी प्रथमच प्राप्त झाली.

डॉ. दाभोळकरांनी अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या लढ्याची व्याप्ती वाढविली. वर्ण-जात-धर्म-लिंग समानता, व्यसनमुक्ती, अहिंसेचे पालन, अल्पसंख्य स्त्रियांचे शिक्षण, संविधान बांधिलकी, पर्यावरण रक्षण अशी बहुआयामी परिमाणे देऊन त्यांनी विवेकवादी चळवळीला व्यापक समाजपरिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेतले. मुस्लिम समाजातील शिकलेल्या स्त्रियांना व्यासपीठावर बोलते करून त्यांचा सत्कार करणे, सत्यशोधकी विवाह (सुटसुटीत अल्पखर्चिक) साजरे करणे, आंतरजातीय विवाह परिषद आयोजित करणे, 31 डिसेंबरला 'हॅपी न्यू इयर, हॅपी न्यू इयर, नाही खाणार गुटखा नाही पिणार बिअर' अशी चपखल घोषणा देत मशालयात्रा काढून नववर्षाचे स्वागत करणे, प्रजासत्ताक दिनाला ज्येष्ठ दलित स्त्रीच्या हस्ते ध्वजारोहण करून घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे विशद करण्यासाठी सभा घेणे, संविधानाची मान-सन्मानाने मिरवणूक काढणे. 21 सप्टेंबर 1995 ला सर्वत्र 'गणपती दूध प्यायला' म्हणून तो दिवस 'चमत्कार सत्यशोधन दिन' म्हणून साजरा करणे, पर्यावरणाशी सुसंगत म्हणून 'विसर्जित गणपती दान करा', 'एक गाव एक गणपती', 'निर्माल्यापासून खत', 'फटाके-मुक्त दिवाळी', 'होळी लहान करणे' आणि अशा रीतीने वाचवलेल्या गोवऱ्या स्मशानात देणे, 'पुरणपोळ्या होळीत जाळण्याऐवजी गरीब वस्तीत वाटणे', 'एकही साप मारणार नाही, एकासही सर्पदंशाने मरू देणार नाही' असे घोषवाक्य घेऊन गावागावातून सर्पयात्रा काढणे अशा अनेक अभिनव उपक्रमांतून, जनचळवळीतून महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समितीने सामाजिक चळवळीचा एक उच्चांक गाठला आहे.

अंनिसच्या कार्यप्रणालीची काही वैशिष्ट्ये नोंद घेण्यासारखी आहेत. त्यांच्या प्रत्येक उपक्रमात साहित्य, समाजसेवा, विज्ञान व शिक्षण अशा विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींना कुठल्या न कुठल्या तऱ्हेने सामाईक केले जाते. डॉ. दाभोलकरांचा हा लोकसंग्रह व्यापक आहे. त्यातील काही व्यक्ती, ज्यांची आपल्या वैयक्तिक जीवनातही विवेकवादावर दृढनिष्ठा आहे, तर जणू चळवळीचे कार्यकर्तेच बनले आहेत. चळवळ पुढे नेण्यासाठी अंनिसला वेगळ्या Brand Ambassador ची गरज नाही. मेधा पाटकर, मृणाल गोरे, न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी, न्या.जहागिरदार, निळू फुले, डॉ.श्रीराम लागू, विजय तेंडूलकर, मंगेश पाडगावकर, सुभाष भेण्डे, जयंत नारळीकर, अच्युत गोडबोले ही त्यातील काही नावे.

समितीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे संघटनेमध्ये काटेकोर संरचना करणे अथवा स्थावर मालमत्ता (जसे की कार्यालयाला जागा वगैरे) ह्यावर भर दिला जात नाही. त्याचे



**प्रभा पुरोहित**

तोटे तसेच फायदे संभवतात. अनेक संस्थांमध्ये संघटनेची संरचना आणि मालमत्तेची वृद्धी तसेच रक्षण हेच मुख्य कार्य बनून मूळ उद्दिष्ट मागे पडल्याचे आपल्याला दिसून येते. काही वेळा संघटनेच्या सैल, विस्कळीत पकडीमुळे कार्यकर्त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळतो.

समितीचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे समितीची देवधर्मासंबंधीची भूमिका. सर्व बुद्धिवादी चळवळी निरीश्वरवादी असतात. समितीचे आगळेपण म्हणजे समितीची देवधर्माबाबतची तटस्थ भूमिका. ही भूमिका भारताच्या घटनेत दिलेल्या धर्मविषयक बाबींशी सुसंगत आहे. घटनेप्रमाणे प्रत्येक नागरिकाला उपासनेचे आणि आपले पारलौकिक कल्याण साधण्याचे स्वातंत्र्य आहे.

व्यक्तीचे हे धर्मोपासनेचे स्वातंत्र्य तोवर अबाधित राहते, जोवर ते इतर नागरी नियमांचे उल्लंघन करीत नाही. ही भूमिका मान्य करून व्यक्तिविकास व समाजविकास साधण्यासाठी धार्मिक रूढी, प्रथा परंपरा ह्यांची बदलत्या कालानुसार विधायक चिकित्सा करून त्यानुसार कृती करणे ही अंनिसची ह्याबाबतची धारणा आहे. त्याप्रमाणे शनी शिंगणापूर येथील शनिमंदिरात स्त्रियांना प्रवेश मिळविण्यासाठी समितीने आंदोलन केले. यात्रांमध्ये होणारी पशुहत्या टाळण्यासाठी शेकडो ठिकाणी सत्याग्रही संघर्ष केले. आपली देवधर्मासंबंधीची भूमिका लोकांपर्यंत पोचविण्यासाठी डॉ. दाभोलकर आणि डॉ. श्रीराम लागू ह्यांनी 'विवेक जागर' नावाचे वादसंवादाचे शंभरावर कार्यक्रम केले. महाराष्ट्रातील प्रमुख शहरातून हे वादसंवाद खूपच गाजले. ईश्वर आणि ईश्वरप्रणीत धर्म हेच सर्व अंधश्रद्धांचे मूळ आहे असे प्रतिपादन करून अशा 'ईश्वराला रिटायर करा' असे सनसनाटी आवाहन डॉ. लागू करीत. तर डॉ. दाभोलकर वर उल्लेखिलेली समितीची भूमिका विस्ताराने मांडत. विश्व नियंत्रित करणारा, चमत्कार करणारा, नवसाला पावणारा परमेश्वर समितीला मान्य नाही. परंतु स्वतःचे आनंदनिधान म्हणून परमेश्वराकडे बघणाऱ्या अथवा मानसिक आधारासाठी परमेश्वराला जवळ करणाऱ्या माणसाला सहानुभूतीने समजून घेणे समितीला आवश्यक वाटते. आणि नीतिमान वर्तनातच परमेश्वराला पाहणाऱ्यांचा समिती आदर करते. ही भूमिका मान्य होण्यास अडचण येत नाही. परंतु समितीतील अनेक कार्यकर्त्यांना जनचळवळीच्या कलाने जाण्यासाठी घेतलेली ही सौम्य भूमिका म्हणजे एक अनावश्यक तडजोड वाटते.

□□

> तरफ, टेकू, बल, इ. संकल्पना शिकताना आर्किमिडीजचे एक प्रसिद्ध वचन कौतुकाने सांगितले जाते. ''Give me a place to stand on, and I will move the Earth.''. वस्तूला गती देण्यासाठी ऊर्जा लागते. तरफेने केवळ बल अधिक मिळविणे शक्य असते. परंतु ऊर्जा मूळचीच राहते. तरफ न वापरतासुद्धा, पृथ्वीवर आपण हालचाल करतो तेव्हाही पृथ्वी तेवढीच हलते.



# चिपळूणकर

*प्रभा पुरोहित*

इ.स.1875-76 दरम्यान निबंधमालेतून विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांनी आपला दृष्टिकोण मांडला आहे. त्यांनी वापरलेला अंधश्रद्धेसाठीचा पर्यायी शब्द 'लोकभ्रम' हा अधिक वादातीत वाटतो. त्यांची ह्याबाबतची भूमिकासुद्धा आक्रमक, ब्राह्मणद्वेषी अथवा धर्मावर आगपाखड करणारी नाही. भूत नाहीच असे ठामपणे म्हणण्याऐवजी ते म्हणतात, 'सृष्टीतील अद्भुत चमत्कार पहायची ओढ सर्वसामान्य माणसाप्रमाणे आम्हाला पण आहे. ह्या विषयी आमची कुणी पक्की खात्री करून दिली तर ती आम्ही फार खुशीने घेऊ.' 'वाजे पाऊल आपुलें, म्हणे मागे कोण आलें' ह्यांसारखी बुद्धिवादी संत रामदासांची वचने ते सविस्तरपणे उद्धृत करतात. 'स्वयंपाकघरात चूल बांधण्यापासून मोठ्या मोहिमेवर जाण्यापर्यंत प्रत्येक बाबतीत शकुन-अपशकुन, ग्रहानुकूलता ह्याचा विचार होतो' ह्यावर तुटून पडताना ते पुढे म्हणतात, 'अशा तऱ्हेचा अनुभव हा केवळ काकतालीय न्यायाचा भाग आहे.' 'विधवा, परधर्मीय ह्यांना अशुभ मानणे हा माणसाच्या अंगभूत मूर्खपणाचा आणि उद्धटपणा कळस आहे' असे ते म्हणतात.

प्राचीन काळी ग्रहनक्षत्रादींच्या शुभाशुभतेवर लोकांचा दृढ विश्वास होता. कारण याबाबत ते पूर्णपणे अनभिज्ञ होते. हळू हळू हे सर्व ज्योतिष, मुहूर्त ह्या स्वरूपात धर्मात आणि लोकव्यवहारात उतरले. 'हिंदुस्थानात शनी लोकांच्या राशी लागतो तर इंग्लंडमध्ये तो निष्प्रभ ठरतो.' 'ज्योतिष्याला जर भविष्य बिनचूक कळते तर त्याच्यावर संसारातील संकटे का गुदरतात?' असा बिनतोड युक्तिवाद ते करतात.

शब्दप्रामाण्यविरोधात ते म्हणतात, 'पुरा कस लाविल्याखेरीज सोन्याचा सोनेपणा धरू नये तसेच कोणी लौकिकाने मोठा एवढ्यावरच जाऊन त्याच्या वचनाचे जे प्रामाण्य मानावयाचे त्यापेक्षा आपण स्वतः होईल तितकी यथातथ्य परीक्षा करून नंतर कोणाचेही मत ग्राह्य की अग्राह्य ते ठरवावे.'

'लोकभ्रम' शीर्षकाखाली लिहिलेल्या निबंधमालेतील तीन लेखांतून विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांची पूर्वग्रह आणि अंधश्रद्धा ह्यांपासून मुक्त असलेली चिकित्सक दृष्टी दिसून येते. 130 हून अधिक वर्षे जुनी अशी ही विचारसरणी आजही आधुनिक वाटते.

□□

# आगरकर

*प्रभा पुरोहित*

19 व्या शतकातील बुद्धिवादी विचार आणि लेखन सतत व प्रभावीपणे करणारे गोपाळ गणेश आगरकर हे एक प्रमुख व्यक्तिमत्त्व होते. *केसरी*तून 7 वर्षे व 'सुधारक'मधून 7 वर्षे असा एकूण 14 वर्षे त्यांनी रूढी, आचार, विचार, पोषाख, वैवाहिक जीवन, शिक्षण, व्यापार इत्यादि ऐहिक जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगावर परखड, सुधारकी लिखाणाचा भडिमार केला. त्याला कुत्सितपणाचा स्पर्श नव्हता. अधिक धारदार लिखाणाला ते मधूनच विनोदाची झालर लावीत. बुद्धिवादाचा पुरस्कार करताना बुद्धीच्या मर्यादेचे त्यांना भान असे. 'आम्ही ज्या विश्वात आहो याच्या पूर्वी दुसरी विश्वे होऊन गेली असतील किंवा नसतील त्यांविषयी वाद करीत बसण्यात अर्थ नाही, कारण त्या विश्वांचा इतिहास समजण्याची साधने आम्हास अनुकूल नाहीत. तेव्हा आमचा जो वादविवाद व्हावयाचा तो सांप्रत विश्वाविषयी, व विशेषतः तदंतर्गत आपल्या भूगोलाविषयी आणि त्यावरील प्राण्यांत अतिश्रेष्ठ प्राणी जे आपण त्याविषयी व्हावयाचा व व्हावा हे योग्य आहे'. असा इहवादी विचार त्यांनी मांडला. ऐहिक जीवनाची माणसाला लाज वाटणे ही एक विकृत मनोवृत्ती आहे, निवृत्तीवादामुळे आपण जीवनातील आनंद कमी करीत आहोत असे त्यांचे स्पष्ट मत होते. प्रियाराधनापासून पोषाखाच्या बारीक तपशिलापर्यंत आगरकरांनी निबंध लिहिले. सण व खेळ यांचे महत्त्व सांगितले. जीवनातील प्रत्येक क्षेत्रात स्वातंत्र्य निर्माण होऊन व्यक्तिजीवन संपन्न होते असे ते आग्रहाने सांगत. जन्माधिष्ठित जातिव्यवस्था व धर्मसंस्था ह्यामुळे व्यक्तिविकास खुंटला आहे अशी सडेतोड मांडणी त्यांनी केली. हिंदूधर्मातील खुळचट आचार व रूढी तसेच स्त्रियांवरील अन्याय ह्यावर त्यांनी केलेल्या तिखट टीकेने पुण्यातील सनातनी खवळले आणि त्यांनी आगरकरांच्या प्रतिमेची जिवंतपणी प्रेतयात्रा काढली. प्रवाहपतित, पुरुषार्थ विरहित जीवनाबद्दल लिहिताना त्यांच्या लेखणीला धार चढे. 'विद्यार्जनाने विकसित झालेली मने स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची अथवा मानाची काय वाण पडणार आहे?' 'मुंबई, मद्रास किंवा कलकत्ता यांच्यासारख्या दहापाच टवटवीत शहरांवरून, किंवा लाख, दोन लाखांत जो एखाद दुसरा सुखवस्तु इसम दृष्टीस पडतो त्यावरून चहुकडे तशीच अबादानी असेल असे अनुमान करणे हा शुद्ध भ्रम होय' हे त्यांचे विचार आजही डोळ्यांत अंजन घालणारे आहेत.

□□



# र. धों. कर्वे

*प्रभा पुरोहित*

1882 साली *सुधारक* मधील 'स्त्रीदास्यविमोचन' ह्या अग्रलेखात आगरकर म्हणतात, 'कालांतराने फाजील संतत्युत्पत्ती होऊ न देता स्त्री-पुरुषाचा संयोग होऊ देण्याची युक्ती काढता येईल. स्त्रियांच्या आरोग्यरक्षणाला आवश्यक म्हणून जी काय दोन तीन मुले ठरतील तेवढी तरुण वयात करून घेतली म्हणजे पुढे टांकसाळ बंद ठेवण्याचा उपाय शोधून काढण्याकडे वैद्यकशास्त्राचे मन लागले आहे. व या कामात त्यास लवकरच यश येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. असे झाले तर आताप्रमाणे डझन किंवा दीड डझन अल्पायुषी मनुष्यप्राणी जगात आणण्यापेक्षा आईबापांच्या जागी खुंटास खुंट उभा करण्यापुरती दोन सुदृढ पोरे झाली तरी बस्स आहेत.' योगायोग असा की त्याच वर्षी म्हणजे जाने. 1882 मध्ये मुरूड येथे बुद्धिप्रामाण्यवादामध्ये आगरकरांचा खरा वारस ठरावा अशा र.धों.कर्वे ह्यांनी धोंडो केशव कर्वे ह्यांच्या प्रथम पत्नी राधाबाई ह्यांच्या पोटी जन्म घेतला. थोर तत्त्वनिष्ठ आणि प्रखर बुद्धिवादी र.धों.कर्वे भारतातील संततिनियमनाचे आद्य पुरस्कर्ते आणि कामशास्त्राचे प्रणेते झाले. त्यांचे ह्या क्षेत्रातील कार्य त्यांचे वडील भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे ह्यांच्या स्त्री-शिक्षण क्षेत्रातील कार्याच्या तोडीस तोड ठरले. आगरकरांनी कुटुंबनियोजनाचा विचार लोकसंख्या-नियंत्रणाप्रमाणेच स्त्रीदास्यविमोचनाच्या दृष्टिकोणातून केला. र.धों.कर्व्यांनी पण त्याच भूमिकेतून संततिनियमन आणि समृद्ध कामजीवनाच्या कार्यासाठी स्वतःस वाहून घेतले.

मुंबईत गणिताचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करताना त्यांनी गणित विषयात एम्.ए. करण्याचे ठरविले. गणिताच्या अधिक अभ्यासासाठी फ्रेंच भाषा येणे आवश्यक वाटल्याने त्यांनी एलफिन्स्टन कॉलेजमध्येच फ्रेंच शिकायला सुरुवात केली, संभाषणाचा सराव केला. याच काळात लैंगिक विषयावरील ग्रंथ प्रथम त्यांच्या वाचनात आले. या विषयावर इंग्रजीपेक्षा फ्रेंच भाषेतील साहित्य विपुल होते. त्यातच 1917 साली ते कर्नाटकातील धारवाड कॉलेजमध्ये शिकवीत असताना त्यांना पुढील अध्ययनासाठी दीड वर्षांची रजा मिळाली आणि ते फ्रान्समधील पॅरिस विश्वविद्यालयात दाखल झाले. 'दिप्लोमा द एस्युद सुपिरिअर' साठी तयारी करत असतानाच तेथील बी.ए.च्या विद्यार्थ्यांना गणित विषय शिकविण्याची खास अनुमती त्यांना विश्वविद्यालयाने दिली होती. तेथे त्यांनी फ्रेंच भाषेचा खोलवर अभ्यास केलाच त्याबरोबरच फ्रेंच समाजजीवनाचाही जवळून अभ्यास केला. कामशास्त्र-कलानिपुण वारांगनांची पॅरिस शहरात कमी नव्हती. तेथील रंगेल जीवनाचे वर्णन पुढे त्यांनी आपल्या 'पॅरिसच्या परी' ह्या पुस्तकात केले आहे. 'तुझ्या शरीराची मालकीण तूच' ह्या नावाने त्यांनी व्हिक्टर मार्गारेट यांच्या संततिनियमनविषयक कादंबरीचा अनुवाद केला. लैंगिक विषयावरील पुस्तकांचे त्यांचे दांडगे वाचन होते. ते

उद्धृत करत असलेल्या लेखकांपैकी बर्ट्रंड रसेल, सिग्मड फ्राईड, मेरी स्टोप्स, डॉ. रॉबिन्सन, डॉ. नॉर्मन हेअर ही झाली काही नावे. फ्रान्सहून परतल्यानंतर त्यांचा अध्यापनसेवेतील ज्येष्ठताक्रम डावलल्याने स्वाभिमानी र.धों.नी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. त्यांनी संततिनियमनाचे काम जोरात सुरू केले. साधने विकणे, सल्ला देणे चालू केले. स्त्रीग्राहकांसाठी व्यक्तीनुरूप साधने बनवून सल्ला देण्याचे काम त्यांच्या पत्नी मालतीबाई तेवढ्याच उत्साहाने करीत. ह्याचवेळी उभयतांच्या जीवनकार्याची दिशा ठरून गेली. आर्थिक विवंचनेची तमा न बाळगता दोघांनीही अखेरपर्यंत ह्या कार्याला वाहून घेतले व त्यासाठी असीम त्याग केला.

1922 मध्ये ख्रिश्चन मिशनरी चालवीत असलेल्या विल्सन कॉलेजमध्ये अर्धवेळ प्राध्यापकाची नोकरी स्वीकारताना उरलेल्या वेळात माझ्या पसंतीचे कुठलेही काम करण्यास मी मोकळा राहीन असे त्यांनी व्यवस्थापनास बजावले. याच काळात त्यांनी 'संततिनियमन' आणि 'गुप्तरोगापासून बचाव' ह्या विषयांवर इंग्रजीतून पुस्तके लिहिली. संततिनियमनावर मराठीतूनही लिहिले. त्यांच्या या पुस्तकांची जाहिरात देण्यास 'टाईम्स ऑफ इंडिया'सारख्या नावाजलेल्या वर्तमानपत्रानेपण नकार दिला. ह्यावरून कोणत्या परिस्थितीत कर्वे आपले काम अविचल निष्ठेने चालू ठेवीत होते ह्याची आपल्याला कल्पना येते. दरम्यान विल्सन कॉलेजमध्ये पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यांचा संततिनियमनावरील एक लेख 'किर्लोस्कर खबर' ह्या किर्लोस्करवाडी उद्योगसमूहाच्या मुखपत्रात छापून आला. औंध संस्थानातील एका ज्यू दिवाणाने ह्यासंबंधीची तक्रार विल्सन कॉलेजच्या मिशनरी चालकांकडे केली. कॉलेज व्यवस्थापनाने त्यांना बोलावून संततिनियमनाचा प्रसार बंद करण्यास सांगितले. र.धों.कर्व्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. दोन आण्यांत पोटभर राईसप्लेट मिळणाऱ्या त्या जमान्यात दरमहा तीनशे रुपये पगार देणाऱ्या नोकरीवर पाणी सोडणे, तेही संततिनियमनाचे काम चालू ठेवण्यासाठी, ही एक असामान्य बाब होती. 'गणित शिकवायला तुम्हाला पाहिजे तेवढी माणसे मिळतील पण संततिनियमनाचा प्रसार मी केला नाही तर तो बंद पडण्याचा संभव आहे', असे बाणेदार उत्तर त्यांनी दिले. व्यवस्थापनानेपण सहा महिन्यांचा ज्यादा पगार देऊन 'आपला स्वकार्याबद्दलचा हट्ट आदरणीय वाटतो' असे पत्र देऊन त्यांना नोकरीतून मोकळे केले. पुढील दोनतीन वर्षे चरितार्थासाठी त्यांनी अगदी टॅक्सी ड्रायव्हरपासून हर तऱ्हेचे व्यवसाय करून बघितले परंतु सगळीकडे त्यांच्या प्रचारकार्याला होणारा विरोध आडवा आला.

फ्रान्सबरोबर मोत्यांचा व्यापार करणाऱ्या एका कंपनीत त्यांना सचिवाची नोकरी मिळाली आणि थोडे आर्थिक स्थैर्य आले. कंपनीचा संचालक फ्रेंच तर त्याची बायको इंग्लिश त्यामुळे त्यांच्या आपापसातील पत्रांचा अनुवाद करण्याचे खाजगी कामही ते करीत. त्यांचे स्वतःचे लेखन चालूच होते. 'विनय म्हणजे काय?' हा आपला लेख त्यांनी 'किर्लोस्कर खबर'कडे प्रकाशनासाठी पाठविला. ह्या लेखात विनय म्हणजे एक ढोंग आहे. नग्नतेकडे तटस्थ वृत्तीने पाहणाऱ्यास लाज वाटण्याचे कारण नाही. अशी भूमिका



त्यांनी मांडली होती. हे विचार पचायला जड वाटल्याने वा प्रकाशनानंतर होणारे संभाव्य वादंग टाळण्यासाठी त्यांचा हा लेख नाकारण्यात आला. 'किर्लोस्कर खबर' हे त्या काळी एक नवमतवादी, पुढारलेले मुखपत्र होते. आपले स्वतःचे प्रकाशन सुरू करण्याखेरीज र.धों.कर्व्यांना गत्यंतरच उरले नाही. 1927 च्या जुलै महिन्यात 'समाजस्वास्थ्य' मासिकाचा जन्म झाला. ही एक ऐतिहासिक संथ, सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. 1927 ते 1953 आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत सतत 27 वर्षे त्यांनी पोटाला चिमटा घेऊन हे मासिक चालविले. हा एक विक्रम होता. समाजस्वास्थ्याची दरमहा 4000 प्रतींची गुजराती आवृत्तीसुद्धा नारायण निमकर नावाच्या गृहस्थाने सलग दोन वर्षे काढली होती. मध्यमवर्गातील घराघरांतून 'समाजस्वास्थ्य' पोचले होते. त्यांच्या ह्या प्रचंड कार्याची दखल, नोंद व मोजमाप, ह्यांबाबत नेहमीच ढिसाळ असलेल्या कृतघ्न समाजाने आणि अलिप्त बुद्धिवंतांनी ठेवली नाही ह्याची खंत वाटते.

'समाजस्वास्थ्य'मधून र.धों.कर्व्यांनी विपुल लेखन केले. 'अश्लिलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूंचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणाऱ्या मनाचा गुण आहे.' 1939 पासूनच्या 'समाजस्वास्थ्य'च्या प्रत्येक अंकाचे आरंभी हे वाक्य छापलेले असे. ज्या काळी लैंगिक परिभाषेतील शब्द उच्चारणे पण निषिद्ध होते त्या काळी वेश्या व्यवसाय, कामवासना, गुप्तरोग, नग्नता, व्यभिचार, समागम, आसने, संततिनियमन अशा विषयांवर लिखाण करून समाजस्वास्थ्याचे एकामागून एक अंक काढणे म्हणजे प्रवाहाविरुद्ध पोहणे होते. त्यांच्या लेखनातून विषयाचा सखोल अभ्यास, वैज्ञानिक दृष्टिकोण आणि एक प्रकारचा आत्मविश्वास दिसून येतो. व्यापारी दृष्टीने समागम सोसणारी स्त्री अशी वेश्येची व्याख्या ते करत. वेश्यांसंबंधी विविध देशात कोणते कायदे केलेले आहेत याबद्दल त्यांनी सलग सहा लेख लिहिले. कोणत्याही स्त्रीला मग ती आपली लग्नाची बायको का असेना समागम करायला लावणे (भाग पाडणे) हे (तिला) वेश्येपेक्षा हीन समजणे होय असे ते म्हणत. विवाहसंस्था हा उंदराचा सापळा आहे. आत शिरायला सोपा पण बाहेर पडणे अशक्य. पातिव्रत्य हे नैसर्गिक नसून ती पुरुषांची अरेरावी आहे. पति-पत्नी यांचा संबंध जिव्हाळ्याचा, मैत्रीचा , प्रेमाचा असावा. कोणतीही एक व्यक्ती दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीसाठी 'देव' असणे शक्य नाही. स्त्रियांनी कुंकू लावणे टाळावे, पुनर्विवाह करावा. तिला सांपत्तिक स्वातंत्र्य असावे. मुले किती व केव्हा हे ठरविण्याचा हक्क स्त्रीचा आहे. मनाविरुद्ध संतती होणे अथवा इच्छा असूनही मूल न होणे हे तिला आयुष्यभर दुःखाचे कारण होऊ शकते. संततिनियमनाची साधने फसली तर गर्भपात करता यावा. सुदृढ, निरोगी मूल होणे अशक्य असेल तर शस्त्रक्रिया करून घ्यावी. हे विचार त्यांनी मांडले.

इ.स.च्या 4 थ्या शतकात महर्षि वात्स्यायन नावाचा श्रेष्ठ, अभ्यासू, पारदर्शक कामसंशोधक होऊन गेला. त्यांनी सूक्ष्म अवलोकन करून, जिज्ञासू बुद्धीने आणि उपलब्ध साधन-सामुग्रीने कामशास्त्राची मूलतत्त्वे सांगणारा 'कामसूत्रम्' हा अलौकिक ग्रंथ लिहिला.

संस्कृत भाषेतील हा प्राचीनतम ग्रंथ आहे. आपल्या 'आधुनिक कामशास्त्र' ह्या ग्रंथात र.धों.कर्व्यांनी वात्सायनाच्या 'कामसूत्रम्' ग्रंथातील कधीच प्रकाशात न आलेले विचार लोकांना समजावून सांगितले. पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते लिहितात, 'कोणी हा विषयच घाणेरडा व अश्लील समजून त्यासंबंधी आपण विचारच करीत नाही अशी स्वतःची समजूत करून घेतात तर कोणी त्यात धर्म व पावित्र्य या असंबद्ध बाबी घुसडतात आणि 'प्रजोत्पादनाचा उद्देश असल्याशिवाय समागम करता कामा नये' वगैरे हास्यास्पद विधाने करून स्वतःची फसवणूक करतात. या विषयासंबंधी निखळ असा शास्त्रीय विचार लोकांपुढे मांडणे अत्यंत जरूर आहे.' दुसऱ्याचे नुकसान केल्याशिवाय जे जे सुख भोगता येईल, ते ते भोगण्याची प्रत्येकाला मुभा असली पाहिजे व यातच कामसुखाचा समावेश होतो. या जगात माणसाला मिळणाऱ्या सुखात कामसुखाला महत्त्वाचे स्थान असल्याने ते व्यक्तीला नाकारणे म्हणजे अन्याय करण्यासारखे आहे. दुसऱ्याच्या सुखासाठी झटणे हे कामशास्त्राचे मुख्य नीतितत्त्व आहे. याकडे लक्ष वेधून स्त्रीच्या सुखावर समागमाचे नियम बसविणाऱ्या वात्स्यायनासारख्या विचारवंताचा त्यांनी गौरव केला. (प्राचीन ग्रीक, रोमन लोकांमध्ये ह्या दृष्टिकोणाचा अभाव होता असे त्यांच्या वाचनात आले.)

ज्या देशात वात्स्यायनासारखा कामशास्त्राचा विज्ञाननिष्ठ अभ्यासक आणि र.धों.कर्व्यांसारखा या क्षेत्रातील समर्पित कार्यकर्ता होऊन गेला तेथील आजची परिस्थिती काय आहे? लग्नाच्या पहिल्या रात्री घटस्फोट होत आहेत. कुमारी मातांची संख्या आणि बलात्काराचे प्रमाण वाढते आहे. मुलगा हवा ह्यासाठी गर्भजलपरीक्षा व गर्भपात केले जात आहेत. पत्रिका बघून विवाह होत आहेत. पुत्रकामेष्टी यज्ञ आणि गोपाळविधीसारखे उपाय सांगून गरजूंना नागविणारे वैदू, भटभिक्षुकांची चलती आहे. हा दैवदुर्विलासच म्हणायला हवा. (विवेकवाद्यांची माफी मागून!)

वैयक्तिक जीवनामध्येही र.धों.कर्वे प्रखर बुद्धिवादी होते. त्यांच्या आचारविचारात एकता होती. लग्नानंतर आपल्याला एकही मूल होऊ द्यायचे नाही असे लग्नापूर्वीच त्यांनी आपल्या भावी पत्नीकडून बाँडपेपरवर लिहून घेतले होते. 'आम्हा दोघांनाही पुत्रप्राप्तीची आतुरता कधीच नव्हती. कित्येकांना धार्मिक कारणासाठी पुत्र पाहिजे असतो तर कित्येकांना वारस हवा असतो. आम्हा दोघांपैकी कोणीच धार्मिक नव्हते व मिळकतच नसल्याने वारसाला काय मिळणार?' असे त्यांचे म्हणणे होते. त्यांचा त्या काळातील प्रेमविवाह होता. मालतीबाईंचे इंटरपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण झाले होते. मुरूड ते पुणे अशा सहा सात दिवसाच्या बैलगाडीचा प्रवासात त्यांचा परिचय झाला. त्या काळातले त्यांचे सहजीवन परिपूर्ण होते. समाजस्वास्थ्याच्या अंकाच्या मालतीबाईच लेखनिक होत्या. कर्व्यांच्या नोकरी सोडण्याच्या निर्णयाला त्यांचा पूर्ण पाठिंबा होता. शाळेत ड्रिल टीचर म्हणून स्वतःला मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारात संसार करायची मालतीबाईंची तयारी होती. संततिनियमनाची साधने बनविणाऱ्या, विकणाऱ्या त्यांच्या 'राईट एजन्सीज'चा सर्व कार्यभार त्यांनी उचलला होता. मृत्यूपूर्वी दहा वर्षे त्यांचे कमरेखालील शरीर रक्तक्षयाने लुळे पडले होते. त्यांच्यावर केलेल्या प्रयोगामुळे त्यांना अपंगत्व आले असा अपप्रचार त्यांच्या हितशत्रूंनी केला. त्या काळात र.धों.कर्व्यांनी व्यक्तिशः आपल्या पत्नीची काळजी घेतली. त्यांच्या औषधोपचारावरही अतोनात खर्च केला. त्या निधन पावल्या त्यावेळची त्यांच्या एका चहात्याने सांगितलेली हकिकत अशी. 'सकाळी 8 वाजता बाहेर चाललो होतो. तो कोपऱ्यावर अप्पा कर्वे दिसले. इतक्या सकाळीच कुठे चाललात असे विचारण्याआधीच ते म्हणाले, 'रात्रीच वारली. सकाळी प्रार्थनासमाजाची प्रेतवाहिनी हातगाडी आणली. त्यालाच म्हणालो 5 रु. देईन, घेऊन चल. करायची काय इतर माणसे? त्रास कशाला सकाळीच? बरे आहे. तो गाडीवाला पुढे जातो आहे तेव्हा मी जातो. बाकी कुठे जायचे ते त्याला सांगितले आहेच.'' पत्नीचा मृत्यू ही नैसर्गिक घटना मानून त्यांनी धीराने स्वीकारली. त्यानंतर त्यांचे आयुष्य मात्र एकाकी झाले.

'रॅशनॅलिस्ट असोसिएशन ऑफ इंडिया' ह्या संस्थेचे 'रीझन' नावाचे नियतकालिक होते. त्यासाठी र.धों.कर्वे लिखाण करीत. संस्थेच्या कामातही ते लक्ष घालीत. त्यासाठी र.धों.कर्वे लिखाण करीत. संस्थेच्या कामातही ते लक्ष घालीत. असोसिएशनच्या निबंधस्पर्धेत भाग घेऊन त्यांनी पारितोषिक मिळविले. त्यामुळे त्यांची डॉ. गोपाळराव देशमुख, डॉ. परुळेकर, मिनू मसानी, पुरुषोत्तम त्रिविक्रमदास व इतर सक्रिय सभासदांची ओळख झाली. 'बहुजन समाजाला अंधश्रद्धेच्या आणि पुरोहितशाहीच्या मगरमिठीतून सोडविणे आणि शास्त्रीय दृष्टीने विचार करावयास शिकविणे' हे संस्थेचे उद्दिष्ट होते. रघुनाथरावांच्या निबंधाचे शीर्षक होते 'सेण्टस् ॲण्ड फकीर्स'. 'साधू-संन्यासी फकीर आणि धर्माच्या नावाखाली लुबाडणाऱ्या अन्य ढोंगी मंडळींचा या देशात नुसता सुळसुळाट झाला असून पोषाखात आणि वागण्यात विचित्रपणा दाखवून कोणालाही या देशात साधू-फकीर बनता येते. भटजी हा उपद्रव देणारा, तर साधू हा बांडगुळासारखा असतो.' असे आपले मत त्यांनी मांडले होते. असोसिएशनच्या सभासदांसमोर त्यांचे 'अश्लीलता व कायदा' यावर भाषण झाले होते. काही काळ त्यांनी 'रीझन'चे संपादक म्हणून काम केले. त्यांचे वाचन दांडगे व चिंतन सखोल होते. कुठलाही अभिनिवेश न बाळगता तर्कशुद्ध, मोजके, सडेतोड असे त्यांचे बोलणे असे. त्यामुळे वैचारिक क्षेत्रातील अनेक नामवंत त्यांच्याभोवती आदराने जमत. मुंबईतील 'रॉयल एशियाटिक सोसायटी'मध्ये ते जमत. ते शेवटपर्यंत सोसायटीचे सन्माननीय सदस्य होते. विचारस्वातंत्र्य व उच्चारस्वातंत्र्य यांचा पुरस्कार करणारी साहित्यिकांची जागतिक संस्था PEN चे ते सभासद होते. 'श्री. ऋषिंची भुताटकी' हा प्लॅचेंटच्या खुळासंबंधी लेख त्यांनी लिहिला. 'आत्तापर्यंत ज्या ज्या लोकांनी युरोप व अमेरिकेत भुतांचे निरोप मनुष्यास कळविले ते सर्व लुच्चे होते व ते लोकांस फसवत होते असे कोर्टात सिद्ध झाले आहे' असे सांगून ते प्लँचेटवाले, अध्यात्म सांगणारे बुवा, ज्योतिषी, मांत्रिक ह्यांच्यावर तुटून पडत. श्रद्धेमुळे तारतम्य कसे नाहीसे होते, लोक कशावरही विश्वास ठेवू लागतात, त्यातून आभास निर्माण होतात हे ते सोदाहरण पटवून देत असत.



प्रभा पुरोहित

गांधीजींची ब्रह्मचर्याची कल्पना, संततिनियमनाच्या आधुनिक दृष्टिकोणास असलेला त्यांचा विरोध, त्यांचे उपोषण, दारूबंदीचा आग्रह ह्यावर र.धों.कर्व्यांनी कडाडून टीका केली. गांधीजींनी राजकारणात जी धार्मिक परिभाषा वापरली ती त्यांना पसंत नव्हती. 'त्यांच्या धार्मिक ढंगामुळे कित्येक लोकांची विचारशक्तीच नाहीशी झाली. ते वास्तविक कोणत्याही विषयांत तज्ज्ञ नसताना त्यांना सर्वच विषयात तज्ज्ञ समजण्याची कित्येकांना सवय लागली. उपोषणाचे आततायी तंत्र राजकारणात शिरून लोक त्याचा सर्रास दुरुपयोग करू लागले.' असे त्यांनी लिहिले आहे. ते पुढे म्हणतात. 'या देशाचे दुर्दैव आहे की विवेकाच्या आधारावर उभी केलेली कोणतीही चळवळ येथे यशस्वी होत नाही. दांभिक प्रदर्शन, पायी चालणे, लंगोटी नेसणे, केस वाढवणे, खाण्यापिण्याचे काही विलक्षण नियम पाळणे अशा युक्त्यांनी येथे व्यक्तित्त्व निर्माण होते. लेनिन, स्तालीन, किंवा माओ-त्से-तुंग यांना अशा युक्त्या कराव्या लागल्या नाहीत. परंतु त्यांनी जे काम केले, तसे हजारो ढोंग्यांच्या हातून होणार नाही. असे लोक लोकांची दिशाभूलच करतील, त्यांना विवेकभ्रष्ट करतील.'

'डॉक्टर' ह्या टोपणनावाने र.धों.कर्व्यांनी 'समाजस्वास्थ्य'च्या शेवटच्या चार अंकातून 'अनैसर्गिक नव्हे निसर्गपूरक' ही लेखमाला सादर केली. त्यानंतर 14 ऑक्टो.1953 ला ते मृत्यू पावले. या लेखमालेतून त्यांनी सममीलन-समलिंगी संभोग हा अनैसर्गिक, असभ्य व बेकायदेशीर न मानता त्याचे निरुपद्रवित्व, समाजोपकारत्व व निसर्गपूरकत्व लक्षात घेऊन त्यास समाजाने मान्यता द्यावी, निदान दुर्लक्ष करावे व कायद्याने त्याबद्दल शिक्षा देऊ नये असे मत 1953 साली मांडले. त्याबाबत अश्लीलतेचा खटला भरण्याची तयारी मुंबई सरकारने तेव्हा केली होती. त्यांच्या मृत्यूमुळे खटल्याचा विचार मागे पडला. आज भारत सरकारने समलिंगींच्या हक्कासंबंधी बिल पारित केले आहे. ह्यातच ह्या महान सामाजिक कार्यकर्त्याचे द्रष्टेपण दिसून येते.

ह्या देशाचे करंटेपण असे की स्वातंत्र्योत्तरही ह्या क्षेत्रात सतत 33 वर्षे काम करणाऱ्या ह्या तपस्व्याच्या कार्याची दखल तर घेतली गेली नाहीच परंतु त्यांच्या कामात अडथळे आणले गेले. देशाच्या कुटुंबनियोजनाच्या धोरणात योगदान देण्याची संधीही त्यांना नाकारण्यात आली. सार्वजनिक तसेच शालेय पातळीवरील लैंगिक शिक्षणाचा तर खेळखंडोबा झाला. एड्सचा भस्मासुर जागा झाल्यावरही ह्याबाबत धीट पाऊले उचलण्यास शासन कचरते आहे.

**संदर्भ :** *उपेक्षित योगी* - मधुसूदन गोखले, बेळगाव
*उपेक्षित द्रष्टा* - दिवाकर बापट, ठाणे
*र.धों.कर्वे* - य. दि. फडके

□□



# अब्राहम कोवूर

*प्रभा पुरोहित*

20 व्या शतकातील भारतातील विवेकवादी चळवळीचे पितामह म्हणून डॉ. अब्राहम कोवूर ह्यांचा उल्लेख करावा लागेल. अमोघ वक्तृत्व, वैज्ञानिक विचारसरणी, परखड टीका आणि चमत्काराची प्रात्यक्षिके ह्यामुळे त्यांची भाषणे गाजत. श्रोतृवर्गाचा त्यांना उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळे. चमत्कार ही बाबाबुवांची केवळ हातचलाखी आहे हे ते दाखवीत आणि तथाकथित अध्यात्म आणि संघटित धर्मावर तुटून पडत. 1960 ते 1970 च्या दशकात त्यांनी भारताच्या गावागावांतून आणि शहराशहरांतून अशी शेकडो भाषणे दिली. बाबाबुवांना चमत्कार करून दाखविण्याचे खुले आह्वान ते देत. त्या काळीही पुट्टपूर्तीच्या सत्य साईबाबांचे बरेच प्रस्थ असे. आपल्या भाषणात डॉ. कोवूर प्रामुख्याने सत्य साईबाबांना लक्ष्य करीत. सत्यसाईबाबाप्रमाणे हवेत हात फिरवून ते हातातून विभूती काढून ती श्रोतृवर्गाला वाटत. थोड्या सरावाने आपण पण असे प्रयोग करू शकाल असे ते आवर्जून सांगत. आजपण अंधश्रद्धा-निर्मूलनाचे हजारो कार्यकर्ते त्यांची चमत्कार सादरीकरणाची प्रभावी पद्धत अनुसरताना आढळतात. दैवी शक्तीचा दावा करणाऱ्या अनेक बाबाबुवा, ज्योतिषी ह्यांना त्यांनी समोरासमोर विरोध केला. 'ह्या जगात कुणाकडेही दैवी शक्ती नाही. आणि कधीही नव्हती. अशा तऱ्हेच्या वावड्या केवळ धर्मग्रंथात अथवा सनसनाटी करणाऱ्या वृत्तपत्रातच असतात' अशा निष्कर्षाप्रत ते आले. 1963 साली डॉ. कोवूर ह्यांनी योग्य देखरेखीखाली बंद लिफाफ्यातील नोटेचा नंबर ओळखणे, पाण्यावर चालणे, हवेतून वस्तू काढणे इत्यादी 23 चमत्कारांच्या यादीतील कुठलाही चमत्कार करणाऱ्यास 1 लाख रु.चे बक्षीस जाहीर केले.

*(1959 मध्ये त्यांनी The Indian Committee for Scientific Investigation of claims of the Paranormal. (CSICOP) ची स्थापना केली. त्या वेळी विवेकवादासाठी झटणारे त्यांचे एकमेव व्यक्तिमत्त्व होते व भारतातील अनेक विवेकवादी त्यांच्याभोवती गोळा झाले) श्रीलंकेत असताना त्यांनी Ceylon Rationalist Association भरभराटीस आणली. ह्या संघटनेचे ते तहहयात अध्यक्ष होते. The Ceylon Rational Ambassador नावाचे वार्षिक ते काढत. 1961 मध्ये युरोपला जाऊन त्यांनी World Union of Freethinkers शी संपर्क साधला. स्वतःच्या जीवनात पूर्णपणे बुद्धिवादी असलेल्या प्रा. डॉ. अब्राहम कोवींर ह्यांनी निवृत्तीनंतर अथकपणे दोन दशके अंधश्रद्धा-निर्मूलनाची प्रभावी जनचळवळ केली. त्यांची 'Begone Godmen and Gods' आणि 'Demons and Spirits' ही पुस्तके आजही लोकप्रिय आहेत. सच्च्या विवेकवाद्यांप्रमाणे ते आपल्या मृत्युपत्रात लिहितात., ''मी मरण आणि पारलौकिक जीवनाबाबत भीती बाळगत नाही. एक चांगला आदर्श म्हणून माझ्या प्रेताचे दफन न

करता ते मेडिकल कॉलेजला विच्छेदनासाठी द्यावे. माझे डोळे नेत्रपेढीला द्यावे आणि माझ्या हाडांचा सांगाडा कॉलेजच्या प्रयोगशाळेस द्यावा' त्याप्रमाणे Thurston कॉलेजमधील विद्यार्थी आजही शरीरशास्त्राच्या अभ्यासासाठी त्यांच्या सांगाड्याचा उपयोग करतात.

डॉ. कोवूरांच्या पश्चात अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या चळवळीत स्वतःला झोकून देणारे दुसरे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे बसवा प्रेमानंद हे होय. केरळमध्ये थिऑसॉफिस्ट मातापित्यांच्या पोटी 1930 साली ते जन्मले. लहान वयात शाळा सोडून ते स्वातंत्र्यचळवळीत सामील झाले. आज गेले 30-40 वर्षे ते सर्वस्व पणाला लावून विवेकवादी चळवळीत सक्रीय आहेत. डॉ. कोवूरांचा सत्यसाईबाबाविरोधी लढा त्यांनी चालू ठेवला. 1975 पासून आजतागायत ते सत्यसाईबाबांच्या साम्राज्याशी टक्कर देत आहेत. 1986 मध्ये आपल्या पाचशे कार्यकर्त्यांना घेऊन पुट्टपूर्ती येथील साईबाबांच्या आश्रमावर त्यांनी मोर्चा काढला होता. त्यात त्यांना अटक झाली. साईबाबा हवेतून सोन्याची अंगठी निर्माण केल्याचा दावा करीत. तेव्हा त्यांच्यावर गोल्ड कंट्रोल ॲक्टखाली खटला भरण्याची भन्नाट कल्पना बी. प्रेमानंद यांचीच आहे. परंतु न्याय आणि शासनाचे हात बाबाबुवांच्या अनैतिक धंद्यापर्यंत पोचताना दिसत नाहीत. ह्याउलट बाबाबुवांच्या संस्था आणि संघटित धर्मसंस्था मात्र विवेकवादी चळवळीतील नेत्यांवर विविध न्यायालयांत वेगवेगळे अब्रुनुकसानीचे खटले दाखल करून त्यांना सळो की पळो करून सोडतात. आजतागायत ते एकही खटला जिंकले नसले तरी त्यांचे उपद्रवमूल्य बरेच आहे.

बी. प्रेमानंद ह्यांनी Federation of Indian Rationalist Associations (FIRA) ची स्थापना केली. देशभरातील वीसहून अधिक विवेकवादी संघटना FIRA च्या सदस्य आहेत. 2005 ला पुण्याजवळ वाघोली येथे त्यांचे संमेलन भरले होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समितीकडे यजमानपद होते. ह्या संमेलनाला नामवंत शास्त्रज्ञ, विचारवंत, माध्यमांचे प्रतिनिधी तसेच देशभरातून आलेल्या अनेक प्रतिनिधींनी हजेरी लावली. विवेकवादी चळवळी खऱ्या अर्थाने लोक-चळवळी कशा होतील ह्यावर विचारमंथन झाले. प्रकृती अस्वास्थ्याला न जुमानता बी. प्रेमानंद संमेलनाला उपस्थित होते.

बी. प्रेमानंद बाबाबुवांच्या चमत्कारामागील विज्ञान एखाद्या सराईत जादुगाराप्रमाणे प्रयोग करून स्पष्ट करतात. परदेशात त्यांचे टी.व्ही.वर सत्तरावर कार्यक्रम झाले आहेत. बी.बी.सी.ने काढलेल्या Guru Busters ह्या डॉक्युमेंटरीमध्ये ते पारलौकिक सामर्थ्याचा दावा करणारे हवेत तरंगणे, जिभेतून, पाठीतून त्रिशूळ, आकडे खुपसणे अशासारखे प्रयोग करताना दिसतात. त्यांची 26 एक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यातील Science Versus Miracles इत्यादी पुस्तके व त्याचे Indian Skeptic नावाचे मासिक देशविदेशात प्रसिद्ध आहे. 1976 मध्ये जेव्हा डॉ. कोवूरांना वयपरत्वे काम झेपेनासे झाले तेव्हा Indian CSICOP ची धुरा बी. प्रेमानंदांनी आपल्या खांद्यावर घेतली. डॉ. कोवूरांच्या पश्चात त्यांचे चमत्कार सिद्ध करण्याचे 1 लाख रुपयांचे आह्वान त्यांनी चालू ठेवले. केन्द्र



सरकारच्या NCSTC ने (National Council for Science & Technology Communication) त्यांना दक्षिणावृत्ती दिली होती. त्या अंतर्गत त्यांनी उत्तर भारतातील निवडक शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. त्यांची महाराष्ट्रातील 1982 मधील 'विज्ञान यात्रा' आणि 1987 मधील 'भारत जनविज्ञान जथा' चांगलाच गाजला.

महाराष्ट्रातील 'विज्ञान यात्रेची' पार्श्वभूमी मजेशीर आहे. 1982 च्या सुमारास श्रीलंकेहून केरळात आलेला एक सिद्धम् बाबा केवळ नारळाचे पाणी पिऊन जगत असल्याचा दावा करी. ईश्वराचे अस्तित्व आणि त्याची दैवी शक्ती सिद्ध करण्यासाठी तो आपल्या डोक्याने 101 नारळ फोडीत असे. सत्यसाईबाबांचे समर्थक असलेल्या मातृभूमी साप्ताहिकाने ह्यासंबंधीचे आह्वान जाहीर केले. बी. प्रेमानंद चांगलेच डिवचले गेले. त्यांना आठवडाभरात आपल्या डझन कार्यकर्त्यांना डोक्यावर नारळ फोडण्याचे प्रशिक्षण दिले. (फोडावयाचे नारळ पुरेसे कोवळे असण्यात सर्व चलाखी होती.) ह्याचे प्रात्यक्षिक आणि अन्य चमत्कार करीत कार्यकर्त्यांनी आख्खा केरळ पिंजून काढला. देशविदेशात ह्याचा बोलबाला होऊन ठिकठिकाणाहून त्यांना कार्यक्रमासाठी आमंत्रणे येऊ लागली. त्यातील एक होते पुण्याचे. प्रेमानंदांना वाटले पुण्याचा कुणी सनातनी आपली खोड जिरविण्यासाठी आपल्याला जाळ्यात ओढीत आहे. पण ते आमंत्रण निघाले 'क्लोरोफॉर्म'कार डॉ. अरुण लिमये ह्यांचे. प्रेमानंदांचे सप्रयोग भाषण ऐकून ते इतके अस्वस्थ झाले की अनेक सामाजिक संस्थांच्या आणि स्थानिक शिक्षणसंस्थांच्या मदतीने पुढील तीन महिन्यांसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांनी विज्ञान यात्रेचे आयोजन केले. नाट्यपूर्ण सादरीकरण, अतीन्द्रिय शक्ती दाखवा आणि 1 लाख रु. जिंका ही घोषणा, पाठीत हुक खुपसून गाडी ओढणे, आगीतून चालणे इत्यादी चमत्कार हजारोंची गर्दी खेचून आणत. विज्ञानयात्रेदरम्यानच कॅन्सरग्रस्त डॉ. अरुण लिमये यांचे निधन झाले. प्रेमानंदांनी दौरा चालूच ठेवला. ह्या झंझावाती दौऱ्याचा परिणाम हळू हळू विरत गेला. लोकविज्ञान परिषद व अन्य समाजवादी स्थानिक नेतृत्वाने ह्या यात्रेनंतर अंधश्रद्धा-निर्मूलनाचे लक्ष्य पुढे चालू ठेवले नाही.

ह्यानंतर तीन चार वर्षांनंतर 1986 मध्ये श्याम मानव व डॉ. नरेन्द्र दाभोलकर ह्यांनी विदर्भामध्ये पाच-सहा जणांच्या ट्रस्टच्या रूपात अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली.

□□

> झोपण्याच्या खोलीत वनस्पती ठेवण्यास अनेक लोक घाबरतात. अशा झाडांपासून पाळीव प्राण्यांपेक्षा अधिक धोका का होईल? तृणधान्ये आणि अननसासारख्या काही वनस्पती रात्री कर्बद्विप्राणिल वायूचे शोषण करतात.

**प्रभा पुरोहित**

# जोतीराव फुले यांचे अंधश्रद्धा-निर्मूलन कार्य

*भा. ल. भोळे*

जोतीराव फुले यांनी विश्वमानवाच्या मुक्तीसाठी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या दोन निष्ठावंत अग्रणींच्या आयुष्यातील दोन प्रसंग प्रारंभीच नमूद केल्यास अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या कार्यात त्या चळवळीने संपादन केलेल्या यशाचा प्रत्यय येऊ शकेल. पहिला प्रसंग ना. भास्करराव जाधवांच्या आयुष्यातला आहे. वेदोक्त प्रकरणी दुखावलेल्या शाहू महाराजांनी जेव्हा क्षात्र जगद्गुरूंची प्रतिष्ठापना केली तेव्हा भास्कररावांनी त्या कल्पनेस विरोध केला होता. एवढेच नव्हे तर महाराजांसह सर्व श्रेष्ठींनी क्षात्रजगद्गुरूंना अभिवादन केले तेव्हा, आपण सत्यशोधक असल्यामुळे कोणत्याही धर्मपीठापुढे नतमस्तक होणे आपल्या विचारांत बसत नाही हे त्यांनी स्पष्ट सांगितले होते. सत्यशोधकी विचार केवळ ब्राह्मणी जगद्गुरूंनाच नकार देत नसून संपूर्ण पुरोहितशाही आणि जन्मनिष्ठ विषमतेवर आधारित वर्णव्यवस्था यांनाच नाकारतो. कारण वर्णव्यवस्थेच्या मुळाशी उच्चवर्णीयांचे अहंगंड आणि निम्नवर्णीयांचे न्यूनगंड जोपासणारी अंधश्रद्धा आहे. ब्राह्मण वर्चस्वाची जागा क्षत्रिय वर्चस्वाने घेतली, किंवा ब्राह्मण-क्षत्रिय समतुल्य झाले तरी तेवढ्याने ही अंधश्रद्धा दूर होणार नाही, तर वर्णव्यवस्थेचे उच्चाटन झाले तरच तिचे निराकरण होऊन समताधिष्ठित समाज उभा राहू शकेल अशी सडेतोड भूमिका ना. जाधवांची होती.

दुसरा प्रसंग सत्यशोधकी विचाराचे खंदे व प्रभावी प्रसारक श्री. बाबूराव यादव यांच्याविषयीचा असून श्री. माधवराव बागलांनी तो आपल्या एका पुस्तकात नमूद केला आहे. शाहू महाराजांनी एकदा बाबूरावांना काही कामाने बोलाविले असता त्यांना येण्यास बराच उशीर झाला. महाराजांनी विलंबाचे कारण विचारले. बाबूराव महाराजांना घेऊन गॅलरीच्या टोकाशी आले आणि तिथून त्यांनी खाली सोडलेल्या आपल्या बैलगाडीकडे अंगुलिनिर्देश केला. महाराजांना काहीच कळेना. त्यांनी पाहिले बाबूरावांच्या गाडीत शेकडो लहानमोठ्या वेगवेगळ्या आकारांच्या लाल दगडांचा ढीग होता. उशिरा येण्याचा या दगडांशी काय संबंध? असा प्रश्न महाराजांच्या मुद्रेवर उमटला. बाबूरावांनी खुलासा केला. ''महाराज, आमच्या शेतकऱ्यांच्या बांधांवर बसून शेतकऱ्यांच्या मेंदूंचे फत्तर करून टाकणारे हे शेंदूरमाखले दगड मी येताना गोळा करीत बसलो. त्यामुळे दरबारात हजर होण्यास विलंब झाला!''

सत्यशोधक समाजाने वरपासून खालपर्यंत अशी अंधश्रद्धाविरोधी मानसिकता निर्माण केली होती याची साक्ष ते दोन प्रसंग देतात.



**नवसमाजनिर्मितीसाठी अंधश्रद्धा-निर्मूलन :**

स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक व आर्थिक न्याय, आणि शोषणरहितता या मूल्यांवर आधारित नवी समाजव्यवस्था जर निर्माण करायची तर जुन्या, विषम व शोषणप्रधान समाजव्यवस्थेला तिच्या पायाभूत मूल्यांसह उखडून टाकलेच पाहिजे अशी जोतीरावांची ठाम धारणा होती. पाया तसाच ठेवून वरच्या डोलाऱ्यात थातुरमातुर दुरुस्त्या करून नवसमाजनिर्मिती होणे शक्य आहे या सुधारकांच्या मताशी ते मुळीच सहमत नव्हते.

सामाजिक उच्चनीचता ईश्वरी संकेतानुसार किंवा पूर्वजन्मीच्या संचिताबरहुकूम असते, त्यामुळे तिचे निराकरण करण्याचा कोणताही प्रयत्न महत्पाप ठरतो हा विचार जोपर्यंत शोषित-वंचितांच्या मनीमानसी घट्ट रुतून बसलेला राहील, तोपर्यंत त्यांना समाजजीवनाचे नवे संकेत समजावून सांगणे केवळ अशक्य आहे, हे ओळखून जोतीरावांनी त्या अंधश्रद्धांवर कठोर प्रहार केले. ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामाण्य यांची मगरमिठी सोडवून बुद्धिप्रामाण्याची व विवेकनिष्ठेची महती त्यांनी गायिली. स्त्री शूद्रातिशूद्राच्या मानगुटीवर स्वार झालेल्या भ्रममूलक मिथकांचे वाभाडे काढले. धर्मग्रंथ रचणाऱ्यांची कुटील कारस्थाने वेशीवर टांगली. कर्मकांडांच्या जळमटांतून मुक्त अशी ईश्वरकल्पना 'निर्मिका'च्या रूपाने उभी केली. परलोकप्रधान जीवनदृष्टीच्या जागी इहलोकप्रधान दृष्टिकोन रुजवण्याचा खटाटोप केला. दैव—देवशरणता, फलज्योतिष, जारण-मारण, भूतबाधा, कर्मकांड, सोवळेपणा, विधी-संस्कार, बुवाबाजी वगैरे अंधश्रद्धांचे विविध आविष्कार कसे तर्कदुष्ट व खुळचटपणाचे आहेत हे त्यांनी परोपरीची उदाहरणे देऊन जनसामान्यांना पटवून दिले. त्याचबरोबर ज्या आर्थिक-सामाजिक दुरवस्थेमुळे स्त्री-शूद्रातिशूद्र अंधश्रद्धांना बळी पडतात ती दूर करण्यासाठी शोषित-वंचितांचे संघटित लढे उभारण्यातही त्यांनी पुढाकार घेतला.

**शूद्रांची ज्ञानबंदी :**

हिंदू धर्मग्रंथांबद्दलचे त्यांचे प्रतिपादन असे आहे की, ''धूर्त आर्यब्राह्मण ग्रंथकारांनी आपले मतलबी धर्माचे लिगाड शेतकऱ्यांच्या मागे... सफाईने लावले आहे''. ''त्यांच्या पूर्वजांनी रचिले भारूड । वेदांचे गारूड । वैरभावे ॥'' एकदा पराभूत केलेल्या शूद्रातिशूद्रांनी पुन्हा प्रतिकारार्थ उभे राहू नये म्हणून आर्यभटांनी कृत्रिम धर्माची उभारणी केली आहे. शूद्रांच्या द्वेषातूनच त्यांनी जन्माधारित उच्चनीचत्वाचे चातुर्वर्ण्य, शिवाशीव, सोवळेपणा वगैरेंची रचना केली. ''पुढे कित्येक शूद्रद्रोही भटग्रंथकारांनी जनाची तर नाही, पण मनाचीसुद्धा लाज न धरिता संधी पाहून त्या सोवळ्याचे इतके महत्त्व वाढविले की सोवळ्या भटास एखादे शूद्राचा स्पर्श झाला असतासुद्धा तो वास्तविक अपवित्र होतो, म्हणून त्यांनी धर्मशास्त्रासारखी अपवित्र पुस्तके करून ठेविली आहेत, व काही कालानंतर शूद्रास आपल्या पूर्वीच्या श्रेष्ठत्वाची आठवण झाल्यास ते कधीतरी आपल्या उरावर नाचण्यास कमी करणार नाहीत या भयास्तव शूद्रास मुळीच कोणी ज्ञान शिकवू नये म्हणून भटांनी बंदी केली.''

शूद्रांनी वेदाध्ययन करू नये, वेद त्यांच्या कानांवरही पडू नये अशा धर्माज्ञांचा हेतू स्पष्टतः सफाईने जुलूम करता यावा याखेरीज दुसरा असू शकत नाही.

**ईश्वर आणि कर्मकांड :**

अंधश्रद्धा-निर्मूलन कार्यकर्त्यांची ईश्वरविषयक भूमिका काय असावी? असा एक प्रश्न चळवळीत अनेकदा उपस्थित केला जातो. आणि निरीश्वरवाद, अज्ञेयवाद, आस्तिक्यवाद वगैरे अनेक विचारसरणींचा पुरस्कार केला जातो. या प्रश्नावरची साधकबाधक चर्चा बरीच विकोपाला जाऊन अखेरीस अनिर्णीत राहाते असा बहुधा अनुभव येतो. या संदर्भात जोतीरावांचे विचार अंधश्रद्धा-निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्यांना आजही मार्गदर्शक ठरू शकतील असे वाटते.

स्थूल अर्थाने फुले ईश्वरवादी होते कारण ते निर्मिक-कल्पनेचा पुरस्कार करतात. प्रार्थना व अन्य विधी करण्याचीही शिफारस करतात. पण त्यांच्या या प्रतिपादनाचा सूक्ष्म विचार केल्यास असे दिसते की समाजवादी-मार्क्सवादी विचारांच्या मंडळींनाही मान्य होऊ शकेल अशी त्यांची ईश्वरकल्पना आहे. जोतीरावांच्या मते चराचरसृष्टीचा निर्माता व नियंता असा एकच एक ईश्वर आहे. सर्व स्त्रीपुरुष मानवमात्र त्याचीच लेकरे, तो सर्वांचा पोशिंदा, न्यायकर्ता व उद्धारक आहे. मात्र त्याचे दर्शन वा साक्षात्कार मानवाला अशक्य आहे. देवदर्शनाची हाव हा जोतीरावांना शुद्ध वेडेपणा आणि ते झाल्याच्या कथा निरर्थक थापाडेपणा वाटतो. अनंत सूर्यांचे तेज एकत्र करूनही ''आपल्या महापवित्र, देदीप्यमान व तेजोमय निर्मिकाच्या तेजापुढे आपल्याच्याने उभे राहून त्याचे दर्शन घेववेल काय?'' असा स्पष्ट नकारार्थी उत्तर ध्वनित करणारा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

पूर्वीच्या माणसाला अज्ञानापोटी जेव्हा निसर्गप्रक्रियांचे स्पष्टीकरण ठाऊक नव्हते त्या कालात अस्तित्वात आलेले पूजाविधी ज्ञानप्राप्तीनंतरही टिकून राहिले याचे ऐतखाऊ पुरोहित पुजारी वर्गांचा स्वार्थ हे एकमेव कारण जोतीरावांना दिसते. ''कल्पनेचे देव कोरीले उदंड। रचीले पाखांड। हितासाठी॥ किन्नर गंधर्व ग्रंथी नाचवीले। अज्ञ फसवीले। कृत्रिमानें॥ निर्लज्ज सोवळें त्याचें अधिष्ठान। भोंदीती निदान। शूद्रादीक॥'' अशी मूर्तिपूजेची संभावना त्यांनी केली आहे. कारण त्यांच्या मते मूर्तिपूजा ही भिक्षुकशाहीची आधारशिळा आहे.

ईश्वरासाठी प्रचलित असलेल्या सर्व संज्ञा आराधना, भक्ती, पूजा वगैरे कर्मकांडांची सूचना करीत असल्यामुळे त्यांना त्याज्य ठरवून जोतीरावांनी जाणीवपूर्वक ''निर्मिक'' ही उपाधिविरहित संज्ञा स्वीकारली आहे. त्यांच्या मते कर्मकांडे फक्त निरर्थक आहेत म्हणूनच नव्हेत तर ती मानवमात्रात फूट पाडतात म्हणूनही वर्ज्य ठरतात. जोतीरावांनी प्रतिपादलेल्या सत्यधर्मात मूर्तिपूजा नाही, पोकळ नामस्मरण नाही, की क्रूर जीवहत्या नाही. त्याच्या आचरणामुळे कुणाचेही व्यक्तिस्वातंत्र्य गहाण पडणार नाही, स्त्री-पुरुष समतेला बाधा येणार नाही, की अन्यधर्मीयांना तुच्छ लेखले जाणार नाही. चोरी, व्यभिचार, व्यसनाधीनता, पिढीजात श्रेष्ठत्व, कपट, अन्याय, देवभोळेपणा इत्यादी दुर्गुणांना फाटा देणे



आणि स्वच्छता, सचोटी, गृहकृत्यदक्षता, सद्विवेक, सततोद्योग, सदाचार, श्रमप्रतिष्ठा, भूतदया वगैरे जीवनोपयोगी सद्गुणांची जोपासना करणे हे सत्यधर्माचे मुख्य उद्दिष्ट जोतीरावांनी सांगितले आहे.

**फलजोतिष :**

फलजोतिष हे शास्त्र आहे किंवा आकाशस्थ ग्रहगोलांच्या परिभ्रमणामुळे मानवमात्रास पीडा संभवते आणि ग्रहशांती केल्यास ती टाळता येते वगैरे कल्पनांवर जोतीरावांचा काडीमात्र विश्वास नव्हता. शेतकऱ्यांच्या घरी पुत्रजन्म होताच 'सोहोम कोहोम' नाद करीत कुडमुडे जोशीबुवा पोचतात. कुंडल्या पाहून विद्याहीन मातापित्यांना भयकंपित करतात. ग्रहमीषे मूढांना नागविले जाते. ग्रहपीडानाशासाठी जप-अनुष्ठानादी विधी केलेच पाहिजेत हे मनावर बिंबले म्हणजे हे दरिद्री पालक कर्ज काढून, भांडी कुंडी विकून यथाविधि सारे कर्मकांड करतात. मोठे संकट टळले अशा समाधानात ते असतात, पण त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे बालकाला वेळीच वैद्यकीय उपचार मात्र लाभत नाहीत. ताप येऊन मूल मरते कर्मकांड त्याला वाचवू शकत नाही.

**बुवाबाजी :**

स्वतःला रामाचे (किंवा बहुतेक वेळा) कृष्णाचे अवतार म्हणून घोषित करून लोकांसमोर येणारे व अंधश्रद्ध भक्तगणांना केवळ पैशाने लुबाडणारेच नव्हेत, तर त्यांच्या बायकांना पळवून संसारांची धूळधाण करणारे तथाकथित साक्षात्कारी बुवा, बाबा, स्वामी, महाराज, संतमहंत किंवा सद्गुरु ही मंडळी अंधश्रद्धा-निर्मूलनवाल्यांच्या रोषपूर्ण निषेधाला नेहमीच बळी पडत आली आहेत. निर्मिकाची भक्ती मानवाने विशुद्ध स्वरूपातच करावी, कोणताही मानवी वा भौतिक रूपाकार कल्पून करता कामा नये, असा आग्रह धरणारे जोतीराव हिंदूंची अवतारकल्पना संपूर्ण त्याज्य ठरवतात. 'ईश्वराला आपल्या कार्यासाठी मानवरूप धारण करावे लागते' असे समजणे, त्यांच्या मते, त्याच्या सर्वशक्तिमानपणाला बट्टा लावण्यासारखे होते. त्यामुळे देवादिकांचे अवतार म्हणून मिरवणारे सगळे दांभिक व ढोंगी असतात असा त्यांचा निष्कर्ष आहे.

**मिथकांचा विध्वंस :**

ज्या मिथकांचा जनमानसावर शेकडो वर्षांपासून पगडा बसलेला असतो आणि ज्यांनी त्यांची अंधश्रद्धा जोपासलेली असते अशी मिथके उद्ध्वस्त करण्याचे कार्य अंधश्रद्धा-निर्मूलनकारांना प्रत्येक काळात करावे लागते. परिपाठाने चालत आलेली सत्ता, संपत्ती व विशेषाधिकार यांची समाजातील विषम वाटणी कशी अस्तित्वात आली यांचे 'ऐतिहासिक' स्पष्टीकरण आणि ती कशी रास्त व आवश्यक आहे असे तिचे 'नैतिक' समर्थन मिथके सदा व सर्वत्र करीत असतात. ज्यांचे हितसंबंध समाजव्यवस्था आहे

तशीच टिकून राहण्यात गुंतलेले असतात ते त्या मिथकांना जिवापाड जपत-जोपासत असतात. पण ज्यांच्यासाठी समाजपरिवर्तन होणे निकडीचे असते अशांसाठी त्या मिथकांना उलथून फेकणे अगत्याचे ठरते. म्हणून समाजपरिवर्तनाची कास धरणाऱ्या धुरीणांना मिथके जनमनात कायम ठेवून पुढे जाताच येत नाही. त्यांना मिथकविध्वंसन करावेच लागते.

**जोतीरावांच्या अंधश्रद्धा-निर्मूलन कार्याचे वेगळेपण:**

जोतीरावांनी केलेल्या अंधश्रद्धा-निर्मूलन कार्याची व्याप्ती व खोली पाहिल्यानंतर त्यांच्या या कार्याची काही ठळक वैशिष्ट्ये अभ्यासकांसमोर येतात. पहिली गोष्ट ही की अंधश्रद्धेला केवळ मनोविकृती समजून केवळ जनसामान्यांचे मनोमालिन्य साफ करण्यातून वा मनोदौर्बल्य दूर करण्यातून अंधश्रद्धांचे निराकरण करता येईल असे जोतीरावांनी कधीच मानले नव्हते. अंधश्रद्धांचे मूळ मनात रुजलेल्या भ्रमांत व गैरसमजुतींमध्ये आहे हे खरे, पण याचा दोष त्या श्रद्धांना बळी पडणाराच्या माथी मारून चालणार नाही, आणि त्यांना मूर्ख, मागास वा वेडगळ ठरवून त्यांच्यावर तोंडसुख घेणे उचित होणार नाही तर त्यांना ज्या व्यवस्थेने अगतिक, अज्ञानी, निरक्षर व दरिद्री ठेवले त्या व्यवस्थेवर प्रहार केला पाहिजे याची त्यांनी सतत जाणीव ठेवली होती.

दुसरे वैशिष्ट्य असे दिसते की अंधश्रद्धा-निर्मूलनाची चळवळ जोतीरावांनी व्यापक सामाजिक-आर्थिक परिवर्तनाच्या चळवळींचा एक भाग म्हणून चालवली होती. समाजपरिवर्तनाच्या गतिशास्त्राचे अचूक भान जोतीरावांच्या अंधश्रद्धा-निर्मूलनविषयक प्रयत्नांमधून जाणवते. अंधश्रद्धेपोटी स्त्री-शूद्रातिशूद्र क्रियाशून्य होतात. सामाजिक विषमतांना व विकृतींना नैसर्गिक समजून त्यांच्या निराकरणाचे प्रयत्न न करता जगतात, सर्वांगीण शोषण बिनतक्रार सहन करतात, शास्त्रीय मार्गाचा अवलंब टाळून प्रसंगी आत्मघातही ओढवून घेतात – अशी जी सगळी अरिष्टमालिका निर्माण होते ती लक्षात घेऊन जोतीराव अंधश्रद्धानिर्मूलनाच्या कार्यास हात घालतात.

उपदेश, शिक्षण व पर्यायी आचारविचार एवढ्या गोष्टी देऊनही जर भोवतालची विषम आर्थिक चौकट जशीच्या तशीच राहिली तर अंधश्रद्धांचा कायमचा नायनाट कधीच होणार नाही याचे सतत भान ठेवून अंधश्रद्धा-निर्मूलनाच्या जोडीलाच दारिद्र्यनिराकरण व शोषणमुक्ती यांच्याही चळवळी सत्यशोधक समाजाच्या वतीने केल्या जात असत हे तिसरे वैशिष्ट्य लक्षात घ्यावे लागेल. त्या चळवळींचा तपशील प्रस्तुत लेखाच्या कक्षेत येत नसल्यामुळे फक्त एवढाच उल्लेख येथे पुरेसा आहे.

वरील विवेचनावरून अंधश्रद्धा-निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्यांना आपल्या चळवळीची परंपरा किमान शे-सव्वाशे वर्षे जुनी आहे आणि त्या परंपरेपासून आपणास बरेच काही शिकता येण्यासारखे आहे असे वाटल्यास या लेखनाचे सार्थक होईल.

[ *तिमिरभेद*, संपादक अंजली सोमण, या पुस्तकातून. ] □□



# गाडगे महाराजांचे अंधश्रद्धा-निर्मूलन कार्य

*श्रीकांत तिडके*

गाडगे महाराजांना संत का म्हटले गेले हेच कोडे आहे. रूढार्थाने आपण ज्यांना संत म्हणतो, त्या संतांसारखी एखादीही कृती गाडगेबाबांनी केली नाही. आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसाला आपण 'बाबा' म्हणतो या अर्थाने खेडुतांनी, गोरगरिबांनी त्यांना बाबा म्हटले आणि ते त्यांनी सहर्ष स्वीकारले असावे. पण महाराज? हे काय प्रकरण आहे? कुणी आपल्या सोयीसाठी त्यांना महाराज बनविले? कारण त्यांनी स्वतःच अनेक वेळा सांगितले आहे 'मी कोनाचा गुरु नाही अन् माझे कोनी शिष्यई नाहीत—' आपल्या भोवतीच्या सामाजिक दुःस्थितीचे अवलोकन करीत, त्यातून मार्ग शोधीत गाडगेबाबांचे लोकोत्तर आणि इहवादी तत्त्वज्ञान आकारले आहे, हे कुणी लक्षातच घेत नाही.

**गो.नी.दांडेकरांच्या चरित्राचे पूनर्मूल्यांकन व्हावे :**

गो.नी.दांडेकरांनी आपल्या 'खास' रसाळ शैलीत गाडगे महाराजांचे चरित्र लिहून महाराष्ट्रावर मोठे उपकार केले असे बाबांचे भक्तच जाहीर व्याख्यानातून सांगतात, तेव्हा त्यांची कीव येते. गाडगेबाबांना गृहत्याग केल्यानंतर एक सत्पुरुष भेटला आणि त्यांनी अनुग्रह केल्यामुळे गाडगे महाराज, 'महाराज' बनले हा दांडेकरांचा शोध त्यांच्या कामाची प्रेरणाच विकृत बनवितो याकडे कुणी कसे लक्ष देत नाही? गाडगे महाराजांनी स्वतः कधीही असे कुणी भेटल्याचे सांगितले नाही. उलट पायाला स्पर्श करणाऱ्या भाविकांना त्यांनी वारंवार काठीने बदडले आहे.

आपल्या भोवतीच्या प्रचंड आर्थिक आणि सामाजिक शोषणाच्या दर्शनातून हे प्रतिक्रियात्मक व्यक्तिमत्त्व कसे उभे झाले, हे दाखविणे ज्यांना समाजाची जातिप्रणीत चौकट कायम ठेवायची आहे त्यांना अडचणीचे वाटते. म्हणून मग कुण्यातरी साधुबुवाचा अनुग्रह होऊन गाडगेबाबा कार्यरत झाले असे सांगणे त्यांच्या दृष्टीने सोयीचे असते. गाडगेबाबांनी 'कीर्तना'द्वारे प्रबोधन केले यामुळेही त्यांना 'महाराज' बनविणे सोयीचे गेले. पण त्यांच्या कीर्तनपद्धतीकडे जरा चिकित्सकपणे पाहिले की, बाबांचे क्रांतिकारकत्व अधिक प्रकर्षाने जाणवते. नारदीय कीर्तनपद्धती, वारकरी कीर्तनपद्धती, राष्ट्रीय कीर्तनपद्धती यांमध्ये त्यांच्या कीर्तनाचा समावेश करता येत नाही. त्यांचे कीर्तन म्हणजे एका तळमळीच्या कर्त्या सुधारकाचे मुक्त आणि प्रगट चिंतन आहे. गाडगेबाबा निरक्षर होते. या निरक्षर माणसाने समाजाचे उद्बोधन आणि त्यातही ग्रामीणांचे करताना, कोणते माध्यम निवडावे? व्याख्यान? कोण आले असते त्यांच्या व्याख्यानाला? कुठलीही कृती करायला घाबरणारा आणि आत्ममग्न असलेला मध्यमवर्ग? आणि खेडूत तर व्याख्यान म्हटल्याबरोबर दोन हात दूर राहतो. आपले तळमळीचे विचार मांडण्यासाठी लोक जमविणाऱ्या कीर्तनाचा

आधार घेण्याशिवाय त्यांना पर्याय नव्हता. त्यांनी आपल्या सोयीची कीर्तनपद्धती बनविली. पण तीच प्रबोधनाच्या दृष्टीने परिणामकारक ठरली. आचार्य अत्रे यांनी म्हटले आहे ''सिंहाला पहावे वनात आणि गाडगेबाबांना पहावे कीर्तनात!''

**मूर्तिपूजेचा निषेध :**

दगडधोंड्यांची पूजा करण्यात काळाचा आणि पैशाचा व्यय करू नका, त्याच्यापुढे बकरा आणि कोंबड्या मारू नका, तीर्थक्षेत्रांना जाऊ नका. गंगास्नानाने पापे जातात असे म्हणणे हा धर्माचा शुद्ध काळाबाजार आहे, असे त्यांनी प्रत्येक कीर्तनात सांगितले. श्रोत्यांशी ते प्रत्यक्ष संवाद साधीत. ते विचारीत, ''देव किती?'' श्रोते म्हणत 'एक'. तुमच्या गांवी खंडोबा आहे का? आहेना, मग देव किती झाले, 'दोन' अशी वाढवीत वाढवीत देवांची संख्या ते दहाबारावर न्यायचे. श्रोत्यांच्या डोक्यात आपोआप प्रकाश पडू लागायचा. पुढे ते म्हणायचे, ''देव सोन्याचा केला तर त्याचा बाप सोनार झाला. लोखंडाचा केला तर त्याचा बाप लोहार झाला. या दगडधोंड्यांच्या नादी लागू नका आणि वेळ बर्बाद करू नका.'' असे ते आवर्जून सांगत. देवांवर, त्यांच्या मूर्तिपूजेवर हल्ला चढविताना ते तुकाराम आणि कबीर यांचे पुरावे घेत. आणि आपले म्हणणे सामान्य खेडुतांच्या गळी उतरवीत.

एखाद्या गावी ते कीर्तन लावीत. खेडुतांना विचारीत 'तीर्थाला गेलात नाई?'

श्रोते : होय, बाबा

बाबा : बोलला काई तुमचा देव?

श्रोते : नाई.

बाबा : इतक्या दुरून गेले तं जेवले-गिवले का, असं काईच नाई विचारलं? वारे! तुमचा देव?

देवांची आणि मूर्तिपूजेची गाडगेबाबांनी अतिशय त्वेषाने टिंगल केलेली दिसते. खेड्यापाड्यांमध्ये दगड-धोंड्याला शेंदूर माखून देव बनविले जाते. अशा शेंदूरमाखल्या देवांना त्यांनी नदीत उचलून फेकले. केवढे हे क्रांतिकारकत्व!

एका कीर्तनात ते म्हणतात, 'कसा बापा तुमचा देव? महादेवाच्या पिंडीवर कुत्रं अभिषेक करते तं तो 'हाडई' म्हणत नाही.' यापेक्षा कोणत्या शब्दांत मूर्तिपूजेवर आणि कर्मकांडांवर हल्ला करता येईल?

**जगात जाती दोनच :**

अस्पृश्यता केवळ कायद्याने जाणारी नसून मतपरिवर्तनाने जाईल, हे ओळखून अस्पृश्यतेसंबंधी आपले स्पष्ट विचार त्यांनी कीर्तनाद्वारा खेड्यापाड्यांतून आणि शहरांतूनही जनतेपुढे मांडले. ते म्हणायचे 'जगात जाती फक्त दोनच आहेत. एक पुरुष व दुसरी स्त्री. तिसरी जातच नाही. जो कोणी जात विचारीत असेल तो महामूर्ख होय. कोणी जात विचारील तर त्याला मी 'माणूस' आहे असे सांगा. जनावरात जसे गाढव, बैल, म्हैस,



कुत्रा इत्यादी जाती आहेत तशा मानवप्राण्यात नाहीत. तसे असते तर जनावरात जसा हा गाढव - हा बैल असे ओळखता येते, तसेच मनुष्यजातीत हा महार, हा कुणबी, हा ब्राह्मण असे ओळखता आले असते... पुढे त्यांनी म्हटले आहे, 'आपल्या देशातच फक्त 'शिवाशीव' हा शब्द आहे, शिवाशीव हा शब्द रशियात नाही, अमेरिकेत नाही, चीनमध्ये नाही. फक्त हिंदुस्थानातच आहे बाप्पा!' जातिभेद निर्मूलनासाठी असे प्रभावी प्रबोधन त्यांनी खेड्यापाड्यांमधून दिले.

गाडगेबाबा खेडुतांच्या मनातील अंधश्रद्धेचा मळ जसा खरडीत होते तसेच भोवतीचा कचराही साफ करीत होते. सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन ते ज्या ठिकाणी गेले त्या ठिकाणी त्यांनी रस्ते झाडले, नाल्या साफ केल्या. खेड्यातले अनेक आजार, व्याधी ह्या अस्वच्छ राहणी आणि कुपोषण यांतून निर्माण होतात हे गाडेबाबांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी स्वच्छतेवर भर दिला. या 'खराटाधर्माने' त्यांनी 'सार्वजनिक आरोग्य' आणि 'श्रमप्रतिष्ठा' अशा दोन साध्यांची प्राप्ती केली. महात्मा गांधींनी 'चरख्यातून स्वराज्य' दिले तसे गाडगेबाबांनी 'खराट्यातून सुराज्य' सांगितले.

खेड्यातली माणसे अस्वच्छ राहणीमुळे अनेक साथीच्या रोगांना बळी पडतात. आणि आजारी झाली की मांत्रिक, देवऋषी यांचा आश्रय घेतात हे गाडगेबाबांनी हेरले होते. 'आजारपणात डॉक्टरकडे जा. अंगारे-धुपारे, नवसतापास करू नका' असा कळकळीचा सल्ला खेडुतांना द्यायला ते कधी विसरले नाहीत. 'अंगात येणे' या ढोंगाचा तर त्यांनी अनेकवेळा आपल्या कीर्तनात नक्कल करीत-करीत निषेध केला.

**इहवादी दृष्टिकोण :**

गाडगेबाबांच्या चरित्रातली एक घटना अतिशय उद्बोधक आहे. महाराष्ट्रभर त्यांनी भ्रमंती केली. नासिकला ते गेले. तिथे एक पुरोहित पाण्यात उभा राहून मंत्र म्हणत होता. त्यांची चेष्टा करण्याची इच्छा गाडगेबाबांची झाली. ते नदीच्या पात्रात उतरले. नदीचे पाणी ओंजळीत घेऊन ते किनाऱ्याकडे फेकू लागले. तो पुरोहित संतप्त होऊन म्हणाला, 'अरे वेड्या! हे काय करतो आहेस? बाबा म्हणाले 'काई नाई, माझ्या वावराले पानी घालतो.' वावर म्हणजे शेत. 'कुठे आहे तुझे शेत?' 'जी वऱ्हाडात, मूर्तिजापूरपाशी दापुरा हाये तथी' — पुरोहित म्हणाला 'हे पाणी इतक्या दूर कसे जाणार?' बाबा म्हणाले, 'तुम्ही पितृमोक्ष अमावश्येला आपापल्या पितरांना अन्न स्वर्गात पाठवता मंग आम्हाला वऱ्हाडात पानी नाई पाठवता येनार काय?, अशा बुद्धिवादी युक्तिवादाच्या विनोदाची घुंगरे बाबांच्या चरित्रात अनेक ठिकाणी निनादताना दिसतात. गो.नी. दांडेकरांसारख्या चरित्रकारांना ती का दिसू नयेत?

सत्यनारायणासारख्या पोथ्यांचाही गाडगेबाबांनी कडाडून निषेध केला आहे. ते म्हणतात. साधुवाण्यानी सव्वा रुपयाचा प्रसाद वाटला आणि पोथी वाचली तर कलावती का लीलावतीची बोट पाण्यात तरंगली. 'असं अशीन तं मंग सारे भटजी सैन्यात पाठवा.

**श्रीकांत तिडके**

शत्रूच्या बंदुकीच्या गोळ्या परतावा म्हणा सत्यनारायणाची पोथी वाचून'. असे परखड विचार एका निरक्षर माणसाने मांडावे याचे कौतुक वाटते.

**शिक्षणावाचून माणूस म्हणजे धोंडा :**

भारतातल्या रोख दारिद्र्याचा शोध घेताना त्यांच्या लक्षात आले. शिक्षणाशिवाय आमचा उद्धार नाही. यासंबंधी बोलताना त्यांनी अनेकवेळा म्हटले आहे 'हे लोक का गरिबीत? ज्याले इद्या नसीन त्याले खटाऱ्याचा बैल म्हटले तरी चालेल! आता तरी सुधरा. मुलाले शिक्षण द्या. इव्हायाले पाहुणचार करू नका. पण मुलाले शाळेत घातल्याशिवाय राहू नका.'

सामाजिक तळमळीतून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था काढल्या. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक-सामाजिक कार्याला सक्रिय पाठिंबा दिला. स्वतः निरक्षर असलेल्या या माणसाने महाराष्ट्रातील खेडुताच्या हाती 'लेखणी' दिली. कशासाठी? त्यांना वाटले होते, शिक्षणानंतर समाजातील सामाजिक, आर्थिक विषमता कमी होईल, देव आणि देवाचे नावाने चालणारे कर्मकांड कमी होईल, जातिभेद आणि पशुहत्या थांबेल. पण काय झाले? शिकलेल्या आजच्या माणसांनी या सर्व गोष्टींना खतपाणी घातले आहे. जी गोष्ट निरक्षर माणसाला समजली ती आम्हा सुशिक्षितांना समजू नये हे केवढे आश्चर्य?

आपले कोणी शिष्य नाही. आपल्या कुटुंबीयांना कोणतीही सवलत मिळू नये हे आपल्या मृत्युपत्रात गाडगेबाबांनी आवर्जून लिहायला लावले. त्यांच्या कुटुंबीयांनी बाबांची त्यागीवृत्ती निष्ठेने जोपासली. त्यांच्या शिष्यांनी मात्र मिशन स्थापन केले. या मिशनने काय केले? जेवणाची सदावर्ते काढली. आश्रमशाळा काढून सरकारी अनुदाने मिळविली. गोरक्षणे काढून धनिकांची मर्जी संपादन केली. पण त्यांच्या क्रांतिकारी विचारांचे मिशन स्थापन करता आले नाही. तसे करणे गैरसोयीचे असावे. कारण धनिकांना भिकाऱ्यांविषयी, प्राणिमात्रांविषयी दया दाखविणे आवडते पण मुळात या विषमतेची चिकित्सा केलेली आवडत नाही. देववाद, दैववाद, अज्ञान, आरोग्यविषयक बेपर्वाई हे सर्व गेल्याशिवाय बहुजन ग्रामीणसमाज प्रगती करूच शकणार नाही. असंख्यांच्या अज्ञानी राहण्यातच मूठभरांचे शहाणपण टिकून असते. अशा मूठभरांना गाडगेबाबांच्या नावाने अशा 'मलमपट्ट्या' करणे सोयीचे वाटते, त्यांनी दाखविलेल्या मार्गाने मुळावर आघात घालणे नाही.

महाराष्ट्रात एका निरक्षर माणसाने आपल्या सर्व ताकदीनिशी अंधश्रद्धेवर आघात केले. आणि 'बुद्धिवाद' हा शब्दही माहीत नसून बुद्धिवादी विचारांचे लोण आपल्या परीने पोहचविण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट समविचारी माणसांनी कृतज्ञतेने स्मरणात ठेवावी.

[ *तिमिरभेद,* संपादक अंजली सोमण, या पुस्तकातून. ]

□□



# बाबासाहेब आंबेडकर व अंधश्रद्धा-निर्मूलन

*रणजित परदेशी*

डॉ. आंबेडकरांच्या अंधश्रद्धानिर्मूलन कार्याचा वेध घेताना त्यांच्या धर्मचिकित्सेचा आणि धर्मांतर चळवळीचा मागोवा घेणे अपरिहार्य ठरते. महाराष्ट्रात अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीची व्याप्ती प्रामुख्याने बुवाबाजी, चमत्काराचा दावा करणारे स्वामी, साक्षात्कारी असल्याचा प्रचार करणारे महाराज, झपाटणे, भानामती, वशीकरण विद्या, पुनर्जन्म, भावातीत ध्यान इ.च्या संदर्भातील प्रबोधनाची आहे. या सर्व अंधश्रद्धांची मुळे धर्माच्या तात्त्विक वा व्यावहारिक स्वरूपात आहेत. अंधश्रद्धानिर्मूलनाचा कार्यकर्ता मर्यादित उद्दिष्टाने व्यवहारातील उघड व बोचक अंधश्रद्धेच्या विरोधात कृती करीत असतो तर धर्मसुधारक आणि धर्मपरिवर्तक अंधश्रद्धांचे शक्तिसामर्थ्य असलेल्या ईश्वरवाद, आत्मवाद, अवतारवाद, पुनर्जन्मवाद, कर्मवाद या अध्यात्मवादी प्रवृत्तींची मूलगामी चिकित्सा करीत असतो. त्याही पलीकडे जाऊन अंधश्रद्धा जाणीवपूर्वक पोसणाऱ्या, प्रसारित करणाऱ्या जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था यासारख्या भौतिक व्यवस्थांविरोधी लढेही उभे करीत असतो. भारतीय प्रबोधन चळवळीच्या इतिहासात डॉ. आंबेडकरांच्या अंधश्रद्धानिर्मूलन कार्याची अनन्यता ही आहे की अंधश्रद्धांचा पाया असलेल्या वैचारिक आणि भौतिक या दोन्ही आधारांवर कृतिशील जनलढे उभारणारे ते एकमेवाद्वितीय समाजसुधारक आहेत.

**अंधश्रद्धाविरोधी वैचारिक व व्यावहारिक संघर्ष :**

या क्षेत्रात बाबासाहेब समाजवादी-साम्यवादी चळवळींनाही मार्गदर्शक ठरेल असे योगदान देतात. कोणत्याही आर्थिक वा राजकीय क्रांतीची पूर्वतयारी सामाजिक व वैचारिक क्रांतीने करणे आवश्यक असते ही त्यांची धारणा असल्याने भारताच्या प्रबोधन चळवळीत धर्मसुधारणेचे आग्रही प्रतिपादन करीत बाबासाहेब अग्रभागी राहतात.

'बुद्ध आणि त्याचा धम्म', 'शूद्र पूर्वी कोण होते?' 'जातिनिर्मूलन' 'रिडलस् ऑफ हिंदुइझम' अशा ग्रंथसंपदेतून त्यांनी सनातनी ब्राह्मणी व्यवस्थेवर वैचारिक हल्ले केले. 'बहिष्कृत भारत', 'प्रबुद्ध भारत', 'जनता' यासारख्या नियतकालिकांतून हिंदुधर्म व समाजव्यवस्था, बुद्ध धम्म आणि त्याची शिकवण, अस्पृश्यता-जातिभेद आणि त्यांचे निर्मूलन यांची अखंडपणे चर्चा केली. सभा-संमेलनातूनही त्यांच्या महानिर्वाणापर्यंत ते या जनसागराच्या आघाडीवर अथकपणे कार्यरत राहिले. परंतु धर्मविषयक प्रबोधनाबाबत त्यांची भूमिका केवळ विचारवंतांपुरती सीमित राहिली नाही. अस्पृश्यता, जातिभेद व स्त्रीदास्य यांना पावित्र्य प्रदान करणारा तत्त्वविचार व व्यवहार याविरोधात संघर्षाची भूमिका घेऊन त्यांनी जनलढेही उभारले. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह (1927), काळाराम मंदिर सत्याग्रह (1930-35), मुखेडचा पांडवप्रताप-सत्याग्रह (1932) पर्वती-सत्याग्रह अशा लढ्यांतून त्यांनी धर्मश्रद्धा व अंधश्रद्धा यासंबंधीच्या चिकित्सेच्या लाटा भारतभर

उसळवीत ठेवल्या. बौद्ध धर्माचा स्वीकार करून व दलित जनतेचे सामुदायिक धर्मांतर घडवून हिंदू धर्माला वैचारिक व व्यावहारिक धक्का दिला. बौद्ध-धम्मपरिवर्तनाची घटना हिंदुधर्मीयांना आपल्या अंधधर्मश्रद्धांबाबत आत्मटीकेची भूमिका घेण्यास भाग पाडणारी, जातिव्यवस्था आणि त्यावर उभ्या असलेल्या धर्माबाबत अपराधभावना व्यक्त करावयास लावणारी आहे.

## अंधश्रद्धेचे शक्तिस्रोत कोणते?

हिंदुधर्माची इतिहासातील विविध रूपे स्पष्ट करताना प्रा.गं.बा.सरदार 'धर्म व समाजपरिवर्तन' यात यातुविधी, वैदिक यज्ञ, देवताराधन, एकेश्वरवाद, ब्रह्मवाद इ.ची चर्चा करतात. डॉ. आंबेडकरांनी हिंदुधर्मातील या अंगाच्या विरोधात आयुष्यभर जनप्रबोधनाची वैचारिक चळवळ उभारली होती. अंधश्रद्धानिर्मूलनाची चळवळ ही गूढवादी, अगम्य अशा श्रद्धांच्या विरोधातील चळवळ आहे. डॉ.आंबेडकर जेव्हा आत्मा, अवतारवाद, चमत्कारवाद, वेदप्रामाण्य इ.वर हल्ला चढवितात तेव्हा तो अंधश्रद्धांविरोधी प्रबोधनाचा भाग असतो. हिंदुधर्मातील या वैशिष्ट्यांची रूपे म्हणून या संदर्भात समजून घेतली पाहिजेत. सृष्टीतील प्रत्येक पदार्थ, वृक्ष, प्राणी या सर्वांमध्ये यातुतत्त्व वसत आहे. विशिष्ट क्रिया आणि मंत्रपठण यामुळे ते जागृत होते, इष्ट फलप्राप्तीची क्षमता त्याच्या ठिकाणी निर्माण होते. या यातुविधीची अभिव्यक्ती आपणास आजही मांत्रिकाच्या व्यवहारातून दिसून येते. विधिपूर्वक केलेल्या अचूक मंत्रोच्चारातून फलप्राप्ती होते, *मंत्रशक्ती* ही किमया आहे व पाऊस, अन्न, पशुधन, संतती, रोगनिवारण, शत्रुनाश इत्यादि गोष्टी त्यापासून उद्भवतात, ही वैदिक यज्ञामागील श्रद्धा आहे. आजच्या साक्षात्कारी बुवा-स्वामींच्या 'सामर्थ्या'मागे वैदिक यज्ञाची ही श्रद्धाच काम करीत असते. देवताराधन पद्धती ही वैदिक यज्ञानंतरची विकासावस्था. पदार्थपूजेतून इच्छापूर्ती करण्याचे धर्माचरण त्यातून उद्भवले. यज्ञीय देवतांच्या पूजा-उपासनातून इच्छित साध्य केल्याचा दावा जो करण्यात येतो, त्याला धार्मिक आधार या परंपरेत आहे. ब्रह्मवाद बुद्धिप्रामाण्य वा अनुभवप्रामाण्यावर उभा नाही तर तो आत्म्याच्या श्रद्धेवर उभा आहे. 'आत्मा' या अद्भुत शक्तीचे प्रकटीकरण करणे, आत्मे जागे करणे, यांसारख्या अंधश्रद्धांचा पाया आत्मवादात आहे.

डॉ. आंबेडकर हिंदुधर्माची चिकित्सा करतात तेव्हा हिंदुधर्माच्या या विविध रूपांतील अध्यात्मवादी, गूढवादी शक्तिस्थानांनाच धक्का देत असतात. बुद्धिवाद, विवेकशीलता, मानवतावाद या आधारे ते प्रश्न उभे करतात त्याचवेळी बौद्धधर्म स्वीकारण्यामागची कारणमीमांसा स्पष्ट करत जातात.

'वेद हे ईश्वरनिर्मित आहेत, अपौरुषेय आहेत, त्यांची आज्ञा मानावी, असे सांगण्यात येते. परंतु त्याला इतिहासात कोठे पुरावा नाही. ब्राह्मणांखेरीज कोणीच वेदाला प्राधान्य दिलेले नाही.'

'... उपनिषदांच्या या कारखान्यातील ब्रह्म व आत्मा या दोन गोष्टींकडे पाहिले तर बुद्धाने त्यांपैकी एकही गोष्ट मान्य केली नाही. बुद्धाने सांगितले मला ईश्वर नको...,

.... 'बुद्धाला वेद मुळीच मान्य नव्हते.... वर्णव्यवस्थाही बुद्धाला मान्य नव्हती.



बौद्ध वाङ्मयात बुद्धाने चातुर्वर्ण्यावर पदोपदी प्रहार केलेले आहेत...'

'बौद्ध धर्मात मोक्ष-स्वर्ग या खुळ्या कल्पनांना स्थान नाही. उलट मानवी जीवित सुखसमाधानाने घालवायचे असेल तर मानवाने शुद्धाचरण, अहिंसा, समता, बंधुत्व या गोष्टींचा अवलंब करावा'.... *(डॉ.आंबेडकरांची भाषणे — मा.फ.गांजरे, खंड 7 मधून)*

डॉ. आंबेडकरांचे धर्मप्रबोधनाच्या क्षेत्रातील सर्वांत मौलिक योगदान म्हणजे बौद्ध धर्मांतराची त्यांनी उभी केलेली चळवळ.

1) अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीने भारतीय संदर्भात प्रेरणादायी वारसा कोणत्या ऐतिहासिक घटना, महापुरुषांपासून घ्यावा?

2) अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीचे तात्त्विक अधिष्ठान कोणते हवे? ब्राह्मणी वेदान्तवाद की अब्राह्मणी बौद्धवाद?

3) भारतीय इतिहास व संस्कृतीत वेदान्तवादाचा प्रतिकार करून विकसित झालेल्या अब्राह्मणी परंपरांतील अध्यात्मवादास नकार देऊन, या परंपरेची सामाजिक-धार्मिक पुनर्रचनेसाठी, पुनर्घटना कशी करावी?

4) अंधश्रद्धांचा प्रश्न धार्मिक श्रद्धा-व्यवहार या स्वरूपात धर्माच्या विचारव्यवहारात असतो. परंतु तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तो ब्रह्मवाद वा मायावाद म्हणून असतो. समाजशास्त्रात तो अध्यात्मवादी प्रभावाच्या रूपाने तर साहित्यात आत्मा, ब्रह्म, चातुर्वर्ण्य, परतत्त्व या ब्राह्मणी तत्त्वांच्या उदात्तीकरणाच्या रूपाने दडलेला असतो. या आणि इतर सर्वच क्षेत्रातील अध्यात्मवादी प्रवृत्तींशी संघर्ष देण्यासाठी कोणती अन्वेषणपद्धती स्वीकारावी?

आंबेडकरांच्या धर्मान्तर चळवळीने अशा प्रश्नांच्या संदर्भात उत्तरांचा शोध घेण्यासाठी समाजसुधारकांना-क्रांतिकारकांना मजबूर केले. डॉ. रावसाहेब कसबे त्यांच्या 'आंबेडकर व मार्क्स' या ग्रंथात बौद्ध धर्माची प्रगमनशीलता पुढील शब्दांत मांडतात —

'उपनिषदांनी जे तत्त्वज्ञान निर्माण केले होते, बुद्ध त्याच्या विरोधी होता. उपनिषदकारांनी आत्म्यावर सर्वाधिक भर दिला. आत्मा हा अभौतिक, शाश्वत व न बदलणारा आहे असे त्यांनी मानले. बुद्धाने उपनिषदांच्या विरोधात भूमिका घेऊन 'सर्व काही प्रवाही आहे' असे सांगितले. त्यामुळे जगाविषयी संपूर्ण वेगळ्या दृष्टिकोनास चालना मिळाली... कार्यकारणभावाचा वेगळा सिद्धान्त मांडणे बुद्धास भाग पडले. 'प्रतित्य समुत्पाद' या आपल्या तत्त्वाचे विवेचन बुद्ध करतो....' (पृ.149).

चिंतनाच्या दोन परंपरांचा भेद विशद करताना भदंत आनंद कौसल्यायन बौद्ध परंपरेतील 'प्रत्यक्ष अनुमानवादा'ची, अनुभववादाची प्रशंसा करतात. 'बौद्ध परंपरा व मार्क्सवादी परंपरा अनीश्वरवादी, अनात्मवादी आणि अनित्यतावादी आहेत तर इस्लामी, इसाई आणि हिंदुपरंपरा शब्दप्रामाण्याचा स्वीकार करणाऱ्या आहेत, असे वर्गीकरण ते मांडतात. बाबासाहेबांनी स्वीकारलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण वारशामुळे त्यांची भारतीय धर्मसुधारणा व प्रबोधनातील कामगिरी समकालीन समाजसुधारकांच्यापेक्षा वेगळी ठरते.

[ *तिमिरभेद,* संपादक अंजली सोमण, या पुस्तकातून. ]

□□

**रणजित परदेशी**

‘धरणाच्या भिंती खाली जाड असतात’ याचे शास्त्रीय स्पष्टीकरण देण्यासाठी केवळ पास्कलचा नियम वापरला जातो. पाण्याच्या दाबामुळे भिंत फुटू नये म्हणून ती खाली जाड असते हे खरे नाही. जगातील सर्वांत उंच धरणाच्या तळातही पाण्याचा दाब वातावरणाच्या केवळ 30 पट असतो. तेवढा दाब स्वयंपाकघकातील सिलिंडरलासुद्धा सहन होतो. पाण्याच्या दाबाचा टॉर्क पडत असल्यामुळे, संपूर्ण भिंत न फुटतासुद्धा कलथून आडवी पडू शकते. तसे होऊ नये म्हणून भिंत बाहेरील बाजूस अधिक उतरती असते.

हवेत वीस टक्के प्राणवायु असतो हे सिद्ध करणारा एक प्रयोग पाठ्यपुस्तकात दिला गेलेला आढळतो. त्यात पाण्याच्या टबात पेटलेली एक मेणबत्ती असते. त्यावर काचेचे भांडे उपडे ठेवल्यावर ती थोडा काळ पेटून राहून विझते. काही काळानंतर टबातील पाणी काचेच्या भांड्यात वर सरकलेले दिसते. हे वर आलेले पाणी वीस टक्के असेल तर प्राणवायू वीस टक्के असल्याचे सिद्ध होत असल्याच्या दाव्यात असे गृहीत धरले आहे की प्राणवायूला संपवून तयार झालेला कर्बद्विप्राणिल ($CO_2$) वायु पाण्यात पूर्णपणे शोषला जातो व पाणी वर येते. पण पाणी वर येण्याचे कारण वेगळेच आहे. मेणबत्ती पेटविल्यावर आजुबाजूची हवा गरम झाल्याने प्रसरण पावलेली असते. कालांतराने ती थंड झाल्यावर आकुंचन पावून पाणी वर चढते. पाण्यात शोषल्या गेलेल्या कर्बद्विप्राणिल वायूचे प्रमाण नगण्य असते.

*(पाठ्यपुस्तकांतील अशा अनेक चुकीच्या संकल्पनांविषयी द. ज. जोगळेकर यांनी नवशक्तीमध्ये लिहिले होते.)*

अन्स्र्ट हेकेल या जीवशास्त्रज्ञाने सुमारे दीडशे वर्षांपूर्वी काढलेल्या काही चित्रांचा वापर आजही काही पाठ्यपुस्तके करतात. हेकेल यांचे उत्क्रांतिशास्त्रासाठीचे योगदान मोठे असले तरी त्यांनी ontogeny recapitulates phylogeny हा सिद्धान्त मांडला. ‘प्रगत’ प्राण्याच्या गर्भाची वाढ होताना तो ‘खालच्या’ प्राण्यांच्या गर्भासारखा दिसत दिसत हळूहळू वरच्या प्राण्याचे शरीर धारण करतो या बाळबोध सिद्धान्तामध्ये किंचित तथ्य आहे परंतु ते ठळकपणे मांडण्यासाठी हेकेल यांनी चित्रांची थोडी हेराफेरी केली. ही बाब उघडकीस येऊन पंचवीस वर्षे झाली तरी काही पाठ्यपुस्तकांमध्ये चुकीची चित्रे असतात. निर्मितिवादी (creationist) लोक याचा फायदा घेऊन संपूर्ण उत्क्रान्तिशास्त्रावर टीका करण्याचा प्रयत्न करतात.

*(Example : http://upload.wikimedia.org/wikipedia/commons/7/7d/Haeckel_Anthropogenie_1874.jpg).*





# श्रद्धांचे सर्वेक्षण

*प्रमोद सहस्रबुद्धे*

सध्या खूप मोठ्या प्रमाणात लोक श्रद्धाळू झाले आहेत असे म्हणणारे विवेकी, तर लोकांना कसची चाड राहिली नाही असे म्हणणारे धार्मिक आपल्याला भेटत असतात. ही त्यांची मते दिखाऊ श्रद्धा वा अश्रद्धा जाणवल्यावर प्रगट होत असतात. म्हणजे अमक्या मेळ्याला काही लाख माणसे जमली, मोठा अपघात झाला त्यात सर्व यात्रेकरू होते, असे काहीसे ऐकू आले की विवेकी माणसांना समाजातील वाढत्या श्रद्धेची ओळख पटते. तर सणासुदीला सुट्टी घेऊन भ्रमण करणारे पाहिले; लग्न-श्राद्ध-मुंजीतील धार्मिक व्यवहारातील ढिलेपणा पाहिला की धार्मिकांना नेमकी त्याविरुद्ध जाण येते. नेमके काय घडते हे पाहण्यासाठी आजकाल सर्वेक्षणाचा उपयोग केला जातो. आता सर्वेक्षण या प्रकाराबाबतच भरपूर अश्रद्धा सापडते ते वेगळे.

भारतात झालेले श्रद्धांचे सर्वेक्षण हे आम्हाला माहीत नाही. पण प्रगत देशांत असे सर्वेक्षण बरेचदा केले जाते. ते खूप व्यापक असते. उदा. ‘प्यु फोरम’ने केलेले अमेरिकेतील सर्वेक्षण 35000 जणांमध्ये केले होते (जून 2008). हे सर्वेक्षण धार्मिकतेचे होते. आपण साईबाबा, गजानन महाराज, लालबागचा राजा, संतोषी माता इत्यादि नवीन देवतांकडे झालेल्या रांगा वा गर्दी, तर राम, विष्णू, शंकर, महादेव, ब्रह्मदेव अशा देवतांचे कमी होणारे पूजन बघून धार्मिकतेच्या बदलत्या स्वरूपाचा अंदाज बांधू शकतो. पण ‘प्यु फोरम’सारख्या सर्वेक्षणामुळे यांची नेमकी आकडेवारी कळते. युरोपातील देशांमधील नास्तिकतेचे सर्वेक्षण विकिपेडियात सापडते. सर्वांत जास्त नास्तिक फ्रान्स, झेकोस्लोवाकिया, स्वीडन येथे (25 टक्यावर), तर सर्वांत कमी तुर्कस्तान, रोमानिया, पोर्तुगाल (1-6 टक्के) येथे दिसते. अमेरिकेत हेच प्रमाण 5 ते 9 टक्के आढळते. ब्रिटनमध्ये अंधश्रद्धांचे सर्वेक्षण करण्यात आले (रिचर्ड वाईजमन) त्यात 13 आकडा अशुभ मानणारे 26 टक्के लोक आढळले.

निवडणुकींच्या निकाल व मतसंख्या यांवर होणारे सर्वेक्षण भारतात गेल्या 25 वर्षांपासून आहे. बरेचदा मतसंख्या व निवडणूक निकाल यात कमीजास्त होत असते. म्हणून निकालाचे फसलेले भाकीत लोकांना दिसते. मात्र अशा सर्वेक्षणाचे खूप फायदे होत असावेत. म्हणूनच आघाडीचे पक्ष त्यांचा आधार घेत व्यूहरचना करत असतात. बाजार पारखायला केलेली सर्वेक्षणे वा पक्षांनी केलेली सर्वेक्षणे यांचे निकाल बाकींच्यांसाठी नसतात म्हणून ती कुठे छापली जात नाहीत. पण या सर्वांचा चांगलाच उपयोग होत असावा. म्हणूनच चांगले पैसे देऊन ती करवली जातात.

कुठलेही सर्वेक्षण म्हटले की ते काय विचारून केले गेले (प्रश्न व विचारण्याची पद्धत) व कुठल्या लोकसमूहावर केले गेले, हे दोन महत्त्वाचे भाग असतात. या दोन्हींवर येणारे निकाल अवलंबून असतात. या दोन्हींत वैज्ञानिकता आणायची असेल तर प्रश्न निवडणे, विचारणे व लोकसमूहाची निवड करणे यासाठी निकष केलेले असतात. उत्तर देणारे आपले उत्तर कुठल्याही दबावाखाली देत नाहीत ना असे बघायचे असते आणि ज्या समाजात हे सर्वेक्षण असते त्या समाजातील लोकसंख्येचे प्रतिनिधित्व उत्तरकर्त्यांत दिसायला लागतो. एवढे सगळे निकष आले की तयारी भरपूर हवी. श्रद्धा हा भारतात नाजूक मामला गणला जातो. म्हणजे श्रद्धांना लागलेला धक्का पटकन सहन केला जात नाही. अशा वेळी सर्वेक्षण करण्यावर एक बंधन येते. प्रश्न विचारताना या बाबींचा नीट विचार करून ते निवडावे लागतात. कदाचित या बंधनाने थोडीफार वैज्ञानिकता हरपू शकते.

**सर्वेक्षणाची माहिती :**

आम्ही केलेले सर्वेक्षण हे तयारी आणि व्यापकता याबाबतीत थोडे कमजोर वाटेल. काही चुका झाल्या असतील. हे पहिले सर्वेक्षण मानले तर याबाबत क्षमा होईल असे वाटते. तयारी व बळ कमी असल्याने व्यापकता कमी होणार हे साहजिक झाले. प्रश्नसंख्या कमी असणे, उत्तरकर्त्याला कंटाळा न येता निवड करता येणे, हे त्यामुळे अध्याहृत झाले. स्वयंसेवक मुंबईचे असल्याने सर्वेक्षणाची व्यापकता ठरून गेली. एकंदर आठ प्रश्न व त्यांना उत्तराचे सहा पर्याय. शिवाय वय, शिक्षण व उत्पन्नगट यांची माहिती असे सर्वेक्षणाचे स्वरूप होते. कुठलाही गट निवडताना त्याची गट म्हणून बांधिलकी पूर्वीच ठरता कामा नये हा निकष देऊन स्वयंसेवकांनी या अकरा प्रश्नांची उत्तरे गोळा केली. जसजशी माहिती गोळा होत गेली तसतसा उत्साह वाढताना दिसला. यामुळे अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त उत्तरे मिळाली. उत्तरकर्ते प्रश्नावलीबाबत उत्साही होते असे वाटले. स्वयंसेवकांचे वैयक्तिक मत व उत्तरकर्त्यांचे मत यांत गणितीय संबंध लागला नाही (म्हणजे प्रामाणिकपणा असावा.). उत्तरकर्त्याचे नाव प्रश्नांसोबत कुठेच नोंदवले गेले नाही. हे मुद्दाम मनमोकळेपणे लिहिण्यासाठी केले गेले.

**विचारलेले प्रश्न व उत्तरे**

खालील विधानावर पुढील पर्याय सांगा.

अ- पूर्ण विश्वास, ब विश्वास, क- मत नाही,

ड- अविश्वास, इ पूर्ण अविश्वास, फ- चुकीचा प्रश्न

प्र 1 हे जग देवाने निर्माण केले.

प्र.2 आपली प्रार्थना देव ऐकतो व त्याचे फळ देतो.

प्र 3 देव प्रत्येक घटनेवर नियंत्रण ठेवून असतो.



प्र.4 पुराणकाळी मानव आजच्यापेक्षा जास्त प्रगत होता.

प्र 5 मंत्रामध्ये भलेबुरे करायची शक्ती असते.

प्र.6 काहीजणांकडे चमत्कार करण्याची शक्ती असते.

प्र.7 जन्मवेळेनुसार केलेल्या कुंडलीकडे वा हाताच्या रेषांकडे बघून जाणकार मंडळी तंतोतंत भविष्य सांगतात.

प्र.8 आयुर्वेद हे संपूर्ण विज्ञान आहे.

प्र.9 वय अ-0-18, ब- 18-35, क 35-60, ड 60 च्या पुढे

प्र.10 शिक्षण अ- बिगर शालांत, ब-शालांत, क-पदवीधर, ड-पदव्युत्तर

प्र.11 मासिक उत्पन्न अ- 5 हजारांखाली, ब- 5-10 हजार,
क- 10-20 हजार, ड 20-50 हजार, इ 50 हजारांवर.

**सर्वेक्षणाची उत्तरे :**

**तक्ता पहिला.**

**सर्व मिळून आकडेवारी एकंदर संख्या 250**

| | निर्माता देव | दाता देव | नियंत्रक देव | प्रगत भूतकाळ | मंत्रशक्ती | चमत्कार | कुंडली/हस्तसामुद्रिक | आयुर्वेदाची वैज्ञानिकता | वय | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्र.1 | प्र.2 | प्र.3 | प्र.4 | प्र.5 | प्र.6 | प्र.7 | प्र.8 | प्र.9 | प्र.10 | प्र.11 |
| अ | 37 | 28 | 26 | 16 | 12 | 8 | 8 | 27 | 3 | 13 | 10 |
| ब | 16 | 25 | 18 | 12 | 14 | 21 | 22 | 41 | 57 | 40 | 13 |
| क | 15 | 13 | 16 | 26 | 16 | 14 | 14 | 19 | 37 | 38 | 32 |
| ड | 13 | 13 | 16 | 22 | 23 | 24 | 28 | 7 | 2 | 10 | 33 |
| इ | 16 | 17 | 21 | 19 | 34 | 32 | 26 | 6 | - | - | 16 |
| फ | 3 | 4 | 3 | 4 | - | 1 | 2 | 1 | - | - | - |

एकूण उत्तरकर्त्यांत 3 टक्के जण 18 च्या आतले होते, 57 टक्के 18 ते 35 म्हणजे तरुण वयोगटातले होते, 37 टक्के 35 ते 60 वयोगटातले होते तर त्यावरील लोकांचे प्रमाण 2 टक्के होते. (काही जणांनी नीटशी माहिती न दिल्याने बेरीज 100 टक्के होणार नाही.) शालान्त परीक्षा उत्तीर्ण न झालेल्यांचे प्रमाण 13 टक्के होते, शालान्त ते पदवी या दरम्यानचे प्रमाण 40 टक्के होते, पदवी मिळवलेले 38 टक्के होते, व त्यावरील शिक्षण 10 टक्क्यांनी घेतले होते. शिक्षणात शालांत परीक्षा पास झाले व पदवीचे शिक्षण

**प्रमोद सहस्रबुद्धे**

चालू आहे अशा काही जणांचा समावेश आहे. त्यामुळे हे सुशिक्षितांचे प्रमाण कदाचित जास्त धरता येईल. पूर्ण कुटुंबाचे उत्पन्न मासिक 5000 पर्यंत उत्पन्न 10 टक्के लोकांचे होते, 5000 ते 10000 उत्पन्न घेणरे 13 टक्के होते, 10000 ते 20000 उत्पन्न 32 टक्के लोकांचे होते, 20000 ते 50000 उत्पन्न मिळवणारे 33 टक्के लोक होते तर त्यावरील उत्पन्न मिळवणारे 16 टक्के लोक होते. एकंदरीत प्रमाण मध्यमवर्गीयांचे जास्त दिसते. शैक्षणिक पातळी ही शालान्त व पदवीधारकांची जास्त दिसते. वयोगट तरुणांबरोबर दिसतो.

प्रश्नावलीत पहिले तीन प्रश्न देवासंबंधी होते. उरलेले पाच प्रश्न इतर श्रद्धांबाबत होते. देवाबद्दलचे प्रश्न हे नाजुकतेकडे वळतात. त्यामुळे प्रश्न असे निवडले होते की उत्तरे देताना कुठला अधिक्षेप होऊ नये. आठ प्रश्न म्हणजे आठ विधाने होती. त्यांवर असणारा विश्वास वा अविश्वासाच्या छटा उत्तरकर्त्याला द्यायच्या होत्या. ही आठ विधाने सर्वेक्षणाचा कल दाखवणारी नव्हती (असा दावा आहे.) कुठल्या दैवताचे वा व्यक्तीचे नाव त्यात नव्हते. देवासंबंधीचे प्रश्न वैयक्तिक देव मानणाऱ्यांना परिचयाचे होते. मात्र देवाऐवजी काहीतरी शक्ती असते असे मानणाऱ्यांसाठी सुकर नव्हते. त्यामुळे प्रश्न चुकीचा आहे असा पर्याय दिला होता. असे असल्याने काही उत्तरकर्त्यांची अशी प्रतिक्रिया आली की हे काही आस्तिकतेचे सर्वेक्षण नाही. आम्ही प्रश्नांची उत्तरे नकारात्मक दिली तरी आम्ही आस्तिक आहोत.

प्रश्नात नेमकेपणा नाही, अशी कुठून तक्रार आली नाही. कोणाच्या श्रद्धेला धक्का लावणारे प्रश्न आहेत, असेही एकानेही म्हटले नाही. तुमच्याकडून हीच अपेक्षा, असेही प्रश्नावलीचा कल निदर्शक उद्गार निघाले नाहीत. या प्रश्नांवर लोक सहिष्णु दिसले. एवढेच नाही तर आपले सहकारी वा मित्र आपल्यापेक्षा भिन्न विचार करतात हे बघून कुणाला फारसे वाईट वाटले नाही तर गंमत वाटत होती. या निमित्ताने या प्रश्नाचा काय छडा लागतो ते पाहू अशी उत्सुकताही लोकांनी दाखवली.

पहिल्या तीन उत्तरांतील घसरता विश्वास ही एक उल्लेखनीय बाब आहे. पहिली दोन उत्तरे (म्हणजे पूर्ण विश्वास व साधारण या श्रेणींची बेरीज केली तर जवळपास 60 ते 70 टक्के लोकांचा कल व्यक्तिरूपी देवाबाबत आस्तिकतेकडे झुकणारा आहे. यामध्ये 'चुकीचा प्रश्न' म्हणणारे 3 टक्के व शिवाय काही प्रतिक्रियांच्या आधारे हे प्रमाण अजून वाढवले तर ते साधारण 70-75 टक्क्यांकडे झुकेल, एकंदर नास्तिकतेचे प्रमाण हे 15-20 च्या घरात जाईल; तर अज्ञेयाकडे 10-12 टक्के असतील

पुढचे पाच प्रश्न हे देवासंबंधी नव्हते. देव मानणे वा न मानणे या उत्तरातून यांचा संबंध प्रस्थापित होईलच असे नव्हते. एक अपेक्षा मात्र होती की काहीतरी कल यातून प्रगट होईल. एकंदर उत्तरे बघता हा कल हळूहळू स्पष्ट होईल. बहुतेक प्रश्नांना समजून व प्रामाणिक मते दिली गेली असे सर्व सर्वेक्षणकर्त्यांचे मत होते. बहुसंख्य लोकांनी मात्र पुराणकाळचा प्रगत मानव, मंत्र, चमत्कार व फलजोतिष्य या चारही बाबतीत नापसंती



दर्शवली आहे. यात रस असणाऱ्यांची संख्या केवळ 33 टक्के आहे. तर सुमारे 50 टक्क्याच्या वर लोकांनी यास नकार दिला आहे. या संख्या समाजाचे एक वेगळे चित्र डोळ्यांसमोर आणतात. बहुसंख्य लोकांच्या मते आयुर्वेद हे संपूर्ण विज्ञान आहे (68 टक्के), त्यास नकार देणाऱ्यांची संख्या फक्त 13 टक्के आहे. कल दर्शवणारी मधली उत्तरे (साधारण विश्वास वा साधारण अविश्वास) देणारे लोक एकंदरीत मोठ्या संख्येने आहेत सर्व प्रश्नांमध्ये त्यांचे प्रमाण साधारण 30 ते 40 टक्क्यांच्या घरात सतत आहे. हे सर्व जण समाजात असलेल्या सावधपणाचे प्रतीक मानता येतील. मत नसणारे साधारणपणे 10-20 टक्के आहेत. प्रचारकांचे (दोन्ही बाजूच्या) लक्ष या लोकांच्या संख्येकडे असल्यास नवल वाटू नये.

### वय, शिक्षण व उत्पन्नाचा संबंध

कुमारवयीन व ज्येष्ठ मतकर्ते एकंदररीत्या फार कमी होते. त्यामुळे त्यांच्या उत्तराबाबत ठाम निष्कर्ष काढता येणार नाही. बाकी ठिकाणी प्रत्येक गटातील संख्या ठीक होती. या सर्वांचा संबंध आटोपशीर तक्त्यात मांडण्यासाठी निर्देशांकाची योजना केली. अ = 2 , ब =1, क =0, ड=-1 आणि इ=-2 असे धरून हा निर्देशांक काढला. जास्तीतजास्त 2 तर कमीत कमी -2 असा हा निर्देशांक होऊ शकतो. या निर्देशांकाने सर्वसाधारणपणे गटाला काय वाटते हे चित्र उभे राहते. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे. साधारणपणे यावरून असे म्हणता येईल की 1.5 ते 2 मधील निर्देशांक पूर्ण विश्वास दर्शवतो, 0.5 ते 1.5 म्हणजे विश्वास, 0.5 ते 0.5 (वजा 0.5) म्हणजे मत नसणे, -0.5 ते -1.5 म्हणजे अविश्वास तर -1.5 ते 2 म्हणजे पूर्ण अविश्वास.

**तक्ता 2. वयानुसार विभागवारी (आकडे निर्देशांकाचे)**

| | निर्माता देव | दाता देव | नियंत्रक देव | प्रगत भूतकाळ | मंत्रशक्ती | चमत्कार | कुंडली/हस्तसामुद्रिक | आयुर्वेदाची वैज्ञानिकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वय | प्र.1 | प्र.2 | प्र.3 | प्र.4 | प्र.5 | प्र.6 | प्र.7 | प्र.8 |
| 18 पेक्षा कमी | 1 | 1 | 1 | 0.43 | 0.57 | 0.86 | -0.43 | 0.71 |
| 18-35 | 0.32 | 0.38 | -0.09 | -0.01 | -0.47 | -0.58 | -0.67 | 0.68 |
| 35-60 | 0.55 | 0.27 | 0.3 | -0.4 | -0.68 | -0.59 | -0.13 | 0.85 |
| 60 च्या वर | 0.86 | 0.00 | 0.57 | -0.57 | -0.86 | -0.43 | -0.43 | 0.86 |

**प्रमोद सहस्रबुद्धे**

**तक्ता 3 शिक्षणानुसार विभागवारी**

| शिक्षण | प्र.1 निर्माता देव | प्र.2 दाता देव | प्र.3 नियंत्रक देव | प्र.4 प्राप्त भूतकाळ | प्र.5 मंत्रशक्ती | प्र.6 चमत्कार | प्र.7 कुंडली/हस्तसामुद्रिक | प्र.8 आयुर्वेदाची वैज्ञानिकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बिगर शालांत | 1.17 | 0.73 | 0.9 | -0.17 | -0.73 | -0.23 | 0.17 | 1.17 |
| शालांत | 0.78 | 0.69 | 0.38 | 0.16 | -0.27 | -0.59 | -0.61 | 0.8 |
| पदवीधर | 0.61 | 0.55 | 0.1 | -0.26 | -0.25 | -0.45 | -0.52 | 0.65 |
| पदव्युत्तर | 0.23 | 0.18 | 0.05 | -0.5 | -1.05 | -1.05 | -0.32 | 0.32 |

**तक्ता 4: उत्पन्नानुसार विभागवारी.**

| मासिक उत्पन्न | प्र.1 निर्माता देव | प्र.2 दाता देव | प्र.3 नियंत्रक देव | प्र.4 प्राप्त भूतकाळ | प्र.5 मंत्रशक्ती | प्र.6 चमत्कार | प्र.7 कुंडली/हस्तसामुद्रिक | प्र.8 आयुर्वेदाची वैज्ञानिकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 हजारापेक्षा कमी | 0.31 | 0.19 | 0.38 | -0.31 | -1 | -0.56 | -0.69 | 0.44 |
| 5-10 हजार | 0.81 | 0.66 | 0.59 | 0.26 | -0.16 | -0.06 | 0.13 | 1.25 |
| 10-20 हजार | 0.58 | 0.53 | 0.18 | -0.13 | -0.42 | -0.51 | -0.67 | 0.63 |
| 20-50 हजार | 0.48 | 0.37 | 0.09 | -0.32 | -0.55 | -0.68 | -0.44 | 0.74 |
| 50 हजारावर | -0.15 | -0.26 | -0.44 | -0.21 | -0.9 | -0.62 | -0.41 | 0.72 |



तरुण (18-35 गट) हा मध्यमवयीन (35 ते 60) गटापेक्षा कमी विश्वास ठेवणारा आहे. 18 च्या खालच्या व 60 च्या वरच्या वयोगटाची आकडेवारी अशा पद्धतीचे उत्तर काढण्यास पुरेशी नाही. शिक्षण व विश्वास यांत उतरती भाजणी मात्र स्पष्ट दिसते आहे. जसे जसे शिक्षण वाढत जाते तसतसा विश्वास कमी होताना दिसतो आहे. अगदी कमी उत्पन्न असलेला गट हा मध्यम उत्पन्नगटापेक्षा जास्त अश्रद्ध दिसतो. मध्यम उत्पन्नगटानंतर उतरती भाजणी दिसते. उच्च उत्पन्नाचा गट हा एकत्रितपणे अविश्वासाकडे झुकलेला दिसतो.

**एकंदरीत :**

'तुमचा देवावर विश्वास आहे का?' असा प्रश्न या सर्वेक्षणात विचारला गेला नव्हता. देवासंबंधीचे तीन प्रश्नांचा एकत्रित विचार केला तर या बाबतीत काही तर्क करता येईल. सर्वसाधारण या तीन प्रश्नांच्या निर्देशांकाची सरासरी 0.31 म्हणजे 'माहीत नाही' कडून विश्वासाकडे झुकणारी आहे.

उरलेल्या पाचपैकी पहिल्या चार (आयुर्वेदावरील प्रश्न सोडून) निर्देशांकाची सरासरी ही -0.18 म्हणजे माहीत नाही कडून अविश्वासाकडे झुकणारी आहे.

आयुर्वेदाचा निर्देशांक मात्र 0.76 म्हणजे विश्वासाकडे झुकणारा आहे. याच अंकात आयुर्वेद ही कशा प्रकारची अंधश्रद्धा आहे याचे विवरण करणारा लेख आहे. तो बऱ्याच जणांना वाद घालण्यासारखा वा उद्बोधित वाटू शकेल असे दिसते.

एकंदरीत सर्वेक्षणामुळे काही बाबी स्पष्ट झाल्या आहेत. साधारणपणे 30 टक्क्यांच्या आसपासचा तरुण व सुशिक्षित मराठी माणूस विवेकवादाच्या वाटेवर आहे असे दिसते. शिक्षणामुळे अंधश्रद्धेचे प्रमाण कमी होते असेही येथे दिसते.

या प्रश्नात आधुनिक अंधश्रद्धा तपासल्या गेल्या नव्हत्या. कदाचित यामुळे हे प्रमाण थोडे कमी होऊ शकते. तरीदेखील विवेकी चळवळीस हे चित्र नक्कीच आशादायक असावे. इतरांनी साथ दिल्यास असेच अधिक व्यापक सर्वेक्षण करता येईल व उत्तरे देखील जास्त निश्चितपणे देता येतील.

"If any remedy is tested under controlled scientific conditions and proved to be effective, it will cease to be alternative and will simply become medicine. So called alternative medicine either hasn't been tested or it has failed its tests."

— रिचर्ड डॉकिन्स

□□

**प्रमोद सहस्रबुद्धे**

'उत्तर गोलार्धात वारे उजवीकडे वळतात आणि दक्षिण गोलार्धात डावीकडे' हा नियम आपण भूगोलात पाठ केलेला आहे. परंतु स्वच्छतागृहातील पाण्याच्या भोवऱ्यांचे स्पष्टीकरण म्हणूनही कोरिऑलिस परिणाम नमूद केला जातो. वस्तुस्थिती अशी आहे की एवढ्या छोट्या जागेत कोरिऑलिस परिणाम अगदी दुबळा असतो. (त्याची शक्ती ठरविण्यासाठी आवश्यक असलेली आकडेवारी सर्वांना उपलब्ध आहे.) केवळ प्रयोगशाळेतील निश्चल पाण्याची दिशा त्यामुळे ठरते. वॉश बेसिनमधील पाण्याच्या भोवऱ्याची दिशा ठरविण्यासाठी पाण्याची मूळची गती, पाणी बाहेर पडण्याच्या मार्गाचा तपशील, तसेच पाण्याच्या तापमानातील असमानता कारणीभूत असतात.

'थंडीत आवाज दूरपर्यंत पोहोचतो' हे विधान ' शास्त्रीय कारणे द्या' या सदराखाली प्रश्नपत्रिकेत असते. 'अधिक घनतेच्या हवेत ध्वनीचा वेग अधिक असतो' असे त्याचे उत्तर अनेक शिक्षकांना 'अपेक्षित' असते. अधिक घनतेच्या हवेच्या थरावर कमी घनतेच्या हवेचा थर असतो. विरळ माध्यमाच्या दिशेने जाणाऱ्या ध्वनिलहरींचे संपूर्ण अंतर्गत परावर्तन होत असल्यामुळे आवाज पसरत नाही आणि म्हणून आवाज दूरपर्यंत ऐकू जातो हे स्पष्टीकरण अनेकांना सुचत नाही. वास्तविक मृगजळाच्या भौतिकशास्त्रात तसे स्पष्टीकरण आपण शिकलेलो असतो.



# लेखक-परिचय


**दि.य.देशपांडे** : *आजचा सुधारक*चे संस्थापक-संपादक

**नरेन्द्र दाभोळकर** : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष, 'साधना'चे संपादक,
परिवर्तन, सहयोग हॉस्पिटल, सदर बाजार, सातारा-415001.

**प्रमोद सहस्रबुद्धे** : स्थापत्यविशारद,
बी 4/1101 विकास कॉम्प्लेक्स, कॅसल मिल कंपाऊंड,
ठाणे 400 601.
E-mail : pramod_sahasrabuddhe@rediffmail.com

**मच्छिन्द्र मुंडे** : 502, ओम विश्वेश्वरदर्शन, ठाकुरवाडी, डोंबिवली (प.)

**प्रभा पुरोहित** : मुंबईतील भवन्स महाविद्यालयातून गणित विभागप्रमुख म्हणून निवृत्त. निवृत्तीनंतर अंनिस चळवळीशी निगडित.
1, विश्वाधार, नटवरनगर, 4 था रस्ता, जोगेश्वरी पूर्व,
मुंबई 400060. भ्रमणध्वनी : 9869835784

**निखिल जोशी** : डॉक्टर व बायोमेडिकल इंजिनिअर,
तत्त्वबोध, माथेरान रोड, कल्याण कर्जत हायवे, नेरळ,
(जि.रायगड), 410101,
भ्रमणध्वनी : 9820777286.
E-mail : atheist.nikhil@gmail.com

**उत्तरा सहस्रबुद्धे** : अधिव्याख्यात्या, राज्यशास्त्र विभाग,
बी 4/1101 विकास कॉम्प्लेक्स, कॅसल मिल कंपाऊंड,
ठाणे 400 601.
E-mail : suttara@rediffmail.com

**सुहास शिंगारे** : व्याख्याता, पदार्थविज्ञान विभाग, सिद्धार्थ कॉलेज
बी-6, त्रिनाथ सोसायटी, पी.डी.क्रॉस रोड, ठाकुरवाडी,
डोंबिवली (प.).

**संजय सावरकर** : 34-2-3, शंकरनगर, खलाइ, विद्याविहार, मुंबई 400086.
E-mail : savarkar.75@gmail.com

**श्रीकांत तिडके** : श्रीसंत गाडगेमहाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर येथे मराठीचे प्राध्यापक व प्राचार्य.

**रणजित परदेशी** : 13, नटराज कॉलनी, काझी प्लॉट, धुळे (महाराष्ट्र)